निवडक वरेरकर

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २९८०



REFBK-0023857

संपादक : सदा कऱ्हाडे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

29 JUN 19[illegible]
19 AUG 1984
6 NOV 19[illegible]
7 DEC 1986
[illegible] JUN 1989

(क्र. मा. प.)
५०००-१२-८२

साहित्य अकादमी



संदर्भ निबंध
२९८०
२३८५७
नवीन

निवडक वरेरकर

[कै. मामा वरेरकर यांच्या साहित्यातील निवडक वेचे]

: संपादन :
डॉ. सदा कन्हाडे

अभिनव प्रकाशन, मुंबई ४०० ०१४

: प्रकाशक :
वामन विष्णु भट
अभिनव प्रकाशन
५३ गुरु नानक मार्केट
डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४

©
श्रीमती माया चिटणीस
राघव वाडी, मुंबई ७

: प्रथमावृत्ती :
२७ एप्रिल १९८३
: मुखपृष्ठ :
श्री. बाळ ठाकूर

: किंमत :
पंचवीस रुपये

: मुद्रक :
दि. बा. म्हात्रे
विजया प्रिंटिंग प्रेस, झिराड
ता. अलिबाग जि. रायगड

[या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाने अनुदान दिले आहे.]

प्रस्तावना :

मामा वरेरकरांच्या जन्मशताब्दी समारोहप्रसंगी हा संग्रह प्रसिद्ध होत आहे. यातील औचित्य स्पष्ट आहे. पण अशा संग्रहाची फार आवश्यकताही होती. तोतन्परतेने तयार करून हाती दिला हे संपादक व प्रकाशक यांचे आपल्यावरील मोठे ऋण आहे.

संग्रहाची आवश्यकता मुख्यतः अशामुळे की वर्षानुवर्षे मामांची बहुतेक नाटके, कादंबऱ्या व इतर पुस्तके दुर्मिळ आहेत : सुजाण टीकाकारांना जी निर्विवादपणे महत्त्वाची वाटतात अशी पुस्तके देखील. मग अभ्यासासाठी, किंवा हौस म्हणून, ती वाचू इच्छिणाऱ्यांना एखादे मोठे ग्रंथालय शोधावे लागते. मोठी ग्रंथालये आपल्याकडे कमीच, आणि त्यातही ती पुस्तके मिळतीलच याची शाश्वती नाही. असा त्या वाचकाला नाउमेद करणारा संशोधनाचा खटाटोप निर्माण होतो. मामा गेल्याला अठरा वर्षेच झाली; पण ते प्राचीनांत जमा व्हावेत अशी त्यांच्या पुस्तकांची एकंदरीने अवस्था झाली आहे. त्यांच्या महत्त्वाच्या पुस्तकांचे तरी पुनर्मुद्रण करावे हे या समारोहाच्या उद्दिष्टांपैकी एक आहे. ते संपूर्णपणे सफळ होईल तेव्हा होवो–ते पैशाचे आणि वेळेचे काम आहे–पण मामांच्या साहित्याचा थोडा परिचय करून देतील असे प्रातिनिधिक वेचे तरी वाचकाला मिळायला हवेत. ते या पुस्तकाने साध्य होत आहे.

मामांची स्वतंत्र पुस्तके सुमारे नव्वद आहेत; त्याशिवाय सुमारे पन्नास भाषांतरे. मराठीच्या मापाने ही संख्या अतिविपुल वाटते. पण आरंभीची काही वर्षे सोडल्यास मामा लेखनावर जगले हे ध्यानात घेतल्यास ती तशी वाटणार नाही. विपुल लेखन करणाऱ्या अन्य लेखकांत चढ-उतार आहेत, तसे त्यांच्यातही आहेत. चढ कदाचित अधिक असतील.

आपण लेखनोपजीवी आहोत याचा, म्हणजेच लेखनव्यवसायाचा, मामांना अभिमान असे. आणि त्याकाळी तो व्यवसाय अति खडतर होता. पण उपजीविकेच्या सबबीखातर त्यांनी साहित्यात आपल्याला जे इष्ट वाटते त्याच्याशी प्रतारणा केली नाही. उदाहरणार्थ, रंगभूमीवर हमखास यश मिळवून देणाऱ्या, आणि तुलनेने सोप्या, मार्गाकडे त्यांनी जाणूनबुजून पाठ फिरवली. तो मार्ग म्हणजे सर्वपरिचित पौराणिक अथवा ऐतिहासिक कथानकावर नाटक लिहिणे, त्याला सर्वमान्य नैतिक मुलामा देणे, आणि त्यात गाण्याचा बोंगा मोठा ठेवणे. उत्तर काळातील त्यांच्या 'भूमिकन्या सीता' या नाटकाचा विषय आणि पात्रे पुराणातील आहेत, पण त्याचे नाट्यरूप आधुनिक आहे. इतक्या खऱ्या अर्थाने आधुनिक की ते सार्वकालीन आहे. आणि त्या नाटकाला कोठे गाण्याचा उपरा टेकू नाही. तेच त्यांच्या कादंबऱ्यांबाबत. वाचकाचे रंजन करावे, त्याला गुंगवावे, आणि भोवतालच्या जीवनाचा विसर पाडावा, या हिशेबी महत्त्वाकांक्षेने प्रेरित होणारे कादंबरीकार तेव्हा बाजारात जोरात चालत होते. ऐतिहासिक आणि सामाजिक ही त्यांच्या चालू साच्यांची नावे. ऐतिहासिकात धर्म-नीती या उच्च अंगांना उठाव;

सामाजिकात अर्थातच प्रणयाला. मामांच्या कादंबरीला या साऱ्यांशी कर्तव्य नव्हते. तिचे विषय वेगळे, वृत्ती वेगळी. त्यांच्या नाटकाप्रमाणे त्यांची कादंबरीही समकालीन वास्तवाचे दर्शन घडवू पाहाते. त्यांतील प्रमुख पात्रेही कित्येकदा तोवर त्या मानापासून दूर ठेवलेल्या वर्गातील असत; आणि तीही आपल्या नेहमीच्या रूपात, छानदार, रोमँटिक साज न चढवता. असे मामा काहीतरी नवे घडवू पाहात होते.

मामांच्या नाटक-कादंबरीतील वास्तव कधी ढोबळ असेल, कधी पुरेसे अर्थपूर्ण नसेल; कधी अप्रस्तुत अथवा गौण गोष्टीवर भर दिल्यामुळे चित्रणाचा तोल ढळला असेल; कधी संयम सुटल्यामुळे परिणामाला बाध येत असेल. पण रंगभूमी आणि साहित्य ही केवळ मनोरंजनाची साधने नाहीत, त्यांतून वस्तुस्थितीची स्वच्छ जाण यावी, तिच्या विकासाचा विचार रुजावा, याविषयीची मामांची कळकळ खरीखुरी होती. तिच्याशी इमान राखल्यामुळे त्यांनी उपेक्षा ओढवून घेतली. पण त्याबरोबरच तुलनेने, सर्वमान्य होऊन बसलेल्या लेखनाचा खोटेपणाही जाणत्या दृष्टीला उघडा केला.

मात्र मामांची उपेक्षा सामान्य वाचकांनीच केली असती तर ते समजण्यासारखे होते; कारण ते ज्या साहित्याचर पोसले होते ते निराळ्या प्रकृतीचे होते, भुलवणारे म्हणून सुखदायक होते; अनपेक्षिताचे दर्शन घडवून अस्वस्थ करणारे नव्हते. पण मामाची उपेक्षाच नव्हे, अवहेलना झाली, ती मुख्यतः साहित्यसृष्टीतल्या दोन गटांकडून. एक : त्यांचे क्षुल्लक वैयक्तिक दोष उगाळीत बसून त्यांच्याविषयी आकसाने लिहिणारा. दोन : वास्तवाविषयीच्या आणि समाजसन्मुखतेविषयीच्या, त्यांच्या भूमिकेला आग्रही विरोध असणारा.या दुसऱ्या गटातही दोन उपप्रकार होते : एक : ना. सी. फडके पठडीतील कलेसाठी-कला-वादी. दोन : दुसऱ्या महायुद्धानंतर काही काळ फोफावलेल्या एका विशिष्ट जातीच्या राजकारणाचे धार्जिणे असलेले कलावादी. ही सारी अवहेलना सामान्य वाचकांपर्यंत सतत पोचवली गेली. आणि मामा वरेरकर हे साहित्यात उपेक्षितच नव्हे, तर अस्पृश्य झाले, आणि कालांतराने विसरले गेले.

आपल्या समाजातील उपेक्षित आणि अन्यायग्रस्त वर्गाविषयी – स्त्रिया, खेड्यापाड्यातील दीन-दुबळे, गिरणीकामगार – मामांनी उमाळ्याने लिहिले. तो उमाळा जिवंत होता; पुस्तकांतून उचललेला नव्हता. आणि त्याचा उच्चार जिवंत भाषेत झाला. तो उमाळा आणि ती भाषा साहित्यसृष्टींतील परपुष्ट, आत्ममग्न बंदिस्त वर्गाला रुचणे-पचणे शक्य नव्हते. आणि वरचढ असणाऱ्या त्या वर्गाने मामांचे नाव पुसून टाकण्याचे महत्कृत्य केले.

ते नाव आणि त्यामागील लेखनाची कामगिरी सर्वसाधारण वाचक आणि प्रामाणिक अभ्यासक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या या पोटतिडिकेच्या प्रयत्नाबद्दल अभिनव प्रकाशनचे श्री. वामनराव भट यांना मनापासून धन्यवाद.

१५ एप्रिल १८९३

– मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष

ऋणनिर्देश :

मामा वरेरकरांच्या साहित्यातील निवडक वेचांचे **'निवडक वरेरकर'** हे पुस्तक त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने प्रकाशित करताना मला कर्तव्य-पूर्तीचा आनंद होत आहे.

१९४५ साली मामांना मी पहिल्याने भेटलो तेव्हा प्रकाशन व्यवसायाच्या क्षेत्रात मी अगदी नवखा होतो. परंतु मामांनी माझ्यावर संपूर्ण विश्वास टाकून शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांच्या एकापेक्षा एक सरस कादंबऱ्या प्रकाशनासाठी देऊन **अभिनव प्रकाशन** ' संस्थेला नावलौकिक आणि दर्जा मिळवून दिला. अनुवादित आणि स्वतंत्र अशी एकूण सव्वीस पुस्तके मामांची मी प्रकाशित केली. जवळजवळ अठरा वर्षे त्यांच्या सहवासात मी वावरलो. अगदी घरच्यासारखा त्यांचे गुण आणि दोष जवळून पाहिले. मामांचा आंधळा भक्त मात्र मी त्यावेळीही नव्हतो–आजही नाही.त्यानी लिहिलेला प्रत्येक ग्रंथ अक्षर वाङ्मयात जमा करण्याच्या योग्यतेचा आहे असा बेडगळ दावाही मी करणार नाही. तरी पण मला जाणवलेली एक गोष्ट इथे स्पष्टपणे नमूद करणे जरूर आहे; ती ही की मामांच्या उभ्या आयुष्यात त्यांच्या गुणांपेक्षा त्यांच्या अवगुणांवरच त्यांच्या हितशत्रूंकडून जास्त भर देण्यात आला. दुसरा एकादा माणूस या कुचेष्टायुक्त विषारी टीकेने नाउमेद झाला असता. हातातली लेखणी खाली ठेवून लेखनसंन्यास घेता. पण मामा या सर्व टीकाकार मित्रांना पुरून उरले आणि ताठ मानेने लिहीतच राहिले. याचे एक कारण म्हणजे लेखन हेच त्यांचे चरितार्थाचे एकमेव साधन होते–तो त्यांचा फावल्या वेळचा व्यवसाय नव्हता. आणि दुसरे म्हणजे त्यांची समाजहिताची तळमळ ओढूनताणून आणलेली नव्हती–ती खरीखुरी होती या समाजहिताच्या तळमळीतूनच त्यांचा सारा लेखनप्रपंच उभा राहिला. ते स्वतःला अभिमानाने ' साहित्य क्षेत्रातला मजूर ' म्हणवीत. लेखन हा त्यांचा ' धंदा ' नव्हता. तो त्यांचा धर्म होता –वृत्ती होती. त्यामुळे खाजगी बैठकीतल्या त्यांच्या संभाषणावर जो अश्लीलतेचा, क्वचित अर्वाच्यतेचा आरोप करण्यात येई, त्याचा लवलेशही त्यांच्या लिखीत साहित्यात सापडणार नाही. चरितार्थासाठी नाइलाजाने त्यांनी काही ' रहस्यकथा ' ही लिहिल्या. पण त्यांच्या ' कामकथा ' त्यानी कधी केल्या नाहीत.

मामांचे साहित्य आता ' कालबाह्य ' झाले आहे अशी भाषा वारंवार ऐकू येते.

विद्यापीठीय, महाविद्यालयीन आणि विद्यालयीन अभ्यासक्रमांच्या स्तरांवर मामांच्या साहित्याची जवळजवळ हकालपट्टीच झालेली आहे. मामांची (स्वतंत्र) पुस्तके बाजारात फारशी उपलब्ध नाहीत. साहजिकच मामांचे साहित्य आजच्या तरुण पिढीला तरी बरेचसे अज्ञात आहे.

१९०४ साली वयाच्या एकविसाव्या वर्षी त्यांनी आपले पहिले नाटक 'कुंजबिहारी' लिहिले तेव्हापासून वयाच्या ब्यायशीव्या वर्षापर्यंत म्हणजे उणीपुरी साठ

वर्षे मामा सारखे लिहीतच होते. आपल्या नाटकांतून ' कादंबऱ्यांतून त्यांनी विविध सामाजिक प्रश्न अगदी पोटतिडिकेने हाताळले. पतितपरावर्तन (संन्याशाचा संसार), हुंड्याची अनिष्ट रूढी (हाच मुलाचा बाप), ग्रामोद्धार (सत्तेचे गुलाम), अस्पृश्योद्धार (तुरुंगाच्या दारात), मजूर चळवळ (सोन्याचा कळस, धावता भोटा), वेठबिगार (चिमणी–स्वयंसेवक), स्त्री स्वातंत्र्य (विधवा कुमारी, गोदू गोखले), स्त्रीप्रतिष्ठा (भूमिकन्या सीता), अपहृत स्त्रियांचा प्रश्न (अ-पूर्व बंगाल), तमाशा (मी-राम जोशी), लेखकाची बांधिलकी (सारस्वत); इत्यादी मामांनी साहित्यबद्ध केलेले विविध प्रश्न खरोखरच ' कालबाह्य ' झाले आहेत काय ! खरी गोष्ट अशी आहे, की आजही यातील जवळजवळ सारे प्रश्न नव्या स्वरुपात आपल्यापुढे उभे आहेत मग कालबाह्यतेचा शिक्का मारून मामांचे सर्वच साहित्य निकालात काढणे कितपत उचित ठरेल ?

' काळजाचा ठाव घेणे ' हा जर साहित्याचा प्रधान गुण असेल तर मामांच्या साहित्यातील काही भाग आजही काळजाचा ठाव घेणारा असल्याचे विचक्षण वाचकांना आढळून येईल.

मामांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने तरी त्यांच्या साहित्याकडे आजच्या पिढीचे लक्ष जाईल आणि ती आस्थेवाईकपणे त्या साहित्याचे परिशीलन करील अशी आशा करू या.

मामांच्या साहित्यातून वेचक उतारे निवडून काढून ते संपादित करण्याची जबाबदारी मित्रवर्य **डॉ. सदा कऱ्हाडे** यानी आपण होऊन घेतली आणि ती उत्तम रीतीने पार पाडली याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. श्रीमती **माया चिटणीस** यानी मामांचे अप्रकाशित साहित्य उपलब्ध करून दिले, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या श्रीमती **लतिका जोशी** यानी मामांच्या साहित्याची **' संदर्भसूची '** तयार करून दिली. चित्रकार **बाळ ठाकूर** यानी पुस्तकाला साजेसे चित्र काढून दिले. श्री. **दिनानाथ म्हात्रे** यानी थोड्या वेळात वेधक छपाई करून दिली. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाने अनुदान देऊन पुस्तकाचे मूल्य कमी ठेवण्यात मदत केली आणि अगदी आयत्या वेळी विनंती करूनही मामांचे स्नेही प्रा. **मं. वि. राजाध्यक्ष** यानी छोटीशी प्रस्तावना लिहून दिली त्याबद्दल या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

— वामन विष्णु भट

अनुक्रमणिका :

पृष्ठ :

१. प्रास्ताविक : ९

२. लेख व भाषणे

(१) वाङ्मय आणि वास्तववादी यथार्थता २२–२८

(२) नव्या जगाची निर्मिती २९–३३

(३) साहित्य आणि प्रेरणा ३४–३७

३. आत्मचरित्र

(१) पहिली मागणी ४०–४७

(२) बंगाली रंगभूमी ४८–४९

(३) गडकरी यांची भेट ५०–५४

(४) महाराष्ट्र रंगभूमि आणि राजकारण ५५–५६

(५ लो. टिळक बरेरकरांचे नाटक पाहातात ५७–५९

(६) नाटकांचा प्रेक्षकवर्ग ६०-६३

(७) आधुनिक नेपथ्याचा पहिला प्रयोग ६३–६५

(८) पहिली डॉक्युमेन्टरी ६६–६७

(९) गांधीजींचा मिठाचा सत्याग्रह ६८–७२

४. नाट्य :

(१) हाच मुलाचा बाप ७६–८६

(२) संन्याशाचा संसार ८७–९२

(३) सत्तेचे गुलाम ९३–९८

(४) सोन्याचा कळस ९९–१०६

(५) उडती पाखरे १०७–११६

(६) सारस्वत ११७-१२४

(७) भूमिकन्या सीता १२५–१३०

(८) नवा जमाना (एकांकिका) १३१–१५०

(९) जरठ (श्रुतिका) १५१– ५७

५. कथा-कादंबरी

(१) पुढाऱ्यांचा पुढारी १६७–१७३

(२) देव आणि देवी १७४–१८१

(३) मी पुन्हा ढोल घेतला १६१–१६६

(४) बादलानंतर (कथा) १८२–१९०

. संदर्भसूचि १९१–१९३

७. वाङ्मयसूचि १९४–२१०

प्रास्ताविक :

मामा वरेरकर आणि त्यांचे साहित्य

भार्गवराम विठ्ठल उर्फ मामा वरेरकर यांचा जन्म २७ एप्रिल, १८८३ रोजी चिपळूण येथे झाला. त्यांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील मालवण. त्यांचे वडील टपालखात्यांत नोकरीस होते. सेवानिवृत्तीनंतर ते मालवणास येऊन राहिले. त्यावेळी मामांचे वय सात आठ वर्षांचे असावे. तेव्हांपासून मालवण, मालवणी माणूस, मालवणी जीवन हे त्यांचे विशेष अभिमानाचे विषय. त्यात एकंदरीत कोकण हा मागासलेला आणि म्हणून उपेक्षित राहिलेला परिसर. पुण्या-मुंबईकडच्या माणसाची कोकणी माणसाकडे पाहण्याची वृत्तीही अपेक्षेपेक्षा उपेक्षेची. त्यामुळे मामांचा कोकणी माणसाविषयीचा अभिमान पुढे त्यांच्या व्यक्तित्वाचा एक विशेष बनत गेला. शाळेतील अभ्यासात फारसे न रमलेले त्यांचे मन अवांतर वाचनांत,विशेषतः नाटकात फार रमले नाटक वाचणे, नाटक पाहाणे, स्वतः नाटक लिहिण्याचा प्रयत्न करणे यातच त्यांचा पिंड घडत गेला. १८९८ मध्ये त्यांच्या वडिलांनी त्यांना शाळेतून काढून रत्नागिरीस सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मेडिकल प्यूपिल म्हणून पाठविले. तिथे डॉक्टर कान्होबा रणछोडदास कीर्तिकर ह्यांचा सहवास,प्रोत्साहन आणि मार्गदर्शन त्यांना लाभले. कीर्तिकरांच्या वैयक्तिक ग्रंथभांडारात मामांचा शेक्सपियर, मोलियर, इब्सेन या पाश्चिमात्य नाटककारांशी गाढ परिचय झाला. त्याचप्रमाणे प्रख्यात असलेल्या कादंबरीकारांच्या कादंबऱ्याही वाचायला मिळाल्या. आणि लेखक म्हणून मामांची 'पूर्वसिद्धी' झाली. अल्पवय व शारीरिक दुबळेपण या कारणांमुळे वैद्यकीय खात्यात ते 'प्यूपिल' म्हणूनही अपात्र ठरले. पण त्याच काळात साहित्यिक म्हणून त्यांची जी पूर्वसिद्धी होत होती, त्याआड ही कारणे कधीच आली नाहीत.

वर्ष दीड वर्षात मामा टपाल खात्यात नोकरीस लागले. रत्नागिरी, चिपळूण, दापोली, धरमतर, रोहे,सावंतवाडी, संगमेश्वर अशी नोकरीनिमित्त; भ्रमंती त्यांनी केली.

नोकरीच्या काळातच त्यांनी अनेक नाटककंपन्यांची नाटके पाहिली. नाटक आणि रंगभूमी यांच्याशी व एकंदरीत साहित्याशी संबंध असलेल्या अनेक मान्यवर रसिक-मंडळींशी त्यांचा परिचय झाला. गार्डनरने एका निबंधात म्हटले की अनुभव हाच जीवनाचा खरा शिक्षक आहे. या काळात मामा अनुभवांतूनच खूप शिकत होते. आपण पदवीधर शिक्षित नाही, याची खंत त्यांनी कधीकाळी बाळगली असेल. पण वास्तव जीवनानुभवांनीच आपल्याला खूप शिक्षित केले याविषयीचा अभिमान मात्र त्यांनी शेवटपर्यंत मिरवला. पण महत्त्वाची गोष्ट ही, की वास्तव जीवनातील अनुभवांचीच अभिव्यक्ती करण्याची प्रतिबद्धता त्यांनी स्वीकारली. त्या प्रतिबद्धतेशी ते अखेरपर्यंत प्रामाणिक राहिले. मराठीतील वास्तववादी सामाजिक नाटक कादंबऱ्यांच्या परंपरेत त्यांचे नाव हरिभाऊ आपटे यांच्यानंतर अग्रक्रमानेच घ्यावे लागले. नोकरीच्या काळातच त्यांनी 'कुंजविहारी' (१९०८) या नाटकाने आपल्या प्रदीर्घ 'नाटकी संसारा' ला प्रारंभ केला. आणि 'हाच मुलाचा बाप' (१९१७) या नाटकाने वास्तववादी सामाजिक नाटकांचा युगारंभ केला. 'संसार की संन्यास?' (१९११) ही कादंबरी लिहून कादंबरीच्या क्षेत्रातही आपली मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या नोकरीचा काळ हा राजकीय प्रबोधनाचा व असंतोषाचा काळ होता. उघडउघड राजकीय प्रबोधन करण्याचा प्रयत्न करणे शक्य नव्हते, हे लोकमान्य टिळकांवरील राजद्रोहाच्या खटल्याने आणि 'काळा'तील निवडक निबंधांवरील जप्तीने निदर्शनास आणून दिलेच होते. 'कीचकवध' नाटकावरही बंदी आली होती. नाटक हे लोकजागृतीचे, लोकक्षोभाचे समर्थ साधन आहे ही जाणीवही मामांना या काळात झाली होती. सरकारी बंधने कडक झाली अशा वेळी मामा 'तमाशां' कडे वळले. सरकारी बंधनांमुळे जी कथानके नाटकाला वर्ज्य ठरली असती त्याच कथानकांवर त्यांनी खजिनदारांच्या तमाशासाठी (हा तमाशा 'महाराष्ट्र संगीत मंडळी' असे आपले नाव लावीत असे) नवे तमाशे लिहिले. मामा वरेरकरांच्या त्या महत्त्वपूर्ण कालखंडातील प्रतिबद्धतेची आज फारशी कुठेच नोंद नाही. परंतु मामांनी हे सर्व नोकरीच्या काळात केले. हा काळही अवघ्या बीस वर्षांचा–१८९९ पासून १९१९ पर्यन्तच होता. त्यानंतर लेखन व्यवसायाव्यतिरिक्त कोणताही व्यवसाय करायचा नाही अशी निश्चिती करून मामांनी स्वेच्छेने सेवानिवृत्ती पत्करली

त्यानंतरच्या काळात मामांनी साहित्याच्या बहुतांशी क्षेत्रांत विपुल आणि विविध प्रकारचे लेखन केले. आयुष्याच्या अखेरपर्यंत ते लेखन करीतच होते. त्यांच्या एकंदरीत लेखनाचा प्रदीर्घ कालखंड सुमारे साठ वर्षांचा. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी लिहिले. स्वातंत्र्योत्तर कालातही लिहिले. या काळात त्यांना लोकप्रियता लाभली, लोकमान्यता लाभली. सगळे मानसन्मानही लाभले. १९४५ साली धुळे येथे भरलेल्या मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद त्यांना मिळाले. त्यापूर्वी बडोदे येथील मराठी वाङ्मय परिषदेचे अध्यक्षपद १९३२ मध्ये त्यांना मिळाले, १९३६ मध्ये मुंबईच

उपनगर साहित्यसंमेलन आणि १९३८ मध्ये 'नाट्यसंमेलन पुणे' ह्यांच्या अध्यक्षपदी त्यांची नियुक्ती झाली. १४ ऑगस्ट १९४३ रोजी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या ४४ व्या वाढदिवशी त्यांनी अध्यक्षपद भूषविले आणि त्यापूर्वी १९४३ मध्येच त्यांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाली; त्यानिमित्त मुंबई येथील वागळे हॉलमध्ये न्या. मू. पु. मं. लाड यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा जाहीरपणे हृद्य सत्कार झाला. त्यांच्या दीर्घकालीन साहित्यसेवेबद्दल त्यांना १९५६ मध्ये 'पद्मभूषण' ही पदवी मिळाली आणि राज्यसभेचे सभासद म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १९६३ मध्ये त्यांना 'संगीत-नाटक-अकादमी'ची फेलोशिप मिळाली. अन्य भारतीय भाषांतील साहित्याशी,साहित्यिकांशी आणि साहित्यसंस्थाशी त्यांचा घनिष्ठ संबंध आला. शरच्चंद्र चटोपाध्याय, प्रभातकुमार चटोपाध्याय, बंकिमचंद्र चटोपाध्याय रवीन्द्रनाथ टागूर यांच्या बंगाली साहित्यकृती त्यांनी मराठीत आणल्या, नाटक-कादंबरीप्रमाणेच त्यांनी स्वतः कथा लिहिल्या, त्यांचे तीन संग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्या एकांकिकांचे तीन संग्रह प्रसिद्ध आहेत. चार भागात त्यांनी आपली आत्मकथा प्रसिद्ध केली आहे. त्यांची भाषणे व लेखही विपुल आहेत.

२ जुलै १९२७ मध्ये भारतात 'आकाशवाणी' ला प्रारंभ झाला. तेव्हांपासून मामांचा आकाशवाणीशी संबंध होता. आकाशवाणीसाठी त्यांनी संवाद लिहिलेत. श्रुतिका, नभोनाट्य या लेखन प्रकारांच्या क्षेत्रांतील आद्यत्वाचा मान वास्तविक त्यांनाच द्यायला हवा. ध्वनिमुद्रिकांचे युग सुरू झाले तेव्हापासून मामा त्याही क्षेत्राशी संबंधित आणि विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकातील त्यांची चित्रपट-सृष्टीतील व चित्रपटव्यवसायातील कामगिरीही ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची आहे. जिथे जिथे आणि ज्या ज्या रूपांत नाट्य असे, तिथे तिथे मामांचे अस्तित्व होते.

हिंदी, गुजराती, तामिळ, मल्याळम, इत्यादी अन्य भारतीय भाषांतही मामा वरेरकरांच्या साहित्याचे नाव दुमदुमले. इतके वाङ्मयीन कर्तृत्व जमेच्या बाजूने असणारा आणि इतके मान-सन्मान लाभलेला त्यांच्या समकालीन पिढीतला श्रेष्ठ साहित्यिक क्वचितच आढळेल.

असे असले तरीही विद्यमान मराठी साहित्य समीक्षेने त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाची कितीशी दखल घेतली ? आजच्या समीक्षामूल्याच्या अनुषंगाने आलोचक त्यांच्या साहित्याची आलोचना करताना त्यांच्या जमेच्या बाजूकडे दुर्लक्ष करीत तेव्हा मामांना फार दुःख होत असे. या संबंधात ते एकदा विष्णु प्रभाकर यांच्याशी उद्विग्नपणे बोलत होते. त्यावेळी विष्णु प्रभाकर म्हणाले, 'मामा, सर्वत्रीकडेच ही अशी परिस्थिती आहे. आणि ते स्वाभाविकही आहे. तुम्हीच काय, मीसुद्धा आता इतिहासजमा झालो आहे. युग पुढे जात आहे.'

मामा काही उत्तर देण्यात व्यग्र होते. पण विष्णु प्रभाकर यांच्याकडे पाहून ते

चूप बसले. विष्णु प्रभाकर लिहितात की जणू काही मामांना सांगायचे होते— अरे, काय युग पुढे जात आहे ! काही आस्था ...

मामांना आस्थाच महत्त्वाची वाटत होती. जीवनाविषयीची आस्था हीच त्यांची खरी जीवनशक्ती होती. प्रेरणा होती. त्यांच्या साहित्यनिर्मितीचीही तीच प्रेरणा होती. जीवनाविषयी आस्था आणि साहित्यावर अनन्यसाधारण निष्ठा हेच मामा वरेरकरांच्या यशस्वी वाङ्मयीन कर्तृत्वाचे बलस्थान आहे.

२३ सप्टेंबर १९६४ मध्ये दिल्लीत वास्तव्य असतानाच त्यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते.

'कै. वि. स. खांडेकर यांनी म्हटल्याप्रमाणे मामा वरेरकर हे केवळ विपुल लेखन करणारे लेखक नव्हते तर मराठी साहित्याच्या एका उज्ज्वल कालखंडाचे अखेरचे प्रतिनिधी होते.'

ज्या काळात मामांचा जन्म झाला तो काळच आधुनिक मराठी साहित्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा होता. नव्या परंपरा उद्भवाला देण्याचा तो काळ होता. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमाले' ने (१८७४) मराठी निबंधाची नवी परंपरा सुरू केली होती. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या नाटकांनी (१८८२) नवी परंपरा सुरू केली. हरिभाऊ आपटे यांनी सामाजिक कादंबऱ्यांची परंपरा सुरू केली (१८८५) आणि केशवसुतांनी आधुनिक मराठी कवितेचे युगप्रवर्तन केले. (१८८५).

हा काळच एकाअर्थी प्रेरणा देणारा आणि संस्कार करणारा होता. मामा वरेरकरांचा जन्म अशा कालखंडात झाला. सामाजिक कादंबरी लेखनाची प्रेरणा मामांनी हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांतून घेतली आणि नाट्यलेखनाची प्रेरणा श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या नाटकांपासून घेतली. या दोघांचाही वारसा त्यांनी घेतला. आणि सेवा निवृत्तीच्या काळानंतरही सुमारे चाळीस वर्षे हा वारसा चालविला. हरिभाऊ–कोल्हटकर काळ १९२५ च्या आसपास संपतो. त्यानंतरही मामा लिहीत होते. वेळोवेळी त्यांना जी विभिन्न सामाजिक सुखदुःखे जाणवली, ती मामांनी आपल्या कथांतून, कादंबऱ्यांतून, नाटकांतून व्यक्त केली.

सामाजिक दुःखाशी एकरूप होऊन जाणे हा मामांच्या व्यक्तित्वाचा महान् विशेष होता. त्यांच्या कथाकादंबऱ्यांच्या निर्मितीमागील प्रेरणा व प्रवृत्ती या विशेषात आहे.

गिरणगावातल्या मजुरांच्या हलाखीच्या परिस्थितीने ते व्यथित होतात. अस्पृश्यांच्या अवमानित अवस्थेने दुःखी होतात. रामाने सीतेवर केलेल्या अन्यायाने उद्विग्न होतात. सीतेवर होणाऱ्या अन्यायात आणि उर्मिलेच्या कुचंबणेत मामांना स्त्रीजातीवरील अन्यायाचे प्रातिनिधित्व दिसते. कलेचा बाजार मांडणाऱ्या लेखकांची टर ते उडवतात परंतु आदर्शवादी लेखकाचे भाग्य गुरफटून टाकणाऱ्या घोर दारिद्र्याने व्याकूळ होतात. अशा प्रत्येक दुःखातून, व्यथेतून मामांची एकेक साहित्यकृती

जन्मली आहे. १९४७ च्या भारत-विभाजनाचे दाहक दुःखही याला अपवाद नाही. नौखालीचे हत्याकांड झाले. हा वणवा विझविण्यासाठी महात्मा गांधी त्या विभागात स्वतः गेले. आपल्या असामान्य कर्तृत्वाच्या बळावर त्यांनी तो वणवा विझवला खरा, परंतु त्या अत्याचाराच्या काळात भ्रष्ट झालेल्या कितीतरी स्त्रियांची जीवने बरबाद होऊन गेली. नौखाली जिल्ह्याला मामांनीही भेट दिली. अनेक प्रसंग त्यांनी पाहिले, ऐकले. अत्याचाराला बळी पडलेल्या स्त्रियांच्या दुःखाने ते विद्ध झाले. आणि त्यातूनच प्रत्यक्ष घडलेल्या प्रसंगांवर आधारलेले 'अ-पूर्व बंगाल' (१९५३) हे खरोखरच अपूर्व असे नाटक त्यांनी लिहिले. त्यापूर्वी नौखालीहून परत आल्यावर १९४७-४८ च्या 'दीपावली' विशेषांकात त्यांनी नाटकाच्या कथानकाचे सूचक स्वरूप म्हणून दोन गोष्टी लिहिल्या होत्या. कारण त्या कथानकावर आधारलेले नाटक रंगभूमीवर आणणे त्यावेळी अशक्य होते. हे थोडे विस्ताराने अशासाठी सांगितले, की सामाजिक दुःखाशी एकरूप होऊन जाणे हा मामांच्या व्यक्तित्वाचा विशेष होता. सामाजिक दुःखाची स्पंदने त्यांच्या संवेदनाशील मनात उमटत असत.

तो कालखंडच असा होता की त्या काळात ललित आणि सामाजिक यात दुरावा नव्हता. या दोहोंचाही अन्योन्य संबंध होता. हा संबंध मामांनी जाणला होता आणि आपल्या साहित्यकृतीतून जपण्याचा प्रयत्न केला होता.

कलावंताच्या सूक्ष्म सौंदर्यदृष्टीचा व सखोल चिंतनशीलतेचा अभाव त्यांच्या लेखनात जाणवतो हे खरे. पण ह्याचे कारण त्यांचे व्यक्तित्व त्यांचे व्यक्तित्व नेहमीच सुधारक राहिले, प्रसंगी ते विद्रोही बनले. जाणत्या वयापासूनच त्यांनी पुरोगामी विचारसरणी स्वीकारली होती. म्हणूनच हरिभाऊ आणि कोल्हटकर यांचा वारसा त्यांनी घेतला तरी त्यांचे केवळ अनुकरण केले नाही. उलट त्यांच्या परंपरेवर मामांनी स्वतःची मुद्रा उमटविली आहे.

त्या काळाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की चिपळुणकर, आगरकर आणि टिळक ही महाराष्ट्राची प्रमुख प्रेरणास्थाने होती. साहित्याच्या दृष्टीने या उज्ज्वल कालखंडाचा (१८७४ ते १९२०) प्रारंभ चिपळुणकरांपासून झाला आणि साधारणतः या कालखंडाचा शेवट टिळकांच्या मृत्यूनंतर झाला. सामाजिक दृष्ट्या या कालखंडावर आगरकरांचा प्रभाव होता आणि राजकीयदृष्ट्या टिळकांचा प्रभाव होता. परंतु मामा वरेरकर यांपैकी कुणाचेही 'पंथभक्त' बनले नाहीत. कारण तसे पाहाता ही प्रेरणास्थाने पांढरपेशी मध्यमवर्गीय आणि पांढरपेशीय मध्यमवर्गाची व त्या वर्गासाठी लोकमान्य टिळक हे तेल्यातांबोळ्याचे पुढारी असले तरीही त्यांचे हे पुढारीपण 'सर्वांना राजी राखून कार्यभाग साधावा' या लोकसंग्रही वृत्तीतून प्रस्थापित झालेले होते. एरवी त्यांच्या सनातन व पारंपरिक पिंडप्रकृतीला पुरोगामी विचारप्रणाली मानवण्यासारखी नव्हती. मामांच्या 'संन्याशाचा संसार'(१९२०) या नाटकाचा प्रयोग त्यांनी आग्रहा-

खातर पाहिला. मध्यंतरात छोटेसे भाषण केले. अनाथ विद्यार्थी गृहासाठी देणगी स्वीकारली. पण टिळकांच्या सर्व कार्यक्रमांचा तपशिलवार वृत्तान्त देणाऱ्या 'केसरी'त या घटनेचा नाममात्रही उल्लेख नाही. ही घटना म्हटली तर मामांच्या 'नाटकी संसारात' नगण्य म्हणता येईल. पण त्याचबरोबर हेही खरे की पुरोगामी दृष्टीतून मामांनी हाताळलेला पतित परावर्तनाचा विषयच टिळकांना आणि त्यांच्या समर्थकांना रुचला नव्हता. हे नमूद करावयाचे अशासाठी की मूलतःच मामांचा पांढरपेशा मध्यवर्गीय वृत्तिप्रवृत्तीशी विद्रोह होता. मामांची पत्रिका बहुजनसमाजाच्या वृत्तिप्रवृत्तीशी जुळणारी होती. म्हणूनच मामा आगरकरांच्या समाजसुधारणावादाने भारावले नाहीत. टिळकांच्या राष्ट्रवादाने प्रभावित झाले नाहीत. त्यांच्या पूर्व सिद्धीच्या काळापासूनच मामा साम्यवादी विचारप्रणालीने आकर्षित झाले होते. आणि १९२० नंतर त्यांनी गांधीवादाचा स्वीकार केला. साम्यवाद आणि गांधीवाद दोन्हीही बहुजन समाजाचा कैपक्ष घेणाऱ्या विचारप्रणाली म्हणूनही असेल, परंतु मामा वरेरकरांच्या साहित्याला या विचारप्रणालीचे अधिष्ठान आहे. हरिभाऊ आणि श्रीपाद कृष्ण यांचा वारसा त्यांनी पुढे चालवला हे जितके खरे, तितकेच हेही खरे की या विचारप्रणालींचा आशय त्यांनी या वारशात भरण्याचा आपल्यापरी प्रयत्न केला. किंवा असेही म्हणता येईल की या वारशाला त्यांनी नवे परिमाण दिले.

जुन्या रूढींवर त्यांनी आपल्या नाटकातून व अन्य साहित्यातून तीव्र प्रहार केले. परंतु त्यांची सामाजिक क्रांती अंधानुकरणाची नव्हती. डोळस मार्गदर्शन करणारी होती. विष्णु प्रभाकर यांनी म्हटल्याप्रमाणे मानवी मनाच्या 'काळोखी डोहा'त त्यांच्या कलेला गती नव्हती. त्यांची साहित्यकला अन्तर्मुख न होता विशुद्ध बहिर्मुखच राहिली. आणि तरीही त्यात स्पष्टता व तीक्ष्ण दृष्टी यांचा अभाव नाही.

'खेड्याकडे चला' असा महात्मा गांधींचा आदेश होता. त्या आदेशाची एक प्रतिक्रिया म्हणून मराठी कथा कादंबरी ग्रामीण जीवनाकडे वळली, असे मानले जाते. वास्तविक पाहता राजकीय मंचाची सूत्रे महात्माजींनी हाती घेऊन तसा आदेश देण्यापूर्वीपासून मामा वरेरकरांची वाङमयीन दृष्टी ग्रामीण जीवनाकडे वळली होती.

एकीकडे त्यांनी सामाजिक क्रांतीचा उद्घोष केला. तटस्थता अथवा अलिप्तता हा कलावंताचा गुण मानला जातो. किंबहुना याच अनिवार्य गुणामुळे साहित्यकृतीला कलात्मकतेबरोबरच महानताही प्राप्त होते. ही तटस्थता मामांच्या साहित्यात अभावानेच जाणवते हे खरे असले तरी त्याचबरोबर हेही खरे की ज्या कालखंडाचे प्रतिनिधित्व मामा करीत होते त्या काळात सामाजिक क्रांतीच अधिक 'मुखर' होती. प्रत्येक युगाची एक विशेषता असते. श्रेष्ठ साहित्यकार कधी आपल्या युगाच्या मागे राहात नाही. उलट त्या युगाचा जो धर्म असेल त्या धर्माची ओळख त्याला

पटते. युगधर्माची ओळख चिपळूणकर, टिळक-आगरकर यांना पटली होती. तशीच ती हरिभाऊंना पटली होती. केशवसुतांना पटली होती. त्या युगधर्माचे स्वर त्यांच्या साहित्यनिर्मितीत आहेत. मामानीही आपल्या कालखंडाचा युगधर्म ओळखला होता ही त्यांची विशेषता आहे. आपल्या युगाची जी मान्यता असेल, मागणी असेल तिला स्फुट स्वरूपात व्यक्त करणे, तिला उद्गार देणे महत्त्वाचे असते. मामांनी प्रामाणिकपणे आणि प्रतिबद्धतेने तो प्रयत्न केला. बर्नाड शॉ इतकी प्रखर प्रतिभा आणि अंतर्भेदी दृष्टी त्यांच्या जवळ नसेल, अथवा त्यांच्या नाटकांत नसेल. परंतु क्रांतीचा स्वर त्यांनी क्षीण होऊ दिला नाही.

'लढाईनंतर' ही कादंबरी मामा वरेरकरांनी प्रसिद्ध केली १९४७ मध्ये. परंतु मूळ या कथानकावर त्यांनी १९२० मध्ये नाटक लिहिले होते. १९२० साली इंदूरच्या महाराजांच्या यशवंत नाटक मंडळीची व्यवस्था कै. गणपतराव बोडस यांच्या हाती होती. मामांकडे नाटकाची मागणी आली तेव्हा हे कथानक त्यांना आवडले. परंतु बोडसांनी नाटकमंडळी सोडली त्यामुळे हे नाटक रंगभूमीवर आलेच नाही. पुढे एकदोन वर्षातच त्यांनी हे नाटक कादंबरी रूपात लिहिले. सैनिकाच्या मानसिक स्थितीचे अंतरंगवर्णन आणि विनाशाच्या भीषण ज्वालामुखीच्या तोंडावर बसलेल्या जनतेच्या मनातील घालमेल या कादंबरीत व्यक्त झालेली आहे. परंतु तिचे एवढेच महत्त्व नाही. पहिल्या महायुद्धानंतर खेड्यात आणि शहरात जी परिस्थिती निर्माण झाली तीतूनच पुढे मजुरांच्या चळवळीचा जन्म झाला. खरे पाहिले तर मुंबईच्या गिरणीमजुरांची चळवळ ही उभयार्थी शेतकऱ्यांचीही चळवळ आहे. पहिल्या महायुद्धाच्या पायी खेडीं ओस पडली म्हणून कोकणचा शेतकरी मुंबईला येऊन कामकरी बनला. शेतकरी आणि कामकरी या दोन्हीही नात्यांनी निर्माण झालेल्या असमाधानातून गिरणी कामगारांची चळवळ जन्माला आली. ('लढाई-नंतर' प्रस्तावना) याचेही दिग्दर्शन या कादंबरीत आहे. इतकेच नव्हे, तर परिवर्तन अथवा क्रांती व्हायचीच असेल तर ती रशियन क्रांतीच्या मार्गानेच होणे शक्य आहे हे परखडपणे आणि उघडपणे १९२० सालीच सांगण्याचे धाडस मामा वरेरकरांत होते. प्रस्तुत कादंबरीत मादेलीन या नावाची व्यक्तिरेखा आहे. ही फ्रेंच नर्स शिधूभाऊंच्या–कथानायकाच्या–परिचयाची झाली ती युद्धभूमीपासूनच. योगा-योगाने हिंदुस्थानातही त्यांची पुनर्भेट झाली त्यावेळी ती म्हणते, 'मी हिंदुस्थानात आल्यापासून इथल्या परिस्थितीचा अभ्यास केला. मला दिसून आलं, की तुमच्या धर्मानं तुम्हाला दुबळं बनवलं आहे. मी तुमच्या धर्माची निंदा करीत नाही– माझ्या देशात धर्माला फारसं महत्त्व नसलं तरीही इतरांच्या धर्माबद्दल व्यक्तिशः माझ्या मनात अढी नाही. पण देवावर आणि दैवावर भार टाकून आकाशाकडे डोळे लावून करुणा भाकायचा जो मार्ग तुमचा धर्म शिकवितो त्यापायीच तुमचा सत्यनाश झाला

आहे. तिकडे रशिया जागा झाला आहे. एकादं अद्वितीय तत्त्वज्ञान निर्माण होणार असं वाटू लागलं आहे. मार्क्स नावाच्या एका जर्मन ऋषीनं जे तत्त्वज्ञान निर्माण केलं, त्याचा खुद्द जर्मन लोकांनी फायदा करून घेतला नाही. आमच्या देशात त्याचे काही अनुयायी आहेत. परंतु केवळ मार्क्सच्या तत्त्वज्ञानावर आधारून रशियात आता जी क्रांती निर्माण होत आहे ती साऱ्या जगाच्या राजकारणावर विलक्षण परिणाम करणार असं मला वाटू लागलं आहे. इथून गेल्यावर रशियात जायचं असं मी ठरविलं आहे. तिथल्या मजुरांचा जर इथल्या मजुरांशी संबंध आला–तुम्ही दरिद्री आहात, चळवळ करण्याइतका पैसा तुमच्याकडे नाही; पण इथली चळवळ चालविण्यासाठी रशियाची मदत जर तुम्हाला मिळाली तर हिंदुस्थानात क्रांती घडून येईल. इथल्या सर्व्हेंटस् ऑफ इंडिया सोसायटीतल्या एका प्रख्यात मजूर-पुढाऱ्याची आणि माझी गांठ पडली. त्याचंही मत असंच पडलं. मी परत देशी गेल्यावर हे धागेदोरे कसे जोडता येतील त्यांचा कसून प्रयत्न करणार आहे. त्यापूर्वी तुम्ही लोक इथल्या मजुरांची मनोभूमि तयार करण्याचा प्रयत्न करीत रहा....' ('लढाईनंतर' पृ. २५४–५५) यावर अधिक भाष्य करण्याची आवश्यकता नाही. परंतु पूर्वसिद्धीच्या म्हणजे १८९९ ते १९९९ या कालखंडात मामा वरेरकरांनी हरिभाऊ-कोल्हटकर यांचा वारसा स्वीकारला हे खरे. परंतु त्या वारशात नवा आशय भरत असतांना मामांच्या मनाची जडणघडण कोणत्या विचारप्रणालीमुळे विशेष होत होती, हे यावरून स्पष्ट होते. तात्पर्य एवढेच, की मामा हे 'युगधर्म' ओळखणारे श्रेष्ठ साहित्यकार होते.

सामाजिक क्रांतीला त्यांनी उद्गार दिला. त्याचबरोबर गांधी-नीतीलाही त्यांनी उद्गार दिला. ग्रामोद्धार, खादीप्रचार, दारूबंदी इत्यादी महात्मा गांधीप्रणीत कार्यक्रमांच्या 'प्रचाराचे' अधिष्ठान त्यांच्या साहित्याला लाभले साम्यवादी विचारप्रणालीची तात्त्विक आणि ग्रांथिक स्वरूपाची परिभाषा सर्वसामान्य माणसाला, खेडुताला समजू शकणार नाही; त्याच्यापर्यंत पोचायचे तर लोकव्यवहार, लोकमाध्यम, लोककला, लोकभाषा यांच्याद्वारेच पोचता येईल असा विश्वास मामा वरेरकरांना होता. ('मी–रामजोशी' या कादंबरीत हा विश्वास प्रकटरूप झाला आहे.) त्यांचा विरोध आणि विद्रोह केवळ आर्थिक पूंजीवादाविरुद्ध नव्हता. धार्मिक पूंजीवादाच्या विरुद्धही त्यांनी युद्धाची घोषणा दिली होती. या घोषणेचा फलक खांद्यावर घेऊनच त्यांच्या 'सात लाखातील एक' कादंबरीतील जिवा धार्मिक अज्ञान, अंधश्रद्धा, अडाणीपणा यांच्या विरुद्ध एकाकी लढा देतो. बाबा शिगवण, कान्हू कृष्णा, बिजली तावडे, जिवा लोहार, शिधूभाऊ इत्यादी मामांच्या साहित्यसृष्टीतील लढाऊ वृत्तीची अविस्मरणीय माणसे पुरोगामी क्रांतिकारक विचारप्रणालीच्या मुशीत घडलेली आहेत.

जाणत्या वयापासून मामांनी पुरोगामी विचारसरणीचा स्वीकार डोळसपणे

केला होता, त्या विचारसरणीचे अधिष्ठान त्यांच्या एकंदर साहित्याला आहे.

मामा वरेरकरांची वाङ्मयीन दृष्टी आणि साहित्यविषयक भूमिकाच 'बहुजन-हिताय' होती. 'स्वान्तःसुखाय' भूमिकेला त्यांचा विरोध होता असे नाही, परंतु वाङ्मय आणि साहित्य हे प्रचाराचे आणि जनमानस घडविण्याचे साधन आहे. अशी त्यांची मनःपूर्वक धारणा होती. 'कलेकरिता कला' की 'जीवनासाठी कला' या वादात त्यांनी जाणीवपूर्वक जीवनवादाचा कैपक्ष घेतला त्यांचा भर वास्तववादी यथार्थतेवर होता त्यांनी एका भाषणात म्हटले,'वास्तववादी यथार्थता हा वाङ्मयाचा प्राण आहे. ही वास्तववादी यथार्थता म्हणजेच कला. कला ही जीवनाहून बलवान आहे पण जीवन हे कलेहूनही बलवत्तर आहे. म्हणून वाङ्मयनिर्मिती करताना जीवन आणि कला यांचा योग्य प्रमाणात समवाय केला नाही तर ते वाङ्मय परिणामकारक होणार नाही, हे तत्त्व या नूतन निर्मितीच्या वेळी अखंड जागृत ठेविले पाहिजे.' ('आघात'– पृ. ७२)

सूक्ष्म भावना, सूक्ष्म प्रसंग, सूक्ष्मतर प्रसंग, या सर्वांचे साहित्यनिर्मितीतील महत्त्व मामांना वाटत होतेच. परंतु या सर्वांचे मायक्रॉस्कोपिक पद्धतीने बृहद्दर्शन घडविले पाहिजे. कारण साधारण बुद्धीच्या आणि साधारण दृष्टीच्या वाचकाला देखील त्या गोष्टी सहजी आकलन करण्यास सुलभ झाल्या पाहिजेत, अशी त्यांची अपेक्षा होती. साहित्यातील भावनाभिव्यक्तीचे महत्त्व त्यांना वाटत नव्हते असे नाही. परंतु भावनाभिव्यक्तीपेक्षाही विचार प्रक्षोभाला ते अधिक महत्त्व देत होते. 'सामुदायिक अन्यायाबद्दल अंतःकरणात प्रक्षोभाची भावना निर्माण झाल्याखेरीज वाङ्मयाच्या निर्मितीत विचार प्रक्षोभन होणार नाही.' ('आघात'– पृ. ७४) अशी त्यांची धारणा होती. भावनाप्रक्षोभातून विचार प्रक्षोभ, आणि विचार प्रक्षोभातून विचारप्रवर्तन ही महत्त्वाची बाब त्यांनी मानली होती. विचारप्रवर्तनासाठी आवश्यक ती प्रचारात्मक भूमिका वाङ्मयाने स्वीकारलीच पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. ध्येयात्मकता हीच वाङ्मयाची–वाङ्मयनिर्मितीची जीवनकला आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. आणि बहुजन समाजात विवक्षित मताचा प्रचार करणे हेच प्रत्येक साहित्यिकाचे जीवनसाध्य असले पाहिजे असे त्यांनी मानले. प्रत्येक कालखंडात–मग तो कालखंड स्वातंत्र्यापूर्वीचा, पारतंत्र्याचा, स्वातंत्र्यलढ्याचा काळ असो, अथवा स्वातंत्र्योत्तर काळ असो– वाङ्मयाला आणि साहित्याला बहुजनहिताच्या दृष्टीने विवक्षित ध्येयाधिष्ठित भूमिका बजावावीच लागते, हे भान वरेरकरांनी सतत बाळगले होते.

त्यांनी एका ठिकाणी असे आवर्जून लिहिले, 'नुसत्या करमणुकीसाठी म्हणून हिंदुस्थानला वाङ्मयाची जरुरी नाही. स्वातंत्र्याच्या छायेखाली ज्यांनी सुखसमृद्धि मिळविली आहे, त्यांना रिकामा वेळ घालविण्यासाठी नुसत्या करमणुकीच्या वाङ्मयाची अपेक्षा वाटत असेल! तशी परिस्थिती हिंदुस्थानात नाही आणि

म्हणूनच लोकजागृती करणे हेच हिंदुस्थानच्या वाङ्मयाचे एकमेव ध्येय राहिले पाहिजे.' ('आघात' – पृ. ९०). 'अबोधांना निर्बोध होणार नाही व त्याचबरोबर बुद्धिमान पंडिताच्या अवहेलनेस पात्र होणार नाही, अशा प्रकारच्या भाषेत समाजाला जी परिस्थिती, जे प्रश्न प्रत्यक्ष जांचत आहेत त्यांचे बरोबर स्वरूप डोळ्यासमोर उभे करणारे ग्रंथ ह्या घटकेस निर्माण व्हायला हवेत. विचारी, अविचारी आणि अतिविचारी वाङ्मयाचे मर्म आपण समजून घेतले पाहिजे. अविचारी, म्हणजे समाजाच्या रूढ कल्पनांप्रमाणे अविचारी धाडसी, परंतु लिहिणाऱ्याने पूर्णपणे विचारपूर्वक लिहिलेले असे 'विचारी अविचारी' वाङ्मयच अन्वर्थक असते.' अशा अर्थाचे प्रतिपादन त्यांनी १९४३ मध्ये मुंबई मराठी ग्रंथ-संग्रहालयाच्या ४४ व्या वाढदिवशी अध्यक्षपदावरून केले. विचारी, अतिविचारी या संज्ञांवरोबरच त्यांनी अंतर्विचारी, शून्यविचारी अशाही संज्ञा योजिल्या लोकहितवादी, जोतीबा फुले, स्वामी दयानंद सरस्वती इत्यादींवर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रगतीस हानिकारक टीका करणाऱ्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांना ते 'अतिविचारी' म्हणतात, न. चिं. केळकरांना ते 'अंतर्विचारी म्हणतात. तर ना. सी. फडके ह्यांच्या कलाकृती इतर दृष्टींनी रम्य असल्या तरी 'शून्यविचारी' म्हणून त्यांची बोळवण करतात. अशा पद्धतीने महानुभाव पंथापासून समकालीन मराठी वाङ्मयाची चिकित्सा करून वरेरकरांनी 'विचारी अविचारा' ची उपपत्ती मांडली आणि ह्या उपपत्तीच्या आधारे समाजपरिवर्तनाला, सामाजिक क्रांतीला आवश्यक आणि प्रेरक अशा बंडखोर साहित्याची, विद्रोही साहित्याची मीमांसा मांडली. त्यांतूनच 'नव्या जगाच्या निर्मितीची' शक्यता व संभवनीयताही त्यांनी प्रत्यक्ष आपल्या साहित्यकृतीतून निदर्शनास आणून दिली. ही त्यांनी लक्षणीय कामगिरी आहे.

मामा वरेरकरांच्या साहित्याचा अभ्यास करताना साहित्यिक या दृष्टीने पूर्वसिद्धीच्या काळात त्यांच्या मनाची झालेली जडणघडण, त्यांचा काल, त्या काळात त्यांना मिळालेला वारसा, त्यात त्यांनी भरलेला आशय आणि त्यांची वाङ्मया-विषयीची भूमिका व दृष्टी लक्षात घेतली पाहिजे. कारण या सगळ्याच विशेषांशी ते अखेरपर्यंत प्रामाणिक आणि प्रतिबद्ध राहिले. विशुद्ध कलावादी, सौंदर्यशास्त्रीय अथवा कलास्वरूपशास्त्रीय, आकृतिवादी मूल्यांच्या आणि निकषांच्या आधारे त्यांच्या साहित्याचे मूल्यांकन करणे हे त्यांच्यावर आणि त्यांच्या साहित्यावर अन्याय करण्या-सारखेच होईल.

हे तर खरेच की मामा वरेरकर मराठी पुरोगामी साहित्याचे अग्रणी होते. रशियन संस्कृतीतील पुरोगामित्वाचे त्यांना आकर्षण होते. परंतु पुरोगामित्वाविषयी त्यांचा दृष्टिकोण सीमित न राहता, व्यापकच होता. परंपरा मोडून परिस्थित्यनुरूप स्वतंत्र विचारांचा बहुजन समाजात फैलाव करणारा प्रत्येक लेखक हा

पुरोगामीच असतो. नाठाळ सनातन्यांच्या मस्तकावर काठी मारणारा मेणाहून मऊ असलेला 'तुकाराम' हा मामांच्या दृष्टीने पुरोगामीच होता. आधुनिक काळात पुरोगामित्वाचा प्रचार करणारे महाराष्ट्रातील पहिले लेखक म्हणून आगरकर, ज्योतिराव फुले, लोकहितवादी, राजारामशास्त्री भागवत यांचा उल्लेख मामा वरेरकर आवर्जून करीत वर्गकलहाचे प्रतिबिंब आजच्या वाङ्मयात आले पाहिजे. 'वर्गकलह' हा शब्द जरी पूर्वीच्या वाङ्मयात वापरला गेला नव्हता. तरी आगरकर, भागवत, फुले आणि लोकहितवादी यांच्या वाङ्मयात तत्सम असलेल्या पारंपरिक कलहाचा ध्वनि स्पष्टपणे केला गेला होता. सनातनी आणि सुधारक यांच्यातील द्वंद्व हेच तत्कालीन वर्गकलहाचे स्वरूप होय, अशी त्यांची विचारसरणी होती. कोणत्याही नवविचाराच्या बाबतीत मामांचा कल हा प्राधान्येकडून एतद्देशीयत्वाकडे होता. 'पुरोगामी साहित्या' संबंधी शेवटी त्यांनी असे म्हटले, 'पुरोगामी वाङ्मय पूर्वीही होते. आजही आहे, आजचे पुरोगामी वाङ्मय पुढल्या काळात प्रतिगामी ठरेल. त्याही पुढे पाऊल टाकणारे पुरोगामी लेखक भविष्यकाळात निर्माण होणार आहेत, हे ध्यानात घेऊन आजच्या पुरोगामी वाङ्मयाचा पुरस्कार करणे क्रमप्राप्त आहे.' ('आघात' पृ. १००) आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासाने ही दखल घेणे आवश्यक आहे. आणि हे सर्व लक्षात घेऊनच वरेरकरांच्या साहित्याचे मूल्यांकन अभ्यासकांनी आपल्या परीने पण निःपक्षपातीपणाने आणि पूर्वग्रहविरहित दृष्टीने करावे.

मामा वरेरकरांना मी माझ्या विद्यार्थी दशेतच पाहिले आहे. ऐकले आहे. प्रारंभापासून त्यांच्या वाङ्मयाचा मी चाहता आहे. मी श्रीराम मिलमध्ये नोकरीला होतो, त्यावेळी गिरणगावातल्या नाट्य चळवळीशी माझा थोडाफार संबंध आला होता. मामांनी सुरू केलेल्या 'शिलेदार' साप्ताहिकात मी थोडे लेखन केले होते. या सगळ्यांच्या निमित्ताने का होईना, परंतु 'मामांच्या दरबारात' काहीशा अवघडलेल्या स्थितीत बसण्याचे भाग्यही मला लाभले होते.

त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने हे निवडक साहित्य संपादित करण्याची संधि माझे मित्र श्री. वामनराव भट यांनी दिली, त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. त्याचप्रमाणे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे श्री. अच्युत तारी, श्रीमती लतिका जोशी, श्री. पारायणे यांनी आवश्यक ते संदर्भ उपलब्ध करून दिले, तसेच श्रीमती माया चिटणीस यांनी मामांचे अप्रकाशित साहित्य संदर्भासाठी पुरविले, या सर्वांचा मी आभारी आहे.

– सदा कऱ्हाडे

लेख आणि भाषणे —

मामा वरेरकर यांनी लिहिलेले लेख आणि वेळोवेळी त्यांनी केलेली व पुढे लेखरूपाने प्रसिद्ध झालेली त्यांची भाषणे उद्‌बोधक आणि विचार-प्रवर्तक आहेत.

'मराठी साहित्य संमेलन' (धुळे, १९४५), 'मराठी वाङ्मय परिषद' (बडोदे, १९३२), 'मुंबई व उपनगर साहित्य संमेलन' (ठाणे, १९३६), 'नाट्यसंमेलन', (पुणे, १९३८) इत्यादी प्रसंगी त्यांनी केलेली काही अध्यक्षीय भाषणे 'आघात' या संग्रहात समाविष्ट केलेली आहेत. याखेरीज त्यांची काही भाषणे लेखरूपाने नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेली आढळतात. उदाहरणार्थ, राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या रजत जयंती महोत्सवाच्या वेळी दिल्ली येथे अखिल भारतीय भाषा संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी राष्ट्रभाषेच्या संबंधात केलेले भाषण आणि अखिल भारत सर्व-संघाच्या वतीने ११ व १२ नोव्हेंबर १९५६ मध्ये अखिल भारतीय साहित्यकार परिषदेत त्यांनी 'वाङ्मय आणि साहित्य' या विषयावर केलेले भाषण 'लहर' (मे-जून १९६५) या हिंदी मासिकात प्रसिद्ध झालेले आहे.मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या ४४ व्या वाढदिवसानिमित्त (१४ ऑगस्ट, १९४३) अध्यक्षपदावरून केलेले भाषण आज लेखरूपात कोठे उपलब्ध नाही. त्याच भाषणात त्यांनी 'विचारी, अविचारी आणि अतिविचारी वाङ्मया'ची उपपत्ती मांडली होती. ते संपूर्ण भाषण उपलब्ध झाले असते तर मराठीतील वाङ्मयविषयक निबंधात निःसंशय मोलाची भर पडली असती. याच उपपत्तीचा आधार घेऊन त्यांनी 'नव्या जगाची निर्मिती' (दीपावली, दिवाळी विशेषांक, १९५०) हा लेख लिहिला आहे. त्यावरूनही मामा वरेरकरांनी मांडलेल्या उपपत्तीची अन्वर्थकता स्पष्ट होऊ शकते. ज्योत्स्ना, नवनीत, मौज, दीपावली इत्यादी नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले लेख संग्रहरूपात प्रकाशित झालेले नाहीत. या भाषणांतून आणि लेखांतून

त्यांची वाङ्मयाकडे पाहाण्याची भूमिका, त्यांची वाङ्मयीन दृष्टी, वाङ्मयाविषयी आणि जीवनाविषयी त्यांना असणारी आस्था, राष्ट्रीय एकात्मतेविषयी कळकळ आणि एकंदरीत त्यांची बहुजनहिताय वृत्ती या वैशिष्ट्यांचे दर्शन घडते. मामांच्या शब्दात सांगायचे तर ' अबोधांना दुर्बोध होणार नाही व बुद्धिमान पंडितांच्या अवहेलनेस पात्र होणार नाही, ' अशा भाषेत मामांनी लेख लिहिले आहेत.

वाङ्मय आणि वास्तववादी यथार्थता

स्वतःला मी साहित्यक्षेत्रातील मजूर म्हणवून घेतले ते विनयाने किंवा लक्षणेने नव्हे. अक्षरशः या क्षेत्रातील मी एक श्रमजीवी आहे. साहित्यावर उपजीविका चालवणारा, या नात्याने प्रत्यक्षतः मी एक कामगारच आहे. या दृष्टीने साहित्यक्षेत्रात दैनंदिन जीवनाकरिता झगडणाऱ्या एका श्रमजीवी मनुष्याला वाङ्मय आणि कला याविषयी काय वाटते, आणि त्या दृष्टीने आजचे मराठी वाङ्मय कोणत्या कक्षेत सामावते, हे ऐकून घेणे एक प्रकारे बोधप्रद होणार आहे.

'बोधप्रद' हा शब्द अहंमन्यतादर्शक नाही. तो शब्द मी हेतुपुरस्सर वापरीत आहे. तो एवढ्याकरिताच, की वाङ्मयनिर्मिती ही सुखासीन जीवनातील फावल्या वेळचे करमणुकीचे साधन म्हणून आता फारच थोड्या लोकांकडून होत असेल. औद्योगिक क्षेत्रातील कामगार आणि रोजिंदार यांच्या सारखीच परिस्थिती आज साहित्यक्षेत्रातही आली आहे. आता लेखक आणि कलावंत यांना आत्मानंदावर चरितार्थ चालवता येत नाही. जीवनकलहाकरिता दुसऱ्यासाठी वाङ्मय निर्माण करण्याचे प्रसंग अधिकाधिक येत चालले आहेत आणि त्यामुळे केवळ साहित्योपजीवी अशा लोकांचा वर्ग दिवसेंदिवस वाढत आहे. आणि शक्त्यनुसार बरीवाईट साहित्य-निर्मिती करीत आहे. या वर्गाच्या धंद्यातील अडचणी, या धंद्याविषयीच्या त्यांच्या आशा-आकांक्षा, आपणाला जाणता आल्या, तर त्यांच्या जीवनाची सापेक्ष कल्पना सर्वत्रांना येऊ शकेल, या अर्थानेच मी 'बोधप्रद' हा शब्द वापरला आहे.

गतकालापेक्षा आजच्या कालातील सर्वसाधारण जीवन-पद्धतीत जो आमूलाग्र बदल झाला आहे आणि ज्या विशिष्ट समाजजीवन पद्धतीसाठी आपण राबतो आहोत, त्याच काळातील वाङ्मयाच्या परिस्थितीचा मी विचार करणार आहे.

वैचारिकदृष्ट्या आणि गुणतः या विशिष्ट कालात वाङ्मयशाखेत जो फरक झाला आहे, त्या दृष्टीने पाहाता या कालाचे युद्धपूर्व आणि युद्धोत्तर असे ठळक दोन

खंड पडतात. या दोन कालखंडातील वाङ्मयनिर्मितीचा विचार करण्यापूर्वी कला-विषयक ज्या काही कल्पना समाजात आज रूढ आहेत आणि ज्या नवीन उदय पावत आहेत त्यांचे समालोचन आधी केले पाहिजे. 'कलेकरिता कला' या नावाखाली कलानिरपेक्षतेच्या ज्या काही कल्पना काही दिवसांपूर्वी साहित्यक्षेत्रात चोकाळल्या होत्या त्या आता चुकीच्या ठरल्या आहेत. इतकेच नव्हे, तर त्यांच्या प्रणेत्यांनी त्या परतही घेतल्या आहेत. साहित्याची संसाराशी असलेली सापेक्षता आता त्यांना मान्य झाली असल्यामुळे हा निरपेक्षतावाद उकरून काढण्याचे प्रयोजन नाही.

ही निरपेक्षता जरी नाहीशी झाली आहे तरी निर्हेतुकता आणि अभिजातता या कल्पना अद्यापीही रूढ असल्यामुळे त्यांचा विचार करणे आवश्यक आहे. या कल्पना आत्मनिष्ठ, म्हणजे व्यक्तिवादी आहेत. अभिजात वाङ्मयाचा बडिवार मिरविणारा पक्षही बराचसा कोसळू लागला असला तरी अजूनही काही काळ तग धरून राहणारे अशी लक्षणे दिसत आहेत. या मतवाद्यांचे म्हणणे असे आहे, की कला ही अभिजात असून कलावंताच्या वैयक्तिक भावना आणि आवेग ही त्याच्या कलाकृतीत उमटत असतात. या भावना आणि आवेग सनातन असल्यामुळे जीवनकलहाचा किंवा परिस्थितीचा त्यावर काहीच परिणाम होत नाही.

मानसशास्त्राच्या निकषावर घासून पाहिले तर हा सिद्धान्त टिकू शकत नाही. जीवनाच्या हालचाली आणि संवेदना या परस्परावलंबी आहेत. हालचालीमुळे संवेदन होते आणि तिचे ज्ञान होताच हालचाल होऊ लागते. त्या हालचालीतूनच मनुष्याच्या भावना, वासना आणि आवेग उत्पन्न होतात. असे जरी आहे तरी या हालचाली अनिर्बंध नाहीत. विशिष्ट काल आणि प्रसंग यांच्या अनुरोधाने त्या हालचाली बदलू शकतात आणि त्याचप्रमाणे भावना, वासना आणि आवेग हेही बदलत असतात. म्हणूनच मानवी स्वभाव हा त्रिकालाबाधित नसून सारखा बदलणारा आहे असे ठरते. या सिद्धांतामुळे अभिजाततेला साहजिकच संक्षेप मिळतो.

भावना, वासना आणि आवेग यांच्या हेलकाव्यांचा जो ठसा निर्माण होतो त्यालाच मनोविज्ञान (सायकॉलाजी) ही संज्ञा दिली जाते आणि हीच मनोविज्ञान जनक मानसिक आंदोलने कलाकृतीत चित्रित होत असतात. अशा आंदोलनांच्या घडणीने निर्माण झालेली कलाकृती आत्मनिष्ठ असते असे कोण म्हणेल? पण ही आत्मीयता का तरी उत्पन्न होते? ज्या व्यक्तिसमूहात, राष्ट्रात किंवा वर्गात कलावंत वावरत असतो त्यातील प्रत्येक दुसऱ्या व्यक्तीच्या आत्मीयतेशी त्याच्या त्याच्या आत्मीयतेचे संघर्षयुक्त संमिश्रण घडत असते. अशा रीतीने घडणाऱ्या संमिश्र गोळाबेरजेलाच सामाजिक आत्मीयता (Social psychology) म्हणतात. अर्थात या वैयक्तिकत्वातच सामुदायिकत्वाचा अंतर्भाव झालेला असतो. म्हणून कलाकृतीचे परीक्षण करताना त्यातील तंत्रमूलक संमिश्र तत्त्वांचा विचार करून

त्यांचे परस्परावलंबन स्पष्ट करावे लागते. तसे केल्यामुळे या संमिश्र तत्त्वांशी आत्मनिष्ठ होणारा वाचकवर्ग आणि कलावंत हे एकमेकांशी निकटतर येऊ लागतात आणि त्यांच्यामधील एकात्मता किंवा परात्मता स्पष्ट होऊ लागते.

व्यक्तीची आत्मीयता तिचे लक्षण आणि जीवनपद्धती, श्रम आणि सहवास यांचे स्वरूप यावरूनच बनत असते. ज्या वर्गात ती व्यक्ती वावरते त्या वर्गाच्या पद्धतीचे शिक्षण आणि जीवनक्रम जर समस्वरूप असतील तर त्या वर्गाची आत्मीयता तिच्यात उतरते. एकात्मतेचे हे विवेचन झाले.

समाजात जेव्हा कार्यविग्रह वाढतो आणि तीव्र बनतो तेव्हा वर वर्णिलेली ही सामाजिक एकात्मता दुभंगून जाते. दोन प्रकारच्या विचारसरणी, भावना, आणि आकांक्षा स्पष्टपणे दृग्गोचर होऊ लागतात, आणि त्या दुभंगलेल्या भावना मग कलाकृतीत उमटू लागतात. कलाकृतीच्या विशिष्ट वर्गाचे स्वरूप त्यावरूनच प्रतीत होते. एका वर्गाच्या कालावंताची कलाकृती दुसऱ्या वर्गाशी ज्यावेळी एकात्म नसते, त्यावेळीच ही परात्मता स्पष्टपणे प्रगट होते. दोन भिन्न वर्गांच्या आत्मीयतेचा चाललेला हा संग्राम अशा रीतीने कलाकृतीतून व्यक्त होऊ लागतो आणि कला ही जीवनकलहाची निदर्शक आणि प्रेरक बनते. या कलहाचे निदर्शन आणि प्रेरणा दिग्दर्शित करणे किंवा होणे यालाच वास्तववाद म्हणायचे. वस्तुस्थितीतील हाच कलह वाङ्मयात रेखाटायचा असतो.

गतिमानता आणि परिवर्तन यांच्या ऐतिहास प्रणालिकेला धरून ही प्रेरणा होत असते. कला परीक्षणानेच या कलहाचा भावार्थ स्पष्ट करायचा असतो आणि गतिमानतेच्या नियमाला धरून आगामी प्रवृत्तितत्त्वाचे दिग्दर्शन करायचे असते. यालाच समन्वय-साधक (Synthetic) कला म्हणतात. प्रवृत्तितत्त्वांच्या या दिग्दर्शनाला प्रचारकी म्हणून कुणी नाके मुरडीत असतील पण असल्या शब्दांच्या जंजाळाला महत्त्व देण्याचे काहीच कारण नाही.

निदर्शक, प्रेरक आणि दिग्दर्शक अशी कलेची समन्वयात्मक स्वरुपे असल्यामुळे निर्हेतुकतावादाला शास्त्रीय विवेचनात स्थान मिळणे शक्य नाही.

सुखासीनता-वाद अलीकडे मधून मधून डोकावू लागला आहे. सुखासीन अवस्थेत कलेची आवश्यकता असते, ही कल्पना भ्रामक आहे. परभृत वर्गाला कदाचित तसे वाटत असेल. पुराणवस्तुसंशोधनात असे दिसून आले आहे, की अर्धरानटी माणूस मारलेल्या जनावरांच्या हाडावरसुद्धा चित्रे कोरीत असे. कलात्मकता ही कोणत्याही प्रसंगात केव्हाही प्रगट होत असते. तिला सुखासीनतेची आवश्यकता नाही. ट्राट्स्की याने लिहिलेला वर्गयुद्धाचा इतिहास हा वाङ्मयीन कलाकृतीचा उत्कृष्ट नमुना नाही असे कोण म्हणेल ? कै. शिवराम महादेव परांजपे यांचे कित्येक राजकीय लेख म्हणजे उत्तम कलाकृती नव्हत्या काय ?

प्रचारात्मकतेने कलेला वैगुण्य येत नाही. मनोभावनांचे वैयक्तीकरण म्हणजेच

कला. कलेविषयी हे जे तात्त्विक विवेचन केले गेले त्याच्या अनुरोधाने मराठी वाङ्मयाचा आढावा घेतला म्हणजे आमची कला तिच्या ऐतिहासिक कार्याची धुरा वाहण्यास समर्थ होईल अशी शुभ चिन्हे दिसू लागली आहेत. आजचा नवा माणूस हा लढवय्या आहे. त्याच्या ठिकाणी सामुदायिक जाणिवेची परिणति झालेली आहे– म्हणजे समष्टिस्वरूपात आपले व्यक्तित्व सामावलेले आहे, याची त्याला यथार्थ कल्पना आली आहे. बुद्धीने तो हालचाल करतो पण अंतःकरणाची त्याला विस्मृति नसते. वैचारिक प्रवृत्तीबरोबर, उत्साहाचे संपादन त्याच्या ठिकाणी झालेले असते; म्हणून बुद्धि आणि अंतःकरण या दोहोंचा त्याच्या कर्तबगारीत भेद दिसू शकत नाही.

तार्किक वृत्तीचा माणूस आणि भावनात्मकतेने फुलून गेलेला माणूस यांचा केव्हा केव्हा उघड संग्राम सुरू असतो. ह्या दोन प्रकारच्या वृत्तीच्या व्यक्तींत कायमचे गैरसमज उत्पन्न झालेले असतात. एकाच विचाराने या दोन प्रकारची म्हणजे तार्किक आणि भावनात्मक माणसे चालत असतात असे जे वाटते, ते दोघांच्याही तोंडून समानार्थी शब्दांची योजना होत असल्यामुळेच. त्यांचे शब्द समानार्थी असले तरी भावना अगदीच भिन्न असतात. बुद्धी आणि भावना यांतील हा खटका प्रस्तुत परिस्थितीत आपल्याला पदोपदी आढळून येतो.

खरे पाहिले, तर असा खटका असण्याचे काहीच कारण नाही. आपल्यासमोर जीवनाच्या दोन बाजू मांडलेल्या असतात. तत्वतः त्या मूळ स्वरूपात परस्परविरोधी असतात. त्यातील प्रत्येकीला वैशिष्ट्य दिले तर ती एकएकटी निरर्थक ठरते. म्हणून तिथे जसे प्रमाण पाहिजे, तसाच अनुक्रमही पाहिजे. पहिल्याने तार्किकता, आणि नंतर भावना. पहिल्याने आखलेला कार्यक्रम आणि नंतर त्याबद्दलचा उत्साह. नवी समाजसृष्टी निर्माण करावयाची असेल, तर प्रेरकता, अदम्य उत्साह, सोज्वळ स्वार्थत्याग एवढीच साधने कांही पुरेशी होत नाहीत. काही' नवीन घडवायचे असेल, तर त्यासाठी आधी विशिष्ट कार्यक्रम आखला पाहिजे. तत्त्वावर आधारलेला नसला तर नुसता उत्साह किंवा स्वार्थत्याग हा तितका कार्यकारी होऊ शकत नाही आणि ठरविलेला कार्यक्रम पुरा पाडायलाही तो पुरेसा होत नाही.

विशिष्ट दिशेने आखलेल्या कार्यक्रमाच्या अनुरोधाने वाचकवर्गाचे प्रक्षोभन करण्याइतकी शक्ति असलेले वाङ्मय निर्माण होण्याची अजूनही आवश्यकता भासत आहे. अशा प्रकारे वाङ्मय निर्माण होण्यासाठी निषेधक, विध्वंसक आणि विधायक असा तीन प्रकारचा कार्यक्रम आखला गेला पाहिजे. धार्मिक, आध्यात्मिक, मानसिक आणि राजकीय गुलामगिरी निवारण करण्यासाठी बहुजनसमाजाला प्रवृत्त करणाऱ्या वाङ्मयाची जरूरी आज तीव्रतेने जाणवत आहे. ऐतिहासिक उत्क्रांतीकडे लक्ष देऊन वर्तमानकालाच्या इतिहासाची संघर्षात्मक चित्रे यथार्थस्वरूपात चित्रित केली गेली पाहिजेत.

अतिरंजित वाङ्मयाने प्रचारकार्य सुलभ होत नाही. वास्तववादी यथार्थता हा वाङ्मयाचा प्राण आहे. ही वास्तववादी यथार्थता म्हणजेच कला. कला ही जीवनाहून बलवान आहे पण जीवन हे कलेहूनही बलवत्तर आहे. म्हणून वाङ्मयनिर्मिती करताना जीवन आणि कला यांचा योग्य प्रमाणात समवाय केला नाही तर ते वाङ्मय परिणामकारक होणार नाही, हे तत्व या नूतन निर्मितीच्या वेळी अखंड जागृत ठेविले पाहिजे.

वाङ्मयनिर्मिती करणाची दृष्टी नुसती व्यापक असून चालत नाही. त्याच्या दृष्टीत मायक्रॉस्कोपची शक्ति पाहिजे. सूक्ष्म भावना, सूक्ष्म प्रसंग, सूक्ष्मतर कल्पना इतक्या मोठ्या प्रमाणात वर्धित करून मांडल्या गेल्या पाहिजेत की साधारण बुद्धीच्या आणि साधारण दृष्टीच्या वाचकाला देखील त्या सहजी आकलन करताना सुलभ झाल्या पाहिजेत.

वैयक्तिक घटना, वैयक्तिक, चरित्रे आणि परभृत समाजाच्या पंचक्रोशीत वावरणाऱ्या व्यक्ती, यांच्या जीवनावर आधारलेले वाङ्मय बाहेरील जगात आज मोठ्या प्रमाणत निर्माण होत आहे.तसल्या वाङ्मयाचा अभाव आज आपणाला तीव्रतेने जाणवत आहे. दृष्टीच्या विभागात वर्धिष्णुता आल्याशिवाय सामुदायिक जीवनाचे चित्रांकन यथातथ्य स्वरूपात होणे शक्य नाही. सामुदायिक अन्यायाबद्दल अंतःकरणात प्रक्षोभाची भावना निर्माण झाल्याखेरीज वाङ्मयाच्या निर्मितीत विचार-प्रक्षोभन उत्पन्न होणार नाही. वास्तवतेपेक्षा कृत्रिमता आकर्षक असते. वास्तवतेपेक्षा कृत्रिमता हाताळणेही जास्त सुलभ असते; पण कृत्रिमता ही वाङ्मयाची वैरीण आहे, हे विसरून चालणार नाही. कृत्रिमतेच्या आधारावर आज वाङ्मयाला अद्भुतरम्यता आणण्याचा जो प्रयत्न केला जात आहे,तो घातुक आहे. सकृद्दर्शनी कृत्रिमता आकर्षक वाटते– प्रभावशाली वाटते, पण विचारप्रवर्तनाच्या दृष्टीने ती वाचकांची दिशाभूल करते. अशा कृत्रिमतेमुळे निर्माण झालेले आकर्षण मादक असले तरी आत्मीयतेची भावना उत्पन्न करण्यास असमर्थ ठरते. सामुदायिक जागृती आणि त्या जागृतीच्या अनुरोधाने उत्पन्न होणाऱ्या सामुदायिक भावनांचे यथातथ्य व्यक्तीकरण होण्यासाठी वाङ्मय निर्मितीचा काल खर्ची पडला तरच ते वाङ्मय परिणामकारक होईल.

सामुदायिक असो किंवा वैयक्तिक असो, जीवनाचा आधार आज डळमळीत झाला आहे. त्याला पायाशुद्ध करण्यासाठी सामुदायिक विचारांचे सरसहा परिवर्तन करण्याखेरीज दुसरा उपाय नाही. त्यासाठी सामुदायिक जीवनाची सूक्ष्म विचिकित्सा झाली पाहिजे आणि ती विचिकित्सा होण्यासाठी लेखन हे सामुदायिक जीवनाशी तादात्म्य पावले पाहिजे. बदलल्या परिस्थित्यनुरूप लेखनशैलीतही बदल केला पाहिजे, आणि तो बदल करताना वाङ्मयाच्या वास्तवतेला यत्किंचितही धोका न देण्याची खबरदारी घेतली पाहिजे, तरच ते वाङ्मय परिणामकारक होईल.

पण वाङ्मय परिणामकारक होण्याला आज ज्या अडचणी आहेत त्या दुर्दम्य

आहेत. विचारजागृतीचा परिणामकारक ठसा वा मयात उमटविण्यासाठी प्रक्षुब्ध झालेल्या लेखकाची आंतरिक जागृती कितीही मोठ्या प्रमाणात धगधगत असली, तरी ती भारून टाकण्याइतकी बाह्य बंधनांची विपुलता अकाळ विकाळ जबडा पसरून त्यांच्यासमोर उभी आहे या परिस्थितीतून मार्ग काढून श्रद्धापूर्वक वाङ्मयनिर्मिती करण्याचे सामर्थ्य फारच थोड्या लेखकांच्या ठायी असते; आणि ते सामर्थ्य कितीही मोठ्या प्रमाणात असले तरी ते पांगळे पाडण्याइतकी शक्ति आजच्या कायदेशीर बधनात सामावली आहे.

विचारप्रक्षोभक वाङ्मय निर्माण करण्यास पहिली अडचण होते ती कायद्याची दुसरी उच्चवर्गीयांची आणि तिसरी मागासलेल्या समुदायाची. या तीन अडचणी पार होऊन वाङ्मयनिर्मिती करण्याचे कार्य तितकेसे सुलभ नाही. असं जरी आहे, तरी त्यातून काहीतरी मार्ग काढला पाहिजे. अशा अडचणीमुळे उत्पन्न होणारा सात्विक उद्वेग प्रदर्शित करण्यास आपण यत्किंचितही कचरता कामा नये. अशा उद्वेगाच्या प्रदर्शनाने कार्यसिद्धी तत्काल होईलच, असे जरी नसले, तरी आघातप्रत्याघाताशिवाय परिस्थिती बदलत नाही, ही गोष्ट विसरून केव्हाही चालणार नाही. डॉ. रवींद्रनाथ टागोर, डॉ. शरत्‌चंद्र चट्टोपाध्याय, बाबू रामानंद चतर्जी प्रभृति बंगाली साहित्यिकांनी प्रसिद्ध केलेल्या एका खालित्यातील खालील उतारा या कामी मार्गदर्शक होण्यासारखा आहे.

अधिकारी असलेले असे हे सर्वश्रेष्ठ साहित्यिक म्हणतात :– 'या देशात आणि इतरत्र आजकाल चालू असलेल्या घडामोडी इतक्या गोंधळात पडणाऱ्या होत आहेत, की संस्कृतीच्या भवितव्याचा खेळखंडोबा करणारी बेभान प्रतिगामी वृत्ती व तत्वशून्य राष्ट्रमतवादित्व यांनी आम्हाला अत्यंत प्रिय असलेल्या संस्कृतीचा उच्छेद आरंभिल्या कारणाने या वृत्तीचा जाहीर निषेध करणे हे आम्ही हिंदुस्थानचे लेखक कलावंत व बुद्धिजीवी लोक, आमचे आद्य कर्तव्य समजतो. अशा वेळी आम्ही मूकवृत्ती पत्करली तर अक्षम्य आत्मसंतुष्टतेच्या आरोपाला आम्ही पात्र ठरू आणि समाजाविषयी आमचे जे कर्तव्य आहे ते बजावण्याच्या बाबतीत समाजाचा विश्वासघात केल्यासारखे होईल.'

'संस्कृतीची काळजी वाहणारे जे आपण सर्वजण त्यांना स्वदेशातील परिस्थितीपेक्षाही परदेशातील परिस्थिती ही जास्तच भयंकर आहे असे दिसून येईल. समाजाला नकी रानटी अवस्थेप्रत पोचविणाऱ्या महायुद्धाचे भूत अवघ्या जगाला भेडसावीत आहे. पोटाला भाकरी देण्याऐवजी हातात बंदूक देऊन आणि संस्कृति-संवर्धनाऐवजी साम्राज्यसंवर्धनाचे मोहजाल पसरून फॅसिस्ट झोटिंगशाहीने आपले युद्धप्रिय स्वरूप उघड करून दाखविले आहे. 'मोठमोठ्या साम्राज्यवादी राष्ट्राराष्ट्रांतील चुरशी आणि झटापटी, आपल्या फायद्यासाठी केलेली रासवट राष्ट्रमतवादी भावनांची

बुद्धिपुरस्सर उठावणी, ना देश ना नीति अशा वृत्तीच्या कारखानदारांनी हावरटपणे चालविलेली शस्त्रास्त्रांची वाढ, या गोष्टी म्हणजे आगामी अनर्थांची भेसूर लक्षणेच होत. म्हणून आम्ही या प्रसंगी जगातील बहुजनसमाजाच्या सुरात सूर मिळवून स्वतःच्या आणि आमच्या देशबांधवांच्या वतीने असे जाहीर करतो, की.... संस्कृति-संरक्षण हा आमचा बाणा आहे, आणि आमच्या महान् सांस्कृतिक परंपरेच्या रक्षणासाठी आम्ही सर्व शक्ती एकवटून निकराने लढल्यावाचून राहाणार नाही.'

या खलित्यापासून आपल्याला पुष्कळ बोध घेण्याजोगा आहे आणि त्या बोधाच्या अनुषंगाने आपल्याला कार्याला प्रवृत्त होता येणार आहे.

उपनिषद्‌कालीन संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाने निर्माण होणाऱ्या समानतेचा डंका साऱ्या जगभर पिटला जात आहे. अशा वेळी समाजशाही आणि हुकूमशाही या दोन नवीन कल्पनांच्या परिणतीसाठी झगडणाऱ्या बुद्धिप्रधान प्रचारकांत जो संघर्ष उत्पन्न झाला आहे त्यांतून निघणाऱ्या ठिणग्यांमुळे साऱ्या जगावर आग पेटेल की काय, अशी भीती सर्वत्र वाटत आहे. ही परिस्थिती निवारण्यासाठी सामुदायिक जीवनाची उपनिषदकालीन कल्पना अस्तित्वात आणून; अखिल जागतिक विराट-पुरुषाचा भग्न झालेला देह एकरूप करण्यासाठी, बहुजनसमाजात मतप्रचार करणे हे प्रत्येक साहित्यिकाचे जीवनसाध्य होवो आणि ते प्रत्यक्ष कृतीत येण्यासाठी आवश्यक असलेले प्रचारात्मक वाङ्मय निर्माण करण्याची सर्व साहित्यिकांना सुबुद्धी होवो.

॥ २ ॥

नव्या जगाची निर्मिती

संवेदनाशील कवि-मनातून परिस्थितीच्या प्राबल्यामुळे भविष्यवाणी निर्माण होते. भवितव्यतेवर आवरण पडलेले अनेक पडदे भेदून अंतर्मुख झालेली कवीची दृष्टी बाह्य जगताच्या व्यापाराच्या पसाऱ्याचा आढावा घेताना सहजपणे जे पाहून जाते, भविष्यकाळात बुद्धिपुरस्सर भेद करण्याची इच्छा नसताना सुद्धा त्या कालाचा अचूक आढावा जी दृष्टि घेऊ शकते–कळत किंवा न कळत घेऊ शकते–त्याच दृष्टीच्या अंतर्मुख संवेदनेतून भविष्य कालाचं मार्गदर्शन होत असतं. कवीच्या या भविष्यवेत्त्या वाणीच्या स्फूर्तीनं सर्वांच्या हृदयातल्या झोपी गेलेल्या अज्ञात भावना जाग्या होतात–जगात वावरू लागतात–त्या त्यांच्या हालचालीमुळे जगाच्या व्यवहारात जी एक खळबळ उडते -ज्या खळबळीमुळं सकृत् दर्शनी सुरळीतपणे चाललेल्या जगाच्या व्यापाराची उलटापालट होते, त्याच या कवीनं स्फूर्ति दिलेल्या आणि तारुण्याच्या उद्दाम वृत्तीतून बुद्धिपुरस्सर निर्माण झालेल्या परिस्थितीला बंड असं म्हणतात.

आजवर जगात अनेक बंडं झाली आहेत. बंडाची यथातथ्य व्याख्या अजून कुणालाही करता आलेली नाही. परिणामाच्या बरेवाईटपणात कोणत्याही बंडाची प्रतिष्ठा नसते. जगात झालेली सारीच बंडे काही यशस्वी झालेली नाहीत त्याचप्रमाणे अयशस्वी झालेलं बंड देखील निरर्थक गेलं आहे असंही म्हणता यायचं नाही. जगाच्या वहिवाटीच्या हिशेबाच्या दृष्टीनं यशस्वी आणि अयशस्वी बंडाचं मोल सारखंच आहे कारण मुळातच बंडखोराला यशापयशाची चाड नसते. बंडखोर जे बंड करतो ते ध्येयाच्या यशस्वितेसाठी असलं तरीही यशाची चाड त्याच्या सूत्रपातात नसते. अपयशाची जाणीव बंडखोराच्या ठायी नसेल तर त्याचं ते बंड केव्हाही यशस्वि होत नसतं; म्हणूनच जो अस्सल बंडखोर असतो तो यशापयशाची खिजगणती मुळीच धरीत नसतो. सुरळीत चालत असलेल्या जगाकडे सामान्य माणूस सहनशील वृत्तीनं पहात असतो. त्या सामान्य माणसाच्या सहनशील वृत्तीच्या मागं कर्तृत्वशून्य अशा स्वास्थ्याची आवड असते. अस्वस्थ वृत्ति कर्तृत्वाला

जन्म देत असते. स्वास्थ्य म्हणजे जिवंतपणाचं लक्षण नव्हे. ऐश्वर्य म्हणजे ईश्वरपणा. ईश्वरी वृत्ति म्हणजे सृष्टि, स्थिति आणि प्रलयाची वृत्ति. निर्माण करणं, रक्षण करणं आणि विध्वंस करणं या तिन्ही प्रकारच्या परिस्थितींतून ईश्वराचं अस्तित्व प्रतीत होत असतं. या तिन्ही वृत्तीच्या समुच्चयातच ईश्वराचं ऐश्वर्य असतं, ईश्वरपणा असतो. तो ईश्वरपणा म्हणजे जिवंतपणा आणि या जिवंतपणाच्या जाणिवेतूनच बंडाची निर्मिती होत असते.

स्वास्थ्य म्हणजे आळस म्हणजे कर्तव्यशून्यता. जसं आहे तसं चाललं आहे, हेच बरं, याच्यापेक्षा वेगळं काही नको, असं ज्यावेळी जाणीव असलेल्या जिवाला वाटत असतं त्यावेळी स्वस्थ राहून तो जगत असतो. त्या या स्वास्थ्याच्या जगण्यात जिवंतपणा नसतो; मरणाची आवड नसली तरी मरतुकडेपणाची वृत्ति या स्वास्थ्याच्या मुळाशी असल्यामुळे, जे विद्यमान आहे त्याच्याबद्दल असंतुष्टपणा प्रदर्शित करून, जे विद्यमान नाही, पण जे विद्यमान झालं पाहिजे असं वाटतं, ते निर्माण करण्याची वृत्ती अस्वस्थपणांतून जन्म पावते. ही वृत्ती म्हणजे ईश्वरी वृत्ति आणि ही ईश्वरी वृत्ती ज्यावेळी उफाळून निघते, सकृतदर्शनी शांति आणि समाधान यांचा आभास होणाऱ्या परिस्थितींत बदल झाला पाहिजे अशा आग्रहानं स्वास्थ्याच्या परिस्थितींत खळबळ उडवून सोडते, त्यावेळी त्या खळबळीला 'बंड' असं म्हणतात.

निर्मितीच्या सुरळीतपणाला खंड पाडून नव्या परिस्थितीचा प्रादुर्भाव करण्याचा पहिला संदेश कुठून मिळतो हे कुणाला सांगता येत नाही. अनंतात दृष्टि फेकून जगाला संदेश देण्याचा बडिवार मिरवणारा कवि संदेश देण्याचा हा अभिमान स्वतः मिरवीत असतो. पण तो संदेश कुठून मिळाला याची, त्याची त्यालाच जाणीव नसते. कुठून तरी हा लहानसा मोड उगवला, वाढला, त्याचं लहानसं रोपटं झालं, की ते रोपटं मला पहिल्यानं दिसलं म्हणून तो कवि जगाला सांगू लागतो. ते चिमुकलं रोपटं जगाला दिसतं. जगाची सामान्य दृष्टि संकुचित असते, आखूड असते, क्वचित् आंधळीही असते. हे पहा नवं रोपटं उगवलं आहे, असं कवि म्हणत असतो. त्यावेळी सामान्य माणूस म्हणतो, 'काय हा वेडा बरळतोय! कुठंच काही दिसत नाही आणि हा वेडा म्हणतोय की एक रोपटं उगवलंय. यालाच ते कसं दिसलं? आम्हाला का दिसत नाही?' सामान्यबुद्धि निर्बुद्धपणानं असा अट्टाहास करून त्या कवीला वेडा ठरवीत असते. तरीही तो कवि तितक्याच अट्टाहासानं नवं रोपटं उगवल्याची ग्वाही नगाऱ्यांच्या खणखणाटानं सगळ्या जगाला सांगत असतो. जे आपल्याला दिसलं आहे, जाणवलं आहे, जे जाणवल्यामुळं आपल्या मनाच्या स्वाभाविक स्वास्थ्यात खळबळ उडाली आहे, जे जाणवल्यामुळं जगाच्या स्वास्थ्यात नवीन निर्मिती होणार आहे असं आपल्याला वाटत आहे, ते सांगितल्यावाचून राहावत नाही, ते सांगितलं नाही तर जगाचं अकल्याण होईल, ते सांगितलं नाही तर जग स्वास्थ्याच्या कर्दमात लोळत राहील, ते सांगितलं नाही तर जगाच्या नव्या निर्मितीला बाध आणण्याचा अपराध आपल्याकरवी घडेल, म्हणून मोठमोठ्यानं

नगारा पिटून तो सांगत असतो, 'झोपलेल्या जगा, पहा, हे नवे रोपटं उगवलं आहे. हे रोपटं वाढलं पाहिजे. या रोपट्याचा वृक्ष झाला पाहिजे. तो फुलला पाहिजे, शाखापल्लवांनी सुशोभित झाला पाहिजे. या रोपट्याचा मोठा वृक्ष झाला पाहिजे. जगाला व्यापून टाकणाऱ्या त्याच्या अफाट शाखापल्लवांखाली जग विश्रांति घेऊ लागलं की तो फलद्रूप झाला पाहिजे. त्याच्यां फुललेल्या फुलांचं फळ होणार आहे आणि त्या फळाच्या निष्पत्तीतून नव्या जगाची निर्मिती होणार आहे. म्हणून या रोपट्याकडे आधी लक्ष द्या, त्याची जोपासना करा, खतपाणी घाला, त्याला वाढू द्या. पल्लवित होऊ द्या, पुष्पित होऊ द्या, आणि मग त्या मोहरलेल्या पुष्पाचं फळ झालं की त्याचा आस्वाद घ्या.' असं तो कवि अट्टाहासानं जगाला सांगत असताना देखील जग त्याच्याकडे लक्ष देत नाही. जग त्याची हेटाळणी करतं. आंधळं जग त्या डोळस कवीला वेडा म्हणतं, भ्रमिष्ट म्हणतं. केव्हा केव्हा असंही होतं, स्वास्थ्याच्या कैफानं धुंद झालेलं ते जग त्या कवीचा जीव घेतं. जगाला अट्टाहासाच्या कंठरवानं नव्या निर्मितीचा संदेश देणारा तो कवी 'अंतर्धान पावतो; नष्ट होतो; पण त्याचा तो जिवंत संदेश अनंताच्या पोकळीत कुठं तरी वावरत राहिलेला असतो. स्वास्थ्यानं आळसावलेल्या जगाच्या कर्णरंध्रात न शिरलेला तो संदेश कुणातरी अकल्पित जिवाच्या ज्ञानेंद्रियाला जाणवतो. त्या ज्ञानेंद्रियाच्या जाणिवेवर झालेल्या त्या संदेशाच्या परिणामामुळं तो जीव अस्वस्थ होतो. त्या अस्वस्थपणातून कर्तृत्वाची भूमिका जन्म पावते. त्या भूमिकेतच ते रोपटं उगवलेलं आहे हे त्या अस्वस्थ जिवाच्या नजरेला येतं. कर्तृत्वाच्या खतानंच त्या चिमुकल्या रोपट्याची वाढ होणार आहे, असा त्या नष्ट झालेल्या कवीचा संदेश त्या अस्वस्थ जिवाला कार्यप्रवण करू लागतो. कार्यप्रवणतेच्या स्फूर्तीतून निर्माण झालेली एका जिवाची खळबळ, धुंद झालेल्या असंख्य जिवांना धक्के देऊ लागते. सकृत्दर्शनी सौम्य वाटणारे ते धक्के हळुहळू वाढत असतात. त्या अस्वस्थ जिवाच्या तळमळीच्या अतिरेकासरशी धुंद झालेल्या समाधानी जगाला मिळत असलेले धक्केही अमर्याद स्वरूपात जाणवत असतात. एका जिवाच्या अस्वस्थतेतून असंख्य जिवाचं स्वास्थ्य भंग पावतं. आणि त्या स्वास्थ्य भंगातूनच ईश्वरी तेजानं प्रभावित झालेला तो जीव असंख्यांना जागृति देऊन जी परिस्थिति निर्माण करतो त्या परिस्थितीलाच विद्रोह म्हणतात, बंड म्हणतात.

कवीच्या स्फूर्तीनं ऐश्वर्य प्राप्त झालेला, बंड निर्माण करणारा तो अस्वस्थ जीव बंडखोर ठरतो. त्या बंडखोराच्या ज्ञात आणि 'अज्ञात धक्क्यांनी कर्तृत्वशून्य झालेल्या सामान्य जिवांच्या ठायींची असमर्थपणाची जाणीव नष्ट होऊन सामान्यांच्या ठायी असामान्यत्व येऊ लागते.एका व्यक्तीच्या ठायी प्रादुर्भूत झालेल्या चैतन्यातून,अचेतन झालेल्या असंख्यांच्या वृत्तीत ईश्वरी चैतन्याचा प्रभाव प्रत्यक्षात येऊ लागतो. त्या चैत-

त्याच्या लहानशा रोपट्याच्या मुळाशी असंख्य हस्तांनी विचाराचं खत घातलं जातं.त्या विचाराच्या खतात अविचाराचे किडेही वळवळत असतात. विचाराच्या दडपणाखाली रगडून जाणाऱ्या त्या अविचाराच्या किड्यांचंही रूपांतर होऊन तो अविचार विचारात विलीन होऊ लागतो.विचार आणि अविचार यांच्यात, स्वास्थ्याच्या काळात जाणणारा तीव्र भेद नष्ट होऊन विचार-अविचाराच्या खतानं त्या रोपट्यांची महान् वृक्षांत परिणती होते. विचारी अविचाराच्या खतानं मस्त झालेला तो वृक्ष शाखापल्लवांनी साऱ्या जगाला ज्या वेळी व्यापून टाकतो, त्यावेळी सुखासीन वृत्तीनं धुंद झालेल्या जगाला स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव होऊ लागते. वृक्ष मोहरू लागतो, पुष्पित होऊ लागतो. फलनिष्पतीचा आदेश देऊ लागतो. एका जिवाच्या जागृतीतून निर्माण झालेल्या विचारी अविचाराच्या विद्युल्लहरी असंख्य जगाला हादरे देऊ लागतात आणि त्या हादऱ्यांनी जागृत झालेलं जग बंडाचं निशाण उभारून प्रलयंकर महादेवाच्या तांडवाची जाणीव देत अफाट विश्वात नव्या निर्मितीची फलनिष्पती करू लागतं.

त्या जागृतीतूनच विध्वंसाचा जन्म होत असतो. त्या विध्वंसाच्या प्रलयंकर स्वरूपानं जग क्षणभर हादरून गेल्यासारखं दिसतं. स्तिमित झालेले सामान्य जीव घाबरून मागे हटत असतात, त्या वेळी निर्मितीच्या जाणिवेनं नवी सृष्टी निर्माण करण्यासाठी उभा राहिलेला तो असमाधानाचा संदेश देणारा स्फूर्त जीव, तो बंडखोर घाबरलेल्या जिवांना, भविष्यकालीन स्वास्थ्याच्या जयंतीचं आश्वासन देऊन कार्यप्रवण करण्यास जो समर्थ होतो, तो विचारी अविचाराच्या ईश्वरी तेजाच्या सामर्थ्यामुळेच.

हतबल करणाऱ्या अतिविचारी वृत्तीमुळं प्रगमनशील विचारांना प्रतिगामित्व येत असतं. पुरोगामी प्रवृत्ति अविचारातून जन्म पावते खरी, पण त्या अविचाराला अधिष्ठान असावं लागतं ते निर्माणशील विचाराचं. सात्विक विचारांतून अतिविचार जन्माला येतो. अतिविचारी वृत्ती स्वास्थ्याला कार्यप्रवण करू शकत नाही. पण अतिविचारी वृत्तीतून ज्या वेळी अविचाराचा प्रादुर्भाव होतो त्या वेळी त्या विचारी अविचारातूनच कार्यप्रवणतेची आत्यंतिकता जन्म पावते. विचार ही सात्विकता, अतिविचार ही राजस वृत्ती आणि अविचार हा तमोगुण. विचार, अतिविचार आणि अविचार या सत्त्व, रज आणि तमोगुणात्मकतेतून विचारी अविचाराची जी निर्मिती होते तीच बंडखोरी. विचारी अविचार हेच बंडखोराचं ब्रीद. विचाराच्या आत्यंतिकतेनं उत्पन्न होणाऱ्या अतिविचारी वृत्तीनं मागं हटणारं पाऊल पुढं टाकायला स्फूर्ती देणारा अविचार, हेच बंडखोराचं ब्रीद, दस्यूदिवीदासाला विचारी अविचाराच्या सामर्थ्यावर सदेह स्वर्गाला पाठवायचा ईश्वरी प्रयत्न करणाऱ्या महर्षी विश्वामित्रापासून, गुलामी वृत्तीनं दुबळ्या झालेल्या भारतीयांना

अहिंसात्मक सत्याग्रहाच्या सामर्थ्यानं कार्यप्रवण करणाऱ्या महात्मा गांधीपर्यंतच्या साऱ्या बंडखोरांनी जी नवी सृष्टि निर्माण केली, ती या विचारी अविचाराच्या बळावरच. जगातले सर्व बंडखोर यशापयशाचे धनी झाले ते या बंडखोरीच्या विचारी अविचाराच्या व्रीदामुळंच. त्या विचारी अविचाराच्या सामर्थ्यानेच आज भारत स्वतंत्र झाला आहे; बंडखोराच्या या व्रीदाचा साऱ्या जगांत जयजयकार झाला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९८१
दा. क्र. २८५७
शिवाजी मंदिर
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

॥ ३ ॥

साहित्य आणि प्रेरणा : (नाटक)

पहिला प्रश्न आहे तो असा आहे, की मी का लिहितो आणि दुसरा प्रश्न, मी नाटके का लिहितो ? तसे पाहिले तर मी काही नुसती नाटकेच लिहिली नाहीत. कादंबऱ्या लिहिल्या आहेत, प्रबंधही लिहिले आहेत आणि वर्तमानपत्रेही चालवली आहेत. पण मी ओळखला जातो तो नाटककार म्हणून, माझा पेशा आहे, नाटककाराचाच यात काही शंका नाही. मी जे इतर लेखन केले ते केवळ विरंगुळा म्हणून. किंबहुना इतर क्षेत्रात देखील आपल्याला काही साहित्य निर्मिती करता येते की नाही ते पाहण्याकरता. ती निर्मिती काही अगदीच कच्ची ठरली नाही. माझ्या कादंबऱ्या देखील गाजल्या आहेत. तरी पण कादंबरीकारांची नावे घेताना माझे नाव विसरले जाते अन् ते या नाटकांमुळेच. मी जन्मतःच नाटकी. अगदी कळू लागल्यापासून मला नाटकाचा ओढा—वेडच म्हणा ना. माझे हे वेड ओळखून माझ्या वडलांनी माझी अभिरुची बिघडू नये म्हणून मला चांगली तेवढीच नाटके दाखवायचा शिरस्ता ठेवला होता. माझ्या काळातले वडील मुलांना नाटक पाहायला जायला देत नसत. हे असले भाग्य, मला वाटते, फारच थोड्या मुलांच्या—विशेषतः माझ्या पिढीतल्या मुलांच्या वाट्याला आले असेल.

मालवणची लायब्ररी मालवणला शोभेशीच होती. त्या लायब्ररीत नाटके भरपूर होती. कुणीतरी माझ्यासारखाच एखादा नाटकाचा भोक्ता या लायब्ररीचा कारभार पाहत असावा. त्यानेच ही नाटके आणलेली असावीत. दुसरा विशेष हा, की पहिले मराठी नाटक छापले गेले ते मालवणच्या शिळा प्रेसमध्येच. त्यानंतर आणखीही बरीचशी नाटके या छापखान्यात छापली गेली होती. कोकणच्या या गावात इतर कोणत्याही कोकणी गावापेक्षा नाटकाला उत्पन्न जास्त होत असे, म्हणून कोल्हापूरला आलेली प्रत्येक कंपनी घाटातून उतरून खटाऱ्या गाडीने मालवणला येत असे. आणि म्हणूनच मला त्या वेळच्या बऱ्याच चांगल्या नाटक मंडळ्यांची चांगली

चांगली नाटके पाहायला मिळाली. मालवणला आली नाही अशी एकच नाटक मंडळी. किर्लोस्कर नाटक मंडळी. खरे म्हणजे किर्लोस हे गाव कुडाळजवळचे मालवणपासून अगदी थोड्याच अंतरावरचे. पण अण्णासाहेब किर्लोस्करांचे वाडवडील गेले कर्नाटकात म्हणून अण्णासाहेब जसे नाटकी तसेच कर्नाटकी ठरले. त्यांना नाटक मंडळी काढायचा आदेश मिळाला तो गोव्याच्या कृष्णभट्ट बांदकरांकडून. त्या काळचे ते गोव्यातले एक संत पुरुष होऊन गेले. त्यांनी स्वतःहि नाटके लिहिली होती. गोवे म्हणजे नाटकाची मातृभूमि. त्यांना भेटायला अण्णासाहेब गेले त्या वेळी त्यांनी प्रसादाचा नारळ त्यांच्या हाती दिला आणि नाटके लिही, नाटके कर,असा आशीर्वाद दिला. तो पूर्णपणे सफल झाला आणि अण्णासाहेब मराठी रंगभूमीचे जनक ठरले.

मराठी रंगभूमीचा उगम असा हा ज्या दक्षिण कोकणातून झाला त्या भागाचे वातावरण नाटकाने भारावून गेलेले होते. मूळची नाटकाची माझी आवड या वातावरणात जशी वाढली तशी जोपासलीहि गेली. एक कोपरा खरा, पण तो नाटकवाल्यांचा, कलाकारांचा. चित्रकार, शिल्पकार, मूर्तिकार यांची भूमि म्हणजे दक्षिण कोकण — विशेषतः मालवण. पहिली बाज्याची पेटी मालवणात तयार झाली. पहिली सायकल मालवणात, पहिली बटणे मालवणात, पहिली लिहायची निबे (पेने) मालवणात तयार झाली. वामनबुवा हडप यांच्यासारखे रामकृष्णबुवा वझ्यांचे पहिले गुरु मालवणचे. आमच्या घराशेजारी त्यांचे घर. मीहि त्यांचा शिष्य होतो. त्यावेळी मी गात होतो. पुढे आवाज फुटला, तरी गाणे माझ्या कानात होते. मोठमोठ्या गायकांच्या सहवासाचा आणि शिक्षणाचा लाभ मला मिळाला होता, त्याचाहि पुढे उपयोग झाला. मुरुवातीला संगीत नाटकाबद्दल मला मोठी ओढ होती. मी पहिले नाटक लिहिले ते आठनऊ वर्षांचा असताना. एका नाटक मंडळीकडे मी ते बसवण्यासाठी दाखवायलाहि गेलो होतो. ते मालक सज्जन होते म्हणूनच त्यांनी मला सांगितले— चांगले भले मोठे नाटक लिहायला येईपर्यंत या भानगडीत पडू नकोस— योगायोग असा की, या माझ्या पहिल्या नाटकाच्या कथेतूनच 'कुंजविहारी' हे माझे पहिले नाटक रंगभूमीवर आले. मालवणांत एका नाटक मंडळीसाठी मी त्या वेळी अरेबियन नाइट्स्च्या एका कथानकावरून जे नाटक लिहिले होते ते त्या नटांना तितकेसे आवडले नाही म्हणून मी ठेवून दिले आणि 'उत्तररामचरिताचा' अनुवाद करायला घेतला. योगायोग असा, की ते नाटक त्या मंडळीच्या गायक नटाला हवे होते, पण मालकांना नको होते. असेच काही तरी कारण होऊन फडके नांवाचे ते गायक नट रत्नागिरीला आपल्या गावी निघून गेले आणि मग ती मंडळी मोडली. अशा रीतीने तेराव्या वर्षी नाटककार होण्याचा माझा योग सुरुवातीलाच हुकला.

नाटकाची आवड अनावर होती. आम्ही जोडीची मुले गोळा होऊन जी नाटके करीत होतो ती बसबीत होतो मी.या लहानशा प्रयोगावरून मला सुरुवातीलाच कल्पना

आली की, नाटक लिहायचे म्हणजे ते आधी बसवता आले पाहिजे. लिहिलेले नाटक बसवण्यासाठी वाचायला घेतले म्हणजे वाचतां वाचतां त्यांतले बारकावे कळून येत. नुसत्या शब्दावर दिलेल्या जोरावर सबंध लेखनाचा अर्थच कसा बदलतो हे जेव्हा ध्यानी येऊ लागले.तेव्हा नाटक लिहिणे आणि नाटक बसविणे या दोन्ही गोष्टींचा मेळ कुठे आहे ते कळू लागले. नवे नाटक प्रसिद्ध झाले की ते वाचायचे प्रयोग त्या वेळी मी करीत असे. त्यातूनच मला नाटक लिहिणे आणि नाटक बसवणे या दोन्ही कलांचे धडे मिळाले. त्या वेळी माझे हे नाटकवाचन सार्वजनिक नसले तरी आमच्या बऱ्याचशा मित्रांच्या पुढे व्हायचे. श्रोत्याशिवाय पठण नाही की प्रयोग नाही हे त्यावेळी कळून येई.

पुस्तकाचे धोरण कळायला स्वतः वाचावे, श्रोत्यांसमोर वाचावे. म्हणजे श्रोतेच आपल्याला ते आपोआप समजावून देतात हे कळले. मधूनमधून मी नाटके बसवीत असे, त्या वेळी तेच अनुभव येत. तालमीत कल्पना व्हावी एक आणि प्रयोगात परिणाम व्हावा भलताच. त्यावरूनच पुरी कल्पना आली की प्रेक्षक समोर असल्याशिवाय नाटकाची कसोटी लागत नाही. नाटकाचा अभ्यास व्यवस्थित स्वरूपात करण्यासाठी मी इंग्रजी नाटके वाचीत होतो. शेक्सपीअरचे त्या वेळी केवढे मोठे कौतुक, पण मला तो केव्हाहि पटला नाही. योगायोगाने डॉ. कीर्तिकरांचा सहवास घडला, त्यावेळी इब्सेनचा परिचय झाला. मला पटणारा नाटककार शेवटी मिळाला. पण इब्सेनचे तंत्र त्या वेळच्या प्रेक्षकांना पटण्याजोगे नव्हते. इब्सेनच्या तंत्राने लिहिणे हेहि फार कठीण होते, असे त्या वेळी केलेल्या थोड्याबहुत प्रयोगावरून वाटले. चिपळूण गावी असताना रंगभूमीवर नावाजलेली मराठी नाटके बसवायची संधि मिळाली. चिपळूणची परंपरा नाटकाच्या दृष्टीने फार गाजलेली होती. या गावच्या तीन विभागातले तीन नाटकी गट चढाओढीने नाटके करीत होते. त्यांत मी बसवलेले नाटक ज्या वेळी पहिल्या दर्जाचे ठरले त्या वेळी मला एक प्रकारचा आत्मविश्वास उत्पन्न झाला.

याच सुमाराला चिपळूणांत खजिनदारांचा तमाशा आला होता. ते 'महाराष्ट्र संगीत मंडळी' असे आपले नाव लावीत असत. गण गौळणीचा पहिला भाग झाला म्हणजे जो वग करायचा तो नाटकासारखाच पात्रे रंगवून, पोशाख वगैरे करून करीत असत. या गृहस्थाचा जो परिचय झाला तो पुढे मला उपयोगी पडला. 'कीचक वध' नाटकावर बंदी आल्यानंतर नाटककाराला मोठी बिकट परिस्थिती जाणवू लागली. नाटक म्हणजे लोकजागृतीचे साधन. लोकक्षोभाचे साधन हे 'कीचक वधा' ने पूर्णपणे पटवले होते. वर्तमानपत्रापेक्षाहि नाटकाचा परिणाम जास्त प्रभावी, जास्त व्यापक होत होता. साक्षरांसाठी वर्तमानपत्रे आणि निरक्षरांसाठी नाटके-तमाशे. सरकारी बंधने कडक झाली त्या वेळी तमाशा हाती घ्यावा असे मला वाटले.

खजिनदाराला गाठून नवे तमाशे लिहिले. जी कथानके नाटकाला वर्ज्य ठरली असती तीच घेतली तमाशासाठी. आणि हे तमाशे देखील जात होते महाराष्ट्रातल्या कोना-कोपऱ्यातल्या खेड्यातून. त्या काळात या तमाशांनी जो लोकक्षोभ केला होता त्याची नोंद कुठेहि झालेली नाही – होणे शक्य नव्हते– तशी नोंद झाली असती तर तमाशावर देखील बंदी आली असती. त्या तमाशांनी खेड्यापाड्यातल्या लोकांना देखील चाळवून उठवले. तेव्हाच माझ्या मनाचा निर्धार झाला, जगायचे ते रंगभूमीसाठी, लिहायची ती नाटके, करायची तीही नाटकेच. प्रभावी आहे ते 'वाङमय' –बोलले जाते ते– साहित्य नव्हे. जे लिहिले जाते ते 'साहित्य.' असंख्य निरक्षरांचे साहित्य– म्हणजे वाङमय – नाटक, तमाशा, हरिकीर्तन, व्याख्यान वगैरे. उभ्या भारतात महाराष्ट्रानेच लोकक्षोभासाठी रंगभूमि हाती धरली. रंगभूमि म्हणजे करमणूक नव्हे. ती समशेर आहे. लढवय्याच्या हातचे हत्यार आहे. करमणूक म्हणजे भेंड्याची भाजी. या तिखट धारेच्या हत्याराने भेंड्याची भाजी चिरीत बसायचे नसते. गुलामगिरीच्या काळात रंगभूमीने लोकक्षोभाचे काम केले. आता स्वातंत्र्य आले-आता कसला लोकक्षोभ, म्हणून चालायचे नाही. लोकक्षोभ नसला तरी लोकशिक्षण – लोक-नेतृत्वाच्या कामी आज रंगभूमि राबवली पाहिजे.

पूर्वीच्या गुलामगिरीच्या काळात नाटके लिहिणे किती बिकट होते हे, ज्यांनी त्या वेळी तशी नाटके लिहिली त्यांनाच सांगता येईल. नाटके लिहिण्याची माझी प्रवृत्ती जरी जन्मजात होती तरीहि मी नाटके लिहिली ती लोक जागृतीला नाटकाचा उपयोग होतो म्हणून. तमाशांतून प्रयोग केला त्यानेही खात्री झाली. नाटक कसे असावे हे मला शिकवले कोल्हटकरांच्या 'मूकनायका' ने आणि नाटक का लिहावे हे शिकवले खाडिलकरांच्या 'कीचकवधाने. या दोन गुरुजनांच्या पावलांचा मागोवा घेत आज बावन्न वर्षे प्रवास केला. रंगभूमीच्या पडत्या काळातहि तिच्या पायाची मिठी सोडली नाही.

आत्मचरित्र—

स्वतःच्या लौकिक जीवनाचा सर्वांगीण, परिपूर्ण आणि सलग असा जीवनवृत्तान्त कथन करणारे आत्मचरित्र मामा वरेरकर यांनी लिहिले नाही. मात्र नाट्यक्षेत्रातील आपले अनुभव कथन करणारी 'आत्मकथा' लिहिण्याचा त्यांचा मनोदय होता. एकाअर्थी 'नाटक' हीच त्यांच्या लौकिक जीवनाची व ऐहिक संसाराची प्रेरणा आणि प्रवृत्ती होती. म्हणूनच 'नाटक' आणि 'संसार' यांच्यात त्यांनी द्वैत पाहिले नसावे.

'माझा नाटकी संसार' असे अन्वर्थक नाव त्यांनी आपल्या आत्मकथेला दिले. या आत्मकथेचे चार भाग अनुक्रमे १९४१, १९५२, १९५९ आणि १९६२ मध्ये प्रसिद्ध झाले आहेत. या चारही भागांतून आलेली आत्मकथा पूर्ण नाही. मामांनी आपले पहिले 'कुंजविहारी' हे नाटक १९०४ मध्ये लिहिले. त्याचा पहिला प्रयोग १९०८ मध्ये झाला. तोच त्यांच्या नाटकी संसाराचा प्रारंभ. हे नाटक १९१४ मध्ये पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. पहिल्या दोन भागात येथपर्यंतची हकिगत आली आहे. तिसऱ्या भागात १९१४ ते १९२० आणि चौथ्या भागात १९२० ते १९३३ पर्यंतचीच हकिगत आहे. पुढील काही वर्षातील हकिगत त्यांनी लिहून काढली होती. श्री. वा. द. सातोस्कर हे 'गोमंतक' चे संपादक असताना १९६३-६४ मध्ये 'रविवार गोमंतका' त त्यांनी मामांच्या या आठवणी छापल्या होत्या.पण त्या पुस्तकरूपाने आलेल्या नाहीत.

मामांनी आपला 'नाटकी संसार' सुमारे साठ वर्षे केला. पण त्यापैकी सुमारे पंचवीस वर्षांचीच हकिगत आज प्रकाशित आहे. ही आत्मकथा लिहिताना, 'आपण आपल्या अनुभवांची बखर करीत आहोत' असे त्यांनी लिहिले. बखरीच्या वाङ्मयीन स्वरूपाविषयी व गुणवत्तेविषयी आलोचकांमध्ये मतैक्य नाही. परंतु एक तर खरेच की 'बखर' हा लेखनप्रकार कालक्रमवृत्तान्तासारखा असतो. त्या दृष्टीने मामांच्या

आत्मकथेला महत्त्व आहे. मराठी रंगभूमीच्या उत्कर्षापरुर्षाच्या काळात मामा साक्षात वावरलेले आहेत. आपल्या 'नाटकी संसारा' ची बखर करीत असताना ते मराठी रंगभूमीचीही 'बखर'. करीत होते. मामांनी टिळक युग पाहिले, गांधीयुग अनुभवले आणि ते स्वातंत्र्योत्तर काळही जगले. त्यांची आत्मकथा पूर्ण लिहिली गेली असती तर कदाचित ती एका कालखंडाचोही बखर ठरली असती.

॥ १ ॥

पहिली मागणी

रंगभूमीच्या क्षेत्रांत प्रत्यक्ष पाऊल टाकून माझ्या नाटकी संसाराला सुरुवात केल्यास जरी आज बत्तीसांवर वर्षे होऊन गेली असली, तरीही तो संसार थाटण्याची पूर्वतयारी केव्हांपासून झाली याचं सिंहावलोकन केल्याशिवाय तो इतिहास पुरा होणार नाही.

माझं आत्मचरित्र लिहिण्याची इच्छा आज पुष्कळ दिवसांपासून माझ्या मनांत आहे. विशेषतः कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचं आत्मचरित्र प्रसिद्ध झाल्याबर जे वादविवाद आणि रणं माजली, एकमेकांनी एकमेकांच्या उखाळ्या-पाखाळ्या काढल्या, अधिकार नसलेल्या माणसांनी आपल्या हाती सत्ता घेऊन हयात नसलेल्या व्यक्तींच्या लिखाणात दुरुस्त्या.... करण्याचं पाप करून कै. कोल्हटकर यांच्या अनुयायी लोकांत जी वितुष्टं आणली, तीं पाहिल्यावर आपल्या हयातीतच आपलं आत्मचरित्र लिहिलं जावं, असं मला वाटू लागलं.

विनयानं क्षुद्रपणा पदरी घेऊन, असा कोण मी– असं काय मी केलं आहे– वगैरे दांभिकपणाचे उद्‌गार काढून सालसपणाचं खोटं प्रदर्शन मला करायचं नाही. इतर क्षेत्रांत माझी कोणत्याही प्रकारची कामगिरी झालेली असो, त्याचा उल्लेख मला इथं करावयाचा नाही, पण नाट्याच्या क्षेत्रासाठी माझं आयुष्य मी सर्वस्वी खर्ची घातलं आहे. रंगभूमीच्या आणि नाट्यवाङ्मयाच्या क्षेत्रात चैतन्य आणि नाविन्य आणण्यासाठी देह, मन आणि बुद्धीबरोबरच माझी अब्रू आणि अभिमानसुद्धा खर्ची पडलेला आहे. या कार्याच्यापायी जे क्लेश, ज्या यातना आणि विटंबनासुद्धा मला सहन कराव्या लागल्या आहेत, त्या इतिहासाची बखर केल्याशिवाय तर मी देह ठेवला तर माझ्याप्रमाणे रंगभूमीशीही प्रतारणा केली असं होईल.

जगणं आणि मरणं ही दोन्हीही माणसाच्या हाती नाहीत– विशेषतः जगायचा प्रयत्न करीत असतांना। मरण थांबवणं कुणालाच शक्य नाही. मरणं मोठं सोपं आहे,

पण जगणंच फार कठीण आहे. जगत असताना ज्या मरणाच्या यातना अनुभवाव्या लागतात, त्या यातनांच्या पायी होणाऱ्या वेदना सहन करून परिस्थितीशी झगडावं लागतं, त्या परिस्थितीशी झगडत असता हाती घेतलेलं कार्य सिद्धीला नेण्याच्या मार्गांत येणाऱ्या अडथळ्यांना टकरा देत जो पुढील मार्ग आक्रमावा लागतो, त्यांतच जगण्याचं खरं सार्थक असतं. त्याचाच इतिहास पुढच्या पिढीला उद्‌बोधक असतो. तो इतिहास सांगितल्याशिवाय जर मी स्वस्थ राहिलो तर पुढील पिढीच्या दृष्टीनं मी गुन्हेगार ठरेन.

माझ्या आयुष्यांत घडलेल्या बऱ्याचशा अद्‌भुतरम्य घटना सर्वसाधारण नाहीत. जे कार्य मला करता आलं त्या कार्यात मला मार्गदर्शक व्हायला जरी ते विशिष्ट प्रसंग कारणीभूत झालेले असले तरी त्यांचा उल्लेख माझ्या आत्मचरित्राच्या या एका विशिष्ट प्रकरणांत मी करणार नाही. माझ्या विस्तृत आत्मचरित्राचा प्रस्तुत लेखसंग्रह हा एक भाग आहे आणि त्या भागांत सर्वच घटनांचा समावेश करून माझ्या आत्मचरित्राची व्याप्ती मी मर्यादित करणार नाही. नाटकी संसारापुरतीच माझी कैफियत मी या लेखांच्याद्वारे नव्या पिढीपुढे मांडीत आहे.

रंगभूमीच्या क्षेत्रांतला माझा संसार सावरताना आणि आवरताना ज्या ज्या व्यक्तींशी माझा संबंध आला, त्यांतील बऱ्याच व्यक्ती आज इहलोक सोडून गेल्या आहेत त्या व्यक्ती हयात असतांनाच जर हा इतिहास लिहिला गेला असता तर संकोच वाटण्याचं कारण आज राहिलं नसतं. माझ्या नाटकी संसारांत या अशा व्यक्तींनी जसं मला साह्य केलं आहे तशाच मला यातनाही दिल्या आहेत. ही बखर करताना मला त्या अशा व्यक्तींवर वेळीप्रसंगी कोरडे हाणावे लागतील आणि त्या बाबतींतील आपली कैफियत द्यायला आज ते हयात नसल्यामुळे वाचकांच्या दृष्टीने एक बाजू लंगडी पडल्यासारखी होईल, याची मला जाणीव आहे. आणि म्हणूनच सत्याचा अपलाप न करता जे जसं घडलं आहे तसं नोंदून ठेवतांना मला या उणिवेबद्दल डांचणी लागणार आहे यात शंका नाही.

ज्या व्यक्ती हयात आहेत त्या आपली बाजू मांडू शकतील—नव्हे, त्यांनी ती अवश्य मांडावी असा माझा आग्रह आहे. माणसाची दृष्टि मर्यादित आहे.त्या मर्यादेतूनच माणूस आपल्यावर येणाऱ्या प्रसंगांचं निरीक्षण करीत असतो. ते निरीक्षण करीत असतांना त्याची दृष्टि स्वार्थी असते. कितीही निरपेक्षतेचा आव आणला तरी परार्थाची व्याप्तीदेखील स्वार्थाची कक्षा फोडून पार होऊ शकत नाही. अशावेळी आपल्या चुका कुठं झाल्या आहेत ते कळावं, असं प्रामाणिक माणसाला वाटत असतं.

आपल्या चुकांचीही आपल्याला जाणीव नसते असं नाही. पण त्या चुका करतांना जो एक विशिष्ट प्रकारचा अभिमान माणूस बाळगीत असतो, तो टाकून देणं हाडामांसाच्या जिवाला तरी शक्य नाही. आपलं तेच खरं, असं म्हणण्याचा

अट्टाहास मी धरणार नाही, पण आपण केलेल्या चुकांबद्दलचा अभिमान सोडणं सुद्धां माझ्या स्वभावधर्माच्या अनुरोधानं मला कठीण जाईल.

माझ्या हातून असंख्य चुका घडल्या आहेत हे कबूल करायला मला मुळीच संकोच वाटत नाही. काही चुका न कळून घडल्या असल्या, तरी बऱ्याचशा प्रसंगी भावनेला बळी पडून माझ्या हातून असं काही वर्तन झालं आहे, की आज सिंहावलोकन करतांनाच नव्हे, तर त्या अशा चुका करतांना देखील मला त्याबद्दल त्यावेळीसुद्धा पश्चात्ताप होत असे, नव्हे, प्रत्यक्ष ती चूक करीत असतांनासुद्धां त्या चुकीची जाणीव सारखी समोर उभी राहून दटावीत असे— तरीही मला त्याचं काही वाटत नाही. जो पश्चात्ताप वाटत होता तोसुद्धा क्षणिक होता. विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट प्रकारे वागणं— बुद्धिपुरःसर चूक करणं— अवश्य होतं. त्या चुकीपासून दुसऱ्याचं नुकसान होत आहे की नाही, एवढंच मी पहात असे. त्या अशा चुकांमुळं जर कुणाचं नुकसान झालं असेल तर ते माझंच. दुसऱ्या कुणाला त्याची थोडीशी झळ लागली असेल, तरी ती इतकी क्षुल्लक असे, की तीबद्दल त्या व्यक्तीलाही काही जाणवत नसे. आणि म्हणूनच त्या चुका करतांना माझ्या हातून घडलेला आत्मघातकी अव्यवहारीपणा आज मागं दृष्टी वळवून पहातांना मला जितका आकर्षक वाटतो तितकाच अभिमानास्पद वाटल्यावाचून राहात नाही.

म्हणूनच माझ्या आयुष्याशी, विशेषतः नाट्यक्षेत्रांतील माझ्या व्यवहारांशी ज्यांचा ज्यांचा संबंध आला आहे, त्या त्या व्यक्तीतील ज्या व्यक्ती आज हयात आहेत त्यांनी या माझ्या कैफियतीत जे जे आरोप केले जातील त्या त्या आरोपांचं निराकरण करण्यासाठी पुढं यावं, अशी त्यांना माझी विनंती आहे.

काही प्रसंगांतील बाजू मला कळली आहे पण काही प्रसंगांतील दुसऱ्या बाजूबद्दल अजूनही मी अंधारात असेन. त्याच्यावर प्रकाश पाडणं हे त्या त्या व्यक्तीचं कर्तव्य आहे असं मी समजतो.

माणसाला सारंच काही कळत नाही. कर्तव्याच्या तीव्र जाणिवेने बेफाम होऊन ज्यावेळी माणूस चालत असतो त्यावेळी तो कचऱ्याबरोबरच फूलसुद्धा पायदळी तुडवीत जातो. त्या तुडवलेल्या फुलांचा कोमल स्पर्श अगदी एक क्षणाच्या झटक्याला जरी त्याला जाणवला तरी कर्तबगारीच्या कैफांत जितक्या तीव्रतेने त्याची आंच मनाला लागावी तितकी ती लागत नाही. किंबहुना असं सुद्धा वाटतं— खडतर मार्गातून पुढं पाऊल टाकताना कचरा आणि फुलं यांच्याठायी भेद तरी का पहावा ?

पण त्या फुलांना ही जाणीव नसते. त्यांचं अंतरंग कोवळं असतं. बिकट वाटेतून वाट काढताना आवेगाच्या भरात आपल्याला यानं तुडवलं, याची जाणीव त्यांच्या स्वार्थी कोमलतेच्या कक्षेत येत नाही आणि म्हणूनच त्यांची दुखावलेली अंतःकरणं चिरकाल आसवं गाळीत राहातात. तुडवून जाणाराला हे कळत नाही. त्या दुःखाची कल्पना असली तरी चढावाच्या कैफांत तो त्याची पर्वा करीत नाही. ते चढावाचं धोरण यशस्वी झालं तर त्या तुडवलेल्या कोमलतेची तो

क्षिती बाळगीत नाहीच पण अयशस्वी झालं तरी देखील आपल्या कठोरपणाशी त्या कोमलपणाची सांगड घालून, सत्कार्यांसाठी उभयतानीही का खर्ची पडू नये, असं त्याला वाटू लागतं.

कर्तव्याच्या कठोरपणात आत्मविस्मृति होत असते याची जाणीव ज्याला असेल तो माझ्या हातून घडलेल्या चुकांकडे क्षमेच्या दृष्टीनं पाहील. मी क्षमेची याचना करीत नाही— कर्तव्याचा माझा अभिमान एवढा जाज्वल्य आहे, की अशा चुकांबद्दल क्षमा मागण्यासाठी मान वाकवण्यापेक्षा तुटून दोन तुकडे झालेले बरे असं मला, वाटेल. तरीही माझ्या चुकांकडे सहानुभूतीच्या नजरेनं पहाण्याची मी त्यांना विनंती करीत आहे. ती करताना माझ्या या अभिमानाला धोका पोंचण्याइतका माझा प्रामाणिकपणा मी लवचिक होऊ देणार नाही.

माझ्या नाटकी संसाराचा इतिहास सांगायला सुरवात करण्यापूर्वी वे लेली ही प्रस्तावना पुढील बखरीच्या दृष्टीने अत्यंत अवश्य आहे. माझ्या आयुष्यात ज्या गोष्टी जशा प्रकारे घडल्याचं मी पहात होतो तशाच त्या मी नमूद करणार आहे. त्या प्रसंगाकडे पाहण्याची इतरांची दृष्टी निराळी असेल– अगदी माझ्या दृष्टीपेक्षा उलट्या दिशेची असेल— प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याची प्रत्येकाची भावना विशिष्ट प्रकारची असल्यामुळे माझ्या दृष्टिकोनाबद्दलचा त्या पाहणाऱ्यांचा कटाक्षही माझ्या इतकाच प्रामाणिकपणाचा असेल— म्हणून माझ्या हातून घडलेल्या बऱ्यावाईट गोष्टींचं आलोचन करतांना त्यांच्या मनाचा आणि भावनेचा समतोलपणा बिघडू नये, म्हणूनच मला एवढी प्रस्तावना करावी लागत आहे.

कोणत्याही प्रसंगाकडे पाहण्याच्या माझ्या दृष्टिकोणाच्या बाबतीत कुणाचा विरोध असेल, तरीही, त्या विरोधाबद्दल मला दोषी ठरवतांना त्यांनी माझ्या भावनेप्रमाणेच ज्या परिस्थितीतून मला मार्ग काढावा लागला त्या परिस्थितीचा बिकटपणाही ध्यानी आणण्यास विसरू नये, एव्हढंच मला इथं सांगून ठेवायचं आहे.

आधीच मी कोकणचा राहाणारा— महाराष्ट्राच्या दृष्टीनं एकाकाळी जंगली समजल्या जाणाऱ्या एका प्रांताचा रहिवासी त्यातून शिक्षणाचा अभाव– पदवी तर नाहीच पण पदवी मिळविण्यासाठी जिथून दार उघडलं जातं त्या इंग्रजी हायस्कूलच्या शेवटच्या परीक्षेचा शिक्काही मला लागलेला नाही. पोस्ट आणि तारखात्यासारख्या अत्यंत रुक्ष आणि यांत्रिक जीवनाच्या वातावरणांत आयुष्याची बीस वर्षे गेलेली.— त्या यांत्रिक वातावरणांत चकरा खात असतांनाच रंगभूमीच्या आखाड्यांत उतरण्याची संधी मिळाली. मोठ्या कष्टानं कां होईना– पण पहिलं पाऊल टाकतांच पायाला जमीन लागली. म्हणूनच उत्साह आला– आवेश आला. बालपणापासून मनांत सळसळत असलेली महत्त्वाकांक्षा पुरी होण्याच्या आशेला अंकुर फुटला आणि पुढं पाऊल टाकायला सुरवात करण्यास उत्तेजन आलं. त्या योगायोगाच्या सामर्थ्यावरच आजवर एवढा मार्ग काढता आला.

ज्यांच्या पायाशी बसण्याचीही व्यावहारिकदृष्ट्या माझी लायकी नव्हती अशा थोर आणि माननीय व्यक्तींच्या खांद्याला खांदा भिडवून आवडत्या क्षेत्रांत मला लढता आलं— इतकंच नव्हे, तर. अशा सामर्थ्यशाली व्यक्तीच्या मनगटाला मनगट घासूनही आपण काही कर्तबगारी दाखवित आहोत, असा भास होण्याइतकी सुसंधी लाभली. म्हणूनच आज मला माझ्या नाटकी संसाराच्या पसाऱ्याची बखर करणं साध्य झालं.

या माझ्या कैफियतीकडे पहाताना, 'सहानुभूतीनं पहा' असं म्हणण्याच्या वेळी, 'सहानुभूति' या शब्दाचा अर्थ व्यापक करावा लागेल. अनुभूति सारखी असायला–सह–अनुभूति असायला–त्याच क्षेत्रांत त्याच प्रकारचं कार्य ज्यांनी केलं असेल त्यांच्याकडेसच ही याचना करावी लागेल. पण या क्षेत्रांतील मार्ग माझ्यासारखाच आक्रमण करणाऱ्या व्यक्तीशी माझी ही याचना नाही – अनुभूतांशी नाही. प्रेक्षकांशी आहे. तटस्थ, मध्यस्थ, आणि विरोधक या सर्वांनी आपापल्या दृष्टिकोणाप्रमाणं या माझ्या इतिहासाकडे पहाताना, तो एका माणसाचा इतिहास आहे, हे ध्यानात ठेवायला विसरू नये, एवढंच माझं मागणं आहे.

× × ×

मी रत्नागिरीस सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मेडिकल प्यूपिल म्हणून राहिलो होतो. त्यावेळेपासून मला नाट्यसृष्टीची यथार्थ कल्पना येऊ लागली होती.रंगभूमी आणि नाट्यवाङ्मय या दोन परस्परावलंबी प्रकारांचा समन्वय कसा करायचा याचं शिक्षण डॉक्टरीच्या शिक्षणाबरोबरच मला डॉक्टर कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांच्याकडून मिळू लागले.

डॉक्टर कीर्तिकर यांचं माझ्यावर अत्यंत प्रेम होतं. त्यांचा पुस्तकसंग्रह फारच मोठा होता. त्यावेळी ते भगवद्गीतेचं दिंडी वृत्तांत रूपांतर करीत होते. लिखाणाच्या नकला करण्यासाठी म्हणून पहिल्यानं त्यांनी मला कामाला लावलं आणि त्यातूनच वात्सल्याची भावना उगम पावली.

माझ्या वयाला न शोभणारा आणि इतरांना अप्रिय असणारा असा माझा फाजील मोठेपणाच त्यांना फार आवडत असे. लहान तोंडी मोठा घास घेण्याच्या माझ्या वृत्तीला त्यांनीच उत्तेजन दिले.

शेक्सपिअरच्या नाटकाबद्दल मी त्यांच्याबरोबर चर्चा करायला सुरुवात केली. त्यांनी शेक्सपिअरची मुख्य मुख्य नाटकं माझ्याकडून पहिल्यानं अभ्यासून घेतली आणि आधुनिकतेच्या दृष्टीनं– म्हणजे १८९८ सालातील आधुनिकतेच्या दृष्टीनं देखील ती कशी मागासलेली आहेत हे मला दाखवून दिलं.

माझ्या लेखनाला जर काही विशिष्ट वळण लागलं असेल तर ते त्याच्या शिकवणीमुळं. पहिल्यानं त्यांनीच माझ्या हाती इब्सेन दिला. डॉक्टरांनी इब्सेनची नाटकं

मला वाचून दाखवायला सुरुवात केली आणि ज्यावेळी तीं नाटकं ते वाचून दाखवू लागले त्यावेळी इब्सेनचं हृद्गत मला आपोआप कळू लागलं.

कोणत्याही रीतीनं टीका न करता नुसत्या वाचनानंच लेखकाच्या हृद्गताचं स्पष्टीकरण कसं होतं हे ज्यावेळी मला कळून आलं त्यावेळी मी वाचनावरच जोर देऊ लागलो. आपल्या मनाप्रमाणं नाटकं न वाचता डॉक्टरसाहेबांच्या समोर तीं मी मोठ्यानं वाचू लागलो. माझ्या वाचनात होणाऱ्या चुका ते प्रतिशब्दाला दुरुस्त करीत आणि त्याबरोबरच पूर्वापार संबंध समजावून देऊन इतर नाटककारांच्या नाटकांतील प्रसंगांची तुलनात्मक छाननी करीत.

इब्सेनच्या वाचनानं मला नवी दृष्टी प्राप्त झाली. त्या काळी इब्सेन हे नावसुद्धा कुणाला माहीत नव्हतं.

मोलियरची नाटकंसुद्धा मी त्यांच्याकडेच वाचली.

डॉ. कीर्तिकरांकडचा हा पुस्तकसंग्रह फार दुर्मीळ असा होता. माझ्या साऱ्या आयुष्यात हा योगायोग भाग्याचा होता. सर्व प्रकारच्या सर्व विषयांवरची अधिकृत पुस्तकं मला त्यांच्याकडे वाचायला मिळाली, इतकंच नव्हे, तर तीं पुस्तकं वाचताना ज्या शंका उत्पन्न होत असत त्यांचं निराकरण करणारा डॉ. कीर्तिकरांसारखा गुरु भेटला, म्हणूनच आज मला एक विशिष्ट प्रकारचं वाङ्मय निर्माण करण्याइतकं सामर्थ्य प्राप्त झालं.

× × ×

डॉ. कीर्तिकरांना गाण्याचा नाद होता. ते प्रार्थना-समाजिस्ट होते. रोज संध्याकाळी ते भजन करीत असत. या भजनाच्या साथीसाठी त्यांनी संगमेश्वरचे मोरूबुवा लिमये यांना आपल्या पदरी बाळगलं होतं. मला त्यावेळी गाण्याचा आवाज होता. मालवणच्या हडपबुवांकडे मी गाणं शिकलो होतो त्यामुळे भजनात मीही भाग घेत असे. आवाज फुटण्याच्या वेळी जी गाण्याची मेहनत करावी लागते ती न केल्यामुळे माझा गाण्याचा आवाज गेला असला तरी पुढल्या काळात बारीक आवाजात चाली सांगण्याइतकं माझं गाणं शिल्लक राहिलं होतं. मोरूबुवा यांनी पूर्वी नाटकांतही कामं केली होती. त्यामुळं त्यांच्या सहवासाचा मला फार उपयोग झाला. केव्हातरी नाटक पहाताना ऐकलेली सौभद्र-शाकुंतलातली पदं मला त्यांच्या तोंडून पुनः पुन्हा ऐकायला मिळत. निरनिराळ्या गायक नटांचं एकच पद त्या त्या नटानं म्हणतांना योजलेले गाण्याचे निरनिराळे ढंग त्यांनीच मला दाखवून दिले.

ते कीर्तन करीत असत. डॉक्टरसाहेबांकडे असतांनाही मधूनमधून रत्नागिरीच्या विठोबाच्या देवळांत त्यांची कीर्तनं होत.

डॉक्टरांची राहाणी पाश्चिमात्य थाटाची होती. त्यांचा बटलर सुरती घेड होता. त्याचं नाव शिवा दियार. तो मोठा गंमती माणूस होता. मी पहिल्यानंच डॉक्टरांकडे

गेलो त्यावेळी 'याच्या हातचा चहा चालेल का?' असं डॉक्टरांनी मला विचारलं. मी कारण विचारतांच त्यांनी शिवालाच तो प्रश्न विचारायला मला सांगितलं तेव्हा शिवा म्हणाला, 'मी घेड ब्राह्मण आहे.'

मला संकोच वाटला तरीही मी हंसलो तेव्हा तो म्हणाला, 'हंसायचं कारण नाही. ब्राह्मण म्हणजे स्वैंपाक करणारा असा त्याचा अर्थ घ्यायचा.'

मी त्या दिवशी तो चहा घेतला. पण सारा दिवस मला तळमळ लागली होती. आपण काही तरी भयंकर पाप केलं, असं मला वाटत होतं. मी डॉक्टरना दुसरे दिवशी माझी मनस्थिती सांगितली, तेव्हा त्यांनी मला एक भलं मोठं व्याख्यान दिलं. त्या व्याख्यानाचा त्यावेळी माझ्यावर जरी परिणाम झाला नाही तरीही भेदाभेद विसरण्याचं ते शिक्षण मला पहिल्यानंच मिळालं.

डॉ. कीर्तिकरांची एक हकिकत इथं सांगितली तर ती अप्रस्तुत होणार नाही. मोरूबाबा लिमये यांची कीर्तनं विठोबाच्या देवळांत होत असत. डॉक्टरना येण्यासाठी बुवांनी एकदा आग्रह केला. डॉक्टर या नात्याने ते रत्नागिरीत अत्यंत लोकप्रिय होते, तरीही इंग्रजी थाटाच्या संसारामुळे ते बहिष्कृत समजले जात असत. कित्येकजण तर ते खिश्चन आहेत असंही म्हणत असत. त्या दिवशी त्यांनी कीर्तनाला यायचं ठरवलं त्यावेळी गावात एकच खळबळ उडाली. डॉक्टरांची धमनी गाडी देवळाच्या दाराशी आली तेव्हा सारेच पहायला धावले. डॉक्टर गाडीतून उतरले तेव्हा मात्र सर्व आश्चर्यचकित झाले. ते पितांबर नेसले होते. अंगांत सदरा नव्हता. अंगावर नुसती शालजोडी पांघरलेली होती. हातात पळीपंचपात्री घेतलेली होती. अशा थाटांत प्रवेश करून त्यांनी विठोबाला आणि नंतर हरदासबुवांना जमिनीला मस्तक टेकून नमस्कार केला त्यावेळी सर्वांचाच विरोध मावळला. एक अट्टल सनातनी गृहस्थ म्हणाले, 'कसाही का वागेना, पण आज तर पितांबर नेसून आला! कसा लेकाने शास्त्रीबोवांचा थाट आणला आहे! आणि तसा देवभक्त पण आहे हो! देवापुढे नमस्कार करून रांडेच्याने एक रुपया देवापुढे ठेवला!'

त्या प्रकारामुळं सनातनी लोकांचा विरोध बराच मावळला. कीर्तनाच्या वेळी कथानकांतील करुण प्रसंग ऐकताना त्यांच्या डोळ्यातून अश्रुधारा येत असलेल्या पाहून आजूबाजूचे लोकही गहिवरल्यावाचून राहिले नाहीत. त्यात काही दिखाऊपणा नव्हता. खरोखरच ते मनाचे मोठे हळवे होते. पुस्तक वाचीत असताना एकदा करुण प्रसंग आला तर अगदी ओक्साबोक्सी रडताना मी त्यांना पाहिलं होतं. त्यांचं हसणही तसंच मोठं अफाट असे. त्यांच्याइतकी सूक्ष्म रसिकता (Keen Sense of humour) म. गांधींखेरीज दुसऱ्या कोणत्याच व्यक्तीच्या ठिकाणी मी पाहिली नाही. सहज बोलता बोलता ते कुणालाही अगदी साध्या उद्गारांनी हसवू शकत. ऑपरेशनच्या टेबलाजवळ देखील त्यांची ही विनोदबुद्धि जागी असे. ज्याची चिरफाड चालू असे तो रोगीसुद्धा त्यांच्या विनोदाला हसल्यावाचून राहात नसे. त्यांच्या विनोदाचा परिणाम लहान-

सहान चिरफाडीत क्लोरोफॉर्मसारखा होत असे, असं म्हटलं तर ती अतिशयोक्ती होणार नाही.

त्यांच्या सहवासाचा आणि शिक्षणाचा मला जो फायदा झाला तो ऑक्सफर्ड केंब्रिजमध्ये जाऊन देखील झाला नसता. कोणताही प्रोफेसर आपल्या विद्यार्थ्याला इतक्या वात्सल्यानं शिकवीत आला असेल असं मला तरी वाटत नाही. अजाणपणाने केलेल्या अगदी अवास्तव प्रश्नांची सुद्धा उत्तरं देण्याचे त्यांचं कौशल्य अद्वितीय होतं. माझ्या बुद्धीला जर काही विशिष्ट प्रकारचं वळण लागलं असेल तर ते केवळ त्यांच्या शिकवणीमुळं.

ते एकाकी होते– विधुर होते. केव्हा केव्हा या एकलेपणाची आग त्यांना चांगलीच होरपळून काढीत असे. पण सर्वस्वी लोकसेवेला वाहून घेण्याची सवय आणि विद्याव्यासंग, या दोन आधारांच्या जोरावरच त्यांनी आपला एकलकोंडा आयुष्यक्रम आनंदमय करून घेतला होता. हे त्यांचं जळजळीत उदाहरण माझ्या डोळ्यासमोर असल्यामुळं माझ्या पुढल्या आयुष्यातील तशाच परिस्थितीत मी खचून गेलो नाही.

डॉक्टरांच्या ठिकाणी एक मोठं वैशिष्ट्य होतं. मराठी बोलत असताना ते चुकूनसुद्धा इंग्रजी शब्द उच्चारीत नसत. ते उत्तम वक्ते होते. त्यांचा आवाज मोठा खंदा होता. आपणही एक वक्ता व्हावं अशी महत्त्वाकांक्षा माझ्या ठिकाणी उत्पन्न व्हायला त्यांचं अस्खलीत, समतोल आणि लयबाज वक्तृत्वच कारणीभूत झालं.

॥ २ ॥

बंगाली रंगभूमी

स्वदेशहितचिंतक मंडळीचे कुंजविहारी नाटकाचे प्रयोग दक्षिण महाराष्ट्रांत गाजू लागले होते. पण त्या नाटकाचं पुस्तक प्रसिद्ध झालेलं नसल्यामुळे त्या यशाचा वाटा माझ्या पदरांत पडत नव्हता. गाजत होतं ते कुंजविहारी नाटक. त्याच्या कर्त्याची दखल कुणीच घेत नव्हतं. नाटक मंडळीचं नाव गाजत होतं, नटांची नावं गाजत होतीं. पण कर्त्यांचं नाव अंधारांतच राहिलं होतं. प्रेक्षकांच्या भावनेला या नाटकानं हालवून सोडलेलं असलं तरी वाचकांच्या अभावी साहित्याच्या क्षेत्रांत त्या नाटकाला किंमत येत नव्हती.

माझ्या मनाला कोणती गोष्ट लागून राहिली असेल तर ती हीच होती. इतर नाटककारांची नाटकं प्रसिद्ध झाली होती. पण ज्या नाटकाबद्दल मला एवढा अभिमान होता तेच प्रसिद्ध होत नव्हतं. पुस्तकाच्या प्रसिद्धीशिवाय साहित्याच्या क्षेत्रात कुणी कुणाची दखल घेत नसे आणि साहित्याच्या क्षेत्रांत योग्य स्थान मिळाल्याशिवाय नाटककाराच्या यादीत माझं नाव पडत नव्हतं. पुस्तक प्रसिद्ध करायला पहिल्या-पासूनच जनुभाऊंचा विरोध होता आणि आता तर माझ्या हाती काहीच राहिलं नव्हतं. मनाचा निर्धार केला असताही पुनः पुन्हा अंतःकरणांत बंडाची उकळी उठत असे, ती या एकाच गोष्टीमुळे.

अशा वेळी रावसाहेब काळे मला धीर द्यायचा आटोकाट प्रयत्न करीत. फलनिरपेक्ष कर्म करीत राहाण्याचा गीतेचा उपदेश ते पुनः पुन्हा माझ्या कानी घालीत असत. मनावर त्याचा परिणाम होत होता, समजूत पडत होती, पण मनाचं समाधान होत नव्हतं हे मात्र अक्षरशः खरं!

मनात उसळणारी ही बंडाची वृत्ति नाहीशी करायला नोकरीचा रुक्ष व्यासंग पुरा पडत नव्हता. बंगाली रंगभूमीशी पहिल्यापासूनच माझा संबंध आला होता. पण एक गिरीशबाबूंची नाटकं सोडली तर बंगाली भाषेतील इतर नाट्यवाङ्मय माझ्या अवलोकनांत आलं नव्हतं. म्हणून तो व्यासंग मी सुरू केला. कलकत्त्याच्या वसुमती

प्रेसनं त्यावेळी अत्यंत अल्प किमतीत बऱ्याचशा प्रख्यात ग्रंथकारांचे समग्र ग्रंथ प्रसिद्ध करायला सुरवात केली होती. बंकिमबाबूंच्या सुट्या पुस्तकांना सर्व मिळून जिथं जवळ जवळ पन्नास रुपये किंमत पडत असे, त्या समग्र ग्रंथाचे तीन भाग नुसत्या पाच रुपयात मिळत असत.ही ग्रंथावली आणून मी बंगाली नाट्यवाङमयाचा–आ ण त्याबरोबरच इतर नाट्यवाङमयाचा पद्धतशीर अभ्यास करू लागलो.बंगाली नाट्यवाङमयाची परंपरा १० व्या शतकाच्या आरंभापासून सुरु झालेली असल्यामुळे मराठी वाङमयाशी तुलना करता ते वाङमय अत्यंत समृद्ध होतं. मराठी 'वाङमय' बंगालीच्या तुलनेनं पासंगालाही पुरलं नसतं. पण 'साहित्य' किंवा रंगभूमीच्या दृष्टीनं ज्यावेळी मी तुलना करून पाहू लागलो त्यावेळी मला असं दिसून येऊ लागलं, की परिमाणाच्या दृष्टीनं बंगाल समृद्ध असला तरी गुणदृष्ट्या तो मराठी वाङमयाशी तुलना करताना उणा पडत होता. बंगाल्यात इंग्रजीचा प्रचार महाराष्ट्राच्या आधी झालेला असला तरी बंगाली नाट्यवाङमयावर आधुनिक इंग्रजी नाट्यवाङमयाचा तितकासा प्रभाव पडला नव्हता. पारंपरिकतेच्या दृष्टीनं महाराष्ट्र बंगाल इतकाच दृष्टी असला तरी नावीन्याच्या दृष्टीनं महाराष्ट्र केव्हाही आघाडीलाच होता. साहित्यक्षेत्रातल्या बंडखोरांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकी महाराष्ट्रात असली तरी बंगाल मात्र आपल्या आद्य परंपरेला चिकटून राहिला होता. त्यामुळेच बंगाली नाट्यवाङमयाची प्रगति होत नव्हती.

बंगाली रंगभूमि स्थायिक असल्यामुळं आणि विशेषतः स्त्रियांच्या भूमिका स्त्रियाच करीत असल्यामुळे, तंत्रदृष्ट्या ती रंगभूमी महाराष्ट्राच्या कितीतरी पुढं होती. फिरत्या फकिरीच्या वृत्तीमुळं मराठी नाटक मंडळ्यांना आपला प्रपंच बंगाल प्रमाणेच विस्तृत प्रमाणात थाटता येत नव्हता आणि म्हणूनच मराठी रंगभूमि तंत्रदृष्ट्या मागं पडली होती.

अभिनयाच्या दृष्टीनंही बंगाली नटवर्ग महाराष्ट्राच्या कितीतरी पुढं होता. आणि म्हणूनच त्या काळच्या नव्या लेखकांनी लिहिलेली मराठी साहित्याच्या दृष्टीनं सामान्य ठरणारी नाटकं देखील प्रयोगदृष्ट्या मराठी नाटकांपेक्षा वरचढ ठरत होती. मराठी रंगभूमीचं पाऊल पुढं पडावं म्हणून हीच दुरुस्ती अंमलात आणणं अवश्य होतं. महाराष्ट्रात स्थायी रंगभूमि कशी निर्माण होईल याचा विचार मी करीत होतो.

माझं वैराग्य अल्पायुषी ठरलं. नाटक लिहिण्याचे विचार पुनःपुन्हा वर उचंबळून उठू लागले. त्याहीपेक्षा रंगभूमीला वैभव प्राप्त करून देण्याची कल्पना माझ्या मनाला सारख्या टोंचण्या देऊ लागली. निग्रह पांगळा पडत होता; पण अनुग्रहाला काही स्थान मिळत नव्हतं.

॥ ३ ॥

गडकरी यांची भेट

रत्नागिरीहून मुक्काम सोडण्यापूर्वी 'कुंजविहारी' नाटकाचं पुस्तक प्रसिद्ध करायचं ठरलं. त्यासाठी फोटो घेणं अवश्य होतं. त्याचप्रमाणे कोल्हापूरला जाऊन छत्रपती शाहूमहाराज यांची परवानगी घेणंही तितकंच अवश्य होतं. फोटो घेण्याचं काम सोपं होतं, कारण रत्नागिरीच्या हायस्कूलमध्ये श्री. आपटे या नावाचे जे एक ड्रॉइंग मास्तर होते ते फावल्यावेळी फोटोग्राफीचा व्यवसाय करीत. ते चांगले आर्टिस्ट होते. माझ्या कसोटीला उतरतील असे फोटो काढण्याचं सामर्थ्य त्यांच्याठायी होतं अशी माझी खात्री होती. मुंबईला इतकी माणसं नुसत्या फोटोसाठी घेऊन जाणं शक्य नव्हतं..... याचवेळी आमच्या विश्वनाथच्या मनांत एक नवीन कल्पना आली. 'कुंजविहारी' नाटकाचा प्रकाशक आपण स्वतः व्हावं अशी त्याची असलेली इच्छा प्रत्यक्षात येणं शक्य नव्हतं. जनूभाऊंना ते कधीच पटलं नसतं. म्हणून विश्वनाथनं एक कल्पना सुचवली. फोटो तयार होऊन त्यांचे ब्लॉक्स करायला अवधी होता. तितक्या मुदतीत माझं 'वरवर्णिनी' नाटक छापून घ्यायचं आणि ते तो त्यावेळी काढीत असलेल्या 'वैश्य मासिका' च्या तर्फे प्रकाशित करायचं. माझ्या पहिल्या नाटकाचा प्रकाशक होण्याच्या दुधाची तहान 'दुसरं नाटक पहिल्यानं प्रकाशित करून' त्या ताकावर भागवण्याची त्याची योजना मी मान्य केली. दुसरी मोठी अडचण माझ्यासमोर उभी राहिली; ती कोल्हापूर सरकारची परवानगी मिळवायची. ती परवानगी मिळणं अशक्य होतं असं मुळीच नाही. पण ती मिळविण्यासाठी एका 'राजा' समोर जाऊन मुजरा करायचं माझ्या जिवावर आलं होतं. शिवछत्रपतींवर माझी भक्ती होती ती ईश्वराइतकी. पण शिवछत्रपतींच्या वंशांतल्या कुणाही माणसापुढं, तो केवळ त्या कुटुंबातला एक छत्रपतीचा वारस आहे म्हणून मान झुकवायला माझं मन तयार होत नव्हतं. पण 'कुंजविहारी' नाटकाच्या प्रसिद्धीसाठी जनूभाऊंनी ही अटच घातलेली असल्यामुळं माझा नाइलाज झाला. मी गोवामार्गे कोल्हापूरला जायला निघालो.

वाटेत पणजी येथे मुक्काम केला त्यावेळी किर्लोस्कर मंडळीबरोबर गडकरी तिथं असल्याचं कळलं. माझे गोव्याचे मित्र श्री. रामा नाईक यांना घेऊन मी किर्लोस्कर मंडळीत गेलो. तिथं काहीच दाद लागेना. गडकऱ्यांनी गोव्यात मित्रमंडळीचा परिवार गोळा केला नव्हता. गडकऱ्यांच्या दिमतीला असलेला पांडुरंग बापट नावाचा कंपनीतील मुलगा वाटेत भेटला. त्यानं गडकऱ्यांची भेट करून द्यायचं कबूल केलं.

पांडूच्या सूचनेप्रमाणे मी कंपनीच्या बिऱ्हाडी गेलो तेव्हां गडकरी दारांतच भेटले. ते फार अस्वस्थ असल्याचं मला दिसून आलं. अघळपघळ रीतीनं बोलण्याइतक्या मनःस्थितीत ते नसावे असं वाटल्यामुळं मी त्यांचा निरोप घेऊन येतेवेळी पुन्हा भेटण्याचं कबूल करून मडगावमार्गे कोल्हापूरला गेलो.

महाराजांची भेट घेतली. त्यांनी परवानगी दिली. पुस्तकाच्या सुरवातीला घालण्यासाठी आपला खास फोटोही दिला. त्या बैठकींत त्यांनी माझ्याकडून सारी हकिकत विचारून घेतली. ते म्हणाले, 'जनूभाऊंकडून माझे पैसे येणं आहेत. त्याची फिटंफाट करायचा त्या लेकाच्याचा हा डाव आहे. काही हरकत नाही. मला ते नाटक फार आवडलं आहे आणि ते तुम्ही मला अर्पण करताहा यांत माझाच मान होतोय. जनूभाऊ एरवी मोठा बुद्धिमान असला तरी पैशाला चिकट आहे. खूप नागबलंय त्यानं मला. पण नाव होतं ना माझं कंपनीच्या नावावर, म्हणून सारं काही विसरून टाकलंय मी. तुम्हीसुद्धा सुटलात त्याच्या तावडीतून हे बरं झालं. आता आमचा केश्या स्वतः उभा राहिलाय. त्याला एक नाटक लिहून द्या. राजा सोहोनी देखील माझाच आहे. तो आता तुमच्याकडेच आला आहे. तेव्हा त्याच्यासाठी तुम्ही करायचं ते करालच--पण केश्याला विसरू नका. केश्या म्हणजे एक तरवार आहे. ती तरवार हाती मिळाली तर तुम्ही जग जिंकाल –' केशवराव भोसले यांची स्तुति करताना महाराजांना त्यांच्याबद्दलच्या अभिमानाचा उमाळा येत होता. या एका संस्थानिकाचं एका नाटकाबद्दलचं एवढं विलक्षण प्रेम पाहून मला मोठा आनंद झाला. स्वदेशहितचिंतक नाटक मंडळीला त्यांनी आश्रय देऊन ती आपली म्हटल्याचं उदाहरणही महाराष्ट्राच्या इतिहासात, किंबहुना भारताच्या इतिहासांत, पहिलंच होतं हेही त्यावेळी माझ्या ध्यानी आलं.

परत येतांना पणजी येथे गडकऱ्यांची पुन्हा भेट घेतली. यावेळी नाट्यविनोद मंडळीचा मुक्काम मालवणला आला होता. तिथ म्हणजे माझ्या घरीच येऊन चार दिवस तरी राहाण्याचं वचन घेऊन मी मालवणला आलो.

दोनच दिवसांनी मालवणला यायचं त्यांनी कबूल केलं होतं. पण ते आले नाहीत, की त्यांजकडून पत्रही आलं नाही. त्यामुळं मी अस्वस्थ झालो. त्यावेळी ते 'पुण्यप्रभाव' नाटक लिहित होते. त्याचसाठी ते गुंतून पडले असतील असं वाटून मी माझे मित्र माधवराव दळी यांना पणजीला पाठवलं. ते दुसऱ्या दिवशी आले ते एकटेच आले. त्यांनी सांगितलेली हकिकत ऐकून

मी थक्कच झालो. मालवणला येण्यासाठी गडकरी उतावीळ झाले होते. पण एका नाटक मंडळीत माझी भेट घेण्यासाठी ते जाणार आहेत असं कळल्यामुळं कंपनीचे त्यावेळचे एकमेव मालक शंकरराव मुजुमदार यानी त्यांना हरकत घेतली. नाटक पुरं झालं नव्हतं, इतकंच नव्हे, तर त्यातला फारच थोडा भाग लिहून झाला होता. आणि त्यांच्या अंगावर एकशे दहा रुपये होते. ते एकशे दहा रुपये परत द्या, किंवा नाटक तरी पुरं करून द्या. नाहीतर तुम्हाला जाऊ देणार नाही, असं शंकररावांनी खडसून सांगितलं. गडकरी शंकररावांना बडीलकीचा मान देत असत. दुसरा कुणी असता तर त्यांच्या संतापी स्वभावाला अनुसरून त्यांनी त्याची हजेरीच घेतली असती. पण या बाबतीत तरी त्यांना मूग गिळून स्वस्थ बसावं लागलं होतं. तीन दिवस ते माथं फिरल्यासारखं होऊन उपासपोटी पणजीत उगीच भटकत होते.

मी मोठ्या पेचात पडलो. मी पर्शरामशेटकडे ही रक्कम मागितली असती तर ती त्यांनी दिली असती. पण मला तसं करायचं नव्हतं. पर्शरामशेट हे एका नाटक मंडळीचे मालक होते. एका मालकाच्या पकडीतून सोडवून दुसऱ्या मालकाच्या ऋणांत गडकऱ्यांना टाकणं मला इष्ट वाटलं नाही. म्हणून राजारामबापूंनाही मी या प्रकरणाचा पत्ता लागू दिला नाही. त्यावेळच्या दृष्टीनं एवढी मोठी रक्कम माझ्याकडे तर नव्हतीच, पण एवढी मोठी रक्कम मालवणात कुणाकडूनही मिळेल अशी आशा मला नव्हती. माझे बालमित्र गोविंद रघुनाथ उर्फ बाळ परूळेकर (गर्डेकर मास्तर) यांच्याकडे मी हौ गोष्ट काढली. गडकऱ्यांना भेटण्यासाठी तेही फार उत्सुक होते. त्यांनी तात्काळ तेवढी रक्कम काढून माझ्या हाती दिली आणि ती देऊन मी माधवराव दळी यांना पणजीला पाठवलं.

पणजीला एवढी रक्कम देणारा गडकऱ्यांना कुणी भेटणार नाही ही खात्री असल्यामुळंच शंकररावांनी तो डाव टाकला होता. रामा नाईक म्हणाले, की या रकमेच्या गोव्याच्या नोटाच करून घेऊ आणि मग त्या गडकऱ्यांनी शंकररावांना द्याव्या म्हणजे ही रक्कम गडकऱ्यांना गोव्यातच मिळाली अस सिद्ध होईल. गडकऱ्यांना ही क्लृप्ति आवडली. ब्रिटीश एकशे दहा रुपये किंमतीइतक्या गोव्याच्या नोटा घेऊन ते शंकररावांकडे गेले आणि म्हणाले, 'मी मालवणला जाणार.' शंकररावांनी विचारलं, 'नाटक पुरं झालं का?' गडकरी उत्तरले, 'नाही.' शंकरराव म्हणाले, 'मग तुम्हाला जाता येणार नाही. एकदा तुम्हाला मी सांगितलं ना, की एक पैसे तरी द्या किंवा नाटक तरी द्या—'

डाव्या हाताच्या मुठीत नोटा घेऊन गडकऱ्यांनी शंकररावांना म्हटलं, 'हे घ्या—तुमचे पैसे!' असं म्हणून त्यांनी डाव्या हातानं त्या नोटा त्यांच्या तोंडावर फेकल्या आणि पुन्हा मागं वळूनसुद्धा न पहाता ते तडक रामा नाईक यांजकडे आले आणि तिथून मालवणला आले.

गडकरी मालवणला आल्यामुळे आम्हा सर्वांना फार आनंद झाला. त्यावेळी गडकरी हे फारसे प्रख्यात नव्हते. 'पुण्यप्रभाव' नाटकातील 'नाचत ना गगनात नाथा' हे पद त्यांनी तिथंच रचून बाळकृष्ण साठे याजकडून म्हणून घेतलं. त्या तिथल्या मुक्कामात किर्लोस्कर मंडळी किंवा तिच्याशी झालेला व्यवहार या बाबतीत एक शब्दही काढायचा नाही, असं त्यांनी आम्हाला बजावून सांगितलं होतं. तसा कुणी उल्लेख केला तर त्यांना इतका उद्वेग होई, की त्यांना मूर्च्छा येईल की काय असं वाटे. सर्व हकिकत कळण्याची माझी आणि गर्डेकर मास्तर यांची फार इच्छा असली तरीही आम्हाला आत्मसंयमन करावं लागलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही मालवणच्या सिंधुदुर्ग किल्ल्यावर गेलो होतो. त्या किल्ल्यात शिवछत्रपतींचं देऊळ आहे. रामकृष्णादि दैवताप्रमाणेच तिथं शिवछत्रपतींची पूजा केली जाते. दर सोमवारी पालखी निघते. किल्ल्यावरच्या एका भागात दोन कोनाड्यात शिवाजीमहाराजांच्या दोन्ही हातांचे आणि पायांचे ठसे उमटवलेले आहेत. त्यांना स्पर्श करताच गडकरी गहिवरून आले आणि त्यांच्या डोळ्यांतून आसवांच्या धारा लागल्या. शाहू मोगलांच्या दरबारातून निघून दिल्लीच्या मांडलिकाची सनद बगलेला घेऊन साताऱ्यावर चाल करून आला त्यावेळी ताराबाई शिवछत्रपतींचं सिंहासन आणि राजचिन्हं घेऊन याच किल्ल्यात राहिली होती. त्या जागेचा चौथराच नुसता पहायला दिसतो. त्या जागी आम्ही बसलो तेव्हा जणू काय पूर्वेतिहासाची तीं चित्रं आमच्या नजरेसमोरून जात आहेत असा भास झाला. किल्ल्याच्या एका भागाला भुईसरपट लहानसा एक खिंडारवजा दरवाजा आहे, त्या दरवाजातून राजघराण्यातल्या बायका समुद्रस्नान करण्यासाठी किल्ल्याबाहेर असलेल्या लहानशा बाळबंटांत जात असत, ती जागा मी गडकरी यांना दाखवली. त्या जागेच्या वरच्या बुरुजावर जाऊन आम्ही टेहळणी केली, त्या टेहळणीचा परिणाम मराठी नाट्यवाङ्मयाला ललामभूत होणाऱ्या एका नाटकाच्या कल्पनेत झाला. 'राजसंन्यास' नाटकाचा जन्म त्याच दिवशी त्याच ठिकाणी झाल्याची गडकरी यांनी तिथल्या तिथं घोषणा केली. याच दृश्याच्या प्रसंगानं 'राजसंन्यास' नाटकाची सुरुवात झालेली आहे.

गडकऱ्यांच्या नित्याच्या स्वभावधर्माप्रमाणे त्यांनी 'पुढलं नाटक तुम्हालाच देईन' असं राजारामबापू सोहोनींना आश्वासनही दिलं. बाळकृष्ण साठे सदोदित त्यांच्याबरोबर असे आणि त्याची काव्यात्मक वाचाळ वृत्ती गडकऱ्यांना फार आवडल्यामुळे ते आपल्या कविता त्याच्याकडून म्हणून घेत असत.

गडकऱ्यांचं लक्ष पुण्याकडे लागलं होतं. आई (मा) ची त्यांना काळजी वाटत होती. त्यामुळं आमची सर्वांची इच्छा असूनही अधिक दिवस राहण्याचा

आम्ही त्यांना आग्रह केला नाही. चारच दिवस त्यांचा मालवणात माझ्या घरी मुक्काम झाला. ते दिवस मोठे मजेत आणि काव्यशास्त्रविनोदात गेले. शंकरराव मुजुमदारांच्या वर्तनानं त्यांना जो जबर धक्का बसला होता तो ध्यानी घेऊन आम्ही सर्वंच त्यांना आनंदात ठेवण्याचे आपापल्यापरीनं प्रयत्न करीत होतो. त्याला यश येऊन ते मोठ्या उल्हासानं पुण्याला निघून गेले.



॥ ४ ॥

महाराष्ट्र रंगभूमी आणि राजकारण

त्याच दिवशी रात्री श्रीयुत बापूजी अणे यांनी मुद्दाम केलेल्या मागणीवरून केशवरावांची गाण्याची बैठक झाली. श्री. बापूजींखेरीज इतर कुणी व्यक्ती आल्या नव्हत्या की त्यांना बोलावणंही करण्यात आलं नव्हतं एकट्या बापूजींसाठीच हा जलसा कंपनी राहात असलेल्या धर्मशाळेच्या माडीवर करण्यात आला होता. रात्री नऊ वाजल्यापासून पहाटे तीन वाजेपर्यंत केशवराव यत्किंचितही विश्रांति न घेता गात होते. पेटीची साथ अशा गाण्यांच्यावेळी पेंढारकर करीत असत. शिवाय चार मुले तंबोरे घेऊन बसत असत. बैठकीचं अवडंबर नसताही त्या रात्री केशवराव इतके सुंदर गायले की त्याला तोड नव्हती. राष्ट्रपुरुषांबद्दल केशवरावांना जो निस्सीम आदर होता त्याचंच हे द्योतक होतं.

केशवरावांचं गाणं बापूजी अत्यंत तल्लीन होऊन ऐकत होते. प्रसंगविशेषीं त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू येत असल्याचं स्पष्ट दिसून येत होतं. या बैठकीत केशवरावांनी निव्वळ शास्त्रोक्त गायन केलं होतं. नाटकातील एकही पद म्हटलं नव्हतं. गायनाच्या असल्या बैठकीत इतर गवयांप्रमाणे केशवराव यत्किंचितही हातवारे करीत नसत. डोळे उघडून समोर पाहात सुद्धा नसत. श्रोत्यांच्या आनंदापेक्षा स्वतःच्याच आनंदात ते गर्क झाले असल्याचं अशा गायनाच्या वेळी दिसून येई. मधून पाणी पिण्यापुरता एकादं मिनिट विसावा घेण्यापलीकडे त्यांच्या गायनात खंड पडत नसे.

त्या दिवसाची ही बैठक मोठी अपूर्व झाली होती गायन संपल्यावर केशवरावांचे आभार मानताना आणि तारीफ करताना बापूजी गहिवरून आले होते.त्यांच्या तोंडचा तोंड भरून दिलेला आशीर्वाद ऐकताच केशवरावांनी त्यांच्या पायावर मस्तक ठेवून नमस्कार केला त्या वेळी ते अधिकच गहिवरून आले.तो प्रसंग अविस्मरणीय होता.

महाराष्ट्राच्या रंगभूमीचा आणि महाराष्ट्रीय राजकारणाचा संबंध निकटचा आहे याची जाणीव त्या क्षणापूर्वी मला झाली नव्हती. पुढच्या काळात या परिस्थितीची प्रत्यंतरं पाहायचं आणि अनुभवायचं भाग्य मला लाभलं. आजच्या पिढीच्या लोकांना

या संबंधाचा इतिहास अजून माहीत झालेला नाही. त्या रात्री बैठक उठल्यावर आम्ही उजाडेपर्यंत बोलत बसलो होतो. अशाच वेगवेगळ्या प्रसंगाच्या आठवणी केशवरावांनी त्यावेळी सांगितल्या. नाटकमंडळीचं बिऱ्हाड-निदान ललितकलादर्श मंडळीचं बिऱ्हाड-म्हणजे तत्कालीन राजपुरुषांचं केव्हा विश्रांतिस्थान, तर केव्हा आश्रयस्थान होतं. त्यामुळे सरकारी डिटेक्टिव्हांचा ससेमिरा मंडळीच्या मागं सारखा लागलेला असे. वीर वामनराव जोशी तर घरचेच होते आणि त्यांच्यावर सरकारची अत्यंत करडी नजर होती. त्या काळात त्यांना केवळ केशवरावांचाच काय तो पाठिंबा होता, पण ही बाब स्वार्थाची म्हणून गणली गेली असती. कारण ते त्यांचे नाटककार होते. त्या काळच्या चळवळीसाठी केशवरावांनी मुक्त हस्तानं पैशाची देखील मदत केली होती– अगदी गुपचूप मदत केली होती. तिला तोड नव्हती. त्या सर्व प्रसंगाचा इतिहास देण्यासाठी पानंच्या पानं खर्ची घालावी लागतील म्हणून नुसत्या उल्लेखावरच भागवून घेत आहे.

नाटकमंडळीचा आणि सरकारी अधिकाऱ्यांचा संबंध व्यवहारदृष्ट्या पदोपदी येत असे. जिल्हा, तालुक्याच्या अधिकाऱ्यापासून पोलिसखात्यातील सर्व दर्जाचे अधिकारी ते रेल्वेवरच्या तिकीट-कलेक्टरपर्यंत, नाटकमंडळीचं भवितव्य प्रत्येकाच्या हाती अडकून पडलेलं असे. स्वाभिमानाला कमीपणा न आणता हे सगळे लागेबांधे सांभाळणं आणि त्याजबरोबर राजकारणी व्यक्तींशी सहकार्य करणं म्हणजे मोठं दुष्कर कार्य होतं. नाटक मंडळीच्या मालकाला या पेचप्रसंगातून निभावून जाताना मुत्सद्देगिरीच वापरावी लागत असे. इकडे घरी राजकारणी लोक असायचे आणि त्याचवेळी त्यांच्या मानगुटी पकडायला तत्पर असलेले सरकारी अधिकारीही यायचे. या दोघांनाही दोन बाजूला ठेवून दोघांचीही मनं सांभाळायची, असला तारेवरचा नाच नाटक मंडळीच्या मालकाला त्या वेळी करावा लागे. आणि हे असले दिव्य करण्यात निष्णात असलेली केशवरावांखेरीज दुसरी व्यक्ति क्वचित्च दिसून येईल.

मी नुकताच नोकरी सोडून आलो होतो— म्हणजे नोकरीचं बंधन तोपर्यंत प्रत्यक्ष तोडलं नव्हतं. ते बंधन तोडायची इच्छा होती, पण सामर्थ्य होतं की काय याची माझी मलाच शंका वाटत होती. नोकरी सोडायची म्हणजे नुसता नाटककाराचाच का पेशा पत्करायचा ? मला प्रश्न पडला होता तो हाच, राजकारणात पडण्याइतकं सामर्थ्य आपल्या अंगी आहे की नाही, हेच मला कळत नव्हतं. त्यावेळी राजकारणात अग्रभागी असलेली जी माणसे होतीं, त्यांच्या पायाशी बसायचीसुद्धा आपली लायकी नाही असं मला वाटे. नाटक मंडळींत प्रवेश केल्यामुळं आपण आता या महान् व्यक्तींच्या अगदी जवळ येणार असं मला त्या दिवशींच्या केशवरावांशी झालेल्या बोलण्यावरून वाटलं. आणि एक प्रकारच्या नव्या उत्साहाने आणि स्फूर्तीनं माझं हृदय भरून आलं.

॥ ५ ॥

लोकमान्य टिळक वरेरकरांचे नाटक पाहतात

याच वेळी मी सांथीच्या इन्फ्लुएन्झानं आजारी पडलो. त्या दुखण्यांतून मी बरा होऊन उठायच्या वेळी लोकमान्य टिळक आपली विलायतेची सफर आटोपून परत आले होते. ते सरदारगृहांत उतरले होते. त्यांनी माझं 'संन्याशाचा संसार' हे नाटक पहावं अशी माझी जिवाभावाची इच्छा होती. स्वतः जाऊन त्यांची भेट घेण्याइतकं मला सामर्थ्य नव्हतं. केशवरावांचा आणि लोकमान्यांचा पूर्वीचा परिचय होता. केशवरावांनी त्यांची सेवाही केली होती. त्यांच्या कार्याला वेळोवेळी आर्थिकदृष्ट्या हातभारही लावलेला होता, पण ते लोकमान्यांना भेटायला एकटेच जायला भीत होते.

पुण्याच्या अनाथ विद्यार्थी गृहाबद्दल केशवरावांना फार जिव्हाळा होता. तसाच मलाही होता. अनाथ- विद्यार्थी गृहाची पेटी आपल्या नाटकाच्या वेळी प्रत्येक प्रयोगाला फिरवली जाण्याची केशवरावांनी व्यवस्था केली होती. मुंबई आणि पुणे इथल्या मुक्कामांत त्या संस्थेचे स्वयंसेवक पेटी फिरवण्याचं काम करीत असत. त्यांत आजचे प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ डॉ. खैर आणि 'सकाळ' पत्राचे मालक ना. भि. परुळेकर हेच बहुधा हे काम करीत असत. इतर गावी कंपनीचा माणूस ही पेटी फिरवून महिना अखेर ती रक्कम अनाथ विद्यार्थीगृहाकडे पाठविण्यात येत असे. या व्यवस्थेमुळे अनाथ विद्यार्थी गृहाचे चालक दादासाहेब केतकर यांचा आणि केशवरावांचा फार स्नेहसंबध जडला होता.

लोकमान्य मुंबईला आल्यावेळी त्यांच्या स्वागतासाठी आलेले केतकर हे कंपनीच्या मुक्कामावरच उतरले होते. लोकमान्यांना 'संन्याशाचा संसार' नाटक पाहायला बोलवावं आणि त्या नाटकाच्या उत्पन्नाचा बराचसा भाग अनाथ विद्यार्थी गृहाला द्यावा अशी केतकर आणि मी सूचना केली तेव्हा केशवरावांनी प्रयोगाच्या उत्पन्नाची सारीच रक्कम प्रयोगाचा खर्च स्वतः सोसून अनाथ विद्यार्थी-गृहाला देण्याची इच्छा प्रदर्शित केली. अर्थात आम्हाला केशवरावांचे ते उपकारच वाटले.

केशवराव आणि केतकर यांनी जाऊन सरदार गृहात लोकमान्यांना आमंत्रण दिलं आणि त्यांनी ते स्वीकारलं.

त्या दिवशी सर्वच मंडळी मोठ्या उत्सवी वृत्तीनं वावरत होती. सर्वांनाच मोठा कैफ चढला होता. लोकमान्य येणार म्हणजे त्यांच्यावरोबर वरीचशी मंडळी येणार हे ठरलेलंच होतं. थिएटरांतल्या पुढल्या तीन रांगा या पाहुण्यांसाठी मुद्दाम राखून ठेवल्यामुळे उत्पन्नात थोडीशी खूट आली खरी पण त्याला केतकरांचा मुळीच विरोध नव्हता. मीच काय तो बिछान्यावर पडलो होतो. अशावेळी मारे गडबड उडवून द्यायची जी मला आवड होती ती असमर्थतेमुळे अशक्य झाल्यानं मी अत्यंत अस्वस्थ झालो होतो. मोठ्या कष्टानंच मी थिएटरमध्ये आलो होतो.

प्रयोग सुरू झाला. पण नित्याप्रमाणे मला ऑथर्स होल मधून प्रयोगाचे निरीक्षण करण्याइतकी ताकद नव्हती. आत एक बिछाना घातला होता आणि मी त्याच्यावर पडून होतो. मी प्रयोग पाहण्याचा प्रयत्न केला, 'पुरूषत्व दाखवा, खंबीर व्हा, तुमचे सर्व काही प्रीतीने व्हावे' हे वाक्य गुलेलूनं उच्चारलं तेव्हा लोकमान्यांची हसताहसता मुरकुंडी वळली.

त्या दिवशी प्रयोग फारच रंगला होता. प्रत्येक नट जीव तोडून काम करीत होता. हंशा, टाळ्यांचा सारखा कडकडाट होत होता. दुसरा अंक संपल्यावर लोकमान्यांना आत बोलावून घेण्यात आलं. त्यांच्या बरोबरची सारी मंडळीही आत आली होती. चहा आणि फराळाची भरगच्च योजना केशवरावांनी केली होती. लोकमान्यांनी फक्त चहाच घेतला. ते साखर खात नसल्यामुळे मुद्दाम सॅकरीन आणून ठेवायची आधीच व्यवस्था केली होती.

या पाहुणचारानं बराच वेळ घेतला. लोकमान्य आत आले, तेव्हा बोलत-बोलतच आले होते. त्या विलायतेच्या गोष्टी होत्या. पहिल्यानं मी त्यांच्या पायावर डोकं ठेवून नमस्कार केला आणि नंतर केशवरावांनी केला. ते बोलण्याच्या नादांत असल्यामुळे म्हणा किंवा इतर काही कारणामुळं म्हणा, त्यांनी आमच्याकडे फारसं लक्ष दिलं नाही. बाकीचे नटही नमस्कार करून जात होते आणि समोर उभे राहात होते, तरीही त्यांच्याकडे त्यांचं लक्ष गेल्याचं दिसून आलं नाही. केशवरावांची थोडीशी निराशा झाली. लोकमान्यांचा वरदहस्त आपल्या मस्तकावर पडेल आणि त्यांच्या तोंडचा आशीर्वाद आपल्याला मिळेल अशी जी अपेक्षा केशवरावांची होती तो पुरी झाली नाही.

खाडिलकरांनी मात्र मला पाठीवर हात थोपटून शाबासकी दिली. ते म्हणाले, 'नाटकाची कल्पना तर सुंदरच आहे, नाटक परिणामकारक आहे. योग्य वेळी रंगभूमीवर आलं आहे, पण हे कितीसं लोकप्रिय होईल याबद्दल मी साशंक आहे. मला मात्र ते फार आवडलं आहे. विशेषतः हे गुलेलूच्या तोंडचं 'का, की' मला

भारीच आवडलं.' हे 'का की' बसवायला मला अत्यंत परिश्रम पडले होते. मी त्यांना म्हटलं, 'हे 'कां की माझं नव्हे. ते मराठी बायबलातलंच आहे. गुलेलूच्या तोंडची सारीच भाषा मराठी बायबलातली वाक्यं टिपून काढून बनवली आहे.' ते ऐकून त्यांना आश्चर्य वाटलं. ते म्हणाले, 'तर मग हे मराठी बायबल मला एकदा वाचलं पाहिजे.' मला पुन्हा एकदा शाबासकी देऊन ते निघून गेले. केशवरावांनाही त्यांनी असाच उत्तेजनपर आशीर्वाद दिला. नरसोपंत केळकरांनी मात्र कुणाकडे ढुंकूनही पाहिलं नाही.

तिसरा अंक सुरू होण्याच्या आधी लोकमान्यांनी छोटंसं भाषण केलं. ते म्हणाले, 'प्रयोग मोठा सुंदर झाला. केशवरावांचं गायन आपल्याला फार आवडलं. नाटकाचा विषय नवीन असला, सुधारणावादी असला, तरी तो लोकांना कितपत रुचेल याबद्दल मी साशंक आहे. आम्ही परंपरेचे भोक्ते आहोत. आमची जुनी परंपरा मोठी अभिमानास्पद आहे. त्या परंपरेत पतितपरावर्तनाला जागा नाही. असं जरी असलं तरी आजच्या काळाकडे दृष्टी देऊन आणि पुढल्या काळावर नजर ठेवून हे नाटक लोक पाहतील अशी माझी अपेक्षा आहे.'

प्रयोगाबद्दल त्यानी समाधानाचे उद्‌गार काढले तरी नाटकाच्या विषया बाबतीत फारसं उत्तेजन न दिल्यामुळे त्यांचं ते भाषण ऐकून आम्हां सर्वांना फारसा आनंद झाला नाही. क्षणभर मला दादासाहेब खापर्ड्यांच्या उद्‌गारांची आठवण झाल्यावाचून राहिली नाही. (मामा वरेरकरांनी उमरावती मुक्कामी याच नाटकाचे दोन अंक दादासाहेब खापर्डे यांना वाचून दाखविले तेव्हा आवेशानं त्यांनी नापसंती व्यक्त केली आणि 'हे नाटक उमरावतीत रंगभूमीवर आलं तर स्टेजवर पहिला जोडा मी फेकीन' असे उद्‌गार काढले होते.— **संपा.**)

सुमारे दीड-दोनशे मंडळी आमंत्रित असूनही त्या दिवशीच्या नाटकाला साडेआठशे रुपये उत्पन्न झालं होतं. ते सारं लोकमान्यांच्या हस्ते अनाथ विद्यार्थी-गृहाला देण्यात आलं.

हा रविवारचा प्रयोग होता. मंगळवारच्या 'केसरी'त लोकमान्यांच्या मुंबईतील कार्यक्रमाची चांगली दीड पानं हकीकत आली होती. पण तीत या एवढ्याच कार्यक्रमाचा तेवढा नामनिर्देशसुद्धां करण्यात आला नव्हता. अनाथ विद्यार्थी-गृहाला दिलेल्या देणगीचाही उल्लेख नव्हता.



॥ ६ ॥

नाटकांचा प्रेक्षकवर्ग

माझ्या नाटकाचा प्रयोग प्रेक्षागृहात बसून पाहण्याचं धैर्य मला कधीच झालं नाही. त्या कालापर्यंत जरी मी लोकांना फारसा परिचित झालो नव्हतो, तरीही प्रेक्षागृहात बसल्यावर प्रेक्षक माझ्याकडे बोटं दाखवतील असं वाटून मला घबराट उत्पन्न होई, म्हणून मी नाटकाचा प्रयोग आंतून पाहात असे. अशा रीतीनं केवळ घबराटीच्या दृष्टीनं नाटक आतून पाहताना मला एक नवा अनुभव मिळाला. नाटककार प्रेक्षकांत बसायचा म्हणजे तो बहुधा पुढच्या रांगेत असायचा. सारे प्रेक्षक त्याच्या पाठीशी असायचे. हंशा, टाळ्या ऐकू येतील तेवढ्याच. यापेक्षा प्रेक्षकांवर नाटकाच्या विविध प्रयोगांचा कसा परिणाम होतो, ते प्रेक्षागृहात बसून कळणं शक्य नसतं. परदेशात ऑथरची एक बॉक्स स्वतंत्र असते, असं मी ऐकलं होतं. दृष्टीचा कोन योग्य प्रमाणात साधलेला असल्यामुळे या बॉक्समधून नाटककाराला रंगभूमीच्या अंतर्भागाप्रमाणेच प्रेक्षकांवर नजर टाकणं सुलभ होतं. तशा प्रकारची कोणतीच योजना आपल्या कुठल्याही नाटक गृहात केलेली नाही, की तशी योजना करण्याची आवश्यकताही कुणाला भासली नाही. मला ही उणीव फार जाणवली. यापूर्वीचे आमचे सर्व नाटककार– एक श्रीपाद कृष्ण खेरीज करून प्रेक्षागृहात बसून आपलं नाटक पहात असत. इतर सामान्य प्रेक्षकांप्रमाणे ते आपल्या नाटकाच्या प्रयोगाकडे पाहात असतांना मनमुराद हसून घेत असत किंवा आसवंही गाळीत असत. पण आपल्या नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी प्रयोगाचा परिणाम प्रेक्षकांच्या चेहऱ्यावरून पहाण्याची आवश्यकता पूर्वीच्या नाटककारांना जाणवली नाही. माझ्या घबराटवृत्तीमुळे मला नवी दृष्टी प्राप्त झाली आणि त्यासाठी मी एक योजना अंमलात आणली. दर्शनी पडद्याच्या आतल्या बाजूच्या पहिल्या बुइंगला मी एक डोळा देण्याइतकं छोटंसं छिद्र पाडून घेतलं. त्यातून पहाताना सारं प्रेक्षागृह नजरेसमोर येत असे. पण आतून कुणी पाहत आहे हे बाहेरच्या माणसाला मुळीच दिसून येत नसे. या

छिद्राला मी माझ्या खाजगी भाषेत 'ऑथर्स होल' असं नाव दिलं होतं. आणि या पहाण्याच्या क्रियेला मी 'छिद्रान्वेषण' म्हणत असे. या छिद्रान्वेषणाच्या पायी मला प्रेक्षकांच्या चेहऱ्यावरचे परिणाम स्पष्टपणे पाहता आले आणि त्यामुळं भिन्नभिन्न प्रेक्षकांचे मला अंदाज येऊ लागले. एकाच प्रसंगात, वाक्याचा, कोटीचा किंवा विनोदाचा वेगवेगळ्या प्रेक्षकांवर कसा वेगवेगळा परिणाम होतो हे आता मला दिसून येऊ लागलं. सर्वसाधारण प्रेक्षकांवर जो गोळाबेरीज परिणाम होतो तोही मला आकलन करता येऊ लागला. प्रत्येक प्रयोगाच्या वेळी नाटकाच्या सुरुवातीपासून मी खडा राहून जे हे निरीक्षण करीत असे,त्याचा नाट्यरचनेच्या कामी मला कसा उपयोग झाला हे माझ्या नाट्यरचनेत दिवसे-दिवस जो बदल होत गेला आहे त्यावरून अजमावता येईल. माझ्या या निरीक्षणाचं पुढं अगदी व्यसनांतच रूपांतर झालं. नाटक चालू असताना मला केव्हाही स्वास्थ्य मिळालं नाही ते यामुळंच.

माझ्या स्वतःच्या नाटकाप्रमाणेच मी इतर नाटककारांच्या प्रयोगांचं असंच निरीक्षण करीत असे. तो एक तुलनात्मक अभ्यास होता. त्या अभ्यासाचाही माझ्या लेखनावर परिणाम झाल्यावाचून राहिला नाही.

नाटककाराचं जसं एक वैशिष्ट्य असतं तसंच नटाचंही असतं. लेखन आणि अभिनय या दोहोंच्या कसोटीनं हे वैशिष्ट्य प्रस्थापित होत असतं. पण प्रेक्षकांत देखील असंच वैशिष्ट्य असतं हे आता मला कळूं लागलं होतं. नाटककारात आणि नटांत ज्याप्रमाणे उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ असा दर्जा लावता येईल त्याचप्रमाणे प्रेक्षकातही हा दर्जा या निरीक्षणाच्या पायी मला लावता आला. आणि त्यामुळे कित्येक 'उत्कृष्ट प्रेक्षक' माझ्या नजरेला येऊ लागले. कित्येक प्रेक्षक नाटक पाहातांना तन्मय होत असत, रसग्रहण करीत असत, सहानुभाव प्रदर्शित करीत असत. तर कित्येक प्रेक्षक नुसतेच विनोदावरच तेवढी नजर ठेवीत असत. कित्येक करुणरसाच्या प्रसंगांनी क्वचित् ओलावलेल्या डोळ्यांनी पाहत असत, तर कित्येक सद्गदित होऊन हुंदकेही देत असत. उत्कट करुणरसाच्या प्रसंगी डोळ्यांतून खळखळ अश्रुधारा गाळणारे प्रेक्षकही माझ्या नजरेला येत, त्याचप्रमाणे अत्यंत चिकित्सक दृष्टीनं नाटक पाहात असतांना लेखकाच्या मनोभूमिकेशी एकरूप झाल्यामुळं किंवा मतभेद झाल्यामुळं होणारे परिणामही कित्येक चोखंदळ प्रेक्षकांच्या मुद्रेवर स्पष्ट दिसून येत.

प्रेक्षकांचा एक वर्ग मात्र मला मोठा दुःसह होत असे. नाटक पाहात असतांना आपण स्वतः तर नीटपणे नाटक पहायचंच नाही, पण शेजारच्या प्रेक्षकांशी हुज्जत घालीत त्यांना विक्षेप करायचा, अशा वृत्तीच्या प्रेक्षकांना त्यांचे कान पकडून पैसे परत देऊन थिएटरबाहेर घालवावं असं मला वाटत असे. केशवरावांनासुद्धां अशा प्रेक्षकांची फार चीड असे. हे प्रेक्षक बहुधा फुकटे असत. काही वृत्तपत्रांच्या

धंद्यांतले, तर काही स्वतःला टीकाकार म्हणवणारे, तर काही नुसतीच विद्वत्तेची आणि पदवीची घमेंड असलेले. असेच प्रेक्षक सामान्य प्रेक्षकांना आपल्या चाळ्यांनी सतावून सोडीत असत.

प्रेक्षकांचा आणखी एक वर्ग होता. तो नाटकमंडळीच्या 'हितचिंतकां'चा. अर्थात् आणखी हेही फुकटेच असत त्यांत काही सरकारी अधिकारी असत, काही व्यापारी उदमी असत, तर काही नुसतेच नाटकमंडळींच्या मालकाशी आणि मॅनेजरशी दोस्ती करून कंपनीच्या बिऱ्हाडी फुकट चहा, प्रेक्षागृहांत फुकट जाग आणि नाटकाच्या मध्यंतरात पुन्हा फुकट चहा उकळणारे सभ्य मवाली असत. नाटक चालू झाल्यावर बऱ्याच वेळानं यायचं, नाटक चालू असतांना आणि विशेषतः रंगभूमीवर एखादा महत्त्वाचा प्रसंग चालू असतांना मध्येच उठून जायचं, उगीच इकडेतिकडे येरझारा घालून प्रेक्षकांच्या नजरेला विक्षेप करायचा, उगीच कुणाशीतरी ओळख काढून त्याला मागं पाहून खूण करायची आणि आपण पुढे बसलो आहोत याची प्रतिष्ठा मिरवायची, अशा वृत्तीनं वागणारे प्रेक्षक म्हणजे नाटककार आणि नाटकमंडळीचे कट्टे दुष्मन होत असं मला वाटे. या माणसांना आळा घालणं किंवा बंदी घालणं अगदीच अशक्य असे. कारण कोणत्या ना कोणत्या तरी कारणानं नाटक मंडळीच्या हितसंबंधाच्या दृष्टीनं त्यांचं आगमन अपरिहार्य असे. माझ्या उभ्या नाटकी जीवनांत या माणसांना वठणीवर आणण्याचं कार्य मला तर करता आलं नाहीच, पण नाटकमंडळीच्या मॅनेजरकडूनही त्यांना आळा घालणं अशक्य झालं.

या सर्व प्रकारच्या प्रेक्षकांच्या मनोवृत्तीच्या अभ्यासामुळे माझा फार मोठा फायदा झाला. महाराष्ट्रातल्या ज्या ज्या गावी नाटकमंडळ्या जात असत त्या त्या गावच्या प्रेक्षकांचं 'छिद्रान्वेषण' केल्यामुळं वेगवेगळ्या महाराष्ट्रीयांची मनोभूमि मला अजमावता आली. महाराष्ट्राच्या प्रत्येक भागांतील प्रेक्षकांचं अशा रीतीनं निरीक्षण केल्यामुळं अखिल महाराष्ट्रीय दृष्टी मला निश्चित करता आली आणि त्याच धोरणानं मी माझी पुढील नाटकं घडवीत आलो.

कॉलेजचं शिक्षण न मिळाल्याबद्दल मला यापूर्वी खंत वाटत असे. त्या शिक्षणाचा मला कितपत उपयोग झाला असता याची शंका आहे. पण नाटकमंडळीबरोबर सारा महाराष्ट्र पालथा घालतांना जे शिक्षण मला मिळालं, तेच माझ्या नाटकी जीवनात मला पूर्णपणे उपयोगी पडलं. मॅक्झिम गोर्की म्हणतो, त्याप्रमाणे हेच माझे खरे 'युनिव्हर्सिटी डेज' होत. या थिएटरमधल्या प्रक्षेागृहाच्या युनिव्हर्सिटीत मला जे शिक्षण मिळालं, त्याची तोड कुठल्याही विश्वविद्यालयीन शिक्षणाला नाही.

॥ ७ ॥

आधुनिक नेपथ्याचा पहिला प्रयोग

'सत्तेचे गुलाम' या नाटकासाठी काहीतरी नवीन करायचं, रंगभूमीचं स्वरूप अजिबात बदलून टाकायचं असं आम्ही ठरवलं होतं. पूर्वी कंपनी मुंबईत असतांना मी पेंढारकर यांना घेऊन इंग्रजी नाटकं जशी पहात होतो, त्याचप्रमाणे त्या लोकांचा परिचय करून घेऊन त्यांच्या तालमीही पहात होतो, याचा उल्लेख पूर्वी आला आहे. तसे वास्तव देखावे करावे या उद्देशाने पूर्वी कंपनीत आलेले मारुतिअण्णा काळे यांना बोलावून घेतलं होतं. चित्रकलेपेक्षा रंगभूमीचा विचार स्थापत्याच्या दृष्टीनं करावयाचा आणि उइंगा आणि झालरी यांना अजिबात छाट द्यायचा असं ठरवून देखाव्यांची योजना केली होती. दरवाजे आणि खिडक्या यांच्या भिंतींची जाडी प्रत्यक्ष दाखवायची. (म्हणजे नुसती रंगवायची नाही.) त्याचप्रमाणे खोल्या, दिवाणखाने यांची लांबी, रुंदी आणि खोली ही यथातथ्य दाखवायची आणि त्याला वास्तवता येण्यासाठी काळे पेंटर यांनी एक सलग कमान करायची जी कल्पना काढली त्यामुळे रंगभूमीचं स्वरूप बदलून गेलं.

'शहाशिवाजी' नाटकापासून काळे पेन्टर यांच्या डोक्यांत आणखी एक कल्पना घोळत होती ती त्यांनी यावेळी अमलांत आणली. दुसऱ्या अंकातील पहिला देखावा हा लक्षाधीश नलिनी गोखले हिच्या घराचा होता. तो तीन मजली दिसावा अशी योजना केली होती. एक जिना लावण्यापुरत्या स्टेजच्या फळ्या कापून त्या प्रवेशांत येणारीं पात्रं खालून वर जिन्यानं येण्याची व्यवस्था केली होती. त्या जिन्याला कटडा होता. स्टेजवर जिथं सर्व नाटकांतील प्रसंग दाखवले जात होते तो भाग रिसेप्शन रूमवजा होता. त्याच्या मागल्या बाजूला वरच्या मजल्यावर जायचा जिना होता. आत जाणारी पात्रं या जिन्यानं वर जात असत आणि बाहेर जाणारी पात्रं जमिनीखालच्या जिन्यानं खाली जात असत. या रचनेमुळे हा देखावा प्रेक्षकांना अपूर्व वाटला.

पहिल्या अंकाचा दुसरा बफर प्रवेश रस्त्यावर होता. तो रस्ता मुंबईच्या प्रिन्सेस

स्ट्रीटचा मोठा रस्ता होता. त्या रस्त्यांतल्या एका मधल्या इमारतीवर भल्या मोठ्या अक्षरांनी तिसऱ्या मजल्यापासून खाली जमिनीपर्यंत 'अशोक स्टोअर्स' अशी भरीव अक्षरे करून लावली होती. या रस्त्यापासून मधला गिरगावचा रस्ता ओलांडून पलीकडे गेल्यावर टी. बी. हॉस्पिटल होतं.डॉक्टर ढवळे यांच्यावरोबर गेल्यावेळी हे दृश्य मला नाटकाच्या रचनेच्या दृष्टीनं योग्य वाटलं होतं. म्हणून त्या रस्त्याचा फोटो घेऊन हा दुसऱ्या प्रवेशाचा पडदा तयार केला होता. नाटकाच्या पहिल्या प्रयोगाच्या दिवशी हा पडदा खाली येताच त्याला कडाडून टाळी पडली.

नाटक लिहीत असतानाच या सर्व गोष्टींचा विचार करावा लागला होता. मुंबईहून फार दूर अंतरावर नसलेलं, पण जिथं शेतीचे प्रयोग करण्याची अनुकूलता आहे, असं स्थळ शोधण्यासाठी पहाणी करावी लागली होती.कंपनीचे मित्र शेट गोविंद-दास यांची मोटार त्यावेळी पेंढारकर सुरवातीपासूनच वापरीत होते. आम्ही दोघेही– म्हणजे मी आणि पेंढारकर–मुंबईच्या आसपास त्या मोटारीतून चकरा मारीत फिरतांना चेंबूर ही जागा ठरवली. आज चेंबूर हे एक मोठं औद्योगिक केंद्र झालं आहे, पण त्यावेळी ते एक ओसाड गांव होतं. ते कुणाच्या माहितीतसुद्धा नव्हतं. कित्येकांना ते नाव पहिल्यानं काल्पनिक वाटलं, इतकं ते अप्रख्यात होतं. पण नाटकातल्या प्रसंगांच्या दृष्टीनं मुंबईपासून जसं ते जवळ नव्हतं तसं ते फारसं दूरही नव्हतं. त्या बाजूला मुंबईतील लोकांची ये-जाही नव्हती. या सर्व दृष्टीनं नाटकातील प्रसंगाला ते अनुरूप होतं. मात्र चेंबूरचा जो देखावा त्या नाटकात दाखवला होता तो अत्यंत सुंदर होता, अर्थात तो काल्पनिक होता. खऱ्या चेंबूरमध्ये निसर्गाच्या सौंदर्याचा मागमूससुद्धा नव्हता.

या नाटकात शक्य तितकी कमी गाणी घालायची असं मी ठरवलं होतं. पहिल्यानं तीन पात्रांना गाणी घातली होती. पण प्रयोगाच्या वेळी तिसऱ्या पात्राची गाणी गाळून टाकली. नायक आणि नायिका या दोघांनाच गाणी ठेवली आणि तीं फक्त सोळाच होती. त्या वेळच्या संगीत नाटकांतून गाण्यांची संख्या कमी झाली होती. तरी ती चाळीसपेक्षा कमी नसे. या नाटकांत ती सोळावर आणून ठेवली. तरीही परिणामकारकतेच्या दृष्टीनं तीं गाणी भरपूर वाटलीं.

बंगभंगाच्या वेळी प्रत्यक्ष बंगभंगाचा उल्लेख करून नाटकं लिहिली गेली. म्हणून तीं सरकारजमा झालीं हा पूर्वीचा अनुभव होता. असं असूनही यावेळी हा एक प्रयत्न करून पहावा असं मनात येऊन मी त्यावेळच्या असहकारितेच्या चळ-वळीचा आधार 'सत्तेचे गुलाम' या नाटकासाठी घेतला. विद्यार्थ्यांनी शाळा कॉलेजं सोडावी, वकिलांनी वकिली सोडावी, राष्ट्रीय शिक्षणसंस्था अस्तिवांत आणाव्या आणि खादीची चळवळ वाढवावी, हा त्यावेळी गांधीजींनी दिलेला आदेश होता. या आदेशाला अनुसरून बऱ्याच लोकांनी वकिली सोडली, विद्यार्थीनी शाळा-कॉलेजं

सोडली, पण हाताच्या बोटावर मोजण्याइतकी माणसंही या ध्येयाला चिकटून राहिली नाहीत. त्या अशा माणसांतूनच निपजलेल्या व्यक्तींतून 'केरोपंत' आणि 'मार्तंडराव' हे त्या नाटकात निर्माण झाले. तसेच फारच थोडे का होईना, 'वैकुंठ' ही होते. त्या काळ्या ढोंगी देशभक्तांचं जे चित्र या नाटकात रेखाटलं गेलं ते केवळ काल्पनिक नव्हतं.

हे नाटक पडलं तर नाटककार या नात्यानं माझं आयुष्य संपणार हे अगदी उघड होतं. ईर्ष्येनं मी हे नाटक लिहिलं होतं. ईर्ष्येनंच नाटकाची सजावट उभारली होती. रंगभूमीचं सारं स्वरूप बदलून टाकावं ही माझी महत्त्वाकांक्षा होती. मारुतीअण्णा काळे यांच्यासारखा पेंटर मिळाल्यामुळे मला जबर आत्मविश्वास उत्पन्न झाला होता. पेंढारकरांची तर माझ्यावर पूर्ण श्रद्धा होती. इतरांना खिजवणारे लोक फार होते, आणि ते आपआपल्या परीनं माझ्यापेक्षा पेंढारकरांचीच जास्त टिंगल करीत होते. 'हा वरेरकर मामा शेवटी कंपनीला गोत्यांत आणणार' असं म्हणत होते.

पण 'सत्तेचे गुलाम' यशस्वी झालं.

॥ ८ ॥

पहिली डॉक्युमेंटरी

याचवेळी तुरुंगात असलेल्या महात्मा गांधींवर शस्त्रक्रिया करण्याचा प्रसंग आला. ती शस्त्रक्रिया यशस्वी झाली आणि गांधीजींची प्रकृति सुधारू लागली असं कळलं. या प्रसंगाचा चित्रपट घ्यावा असं माझ्या मनात आलं. त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन यांना भेटून या कामासाठी त्यांची परवानगी आणि मदत घ्यायचं ठरवलं. मी खादीवाला होतो आणि माझ्याबरोबर येणारे माझे मित्र पु. रा. लेले हेही खादीवाले होते. म्हणून त्यांच्या खाजगी कारभाऱ्यांना फोन केला आणि खादीच्या पोषाखात गव्हर्नरसाहेबांना भेटण्याची परवानगी घेतली.

आम्ही दोघे भेटायला गेलो त्यावेळी त्यांनी आम्हाला मोठ्या आदरानं वागवलं. या चित्रपटात आम्हांला त्यांचाही समावेश करायचा होता. म्हणून तीही परवानगी विचारली त्यावेळी ते म्हणाले, 'You can come and shoot me here at any time–of course nonviolanteey !'

त्यांचं अधिकारपत्र घेऊन आम्ही पुण्याला गेलो. गांधीजींवर शस्त्रक्रिया करणारे डॉ. मेंडॉक यांनी आम्हांला सर्व प्रकारची अनुकूलता करून दिली. ज्या जागी ऑपरेशन केलं होतं त्या जागी तेच सर्व डॉक्टर आणि नर्सिस यांना उभं केलं होतं. सर्व प्रकारची शस्त्रं वगैरे जशीच्या तशी टेबली होती. बाबा आनन्दकर यांनी कॅमेरामनचं काम केलं. ऑपरेशन होत असताना विजेचे दिवे गेले होते आणि त्यानंतर आणलेले किट्सनचे दिवेही जाऊन हरिकेन कंदिलाच्या प्रकाशात ऑपरेशन करण्यात आलं होतं, तोही प्रसंग घेतला होता.

हॉस्पिटलच्या कंपौंडमधल्या एका खोलीत महात्माजी बिछान्यात होते. ते आपला फोटो घेऊ देईनात.'मी तोंड फिरवीन' असं म्हणाले.ते असं म्हणत असतानाच आनंदकरानी त्यांना 'शूट' केलं. आज डॉक्युमेन्टरी हा शब्द प्रचारात आला आहे. त्या वेळी तो नव्हता. भारतातील ही पहिली डॉक्युमेन्टरी होती. माझे मित्र पु. रा. लेले यांनी या चित्रपटाला 'Mahatma's Miracle' असं नाव सुचवलं आणि तेच नाव देण्यात आलं.

हा चित्रपट दाखवण्यासाठी मंजुरी घ्यायच्या वेळी जो प्रकार घडला तो इथ नमूद करायला हवा. त्यावेळी नवा चित्रपट शनिवारी दाखवला जात असे. चित्रपटाला मंजुरी मुंबईच्या पोलिस कमिशनरच्या सहीनं मिळत असे. ती मिळणं अशक्य होणार नाही असं समजून आम्ही जाहिराती दित्या होत्या, पण शनिवारी सकाळपर्यंत परवानगी हाती आली नव्हती. शनिवारी आफिसं दोन वाजता बंद होतीं. त्याच्या आत परवानगी हाती येणं अवश्य होतं.

आम्ही चित्रपटाचे सेन्सॉर इन्स्पेक्टर शिवलकर यांना जाऊन भेटलो. परवानगी मिळत नाही असं त्यांनी सांगितलं. तेव्हा मी, लेले आणि पांडुरंग तलगेरी पोलिस कमिशनरपाशी गेलो. त्याच दिवशी पूर्वीचे श्री. केली हे जाऊन त्यांच्या जागी श्री. हेली हे कमिशनर म्हणून आले होते. त्यांना काहीच माहीत नव्हतं. त्यांच्या सांगण्यावरून आम्ही शिवलकर यांना घेऊन आलो. आम्हाला बाहेर ठेवून शिवलकर आत जाऊन साहेबाना भेटले. थोड्या वेळानं आम्हाला बोलावणं आलं. साहेब म्हणाले, 'या चित्रपटात गव्हर्नर एका खादीधारी माणसाशी बोलत आहेत तो बनावट आहे असं शिवलकर म्हणतात. यावर तुमचं म्हणणं काय आहे ?'

आमच्यापाशी गव्हर्नरनी परवानगी दिल्याचा हुकूम होता. तो दाखवला तेव्हा शिवलकर म्हणाले, 'चित्रपटांत गव्हर्नर असायला माझा विरोध नाही, पण खादीधारी माणूस त्यांच्याशी बोलत आहे असं जे दाखवलं आहे ते फेक (बनावट) आहे.'

गव्हर्नरशी बोलणारे ते खादीधारी गृहस्थ पु. रा. लेलेच होते हे आम्ही साहेबांना सांगितलं. प्रत्यक्ष पुरावा लगेच मिळणं शक्य नव्हतं. म्हणून गव्हर्नरच्या खाजगी कारभाऱ्यांना फोनवर विचारावं अशी हेलीसाहेबांना मी विनंती केली. कारण ते खाजगी कारभारीही त्याच 'शॉट' मध्ये होते.

हेलीसाहेबांनी फोन करून विचारलं आणि आम्ही सांगितलं ते खरं असल्याचा निर्वाळा खाजगी कारभाऱ्यांनी दिला, तेव्हां हेलीसाहेब शिवलकरांना म्हणाले, 'यांत आक्षेप घेण्याजोगं काही आहे असं मला वाटत नाही.'

शिवलकर साहेबांना म्हणाले, 'आपल्याला यांत काही आक्षेपार्ह वाटत नसलं तर मग माझीही काही हरकत नाही.'

'हा आक्षेप तुमचा होता तर शिवलकर ! – कमिशनर साहेबांचा नव्हता !' असं मी म्हटलं त्यावेळी शिवलकर मुकाट्यानं बाहेर निघाले.

माझं नाव आणि व्यवसाय कळला तेव्हां हेलीसाहेबांनी माझं 'हाच मुलाचा बाप' हे नाटक धुळे इथं आपण पाहिल्याचं मला सांगितलं. या प्रसंगानं त्यांचा आणि माझा स्नेहाचा संबंध जुळून आला.

शेवटी त्या दिवशी तो चित्रपट ठरल्यावेळी दाखवण्यात आला.

॥ ९ ॥

गांधीजींचा मिठाचा सत्याग्रह

मी आणि आळतेकर मुंबईला आलो. काँग्रेस हाऊसच्या शेजारच्या दादाभाई मंजिलमध्ये आम्ही रहात होतो. काँग्रेस हाऊसमधे हल्ली जोराची चर्चा सुरू होती. गांधीजी कांहीतरी नवी चळवळ मोठ्या प्रमाणावर सुरू करणार आहेत असं बोललं जात होतं.

ही बातमी खरी ठरली. गांधीजींनी मिठाचा कायदा तोडून सत्याग्रह करण्याची घोषणा केली. स्वतः गांधीजींनी दांडीहून मार्च काढला. मुंबईच्या काँग्रेस हाऊसमध्ये भारतातील सर्व ठिकाणाहून स्वयंसेवक येत होते. मुंबईतही मिठाचा सत्याग्रह सुरू झाला होता. रोज स्वयंसेवक जाऊन मीठ तयार करीत होते आणि पोलीस त्यांना पकडून नेत होते. काही स्वयंसेवक विलायती कपड्याच्या दुकानांवर पिकेटिंग करीत होते. त्यांनाही पकडून नेण्यात येत होतं. गांधीजींच्या आज्ञेवरून देशसेविकांचं पथक उभारण्यात आलं होतं. या पथकाच्या अग्रभागी हंसा मेहता, पेरिन कॅप्टन प्रभृती प्रमुख बायका होत्या. त्या बायकांचा पोषाख केशरी रंगाचा होता. त्या केशरी साड्या नेसत असल्यामुळे त्यांना 'केशरिया' म्हणत होते. या बायका प्रामुख्याने दारू-दुकानावर पिकेटिंग करीत होत्या. सुरवातीला पोलीस त्यांना पकडीत नव्हते, पण पुढं त्यांनाही पकडून तुरुगांत घालू लागले.

डॉ. हर्डीकर यांच्या हिन्दुस्तान सेवा दलाची शाखाही इथं उघडली होती. त्या शाखेने प्रमुख एकाम्बर अय्यर हे होते. मीही हिंदुस्तानी सेवा दलाचा एक स्वयंसेवक होतो. सेवादलाच्या प्रसिद्धी खात्याचं काम माझ्याकडे देण्यात आलं होतं. सेवादलाचा खर्च चालवण्यासाठी मी एक पथक उभारलं होतं. त्यावेळी कलापथक हा शब्द अस्तित्वात आला नव्हता. वेगवेगळे नट आणि गायक मिळून हे कार्यक्रम करण्यासाठी मी काही संवादात्मक नाट्यप्रसंग लिहिले होते. ते 'आजचे संवाद' या नावानं पुस्तकरूपानं प्रसिद्ध केले होते; पार्श्वनाथ आळतेकर यांना हे कार्यक्रम बसवण्यासाठी

जुंपलं होतं. काही संवाद फक्त मुलींचेच होते, काही नुसते पुरुषांचे होते. हे कार्यक्रम बसवण्यासाठी सारख्या तालमी घेण्यात येत होत्या. सात रस्त्यावरच्या एका भजनी मंडळीचा कुणबाऊ भाषेतील गाण्यांचा कार्यक्रमही यात सामिल केला होता. श्यामला माजगावकर ही गायिकाही पहिल्यानं याच कार्यक्रमात सार्वजनिक रीत्या गाऊ लागली. हरीन्द्रनाथ चट्टोपाध्याय यांनी या कार्यक्रमासाठी काही हिन्दी पदं लिहिली होती. मी मराठी पदं लिहिली होती. या पदांचं छापलेलं पुस्तक पुढं सरकारजमा झालं; त्यामुळं ही पदं आज उपलब्ध नाहीत.

या कार्यक्रमाचे प्रयोग जीना हॉल आणि परळचा दामोदर हॉल इथं जसे केले जात होते, तसेच ठिकठिकाणी उघड्यावरही केले होते. त्यावेळी 'ओपन एअर थिएटर' हा शब्द प्रचारात नव्हता. असे ठिकठिकाणी प्रयोग करून आम्ही तीन चार हजार रुपये सेवा दलासाठी उभे केले.

याचवेळी हिंदुस्तानी सेवा दलात बायकांचं एक पथक उभारण्याची कल्पना निघाली. या पथकांतील बहुतेक बायका महाराष्ट्रीय होत्या. जाड खादीची नऊवारी साडी नेसणं त्यांना कठिण जात होतं. म्हणून पाचवारी साडीचा विकच्छ पोशाख आणि अंगात निळा कोट असा गणवेष डॉ. हर्डीकर यांच्या संमतीने ठरवला.

हा पोषाख लोकप्रिय करण्यासाठी डॉ. हर्डीकर आणि मी या दोघांच्या सहीनं एक पत्रक काढलं होतं. त्यात असा पोषाख केलेल्या दोन मुलींचे फोटो देण्यांत आले होते. आज साऱ्या महाराष्ट्रीय बायका व मुली या पाचवारी विकच्छ साडी नेसत आहेत, पण त्यावेळी ही साडी नेसण्यासाठी प्रचार करावा लागत होता. आज पाचवारी साडी ही फॅशन झाली आहे, पण ही फॅशन १९३० सालच्या मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी अस्तित्वांत आल्याचं कितीजणांना माहीत आहे? काँग्रेसच्या चळवळींतून खादीच्या प्रचारासाठी ही पाचवारी साडी महाराष्ट्रांत आली. ही एक काँग्रेसची देणगी आहे.

एक ऑगस्ट १९३० या दिवसाच्या आधल्या रात्री काँग्रेसच्या वर्किंग कमिटीची बैठक भरली होती. थोडीशी चर्चा झाल्यावर एक मोर्चा काढायचं ठरलं. लोकमान्यांच्या पुण्यतिथीनिमित्त हा मोर्चा निघणार होता. काँग्रेस हाऊसमधून बोरी-बंदर स्टेशनपर्यंत मोर्चा गेल्यावर पोलिसांनी तो अडवला. त्यावेळी सर्वत्रांनी रस्त्यावर बैठक मारली. पहाटे सर्वांना गिरफदार करण्यांत आलं. त्यांत मौलाना आझाद, वल्लभभाई पटेल, जयरामदास दौलतराम, मदनमोहन मालवीय, डॉ. हर्डीकर, हंसा मेहता यांच्याशिवाय मुंबईच्या वॉर कौन्सिलचे प्रमुख श्रीकांत पालेकर आणि इतर कांही स्वयंसेवक होते. या सर्वांना एस्प्लनेड पोलीस कोर्टाच्या लॉक्-अपमध्ये ठेवण्यात आलं होतं. त्यांच्या सेवेला सेवा दलातील स्वयंसेवक या नात्यानं मीही एक होतो. मौलाना-साहेब आणि मदनमोहन मालवीय यांच्या स्नानसंध्येची व्यवस्था करण्याचं बिकट

काम मला करावं लागत होतं. सरदारगृहांतून या सर्व मंडळींसाठी जेवण आणायचं काम मलाच करावं लागत असे.

काँग्रेसच्या शिस्तीप्रमाणे कैद केलेल्या लोकांनी खटला न चालवता दिलेली शिक्षा मुकाट्याने सोसायची, असा नियम होता. पण मदनमोहन मालवीय काँग्रेसमध्ये नव्हते. त्यांनी केस चालवायला सुरुवात केली. तीनचार दिवस केस चालली आणि नंतर सर्वत्रांना तीन महिन्यांपासून सहा महिन्यापर्यंत अशा शिक्षा झाल्या.

शेवटी एकदा काँग्रेस हाऊसवर सरकारी वरवंटा फिरला. काँग्रेस हाऊस जप्त केलं जाणार, ही बातमी आधीच कळली. मुंबईच्या पोलीस खात्यातील शिपाई नेकीचे होते. काँग्रेसबद्दलच्या विरोधी बातम्या ते हळूच येऊन आम्हाला देत असत. पूर्वी असं झालं होतं, की ज्यावेळी लाठीमार सुरू झाला त्यावेळी स्वयंसेवकांना न मारता ते काठ्यांनी जमीन बडवीत असत. हे पोलीस अधिकाऱ्यांच्या नजरेस आलं तेव्हा त्यांनी उत्तर हिंदुस्थानातील पुरभय्ये आणून त्यांच्याकरवी स्वयंसेवकांवर लाठीमार केला. पण या मालवणी शिपायांनी आपली नेकी सोडली नाही. ज्या दिवशी काँग्रेस हाऊसवर जप्ती येणार होती त्याच्या आधी दोन दिवस या मालवणी शिपायांनीच आम्हाला बातमी दिली. शॅडो कॅबिनेट म्हणून उमाशंकर दीक्षित आणि के. के. मेनन हे काम करीत होते. त्यांनी सारं काँग्रेस हाऊस खाली करायला सुरुवात करून आत सुतळीचा तोडा ठेवला नाही. एके दिवशी पहाटे खाड खाड बूट वाजवीत पोलीसांची तुकडी आली आणि काँग्रेस हाऊसचा ताबा घेऊन त्यांनी तिथं असलेल्या स्वयंसेवकाना कैद केलं. मी दादाभाई मंजिलमध्ये रहात होतो म्हणूनच त्यांच्या हाती सापडलो नाही.

उजाडलं त्यावेळी सारं भकास झालं होतं. काँग्रेस हाऊसवर एक प्रकारची अवकळा आली होती. हिंदुस्तानी सेवादलानं आपली कचेरी आधीच खाली केली होती. साऱ्या स्वयंसेवकांची पांगापांग झाली होती.

उभारलेला एवढा मोठा डोलारा कोसळून पडला होता, पुष्कळसे लोक तुरुंगात गेले होते, त्यातले काही याच वेळी सुटूनही आले होते. त्यांना रहायला कुठं आसरा नव्हता. त्यांतले बहुतेक सारे बाहेरगावचे होते. गावी जाण्यासाठी त्यांच्या हाती एक पैसाही नव्हता. सुटून आलेल्या पुढाऱ्यांकडे मागणी केली. तेव्हा त्यांनी हे जोखीम अंगाबाहेर टाकले. त्या स्वयंसेवकांवर हा मोठा बिकट प्रसंग आला होता.

याचवेळी ललितकलादर्श मंडळी मुंबईला आली होती. पेंढारकरांकडे मी शब्द टाकला. त्यांनी एका खेळाचं उत्पन्न द्यायचं कबूल केलं. त्यासाठी कॅन्व्हासिंग केलं पाहिजे होतं आणि ते तर शक्य नव्हतं. असा खेळ दिला आहे, असं सरकारांत कळलं असतं तर नाटक मंडळीवर कोणता प्रसंग आला असता

हे सांगता येत नाही. शेवटी पेंढारकरांनी उपाय काढला. श्रीपतराव उपरे नांवाचे एक नाटकाचे कॉन्ट्रॅक्टर होते. त्यांच्या नावेच हा खेळ लावला. त्यांनीच कॅन्व्हासिंग केलं. नऊशे एक्याण्णव रुपये उत्पन्न झालं. ते पैसे वाटून बाहेरगावच्या स्वयंसेवकांची त्यांच्या घरी रवानगी केली.

काँग्रेस हाऊस सरकारजमा झालं तरी चळवळ उभी ठेवण्यासाठी काँग्रेस बुलेटिन चालू ठेवणं अवश्य होतं. हे काम मी पत्करलं होतं आणि माझ्या हाताशी हरी विठ्ठल देसाई हा काम करीत होता.

त्यावेळी मी खेतवाडीतील तुळशी बिल्डिंगमध्ये रहायला होतो. आमच्या याच चाळीच्या वरच्या मजल्यावर अच्युत पटवर्धन आणि त्यांचे तीन सहकारी रहात होते. त्यांच्यावर नजर ठेवण्यासाठी रस्त्यावर पाटीवाल्याच्या वेषात एक पोलिस बसलेला असे. त्या पोलीसाची पाळी बदलत असे. त्यांतला एक खुद्द मालवणचाच होता, माझा वर्गबंधू होता. आपण असल्या मुदतीत अच्युतरावांनी कुठेही बाहेर यावं जावं असं त्यानं सांगितलं होतं. इतर वेळात गेल्यास धोका होता.

अच्युतरावांनी त्यावेळी रेडिओ-स्टेशन उभारण्याचा घाट घातला होता. मुंबईच्या रेडिओ स्टेशनवर रात्री साडेआठ आणि नवाच्या दरम्यान स्टेशन बंद असे. साडेआठ वाजल्याबरोबर त्याच रेडिओच्या वेव्हलेन्थवर 'महात्मा गांधी की जय' असा पुकारा करून अर्धा तास रेडिओ स्टेशन चालू राही आणि त्याचद्वारे काँग्रेसप्रचार होई.

पोलीसांनी जंगजंग पछाडलं तरी हे स्टेशन त्यांना सापडलं नाही.

एके दिवशी मलबार हिलवरील एका घरावर त्यांनी छापा घातला आणि तिथून एक ट्रान्समिटर जप्त करून नेला, पण त्याचवेळी पुन्हा स्टेशन सुरू झालं आणि त्यातून ट्रान्समिटर पोलीसानं जप्त करून नेल्याची बातमी देण्यात आली.

ही जप्ती येणार म्हणून एका पोलीसानं आम्हाला आधीच वर्दी दिली होती. म्हणूनच एक कसाबसा मोडका ट्रान्समिटर त्या जागी ठेवून चांगलं यंत्र दुसऱ्या जागी लांबवलं होतं.

एके दिवशी असं झालं, की अच्युतराव भलत्या वेळी बाहेर गेले. त्यावेळी आमचा दोस्त पाळतीवर नव्हता. तिथल्या पाटीवाल्यानं त्यांना त्यांच्या जोडीदारासह पकडलं. मला ते कळलं त्यावेळी मोठं दुःख झालं. त्यांनी हा अविचार केला नसता तर ते बाहेर राहिले असते. रेडिओच्या ब्रॉडकास्टची जबाबदारी त्यांची होती.

तरी पण रेडिओ चालूच राहिला. काही दिवसांनी तो बंद करावा लागला. आमचाच माणूस फुटला होता.

बुलेटिन मात्र चालू होतं. वारंवार जागा बदलाव्या लागत होत्या, तरीही सर्व अडचणींना तोंड देऊन बुलेटिन चालू ठेवलं होतं. या कामासाठी लागणाऱ्या खर्चाचे पैसे पेंढारकर देत होते, पण तेही गुपचुपच– जमाखर्चात न दाखवता.

तुरुंगात गेलेले लोक सुखी होते. जे आम्ही बाहेर होतो त्यांना सर्व प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावं लागत होतं. तुरुंगात गेले ते पुढं 'वीर' ठरले. स्वातंत्र्यानंतर देखील तुरुंगाची शिक्षा भोगली त्यांनाच महत्त्व देण्यात आलं, पण ज्यांनी जिवावर उदार होऊन काँग्रेसप्रचार चालू ठेवला त्यांना पुढं हिशेबांत घेण्यात आलं नाही.

'माझ्या नाटकी संसारा'त ही काँग्रेसच्या चळवळीची हकिकत कां असा प्रश्न पुढं येईल. बारकाईने पाहिल्यावर दिसून येईल, की प्रत्येक अडचणीच्या वेळी नाटक मंडळीच आमच्या संकटाला हात द्यायला आली होती. एक पोलीस अधिकारी पेंढारकरांना म्हणाले होते, 'तुमच्यासाठी म्हणून हे मामा बाहेर राहिले आहेत. नाही तर इतक्या वेळात त्यांना आम्ही तीनदा तुरुंगात घातलं असतं.' नाटक मंडळ्यांचे आणि पोलिसांचे संबंध फार लोभाचे होते म्हणूनच हे घडलं.

म्हणूनच माझ्या नाटकी संसारात या प्रसंगाची बखर करावी लागली. काँग्रेसच्या सेवेसाठी म्हणूनच मी नोकरी सोडली होती. काँग्रेसच्या सेवेसाठी मी रंगभूमि राखली. पेंढारकरांसारखा जोडीदार मिळाला म्हणूनच हे कार्य सुलभ झालं

नाट्य –

मामा वरेरकर यांची प्रतिभा सर्वतोन्मुखी होती. साहित्याच्या बहुतेक सर्व प्रकारांत त्यांच्या लेखणीने कर्तृत्व गाजवले. परंतु त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचे मुख्य क्षेत्र म्हणजे नाटक. विष्णु प्रभाकर या हिंदी लेखकाने म्हटल्याप्रमाणे नाटक हेवरेरकरांच्या प्रतिभेचे पिरॅमिड आहे. त्यांची नाटके उद्देशमूलक आहेत. लोकरंजनावरोवरच लोकशिक्षण आणि प्रचार यासाठी समर्थ साधन या दृष्टीनेच त्यांनी नाटकांकडे पाहिले.

साठ वर्षांच्या कालावधीत त्यांनी विपुल नाट्यलेखन केले. त्यात एकूण ३७ नाटके, ६ लघुनाटके, १४ एकांकिका, २१ श्रुतिका आहेत. याखेरीज वेळोवेळी आकाशवाणीसाठी लिहिलेली नभोनाट्ये अप्रकाशित स्वरूपात आहेत. प्रारंभीच्या काळात 'खजिनदारांच्या तमाशा' साठी त्यांनी वगही लिहिले. ते आज अनुपलब्ध आहेत. 'तमाशा' या लोककलेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी व या कलेला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी मामांनी महत्त्वाची कामगिरी वजावलेली आहे. मराठी 'तमाशा' त शृंगारबाहुल्य होते. त्याचवरोवर तमाशाला त्यांनी संस्कारक्षमता प्राप्त करून दिली. मराठी 'तमाशा' ला त्यांनी शिष्टसंमत केले. जिथे जिथे नाट्य आहे तिथे तिथे मामांच्या प्रतिभेने संचार केला आणि त्यांच्या लेखणीने पराक्रम केला. म्हणूनच नाटकाचे हे विविध प्रकार ते हाताळू शकले.

नाट्यक्षेत्रात त्यांनी श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांना गुरू मानले आणि एका अर्थी त्यांचाच वारसा पुढे चालवला. त्या काळात जे कार्य हरिभाऊ आपटे यांनी सामाजिक कादंबऱ्यांतून केले तेच कार्य वरेरकरांनी सामाजिक नाटकाद्वारे केले. कोल्हटकरांनी शेक्सपियर व मोलियरला अनुसरून अद्‌भुतरम्य नाटके लिहिली. परंतु मामांनी त्यांच्यापुढे जाऊन मराठी नाटकाला सामाजिक वास्तविकता प्राप्त करून दिली. आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने इब्सेनची कलात्मकता मराठी नाटकात आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी वास्तविकतेच्या अंगाने नाट्यलेखनात अनेक प्रयोग

केले आहेत. नावीन्याची त्यांना हौस होती. आणि 'नाटकी संसारा' च्या प्रारंभापासूनच कोल्हटकरांप्रमाणे आपण काही नवीन करावे ही त्यांची महत्त्वाकांक्षा होती. म्हणून ते सतत प्रयोगशील राहिले. रंगभूमीवरील नेपथ्याच्या पात्रांच्या वेषभूषेतील वास्तविकतेच्या बाबतीत ते नेहमीच दक्ष राहिले. या विषयीची कितीतरी उदाहरणे त्यांच्या आत्मकथेत आढळतात. परंतु केवळ नावीन्याकरिता नावीन्य अथवा प्रयोगाकरिता प्रयोग अशी त्यांची भूमिका नव्हती. ज्या सामाजिक उद्दिष्टासाठी त्यांना 'नाटक' हे समर्थ साधन म्हणून वापरायचे होते त्या उद्दिष्टपूर्तीच्या रोखानेच त्यांचे प्रयोग होते.

त्यांच्या 'हाच मुलाचा बाप' (१९१६) या नाटकाने आधुनिक मराठी वास्तववादी सामाजिक नाटकांचा युगारंभ झाला. 'सत्तेचे गुलाम' (१९२२),' 'संन्याशाचा संसार' (१९२०), 'सोन्याचा कळस' (१९३२) या सामाजिक नाटकांनी वरेरकरांना किर्लोस्कर, देवल, कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी यांच्या श्रेणीत नेऊन बसवले. रूढीच्या दास्यातील असहाय स्त्री,पंगु बनलेला दीन दलित वर्ग, अवमानित अस्पृश्य, कष्टकरी मजूर- यांच्या दुःखानी ते व्यथित होत. त्यांच्या नाटकातील समस्यांचे क्षेत्र व्यापक आहे. मालक मजूर, दारू, सट्टा, जुगार, अस्पृश्य, तुरुंगातील कैदी, दुष्काळ, आझाद हिंद फौज, राजकारण, कला, इतिहास, पुराण, स्त्री-स्वातंत्र्य, हुंडा- इत्यादीशी संबंधित असा एकही प्रश्न नाही, की जो मामांच्या नजरेतून सुटला असेल. इतकी त्यांची दृष्टी चौफेर होती. म्हणूनच त्यांच्या नाटकात विषयांची व समस्यांची विविधता आढळते. तात्कालिक घटनांमधूनही त्यांना नाट्यनिर्मितीची प्रेरणा लाभली. हुंड्यापायी स्नेहलता नावाच्या बंगाली तरुणीने स्वतःला जाळून घेतले. मामांनी या घटनेने प्रेरित होऊन 'हाच मुलाचा बाप' नाटक लिहिले. गांधीजींच्या आदेशानुसार अनेक वकील देशभक्तीने संचारित झाले. पण त्यातील अस्सल आणि नक्कल कोण असाही प्रश्न उद्भवू लागला. त्यावर मामांनी 'सत्तेचे गुलाम' नाटक लिहिले. स्वामी श्रद्धानंदांच्या पतितपरावर्तन चळवळीचे महत्त्व जाणवले त्यांतून 'संन्याशाचा संसार' स्फुरले. स्त्रियांवर दास्यत्वामुळे होणारा अन्याय्य जुलूम आणि व्यक्तिस्वातंत्र्याची निकड यातून प्रेरणा घेऊन 'नाटकी संसाराच्या' अखेर अखेरीसही भूमिकन्या सीता' (१९५०) हे नाटक वरेरकरांनी लिहिले.

त्यांच्या चौफेर दृष्टीला सामाजिक दुःख चटकन जाणवत असे. आणि त्या सामाजिक दुःखातले नाट्य त्यांच्या संवेदनाशील मनाला भावत असे. हा त्यांचा व्यक्तित्वविशेष होता.

सामाजिक दुःख व्यक्त करणारे नाटक गंभीर प्रकृतीचेच असावे हा संकेत होता. हा संकेत मामांच्या नाटकांनी मोडला. तसा तो देवलांच्या 'शारदा' नेही

मोडला होताच. म्हणून 'शारदा' नाटकाचा सुखान्त शेवट अनेक टीकाकारांना आक्षेपार्ह वाटला. मामा वरेरकर यांची सामाजिक नाटकेही अशीच आक्षेपार्ह ठरली.

परंतु सामाजिक समस्या गंभीर असली तरी मामांनी त्या समस्येवर आधारलेले सामाजिक नाटक शक्यतो जाणीवपूर्वक गंभीर होऊ दिले नाही. त्या समस्येकडे त्यांनी विनोदाच्या व हास्यास्पदतेच्याच अंगाने पाहिले. नाटकांतून त्यांना जे सांगायचे होते, दर्शवायचे होते, ते प्रामुख्याने बहुजनसमाजासाठी. आणि बहुजन समाजाची नाडी वरेरकरांना परिचित होती. बहुजनसमाजाला त्याच्याच भाषेत, त्याच्याच रुचि-अभिरुचीच्या कलाने सांगायला हवे. हे वरेरकरांनी जाणले होते. सर्वसामान्यांना अगदीच 'जड' वाटणार नाही अन् समाजातल्या बुद्धिवंतांना अगदीच 'हलकं' वाटणार नाही अशा पद्धतीने लिहिण्याची परी त्यांनी स्वीकारली होती. म्हणूनच इब्सेनचे रचनातंत्र, मोलियरचे सामाजिक समस्येकडे हास्यात्मकतेने बघणे, आणि एतद्देशीय मराठी तमाशातील रंजकता यांचा मेळ साधून त्यांनी आपली नाटके लिहिली. सामाजिक उद्दिष्टपूर्तीसाठी त्यांना हा मेळ सोयीस्कर वाटला.

कलात्मकतेच्या कसोटीवर त्यांची नाटके गुणात्मकतेत कमी पडणे शक्य आहे. परंतु नाट्यकला ही केवळ रसाभिव्यक्तीचे साधन असे वरेरकरांनी कधीच मानले नाही. नाट्यकला हे मानवकल्याणाच्या 'क्रान्त स्वरा' ला उद्गार देणारे साधन आहे, असेच त्यांनी मानले. त्यांची नाटके उद्देश-मूलक आहेत. परंतु तितकीच हृदय-ग्राहीही आहेत. त्यात भडकपणा नाही, दम्भ नाही, सहजता आणि स्पष्टता आहे, खरेपणा आहे. सरळसरळ मर्मावर प्रहार करणारा, आघात करणारा विशुद्ध यथार्थवादी स्वर त्यांच्या नाटकात आहे, हा विष्णु प्रभाकर यांचा अभिप्राय अन्वर्थकच आहे.

॥ १ ॥

हाच मुलाचा बाप

['हाच मुलाचा बाप' (१९१७) या नाटकाने आधुनिक मराठीतील वास्तववादी सामाजिक नाटकांचा युगारंभ झाला असे मानले जाते. बंगालमधील स्नेहलता प्रकरणातून मामांना या नाटकाच्या कथानकाची प्रेरणा झाली. हुंड्याचा प्रश्न आजही वेगवेगळी रूपे धारण करून समाजाच्या मानगुटीवर बसला आहे. हुंड्यापायी मुलीची कशी परवड होते, तिची कशी शोकांतिका होते, हे स्नेहलतेच्या आत्महत्येने सिद्ध केलेच होते, म्हणून या नाटकाच्या कथानकाने शोकनाट्याचे गंभीर रूप धारण करायला हवे होते, असे समीक्षकांचे मत आहे. परंतु मामा वरेरकरांनी विनोद, उपरोध आणि विडंबन या अंगानेच जाणीवपूर्वक ही समस्या हाताळली. परस्परांना अनुरूप असलेल्या वधूवरांनीच पुढाकार घेऊन हुंड्याच्या समस्येवर तोड काढून समाजाला धडा शिकविण्याची शक्यता मामांनी दाखवून दिली. तिसऱ्या अंकातला हा चवथा प्रवेश त्या दृष्टीने उद्‌बोधक आहे.]

[स्थळ – रावबहादुरांचे घर. मंजिरी बसली आहे.]

मंजिरी : दैवगति म्हणून काहीतरी आहे खास! ही चोरी इतक्या लवकर उघडकीला यायचं काही कारण नव्हतं – पण कुठून कशी बातमी फुटली कोण जाणे! दैवाचेच का हे सारे खेळ! आता माझ्या दैवी तरी पुढं काय आहे? बाबांनी इस्टेटीची विल्हेवाट तशी लावून टाकली आणि दादावरचा त्यांचा राग कमी होण्याचे लक्षण तर मुळीच दिसत नाही. दादाचं किंवा यमूचं नाव जरी काढलं तरी ते संतापून जातात. अशा स्थितीत अभ्यासाकडे मन लागावं कसं? म्हणून एकदा मनाचा धडा करून ज्याना विचारायचं त्यांना विचारून पाहिलं. पुढं काय करायचं ते ठरवलंच आहे. आता बाबा आले

की– (रावबहाद्दूर येतात.) आलेच बाबा. (त्यांचे कपडे घेऊन ठेवून देते) का बाबा, आज अगदी बोलत नाही ?

राव. : काय बोलू ? आज मी मोठ्या संकटात सापडलो आहे.

मंजिरी : आणखी कसलं संकट आलं आहे ?

राव. : आज विष्णुपंत म्हणत होते-- काय सांगू तुला पोरी, मोठी पंचाईत झाली आहे.

मंजिरी : काय आणखी नशिबी आहे कोण जाणे ! एकंदरीत दिवस वाईट आले आहेत खरे !

राव : दिवस वाईट आले आहेत असंच काही म्हणता येत नाही; पण मोठी पंचाईत आली आहे यात शंका नाही. एकीकडचा टाकलेला शब्द मोडून पुन्हा दुसरीकडे जुळवायचं मोठं बिकट आहे.

मंजिरी : दुसरीकडे काय जुळायचं ? लग्न का ? कुणाचं लग्न ?

राव : आता दुसऱ्या कुणाचं लग्न जुळवायचं राहिलं आहे ? तुझंच.

मंजिरी : माझंच ? हिंदु स्त्रीला एकाच वेळी एकापेक्षा जास्त नवरे केव्हापासून करता येऊ लागले ?

राव : नवरे कसे ? अजून तुझं लग्न कुठं झालं आहे ?

मंजिरी : फक्त ब्राह्मणाच्या साक्षीनं तेवढं व्हायचं राहिलं आहे ! देवाच्या साक्षीनं केव्हाच झालं आहे.

राव. : तू काय म्हणतेस ते मी नीट समजलो नाही.

मंजिरी : लग्न करायला माझी अनुकूलता मिळवण्यासाठी ज्यांना तुम्ही माझं मन वळवायला सांगितलं होतं, त्यांनी लग्न करायला माझं मन वळवलं इतकंच नव्हे, तर आम्ही उभयता वचनबद्धही झालो.

राव : मोठी फजिती झाली ! त्या मनोहरपंताला तर मी विष्णुपंताबरोबर बोलावणं देखील पाठविलं आहे.

मंजिरी : कुठले मनोहरपंत ? तो मनोहर पशु की काय ! (हसते)

राव. : हसतेस काय मंजिरी ? कुणी गुरांचा डॉक्टर होऊच नये वाटतं ?

मंजिरी : ते एकदा मला पाहायला आले होते. काय मेलं हे पाहणं आहे देव जाणे ! कित्येक वर्षे एकमेकांच्या नित्य सहवासात राहणारे दोघे जिवलग मित्र, एखाद्या आगलाव्याच्या कलागतीने एका क्षणात वैरी बनतात; कित्येक वर्षे आनंदात राहणारं एखादं सुखी जोडपंसुद्धा एखाद्या क्षुल्लक कारणावरून आनंदाला कायमचं आचवतं; बापाचा स्वभाव मुलाला आणि मुलाचा बापाला कित्येक वर्षांच्या नित्य सहवासानंसुद्धा कळत नाही आणि ही मेली अठरावीस वर्षांची कोवळी पोरं, तास दोन तासांच्या परीक्षेनं वधू पसंत करतात ! वधू

म्हणजे जशी काही आठवड्याच्या बाजारात विकायला आणलेली म्हैसच ! साराच मूर्खांचा बाजार आहे झालं !

राव. : ते तुला पाहायला आले होते ते केव्हा ?

मंजिरी : दादाचं लग्न—

राव. : चूप ! त्याचं नाव काढू नकोस.

मंजिरी : त्यापूर्वी. तो मनोहर म्हणजे एक पशूच आहे. त्यानं अगदी योग्य धंदा उचलला आहे; आणि तो मोठा शहाणा असता तरी मला त्याचं काय होय ? माझं लग्न होऊन चुकलं आहे.

राव. : अग चुकलंच आहे. लग्न झालं म्हणतेस, हेच मुळी चुकीचं आहे.

मंजिरी : आता आणखी एक शब्द बोलाल तर मी देखील चालती होईन.

राव. : (स्वगत) हे बिनहुंड्याचं स्थळ हातचं जाणार ! गुलाब तरी काय करील कोण जाणे ! श्रीमंत आहे, कदाचित् हुंड्याचा हट्ट नाही धरणार. हट्टच धरून बसला तर मात्र मी या पोरीचं मुळीचं ऐकणार नाही; मनोहरशीच लग्न करायला हिला भाग पाडीन.

मंजिरी : बाबा, विचार कसला चालला आहे ? काहीही म्हटलंत तरी माझा जो विवाह एकदा ठरला तो ठरला ! आताच मी त्यांना बोलावलं आहे. काय तो एकदा मुहूर्त ठरू द्या. यापुढं या स्मशानासारख्या घरात माझ्यानं राहावत नाहीसं झालं आहे.

राव. : त्यांना बोलावलं आहे ! म्हणजे कुणाला ? डॉक्टर गुलाबला ? बरं केलंस, केव्हा येणार आहेत ते ? एकदा होऊन जाऊ द्या तुझ्या मनासारखं.

मंजिरी : हे पहा, ते आलेच. (गुलाब येतो)

राव. : या डॉक्टर, बसा. मीच तुम्हाला बोलावणं पाठवणार होतो. खरं म्हटलं तर मी स्वतःच तुमच्या घरी यायला पाहिजे होतं. पण त्या तुमच्या मामाचं तोंड पाहायचं नाही अशी माझी प्रतिज्ञा आहे.

गुलाब : झाल्या गेल्या गोष्टी आता पुनः कशाला हव्यात ? आता बोलावण्याबद्दल म्हणाल, तर मी काही असल्या खोट्या मानाचा भोक्ता नाही. आपण बोलावताच येणं हे माझं कर्तव्य !

राव. : आता एवढी मंजिरीच काय ती माझी आंधळ्याची काठी राहिली आहे. तिला दूर करणं माझ्या अगदी जिवावर येतं आहे. पण करणार काय ? कन्याही अन्याची. आज ना उद्या केव्हा तरी लग्न हे केलंच पाहिजे. मग सहवासाच्या संसर्गानं अधिकाधिक लोभ तरी का वाढवावा ? त्याचवेळी ही दोन्ही कार्ये झाली असती– पण त्या गोष्टीचा आता उल्लेखच नको. (सुस्कारा टाकून) कण्वानं म्हटलं ते काही खोटं नाही. त्या तपस्व्याला, पोसलेल्या मुलीचा

विरहमुद्रा दुःसह झाला, मग आम्हा गृहस्थाना पोटचा गोळा दुसऱ्याच्या हाती देताना काय वाटत असेल ते तुम्हाला आज नाही कळणार.

गुलाब : (स्वगत) पोटचा गोळा की गाठचा गोळा ? आणि वसंत नव्हता वाटतं पोटचा गोळा ? (उघड) मला स्वतःला जरी हा अनुभव नाही, तरी मामांच्या अनुभवाचा मी थोडा वाटेकरी आहेच.

राव : मेहेरबानी करून पुन्हा ती नावे काढू नका ! बरं, आता तुमची काय अडचण होती ती संपली ना ? आता पुढच्या आठवड्यात मुहूर्त धरला तर चालेल की नाही ? हो, तुमचे तुम्हीच मुखत्यार आहात, एवढं तरी बरं आहे.

गुलाब : मु–हू–र्त ! पण––

राव. : आता 'पण' ते काय राहिले ? लग्न या पुढच्याच आठवड्यात उरकून घ्यावं, असा मंजिरीचा आग्रह आहे. नाहीतर माझी घाई नव्हती. तिनं सोडून जावं असं मला कुठं वाटतं आहे ! म्हणजे मी तुम्हाला घरजावई व्हा असं नाही बरं म्हणत. एवढी कुठं आहे माझी योग्यता ? उलट, तुम्हीच कदाचित मला घरसासरे करणार म्हटलंत तर जास्त शोभेल. (हंसतो)

गुलाब : आता जरा स्पष्ट बोलतो तर आपल्याला राग नाही ना येणार ? सर्व भार माझ्यावरच पडल्यामुळे असलं अवघड काम दुसऱ्या कुणावरही सोपवता येत नाही. त्यातून मामा– हो, खरंच त्यांचं नाव घेता नये !

राव. : नाव घेतलं असतं तरी त्यांना काय समजणार होतं म्हणा ! त्यांनी नुसती दीड डझन मुलींशी लग्न करावी !

मंजिरी : आपणही त्याच स्थितीत आहात, हे विसरलात वाटतं, बाबा ?

राव : (स्वगत) प्रसंग मोठा कठीण आहे ! (उघड) हो; आता आलं माझ्या ध्यानात.

गुलाब : (स्वगत) तरी बरंच ! उलट माझ्याकडूनच हुंडा मागितला नाही !

राव : बरं, पुढच्या आठवड्यातला कुठला मुहूर्त धरायचा ? मंजिरी, पंचांग घे बरं इकडे.

गुलाब : पंचांग सध्या राहू दे. आधी आपण पहिल्याच अंगाचा विचार करू. हं ! लग्नाचा थाट ठीक आहे. मला दुसरा भाऊ नाही, माझं एकट्याचं हे एकुलतं एक कार्य आहे, तेव्हा ते थाटात होणं अत्यंत अवश्य आहे !

राव : आश्चर्य आहे ! आपल्यासारख्या सुशिक्षितांनी हे असं म्हणणं हे मोठं आश्चर्य आहे !

गुलाब : प्रत्येक माणसाचे काही ना काही तरी वुइक पॉइंट्स (weak point) म्हणून असतातच. त्यातला माझा हा एक वुइक पॉइंट आहे. म्हणूनच तर– हो बोलायचं नव्हतं खरं, पण आता बोललंच पाहिजे– यमूच्या लग्नाच्यावेळी मी आपल्या सर्व अटी कबूल केल्या होत्या.

राव. : मला वाटतं, या बाबतीत तुम्ही जरा पोक्त विचार केलात तर बरं होईल.

गुलाब : तरुणांनी पोक्त विचार करणंच संभवत नाही. या हौसेच्या गोष्टी आहेत. साऱ्या आयुष्यात केव्हा तरी एकदाच व्हायच्या. बरं, हे एक ठरलंच–

राव. : ठरलं असं मी केव्हा म्हटलं ? मंजिरी, यासंबंधी तुझं काय मत आहे ?

मंजिरी : लग्नाचा थाट कुठल्या मुलीला कधी नकोसा का झाला आहे ?

गुलाब : तेव्हा हे ठरलंच.आता दुसरा मुद्दा. पण ते आधीच ठरून गेलं आहे.

राव. : आधीच काय ठरून गेलं आहे ?

गुलाब : सालंकृत कन्यादान.

राव. : ते केव्हा ठरून गेलं ? तुम्ही अगदी गळेपडूपणाच चालवला आहे !

मंजिरी : जरा बोलतांना माणूस पाहून बोलावं, बाबा !

गुलाब : गळेपडूपणा नव्हे, अगदी वस्तुस्थिती आहे. यमुनेच्या लग्नाचा ठराव झाला––

राव. : माझ्यावर कृपा करा. त्या कुणाचीं नावं घेऊ नका, हात जोडतो हवे तर.

गुलाब : माझ्यासाठी – तसंच मंजिरीसाठी म्हणून आपण हा राग घटकाभर बाजूला ठेवला पाहिजे.

राव. : (स्वगत) आता हा माझी गळचेपी करणार !

गुलाब : मंजिरीच्या स्वर्गवासी मातेचे दागिने मंजिरीचेच आहेत, असं त्यावेळी आपण एक सिद्धांतवाक्य सांगितलं होतं ते आठवतं ना ?

राव. : (स्वगत) काय लबाड आहे ? विसरलासुद्धा नाही ! (उघड) कुठं आहेत आता ते दागिने ? त्या रागाच्या भरात सारी चीजवस्त नेऊन मी बँकेत टाकली.

गुलाब : बँकेतून परत आणता येतील.

राव. : ते मोडून त्याची रोकड केली आहे.

गुलाब : त्या रोकडीने पुन्हा दागिने घडवता येतील. काही तूट येईल खरी, पण मंजिरी त्याबद्दल मुळीच नाखूष होणार नाही, अशी हमी मी घेतो.

मंजिरी : ही गोष्ट मला कबूल आहे.

राव. : म्हणजे ? दागिने मिळण्याबद्दल तुझाही आग्रह आहे की काय ?

मंजिरी : आग्रह नव्हे, तर त्या दागिन्यांवर माझाच हक्क आहे.

राव. : मुली शिकल्या म्हणजे चेकाळतात असं म्हणतात ते काही खोटं नाही.

गुलाब : हेही दुसरं ठरलंच. आता–

राव. : (स्वगत) आता हुंड्यावर येणार की काय ?

गुलाब : आता पोषाख. पूर्वीचे शेल्यापागोट्याचे दिवस आता गेले आहेत. आता एक दोन व्हाइटअवे लेडलॉकडचे अपटुडेट सूटस, ज्युवेल्ड – टायपीन, अंगठी

सोन्याची नव्हे बरं– हिऱ्याची, रिस्ट वॉच आणि एक मोटार सायकल बुइथ साइडकार मिळाली म्हणजे मला आणखी काहीसुद्धा नको.

राव : मी एखादा धनकुबेर आहे असा तर तुमचा समज झाला नाही ना ?

गुलाब हेही ठरलंच. आता—

राव. : केव्हा ठरलं ?

मंजिरी : ठरलं बाबा, ठरलं. म्हणा पाहू ठरलं म्हणून.

राव. : वेडी आहेस पोरी ! काय ठरलं ? म्हणे ठरलं !

गुलाब : हं ठरलंच. आता कन्यादान दक्षिणा—

राव. : (स्वगत) अरे बापरे !

गुलाब : आपण ब्राह्मण आहोत. दक्षिणेशिवाय दान घेणं आपल्याला अगदी अनुचित आहे. तेव्हा कन्यादानाला वरदक्षिणा ही पाहिजेच.

राव. : हुंड्याचा मला अत्यंत तिटकारा आहे.

गुलाब : देण्याचा की घेण्याचा ?

राव. (स्वगत) काय करू ? असं सणसणीत उत्तर दिलं असतं, पण मंजिरीमुळं माझं तोंड बांधलं गेलं आहे. नको या मुली !

गुलाब : घेण्याचा तिटकारा तर नाहीच नाही, कारण वसंताच्या लग्नाच्या-वेळी—

राव. : त्याचं नावसुद्धा काढू नका म्हणतो ना !

गुलाब : आता त्याचं नाव न काढून कसं चालेल ? निदान मंजिरीसाठी तरी तुम्ही मन घट्ट केलं पाहिजे. वसंताचा आपण चार हजार रुपये हुंडा घेतला—

राव. : पण तो माझ्या पदरात कुठं पडला ?

गुलाब : आणि पदरात पडून तरी काय उपयोग होता म्हणा ? कारण वसंताला विलायतेला पाठवण्याच्या बगैरे खर्चासाठी म्हणून ती रक्कम आपण घेतली होती.

राव. : पण तुम्ही लक्षाधीश आहात, तुमची माझी बरोबरी कशी होईल ?

गुलाब : ते बरोबर आहे. पण लग्नाचा खर्च आणि वधूचे दागिने हुंड्याच्या रकमेतूनच व्हावेत, अशी माझ्या चुलत्यांनी आपल्या मृत्युपत्रात एक अट घातली आहे.

राव : काही तरी सांगता आहात झालं !

गुलाब : आपण आपल्या मृत पत्नीच्या म्हणून ज्या ज्या इच्छा सांगितल्या, त्यावेळी आम्हीही अशाच तऱ्हेचे उद्गार काढले असते तर आपल्याला कसं वाटलं असतं ? कुणावर झालं तरी थोडा विश्वास टाकला पाहिजे. बरं, आता हुंड्याची रक्कम–

राव. : (स्वगत) नको देवा, या मुली कुणालाही देऊ नकोस.

गुलाब : वसंताचा आपण— (रावबहादूर तोंड फिरवितो) ऐकून घ्या. आता ऐकल्याखेरीज गत्यंतर नाही– वसंताचा आपण चार हजार रुपये हुंडा घेतला. तो नुसता बी. ए. होता ! मी एम. डी. आहे. आपण पांच हजार रुपये हुंडा दिला तर तो काही अयोग्य होणार नाही.

राव : पण एवढी रक्कम मी आणू कुठून ?

गुलाब : का बरं ? आपल्या सेफमधून वसंताला ज्या अर्थी चार हजार रुपये सहज चोरता आले, त्या अर्थी—

राव : अरेरे ! पोरानं माझ्या तोंडाला काळं फासलं. नका– डॉक्टर, त्या हकीकतीचा उल्लेख करून माझ्या दुःखावर डागण्या देऊ नका.

गुलाब : काही वेळा अशा असतात की, मोठमोठ्या संकटाच्या आठवणीसुद्धा त्या वेळी मोठ्या आनंदाने जागवाव्या लागतात. त्यातलीच ही एक वेळ आहे. ऐका, ज्याअर्थी त्याला सेफमधून चार हजार रुपये सहज काढता आले; आणि ते आपल्याला सहज उमगले नाहीत, त्याअर्थी सेफमध्ये त्यापेक्षा काही तरी जास्त रक्कम होती यात शंका नाही. शिवाय नोटा ताडून पाहण्यासाठी- (राव बहादूर कपाळावर हात मारून घेतो.) आपण आपली डायरी दाखवली, तीत त्याच पानावर पंचवीस हजारांचे आकडे तर मला दिसलेच, त्याशिवाय आणखी--

राव : माझ्या इस्टेटीची मोजदाद करायला तुम्हाला काही कुणी नेमलं नाही. इनकमटॅक्स कलेक्टरसुद्धा एवढी चिकित्सा करीत नाही.

गुलाब : तेव्हा हे हुंड्याचं ठरलंच. आता मानपान–

राव : हेही ठरलंच काय ? हुंडा म्हणून मी एक पैसुद्धा देणार नाही. !

गुलाब : हुंडा म्हणून नका देऊ; किरकोळ खर्च म्हणून द्या, जावयाला आहेर म्हणून द्या, मुलीच्या नवऱ्याला उत्तेजनार्थ इनामत म्हणून द्या, काहीही म्हणून द्या, पण द्या.

राव : मला हा संबंधच मुळी कर्तव्य नाही.

गुलाब : ठीक आहे. मी येतो तर. नमस्कार.

मंजिरी : थांबा बाबा, काय चाललं आहे हे ? माझ्या सुखापेक्षा तुम्हाला पैसा का अधिक वाटतो ? मी तुम्हाला अगदी नकोशीच का झाले आहे ?

राव. : मी स्पष्ट सांगतो, मला हा संबंध कर्तव्य नाही. म्हणे लव्ह मॅरेज ! (Love Marriage) यांना मुलीचा बाप म्हणजे अडवून नाडायला एक कूळच सापडलं आहे असं वाटतं ! असं नाडायचं तर लव्ह मॅरेज ते कसलं ?

मंजिरी : हे लग्न मोडाल तर मी तुमच्या पायाशी डोकं आपटून प्राण देईन.

राव. : मंजिरी, काय हा वेडेपणा ! पोर अगदी बावळी आहे ! तुला यातलं काहीच कसं समजत नाही ? (गुलाबला) अहो डॉक्टर, तुम्हाला हिच्या लव्हविषयी काहीच आदर वाटत नाही ?

गुलाब : लव्ह, प्रेम आणि प्रणय असलं मला बिलकूल काही माहीत नाही. लव्हच्या खुळानं मूर्ख बनून हुंडा न घेतला तर माझी इभ्रत कमी होईल, हे तत्व यमूच्या लग्नावेळच्या आपल्या भाषणामुळं माझ्या मनावर पूर्णपणे बिंबलं आहे. वसंताचंही यमूवर प्रेम होतं त्यावेळी लव्हचा आदर आपल्याला कुठं उत्पन्न झाला ?

राव. : यमू आणि वसंत ! वसंत आणि यमू ! पुन्हा पुन्हा तीच रोपे ! जशी काही भुतंच माझ्यामागं लागली आहेत. (तारेचा शिपाई येतो.)

मंजिरी : अग बाई ! तार कुणाची ? दादा पुण्यातच आहे ना ? माझ्या छातीत धस्सं झालं ! काहीतरी वाईट बातमी आहे असंच आपलं वाटू लागलं ! दादा इथंच आहे ना ?

राव. : त्याला काय घाड भरली आहे ? हरामखोरानं मला चोहीकडून कसं पेंचात आणलं आहे ! (तार वाचून) घात झाला ! बुडालो, बुडालो ! मंजिरी, ठार बुडालो– (डोक्यावर हात घेऊन स्वस्थ बसतो.)

मंजिरी : काय–काय ? झालं काय ?

राव : त्या पोरांचा शाप मला भोवला. बुडालो–डॉक्टर; सफाई बुडालो ! ही पहा तार.

गुलाब : (तार वाचून मंजिरीकडे देतो.) हं: ! कर्मगति ! दुसरं काय ? बरं तर, येतो मी.

राव.: हे काय ? तुम्ही का चाललात ? बँक बुडाली म्हणून ? कुठली मला बुद्धी झाली ? माझं सर्वस्व गेलं ! आपल्या हातानं मी माझी सारी जिंदगी त्या चोरांच्या हाती देऊन टाकली. पोराला तर आधीच घालवून दिलं—

गुलाब : आणि म्हणूनच सर्वस्व गेलं !

राव : कर्म माझं !

गुलाब : खरोखरच हे कर्म मात्र तुमचं स्वतःचं ! करावं तसं भरावं ! बरं, येतो मी. नमस्कार !

राव. : (त्याचा हात धरून) थांबा-मंजिरी, पहा, या माणसावर तुझी लव्ह बसली होती. तुझ्या प्रेमाला हा पात्र आहे का ? पहा; माझं ऐश्वर्य नाहीसं होताच हा निघून चालला.

मंजिरी : Still I love him (स्टिल आय लव्ह हिम) बाबा; प्रेम आंधळं असतं बरं !

राव. : पण तू डोळस आहेस ! (विष्णुपंत व मनोहर येतात) अगदी योग्यवेळी आलात मनोहरपंत. हुंडा घेतल्याशिवाय माझ्या मुलीबरोबर लग्न करायला तुम्ही तयार आहात का ?

मनो. : हुंडा घेतल्याशिवाय तुमच्या मुलीशी लग्न करायला मी तयार आहे.

गुलाब : पण ही तार पाहिलीस का ? (मंजिरी तार देते)

मनो. : (तार वाचून) अरेरे ! याच बँकेत तुमची सारी जिंदगी होती ना ! अरेरे ! मला तुमची फार दया येते. काय हल्ली बँका बुडत आहेत या !

विष्णु : काय म्हणता ? बँक बुडाली ? आटोपला तर सारा बाजार.

मनो. : रावबहादूर, विष्णुपंत, येतो तर. नमस्कार.

राव. : हे काय ? तुम्ही मंजिरीशी लग्न करायला कबूल होता ना ?

मनो. : असं मी कुठं म्हटलं ? तुमच्या मुलीशी हुंड्याशिवाय लग्न करणारा एखादा मुलगा मी पाहून देईन असंच मी तुम्हाला सांगणार होतो, पण बोलताना काहीतरी चूक होऊन, आपला भलताच समज झाला असावासं दिसतं.

राव. : पण आताच मी तुम्हाला स्पष्ट विचारलं होतं.

मनो : अरेरे ! डॉक्टर गुलाब, बँक बुडाल्याच्या शॉकमुळे यांना भ्रम झाला खास.

गुलाब : बँक बुडाल्याच्या शॉकमुळं पुष्कळानाच भ्रम झाला आहे.

मनो. : मोठ्यांचं संकटही मोठं ! असो. झाल्या गोष्टीला उपाय नाही !

राव. : खरोखर मला भ्रम झाला आहे का ? अरेरे ! मी भिकारी झालो ! मी दिगंबरपंताइतका भिकारी झालो ! हर हर ! गरिबाचा वाली कुणीही नाही. डॉक्टर गुलाब, अकल्पित रीतीनं प्राप्त झालेल्या माझ्या या दारिद्र्याकडे पाहून तरी आता हुंड्याचा दृष्ट सोडा.

मनो. : गरिबांकडून हुंडा मागणारा हाच मुलाचा बाप बरं– हाच वराचा बाप !

गुलाब : हुंड्याचा आणि दारिद्र्याचा काय संबंध ? सुंदर आणि सुशिक्षित मुलीच्या दरिद्री बापानंही वराला हुंडा दिलाच पाहिजे; हुंडा हा वराचा निसर्गसिद्ध हक्क आहे, असंच पूर्वी आपलं मत होतं ना ?

राव. : पण मी आता दरिद्री झालो ! आता माझ्यावर दया करा.

मनो. : हाच मुलाचा बाप ! हाच मुलाचा बाप !! हाच मुलाचा बाप !!!

गुलाब : (संतापाने) माझे मामा तुमच्याकडे आले त्यावेळी याहूनही दरिद्री होते. त्यावेळी मामा याचक होते. तुम्ही दाते होता. पुढे केव्हातरी आपणही दरिद्री होऊ, ही जाणीव इतर धनिकांप्रमाणे तुम्हालाही नव्हती. आपणही मुलीचा बाप आहोत हे त्यावेळी तुमच्या ध्यानात येत नव्हतं. भवितव्यता म्हणून काही तरी आहे. कालचक्र काही आजच फिरायचं थांबलं नाही, हे वैभवाच्या धुंदीमुळे आणि वरपक्षाच्या कैफामुळं तुम्हाला आठवत नव्हतं. पण रावबहादूर, ईश्वराच्या घरचा न्यायाचा काटा फार तीक्ष्ण असतो, याचा आता अनुभव घ्या. तुमची मुलगी माझी वाग्दत्त वधू आहे. माझ्या-खेरीज इतर कुणाशीही आणि केव्हाही ती लग्न करणार नाही, अशी तिच्या मनाची तयारी आहे; आणि हा डॉक्टर गुलाब, आपल्या मामाचा सूड घेण्याकरिता म्हणून पाच हजार रुपये हुंडा घेतल्याशिवाय तुमच्या मुलीशी केव्हाही लग्न करणार नाही....

राव. : पुरे डॉक्टर, आता मला छळू नका. आता माझे डोळे उघडले. दारिद्र्याचं अंजन मिळाल्यामुळे दिगंबरपंतांची ती केविलवाणी मुद्रा मला आता स्पष्ट दिसू लागली आहे.

गुलाब : त्या समोरच्या आरशात पहा; म्हणजे याहीपेक्षा स्पष्ट दिसेल.

राव. : त्या थोर गृहस्थाचा हुंड्यासाठी मी जो निष्कारण छळ केला, त्याचंच प्रायश्चित्त मी भोगतो आहे. वसंताला आणि यमुनेला मी पुनः सन्मानाने घरी आणीन, त्यांची क्षमाही मागेन, पण दिगंबरपंतांचा माझ्याकडून जो छळ झाला आहे, तो मात्र काहीही करून आता विसरला जाणार नाही. तरी पण मला एवढं करू दे. विष्णुपंत, दिगंबरपंतांना आताच्या आता इथं घेऊन या. जा.

गुलाब : जाण्याचं कारण नाही, हे पाहा, तेच स्वतः इकडे येत आहेत. बरोबर वसंत आणि यमुनाही आहेत. [ती येतात]

राव. : आता हे काळं तोंड त्यांना कसं दाखवू ? [धावत जाऊन दिगंबरपंतांचे पाय धरतो.]

दिगं. : रावबहादुर, हे काय ? आपल्यासारख्यांनी —

राव. : नाही. आता तुम्ही आणि मी सारखेच झालो आहोत. सहाध्यायी असूनही, वैभवाच्या धुंदीने मी पूर्वीचं नातं विसरलो होतो; पण आता क्षमा करा– क्षमा केली असं तुम्ही म्हटल्याखेरीज मी तुमचे पाय सोडणार नाही.

दिगं. : क्षमा केली, उठा आता. पण क्षमा कसली मागता आहा, ते तरी सांगा.

राव. : (वसंताला आलिंगन देऊन) बाळ वसंत, मी तुला किती निष्ठुरपणानं वागवलं ! (यमुना नमस्कार करते) अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ! तूही मला क्षमा करशील ना यमुने ?

यमुना : हे काय भलतंच बोलणं ? आपली मुलंच आहोत ना आम्ही ?

राव : बाळे, तुझ्यासारखी गृहलक्ष्मी लाभल्यावर ती पांढऱ्या टिकल्यांची लक्ष्मी काय करायची आहे मला ?

दिगं. : काय चमत्कार आहे हा ? वसंतरावांच्या सांगण्यावरून आपलं मन वळवायची शेवटची खटपट करावी म्हणून मनाचा हिय्या करून आलो, तोच—

राव. : माझ्यात झालेला हा अकल्पित फरक पाहून तुम्हाला आश्चर्य वाटलंअसंच ना ? दिगंबरपंत, ही तार पहा. खरोखरच देवा, सर्व मुलांच्या चढेल बापांना माझ्यासारखं असं अचानक दारिद्र्य देशील तर, जगतावर किती उपकार होतील. डॉक्टर गुलाब, आता तुम्ही खुशाल जा आणि तुमच्या श्रीमंतीला शोभेल अशी दुसरी एखादी वधू पहा. मंजिरी, पश्चात्तापानं पोळलेल्या या तुझ्या दीन बापाकडे पाहून, या लक्ष्मीपुत्रावर जडलेलं तुझं प्रेम हृदयातून काढून टाक.

गुलाब : तसं करण्याचं काहीच कारण नाही. (रावबहादुरांचे पाय धरून) पण मला आधी तुमची क्षमा मागितली पाहिजे.

राव. : माझी क्षमा ! श्रीमंतांनी आताही गरिबांची क्षमा मागायचं कारण नाही.

गुलाब : मी केव्हाही श्रीमंत नव्हतो आणि आता नाही. हुंडा घेण्याची माझी केव्हाही तयारी नव्हती आणि आताही नाही. केल्या कृतीचा तुम्हाला पश्चात्ताप व्हावा म्हणून मुद्दाम केलेलं ते कपटनाटक होतं. ये मंजिरी, तुझ्या पित्यासमक्ष मला तुझं पाणिग्रहण करू दे.

राव. : असं जर आहे तर मीच तुम्हा उभयतांचा संगम घडवून आणतो. [त्यांचे हात हातात देतो.]

गुलाब : सर्वांचं समाधान झालं; पण अजून माझ्या कपटनाटकातला एक प्रवेश उलगडायचा राहिला आहे. रावबहादुर, तुम्हाला मी अत्यंत क्लेश दिले याची मला पुन्हा क्षमा करा. तुमच्या मनात हुंड्याविषयी खराखुरा तिटकारा उत्पन्न होण्यासाठी मी जे एक विलक्षण कपट केलं आहे, ते कळल्यावर कदाचित् तुम्हाला अजूनही माझा तिटकारा येईल.

राव. : केव्हाही नाही. ज्या कारणामुळं मला एवढा अनुताप झाला, ते कारण कितीही चमत्कारिक असलं तरी त्याबद्दल मी तुम्हाला उलट शाबासकीच देईन.

गुलाब : ऐका. रावबहादुर, मामा, वसंत आणि ए पशू, तूही ऐक. ही तार खोटी आहे. हल्ली बुडत असलेल्या बँकांची संधि साधून मी माझ्या मित्राला ही खोटी तार पाठवायला सांगितलं होतं. रावबहादूर, आपली रक्कम बँकेत सुरक्षित आहे.

राव. : आता मला त्या रकमेशी काही कर्तव्य नाही. वसंत, तूही ती घेऊ नकोस अशी माझी इच्छा आहे. वैभव होतं तेव्हा मी उन्मत्त झालो, दिगंबरपंतासारख्या सज्जनाचा मी त्याचमुळं छळ केला, तेच वैभव उपभोगून माझ्या मुलाबाळांनीही अधोगतीला जावं अशी माझी इच्छा नाही.

वसंत : मलाही ते नकोच आहे.

गुलाब : मला ते द्रव्य मुळीच नको.

॥ २ ॥

संन्याशाचा संसार

[पतितपरावर्तनाच्या समस्येवरील हे नाटक त्या काळात फारच गाजले. १९२० साली लिहिलेले हे नाटक आहे. म. गांधींच्या चळवळी इतकेच स्वामी श्रद्धानंदांच्या चळवळीविषयी जनमानसात कुतूहल होते. या नाटकाची प्रेरणा त्या चळवळीत आहे. संसाराचा त्याग करून व संन्यास स्वीकारून देशाची व धर्माची सेवा करता येते. पण धर्माची वाट चुकलेल्यांचा उद्धार करण्यासाठी संन्याशालाही संसार करावा लागतो. विषयी जनांच्या संसारापेक्षा संन्याशाचा संसार व्यापक असतो. या नाटकाच्या तिसऱ्या अंकातील हा चवथा प्रवेश विचार प्रक्षोभक आहे.]

[**स्थळ**– विंदु माधवजीचे घर (विंदु माधव)]

विंदुमाधव : इतकी वर्षं हृदयात जपून ठेवलेला हेतु आता प्रत्यक्ष फलद्रूप होणार, अशी चिन्हं दिसू लागली आहेत. हे सर्वसाक्षी भगवंता, आजन्म तुझं स्मरण करीत असतांना तुझ्यापाशी जी याचना करीत आलो ती सफल झाल्याचं या वृद्ध नेत्रांना दाखवशील का ? समाधिस्त श्रींच्या अनुज्ञेनं त्यागराजाला सर्व हिंदुस्थानभर फिरवून उभयपद्धतींचं शिक्षण देताना मी याच आशावृक्षाच्या बीजाचं त्याच्या हृदयातही संवर्धन करवीत होतो, त्याचं कार्य झालं. त्यागराजानं आपण खराखरा त्यागराज आहे हे जगाला पटवून दिलं; वैभवाची धगधगणारी मशाल मालवून दारिद्र्याच्या घनघोर काळोखात त्यानं प्रत्यक्ष प्रवेश करून दाखविला. त्या काळोखातून खेचून आणून जगाच्या प्रकाशात त्याला उभा करण्याचं श्रेय संपादन करणाऱ्या अनाथ डेव्हिडला ईश्वरा,तू ब्राह्मण्याचा सूर्य दाखविणार नाहीस का? निघड्या हृदयानं सर्व देशात फिरून बहुमताचा जोर पैदा करणाऱ्या माझ्या लाडक्या किशोरीच्या प्रश्नांनी पुनरुद्धाद्वित झालेल्या या आचार्य पीठाला परावर्तनाची ध्वजा लावण्याचा अग्रमान देणार

नाहीस का ? आजन्म परार्थ देह झिजवू इच्छिण्याची दैवी महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या या विंदुमाधवाला देह ठेवण्यापूर्वी एवढी कृतार्थता देशील का ? हे सकल चराचर नियामका, परंपरेच्या मायावी मोहजालात गुरफटून उगवत्या सूर्याकडे डोळेझाक करू पाहणाऱ्या आमच्या हिंदु समाजाचे डोळे असेच झाकलेले राहाणार आहेत का ?

श्री. : (प्रवेश करून) डोळे उघडले, गुरुजी, या तुमच्या मूढ शिष्याचे डोळे आज उघडले.

विंदुमाधव : काय झालं ?

श्री : परंपरेच्या वृथाभिमानानं मूढ झालेल्या हिंदु समाजाला आपलं हितसाधन कळत नाही, हे कळून आज माझे डोळे उघडले. गुरुजी, धर्ममंडळाची रचना करितांना त्याचा उपयोगच होईल, असं मला वाटत होतं, पण आता ते खोटं ठरणार. लोकसत्तात्मक पद्धति अमलात आणतांना, परंपरेच्या वृक्षाची मुळं किती खोल गेली आहेत, याचा अंदाज मला झाला नाही.

विंदुमाधव : हा वृक्ष अक्षय्यवटापेक्षांही पुराणा आहे. एका हिसक्यानं तो उखडून निघणार नाही. तसं करतांना नुसता हाताला धक्का बसेल.

श्री : तसंच झालं. पुराण्या पुरोहितांनी धर्ममंडळावर वजन पाडलं आणि त्यांनी एक विलक्षण अट पुढं मांडली. कुणीही धर्मनिष्ठ कुलीन ब्राह्मण आपली मुलगी डेव्हिडला देईल तरच योग्य ते प्रायश्चित्त देऊन डेव्हिडला ब्राह्मण करून घ्यावा, असा ठराव सर्वानुमते पसार झाला.

विंदुमाधव : अगदी योग्य तेच झालं. नुसत्या परावर्तनाच्या ठरावानं डेव्हिडचं ब्राह्मण्य सिद्ध झालं नसतं.

श्री : पण जमलेल्या सर्व ब्राह्मणांतून कुणीच या कार्याला तयार होईना. जे तयार झाले त्यांना धर्मविरोधी सुधारक ठरवून इतरांनी बहुमतानं हाणून पाडलं.

विंदुमाधव : शंकराचार्यांचा पुरोहित धर्मद्वेषी ठरेल का ?

श्री : म्हणजे ? आपल्या धर्मनिष्ठेला कोण नावं ठेवील ?

विंदुमाधव : मी माझी मुलगी आनंदानं डेव्हिडला अर्पण करतो.

श्री : काय ?

विंदुमाधव : आपल्या पुराण्या आईच्या संमतीनं– नव्हे आग्रहानं–छत्रपति शिवाजी रायांनी आपली मुलगी बाटलेल्या बजाजीच्या मुलाला दिली होती ना ! त्या शककर्त्या शिवाजीचं मी नुसतं अनुकरण करीत आहे. तसं न केलं तर जग माझी गणना कर्तृत्वहीन बोलघेवड्यांत करू लागेल. हा संसारी लोकांचा त्याग संन्याशाला हृदयगम्य होणार नाही. माझी किशोरी मी डेव्हिडला दिली !

श्री. : किशोरी ! गुरुजी, किशोरी तर हल्ली एक संन्यासिनीच बनली आहे.

विंदुमाधव : त्यागाच्या प्रकाशानं भारतभूमीला दिपवून टाकण्यासाठी

संन्यासिनीनं संसार थाटावा; त्यागाचा त्याग करून वैराग्याची परमावधी पटवून दाखवावी आणि मृतप्राय झालेल्या एका शुद्धजीवाच्या उद्धारानं परंपरेच्या खोल गर्तेत गढून गेलेल्या समाजाला माझ्या किशोरीनं उदाहरणस्वरूप व्हावं. (जातो.)

श्री : खरा त्यागी कोण ? मी की हे ? माझं मन घाबरू लागलं. संन्यास घेऊन संसार मोडणारा मी– मीच किशोरीला संसारी होण्याचा उपदेश करू ? किशोरीला उपदेशाचे चार शब्द सांगणं म्हणजे देखील मला मोठं संकट वाटतं. अर्थपूर्ण चारच शब्दांनी माझ्या तत्कालीन बधिर झालेल्या हृदयात जिनं वैभवाचं संकट टाळण्याची स्फूर्ति उत्पन्न केली, त्या माझ्या गुरुदेवतेला मीच कसा उपदेश करू ? हृदया, ईश्वराची भावना बळकट कर. जिव्हे, ईश्वरस्मरणानं धीट हो. नेत्रांनो, ईश्वरस्वरूप दर्शनानं तृप्त व्हा, तरच यावेळी किशोरीसमोर राहण्याचा या देहाला अधिकार येईल. आली-किशोरी आली–जय भगवान. (किशोरी येते)

किशोरी : स्वामीजींनी मला का बोलावलं ?

श्री : किशोरी, संसाराविषयी तुझं काय मत आहे ?

किशोरी : संसाराचा विचार संन्याशांना कशाला पाहिजे ?

श्री : विषयीजनांच्या संसारापेक्षा संन्याशाचा संसारच मोठा व्यापक असतो.

किशोरी : संन्याशाचा संसार ! किती परस्परविरोधी शब्द आहेत हे !

श्री : विरोधाचं निर्मूलन होऊन ते शब्द सार्थ व्हावे असं तुला वाटतं का ? तर मग संसारी हो !

किशोरी : कुणाचे शब्द हे ? हे शब्द उच्चारणारा संन्याशी संन्यासीच आहे ना ?

श्री : संसारीजनांनी विषयत्यागानं संसारी व्हावं म्हणूनच एक संन्यासी हे शब्द उच्चारीत आहे.

किशोरी : पण संसारत्यागी संन्यासिनीला ते ऐकण्याची आवश्यकता वाटत नाही.

श्री : किशोरी, धर्ममंडळानं डेव्हिडच्या परावर्तनाला घातलेली अट तुला कळली ना ? आता पुढं कसं होणार ?

किशोरी : ते मी काय सांगू ? डेव्हिडच्या परावर्तनासाठी मी काही तळमळत नव्हते. (स्वगत) मी खोटं बोलले का ?

श्री : पण तुझे बाबा ? किशोरी, गुरुजींच्या शब्दाची तुला किंमत आहे ना ?

किशोरी : पितापुत्रीच्या नात्याची चर्चा करण्याचा परस्थांना अधिकार नाही.

श्री : अर्थात् नाही ! पण किशोरी, त्यागराज परस्थ आहे का ? (किशोरी

स्तब्ध राहते) किशोरी, त्यागराज परस्थ आहे असं म्हणण्याचं धाडस करू नकोस ! तुझे बाबा तरी तुला परके नाहीत ना ?

किशोरी : असं म्हणण्याचा उद्देश ?

श्री : उद्देश तुझ्या बाबांनाच विचार. डेव्हिडचं परावर्तन व्हावं म्हणून तुझ्या बाबांनी– किशोरी, घाबरू नकोस. मन घट्ट कर– ऐक. तुझ्या बाबांनी आपली वडील मुलगी डेव्हिडला अर्पण केली.

किशोरी : काय म्हटलंत ?

श्री : तुझ्या बाबांनी किशोरीचं डेव्हिडशी लग्न ठरविलं.

किशोरी : गुलामांचा व्यापार बाबांनी केव्हापासून सुरू केला ?

श्री : जगत्कार्यासाठी अलौकिक स्वार्थत्यागाची ईश्वरानं त्यांच्या हृदयात प्रेरणा केली तेव्हापासून. ईश्वरी इच्छेचे गुलाम गुलामांचा व्यापार करायला भीत नाहीत.

किशोरी : या भारतवर्षात गुलामांचा व्यापार रुजू नाही.

श्री : हरिश्चंद्राच्या तारामती - रोहिताश्वांनी तो एका काळी चिरस्मरणीय करून ठेविला आहे. हरिश्चंद्र भारतवर्षाचा आदर्श आहे असं नाही का तुला वाटत ? रतिदेवाचा स्वार्थत्याग नाही का तुला आठवत ?

किशोरी : जुन्यापुराण्या पुराणांचे आधार अंधश्रद्धाळू भाविकांसाठी आहेत.

श्री : जाज्वल्य श्रद्धेच्या मूर्तिमंत पुतळ्यांना त्यापासून काहीच घडा घेता येणार नाही का ? (किशोरी स्तब्ध राहते) किशोरी, ताजा इतिहास देखील आज पुराणा झाला असं तू म्हणणार नाहीस ना ? शिवाजीमहाराजांनी काय केलं ? त्यांचं अनुकरण करणं बिंदुमाधव गुरुजींच्या भारतव्यापी लोकप्रियतेला जास्त उज्ज्वल करणार नाही का ! एका दीन दुबळ्या अनाथ जीवाच्या उद्धारानं तू आपल्या जन्मदात्या पित्याची कीर्ती चिरंतन करणार नाहीस का ?

किशोरी : मतस्वातंत्र्याचा माझ्या बाबांना फार अभिमान आहे. तो इतका मर्यादित आहे का ? नुसता दुसऱ्यांना उपदेश करण्यासाठीच ते मतस्वातंत्र्याचा बडिवार बडबडत होते का ? त्यागराज, बाबांनी तुम्हालाच हे वकीलपत्र दिलं आहे ? किशोरीच्या देहविक्रयाची हकीगत स्वतःच्या तोंडानं तिला सांगण्याची त्यांना भीती वाटली– की शरम वाटली ?

श्री : किशोरी, रागाला डोळे नसतात. मन शांत ठेवून शब्द बोल.

किशोरी : प्रेमाची पायमल्ली करू पाहणाऱ्या संन्याशानंच आधी मन शांत ठेवावं. संन्यास घेतला म्हणून स्त्रियांचं हृदय काही ओळखता येत नसतं.

श्री : म्हणून म्हणतो, संसारी हो आणि नंतर पुरुषांच्या हृदयाची परीक्षा कर !

किशोरी : पुरुषांना असतं का हृदय ?

श्री : पुरुषांच्या हृदयाच्या आश्रयाशिवाय ते तुला कळणार नाही. किशोरी,

तुला उपदेश करण्याचा मला अधिकार नाही. तुझी प्रार्थना करावी हाच माझा अधिकार आहे. एका दीनाच्या उद्धारासाठी तळमळणारा एक दुसरा दुबळा जीव तुझ्या पायांवर मस्तक ठेवून–

किशोरी : स्वामीजी, हे काय ? संन्याशानं कुणाला नमस्कार करू नये.

श्री : सर्वांच्या ऋणांतून मुक्त झालेला संन्यासी आपल्या मातेच्या पायांवर डोकं ठेवल्यावाचून धन्य होत नाही. संन्यास घेतला तरी कुणी मातृऋणांतून मुक्त होत नाही. किशोरी, माझ्या गुरुदेवते, माझ्या मातृदेवते, विषयलालसेचा कलंक न लागता ईश्वरी संसाराचा पसारा वाढण्यासाठी तू स्वेच्छापूर्वक डेव्हिडचं पाणिग्रहण कर ! आपल्या ईश्वरी तेजानं भारतवर्षाचे मिटलेले डोळे उघडून दे ! त्यागाच्या त्यागानं जगद्विजयी हो !

किशोरी : ज्या दिवशी तुमचा संन्यास कबूल करून मी तुम्हाला नमस्कार केला, त्याच दिवशी मीही संन्यासिनीच झाले–

श्री : किशोरी, माते, मी हरलो. तुझ्या बाबांच्या आज्ञेनं मी तुला उपदेश करण्याचा प्रयत्न केला, त्याची मला क्षमा कर ! तुझ्या मनाच्या समाधानापुढं मला डेव्हिडच्या परावर्तनाची काडीभरही किंमत वाटत नाही. जा ! स्वतःच्या स्वातंत्र्यानं स्वतंत्र संन्याशाचा तेजोभंग करणाऱ्या देवते, मी तुला प्रणिपात करतो.

दुलारी : (प्रवेश करून) घात झालासं वाटतं ! कुठं आहेत बाबा ? स्वामीजी, आधी सांगा, बाबा कुठं आहेत ?

श्री : ते घरातच कुठंतरी असतील. काय झालं दुलारी ?

बिंदुमाधव : (प्रवेश करून) काय झालं दुलारी ?

दुलारी : डेव्हिड जोशी एकाएकी कुठं नाहीसे झाले, आणि त्यांच्या खोलीत मला हे पत्र सापडलं.

बिंदुमाधव : कुणी उघडलं हे पत्र ? (वाचू लागतो.)

दुलारी : मला क्षमा करा. फाजील जिज्ञासेनं मी ते उघडलं.

बिंदुमाधव : एका अर्थी बरंच झालं किशोरी, हे पत्र मोठ्यानं वाच.

किशोरी : (वाचते) गुरुवर्यांच्या चरणी साष्टांग प्रणिपात. गुरुजी, शेवटी निराशाच विजयी झाली. मी काय करू ? पतिताला दारी कोण उभा करील ? तुमची मुलगी मला द्या असं मी ख्रिस्ती या ब्राह्मणांना कुठल्या तोंडानं सांगू ? आत्मघाताखेरीज आता मार्ग नाही. हा देह मला असह्य वाटतो. शेवटची विनंती म्हणून एवढीच की, माझ्या बाबांच्या थडग्याशेजारी पडलेल्या माझ्या देहाला अग्नि द्या ! पुरू नका ! आणि माझ्या अस्थींचं गंगेत विसर्जन करा ! मरण्यापूर्वी एकदा मन मोकळं

करावंसं वाटतं. मृत्यूच्या द्वारी लाजेचा प्रवेश होत नाही. किशोरीला सांगा— (किशोरी थांबून वाचते.)

विंदुमाधव : देहाची सांड झाली तर देवाचीसुद्धां भेट होते; पण किशोरी-सारख्या मानवी मायेला नुसता दयेचा द्रव देखील येत नाही अं ?

श्री : वाच– किशोरी, पुढे वाच.

दुलारी : तात्पर्य समजलं. आता आधी कबरस्थानाकडे चला.

किशोरी : नाही. तुम्ही कुणीच येऊ नका. मी एकटीच त्यांना सोडवून आणीन. (जाते.) (पडदा)

॥ ३ ॥

सत्तेचे गुलाम

['सत्तेचे गुलाम' (१९३२) हे नाटक अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे. 'खेड्याकडे चला' हा म. गांधींचा आदेश पाळणारे आदर्शवादी व्यक्तिचित्र त्यात आहे. तसेच म. गांधींच्या देशभक्तिच्या आदेशाचा विपर्यास करून दांभिकपणाच जोपासणारे व्यक्तिचित्रही यात आहे. खादीच्या स्पर्शाने मोहरून जाणारे व्यक्तिमत्व यात आहे. तसेच खादीच्या पोशाखाची विटंबना करणारे 'ढोंगही' यात आहे. माणसं राजकीय सत्तेचेच गुलाम होतात असं नव्हे. प्रेमाच्या सत्तेचेही गुलाम होतात. त्याचप्रमाणे संपत्तीच्या सत्तेचेही गुलाम होतात. परंतु कोणत्याही सत्तेची गुलामी ही माणसाला अहितकारकच असते. इस्टेटीच्या मालकीसाठी एका कुटुंबाची कशी दैना झाली याचे मार्मिक चित्रण उपरोध, विडंबन यांच्या साह्याने या नाटकात केले आहे. पहिल्या अंकातील हा तिसरा प्रवेश मामांच्या नाटकातील विनोदनिर्मितीच्या दृष्टीनेही लक्षणीय आहे]

स्थळ : बाबासाहेबांचे घर.

(हेरंबराव पूजा करीत आहेत. जवळ रमा उभी आहे.)

हेरंब : शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोऽस्तुते ! – हद्द झाली तुझ्यापुढं ! मी काय करणार त्याला ? बाबा हरिद्वारला मी हा इकडे. म्हाताऱ्याला बुद्धिभ्रंश झाला खास.

रमा : पण आता हाती नरोटी आली ना ? इतके दिवस थाटात काढले आता या वयात भीक मागत फिरायची पाळी आली. वैकुंठभावजींना त्याचं काहीच वाटत नाही.

हेरंब : लाभस्तेषां जयस्तेषां कुतस्तेषां– त्याला काय टोणग्याला ! हयात असतानाच बाबांनी ते एक शेत करून दिलं आहे ना त्याच्या नावावर ? त्याला तेवढंच पुरेसं वाटतं. आता मला काय ते तेवढं गिरगावातलं घरच राहणार.

रमा : घर घेऊन खायचं का आहे ? आपल्यापुरत्या चार खोल्या ठेवून बाकीचं भाड्यानं लावावं लागणार आता. भाडेकरू बरा मिळाला तर ठीक, नाहीतर तो आणखी नसता जंजाळ व्हायचा. केरोपंत काय म्हणत होते ? आहे का काही आशेला जागा ?

हेरंब : त्वं पुरा सागरोत्पन्नो विष्णुना विधृतः करे– आता घरलंच आहे हाताशी त्यांनी. काय वाटेल ते करून उईल खोटं पाडतो, असं त्यांनी वचनच दिलं आहे मुळी. आता माझा सारा भरिभार त्यांच्यावर आहे. हे लोक जे वकिलांना नावं ठेवतात, ते त्यांच्या बापांनी अशी बुईलं केलेली नसतात म्हणून. हल्ली वकिलांनी वकिली सोडावी म्हणून चळवळ चालली आहे– पांचजन्याय विद्महे पावमानाय – त्यांचे बाप गेले असते हरिद्वारला मरायला म्हणजे कळलं असतं त्यांना – आगमार्थं तु देवानाम्– (कान्होबा येतो.) आलास बाहेरच्या पायांनी आत ? धर्मच सोडला या अलीकडच्या पोरांनी.

कान्होबा : वकीलसाहेब आले आहेत. कोर्टाची घाई आहे त्यांना—

हेरंब : वंदे विष्णुं भवभयहरं सर्व— त्यांना आत का नाही घेऊन आलास ?

कान्होबा : ते तुम्हालाच बोलावताहेत बाहेर. त्यांच्या पायात बूट आहेत आणि तुम्ही इथं—

हेरंब : स भूमिं विश्वतो वृत्त्वाऽत्यतिष्ठद्दशांगुलं— बूट काढून या म्हणावं. स्टॉकिंग असले तरी चालतील. या घरात पाय लागायला भाग्य हवं या देवाचं ! पादयो : पाद्यं समर्पयामि— (कान्होबा जातो) पाहिलीस किती कळकळ त्यांना ती ? देवमाणसं बरं ही ! अरे कान्होबा, बूट असले तरी चालतील म्हणावं. खोटी नको त्यांची— (केरोपंत येतो) या नमस्कार. पूजेला बसलो आहे. उठता येत नाही. आज गरिबावर का एवढी कृपा ही ? अग, पाट दे त्यांना बसायला— चौरंग दे तो. हं बसा.

केरो. : आज प्रोबेटचा अर्ज गुदरायचा आहे. त्यापूर्वी तुम्हाला भेटून जावं म्हणून मुद्दाम आलो. वैकुंठरावाना परभारे कोर्टातच बोलावलं आहे.

हेरंब : त्याला कशाला ?

केरो. : परवा बुइल वाचताना मी ती बाब मुद्दामच वगळली होती.

हेरंब : म्हणजे त्याला काही दिलं आहे की काय त्यात ?

केरो. : दिलं नसलं तरी सारी त्याचीच इस्टेट आहे आता ती. म्हातारा मोठा वस्ताद खरा.

रमा : पूर्वजन्मीचा वैरी पण या जन्मी बाप होऊन आला होता मेला. काय दिलं आहे वैकुंठभावजींना ?

केरो. : त्याला इस्टेटीचा एक्झिक्यूटर नेमला आहे– आणि तोही एकटाच.

हेरंब : चोराच्या हातात जामदारखान्याची किल्ली. आता कसं ? सुप्रतिष्ठितमस्तु-मालकीशिवाय तावा. काय भाग्य आहे गुलामाचं !

केरो. : अं : ! त्याची मोठीशी काळजी बाळगायचं कारण नाही. लिहितानाच ते वुईल इतकं वेकायदेशीर भाषेत लिहिलं आहे की— जाऊ द्या. बोलण्यात काय अर्थ आहे ! प्रत्यक्षाशीच गाठ आहे आता. पण मुख्य प्रश्न असा आहे– (स्तब्ध राहतो)

हेरंब : अलंकारार्थे अक्षतां— आता प्रश्न मुळी ठेवूच नका. नुसती उत्तरं– खडाखड उत्तरं देत सुटायची वेळ आली आहे. पूजार्थे यथाकालोद्भवपुष्पाणि— अगदी संकोच करू नका. स्पष्टस्पष्टच काय ते होऊन जाऊ द्या.

केरो. : मला आता बोलायला फार वेळ नाही. मुख्य प्रश्न खर्चाचा. सॉलिसिटरच्या हातात केस द्यावी लागणार. खर्च काय लागेल याचा आताच अंदाज करता यायचा नाही. हा कोर्टात खर्च आहे एवढंच ध्यानात ठेवलं म्हणजे झालं.

हेरंब : ॐ प्राणाय स्वाहा ॐ अपानाय स्वाहा– खर्चाची अगदी पर्वा करू नका. जीव गहाण ठेवावा लागला तरी हरकत नाही– हिनं तर आपले दागिने देखील उतरायचा निश्चय केला आहे– काय ग, असंच ना ?

रमा : नकोत द्यायला दागिने ? बरं का वकील भावजी, नाक कान उघडे पडले तरी चालतील, पण मेल्यांची चांगली नांकं ठेचा. ऐकलं का, आता वैकुंठभावजींचं ' काय करायचं ? घरात ही असली कामं चालायची आणि ते आपले भिंतीला कान लावून राहायचे–

केरो. : शाबास वहिनी ! तुम्हीच सांगितलंत म्हणून बरं झालं. मी म्हटलं असतं तर भावाभावात वितुष्ट आणायचा आरोप आला असता माझ्यावर.

हेरंब : नान्यापंथा अयनाय विद्यते– उपायच राहिला नाही आता दुसरा. ती व्यवस्था मी करतो.

केरो. : असं पहा हेरंबराव, उतावी ळपणानं कोणतीही गोष्ट करू नका. लोकापवादाला भिऊनच सर्व काही झालं पाहिजे. हे असले प्रसंग फार नाजुक असतात. कुणाचीही मनं न दुखवता कामं केली पाहिजेत. डॉक्टरप्रमाणे क्लोरोफार्म देऊन पोट फाडलं पाहिजे आणि शुद्धीवर यायच्यापूर्वीच टाके मारून टाकले पाहिजेत. —खर्चाला तुम्ही तयारच आहात. वैकुंठचीही व्यवस्था होईल. ठीक आहे. आता कामाला सुरुवात करायला हरकत नाही.

रमा : पण नलिनीचं कसं ? आमच्यासारखं व्हायचं म्हणजे नलिनीला काही मिळायचं नाही. इकडे तुमचंन् तिचं लग्न ठरलेलं. आता आमची बाजू धरायची म्हणजे नुकसानच नाही का तिचं ?

केरो. : रमावहिनी, हे वकिलीचं काम म्हणजे सतीचं वाण आहे. आपल्या अशीलाचं कल्याण करण्यासाठी वकिलाला प्रसंगी स्वतःच्या गळ्यालाही तात लावावी लागते. नलिनीच्या इस्टेटीसाठी काही मी तिला मागणी घातली नाही. निरपेक्षबुद्धीने कार्य करीत राहिलो तर या इस्टेटीच्या दुप्पट इस्टेट मीसुद्धा कमावीन, अशी मला

धमक आहे. नलिनीला संपत्तीचीच आवड असेल तर तो पुरवायला या बुइलातली इस्टेटच नको आहे काही !

हेरंब : ती मूर्ख आहे अगदी. तिचं काय ऐकता ? यानिकानि च पापानी जन्मान्तर कृतानि च– पदोपदी चांगलीच समज देऊन उघड उघड बोलल्याशिवाय तिला काही कळत नाही. पण अशा कामी तोंडाला कुलूप पाहिजे.

केरो. : मी आता येतो. पैशाची तयारी ठेवा. आरंभाला– (कानात लागतो) एवढे असले म्हणजे पुरे.

हेरंब : अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम– आता आमची लाज तुम्हालाच बरं केरोपंत ? काय वाटले ते झालं तरी चालेल, झोळी घेऊन भीक मागेन दारोदार– पण केस जिंकली पाहिजे. अगदी तुमच्या कसबाची कमाल करा. आजन्म तुमचा गुलाम होऊन राहीन.

केरो. : छे ! छे. असं बोलणं चांगलं नाही. किती झालं तरी तुम्ही वडील आहात. येतो आता, नमस्कार. (जातो)

हेरंब : आगताः सुखसंपत्ति पुण्योडइं तव दर्शनात-- फार मोठा माणूस. अशी माणसं आहेत म्हणून हे जग चाललं आहे. आणि म्हणे वकिलांनी वकिली सोडावी ! वकिलांनी जर वकिली सोडली--

वै. : (प्रवेश करून) तर जगातली निम्मी पापं नाहीशी होतील.

हेरंब : पण तुझ्यासारखं चालतं बोलतं पाप वकिलाच्या बापालासुद्धा नाहीसं करता यायचं नाही.

वै. : केरोपंताचे वडील देखील वकीलच होते ना ? होमिओपॅथीच्या तत्त्वाप्रमाणे पाहिलं तर मोठ्या पापानं लहान पाप निघालं पाहिजे. एवढा पिढीजाद वकील माझ्यावर घातलात तर माझा नायनाट व्हायला एक महिनासुद्धा लागायचा नाही.

हेरंब : आता जरा तोंड बंद ठेवशील ? मी पूजा करतो आहे– दिसतं का तुला ?

वै. : वकिलाच्या बाष्कळ लपंडावी भाषेनं तुमच्या पूजेला काही अडथळा आला नाही, पण पाठच्या भावाच्या चारच शब्दांनी तुमची पूजा बोरूळू लागली ना ? अरेरे, विचाऱ्या देवांनो, धन्य आहे तुमच्या पक्षपाताची !

रमा : जरा उगी रहाल का भावजी ?

वै. : या देवांची पूजा दादा करताहेत मी आपली माझ्या देवाची— माझ्या दादांची पूजा करतो आहे. वहिनी, थोडी फुलं द्या ना मला– की नुसत्या वाक्पुष्पांवरच भागवू पूजा !

हेरंब : सुचू तरी दे मला. छेः विसरलो. कलश शंख घंटा धूप दीप स्थावरदीप—

वै. : सारं काही नलिनीच्या ताब्यात जाणार. मुळीच गय करणार नाही मी आता.

हेरंब : तू ट्रस्टी झाला आहेस ते कळलं आहे मला.

वै. : पैशाच्या कलशावर नजर ठेवून वकिलांनी शंख केला असेल. आता तुम्ही घंटा वाजवा आणि कुणीही धूप घालीत नसला तरी मी दिवे लावतो साऱ्या गावभर. दादा, माझं ऐका या कोर्टाच्या भानगडीत पडू नका. पैशापरी पैसा जाईल, वेळ गमावेल आणि शेवटी हाती करवंटी घेऊन वकिलांच्या बँकअकौंटची मात्र चारदोन पूज्यं वाढतील. मिळेना का इस्टेट नलिनीला ? किती झालं तरी ती आपलीच आहे. पिढीजाद घरोबा. तिला मिळाली इस्टेट तर आपल्या आपसातच राहील. पण कोर्टाची पायरी चढाल तर दोन्ही बाजूंनी नुसती वकिलांची घरं भरायला कारणीभूत व्हाल.

हेरंब : हो, वकिलांचीच घरं भरायची आहेत मला ! नलिनीचं घर भरण्यापेक्षा सारी इस्टेट, वकिलांच्या घरात गेली तरी चालेल. त्यात तुझ्या बापाचं काय खर्च होतं आहे ?

वै. : माझ्या बापाचीच इस्टेट खर्च होत आहे, म्हणून मी बोलतो आहे ! नलिनीला इस्टेट मिळावी अशी बाबांची इच्छा होती. वकिलांना काही त्यांनी इस्टेट बहाल केली नव्हती !

हेरंब : पूजासुद्धा सुचू देत नाहीस मला !

वै. : आता संपवाच पूजा झालं.

रमा : आता जाल का इथून भावजी ?

वै : जायचंच आहे मला कोर्टात, म्हणून घाई करतो आहे. दादांची पूजा संपणार तेव्हा कुठं मला जेवण मिळणार.

हेरंब : आता केलीस माझी पूजा तेवढी पुरे नाही का झाली ?

वै. : ही आपली पूजा देवपूजेसारखीच त्रिकाल सुरू रहायची ! आता शेवटी प्रार्थनाच राहिली ना दादा ? देवाला म्हणावं, देवा, मला कोर्टाची पायरी चढायची दुर्बुद्धि देऊ नकोस.

हेरंब : मन्त्रपुष्पं समर्पयामि – नमस्करोमि – हात जोडतो तुला आता. माझं डोकं फिरवू नकोस—

वै. : डोकं ताळ्यावर ठेवलं म्हणजे फिरायची भीति नाही, किंवा मुळी डोकंच नसलं तर—

हेरंब : आता तोंड बंद करशील की मारू एक—

वै. : खडावा म्हणा. इथं खडावा आहेत, खेटरं नाहीत.

हेरंब : शंखमध्ये स्थितं तोयं भ्रामितं केशवोपरी—

वै. : देव देखील शंख व्हायचा त्यामुळे—

हेरंब : (रागाने ओरडून) अंगलग्नां मनुष्याणां ब्रह्महत्या व्यपोहतु- (वैकुंठाच्या डोक्यात शंख मारतो) वे शंखा हे बक्षिस.

वै. : काय केलंत हे दादा?

हेरंब : शंखावर शंख मारला.

वै. : सहाण नव्हती का जवळ? ते खोड होतं, पळीपंचपात्री होती, निदान देव्हाऱ्यातले देव तरी होते. देवानं मारलं असतंत तर देवांनी मारलं असं तरी सांगता आलं असतं. पण आता कोर्टात गेलो आणि ही खोक कसली म्हणून कुणी विचारलं, तर शंखानं मारलं असं कसं सांगू? मला तुम्ही मारलंत दादा, आणि शंखानं मारलं असं आता कसं सांगू?

रमा. : झाली पूजा तेवढी पुरे नाही का झाली भावजी?

वै. : अपराध सहस्राणि क्रियन्ते ऽ हर्निशं मया। दासोहं इति मां मत्वा क्षमस्व परमेश्वरा- झालं पूजेचं भरतवाक्य. उठा आता, जेवायला चला. वहिनी, पाणी द्या थोडं इकडे, हे रक्त पुसून काढू दे.

हेरंब : नको देऊ पाणी. गादवा पुरे झाला तुझ्या सहवास! आता जेवळ्या लवकर इथून तोंड काळं करशील तेवढाच आनंद होईल मला.

वै. : तांबडं झालंच आहे तोंड- हे रक्त न धूता असंच वाळू दिलं, की आपोआपच काळं होईल.

हेरंब : तर मग करच काळं इथून. यापुढं या घरात पाऊलसुद्धा टाकू नकोस.

वै. : जेवल्याशिवाय?

हेरंब : हो हो- जेवल्याशिवाय.

रमा. : असं कसं बरं? जायचंच तर जेवल्यानंतर जावं त्यांनी.

हेरंब : ते काही नाही. जेवल्याशिवाय इथून असाच चालता हो.

वै. : देवाला साक्ष ठेवून मला घरातून उपाशी बाहेर घालवता आहात बरं दादा! निदान देवाला तरी हे रुचायचं नाही. जाऊ असाच?

रमा : नाही. मी जेवल्याशिवाय जाऊ द्यायची नाही.

हेरंब : माझ्या पंक्तीला नको असला सैतान!

वै. : तुमच्या पंक्तीला बसायची माझी कुठं आहे तयारी? चला वहिनी, दोन गरम पोळ्या हातावर टाकल्या तरी मी तसाच खात जाईन पण प्राण गेला तरी या घरातून उपाशी बाहेर जायचा नाही. (पडदा)



॥ ४ ॥

सोन्याचा कळस

['धावता धोटा' या कादंबरीत जे कथानक आहे आणि मालक मजुरांचा जो संघर्ष आहे, त्यावरच आधारलेले 'सोन्याचा कळस' (१९३२) हे नाटक. कादंबरीचा पूर्वार्ध 'तुतारी' या साप्ताहिकात क्रमशः प्रसिद्ध झाला. (१९३०) साप्ताहिक बंद पडल्यामुळे पुढील भाग लवकर प्रसिद्ध होण्याची शक्यता नव्हती. म्हणून मामांनी हे नाटक लिहिले. सामाजिक समस्यांच्या बाबतीत मामांचे एक वैशिष्ट्य असे दिसते की एखाद्या समस्येचे नुसते बिकट स्वरूप मांडण्याऐवजी त्या समस्येवर तोडगा शोधण्याचा प्रयत्न मामा करतात. मालकांनीच मजुरांची दुरवस्था समजून घेतली तर मालक मजूर संघर्ष मिटण्याची शक्यता व संभवनीयता प्रस्तुत नाटकात दर्शविली आहे. मालक आणि मजूर या दोघांचीही जोड झाली पाहिजे. हेच विशद करणारा हा प्रवेश.]

(विठ्ठलदास धोंडूला सावरून घेऊन येत आहे.)

विठ्ठल : ये इथं बैस. इथं आता कुणी नाही. या बाजूला त्रास द्यायला आता कुणीही येणार नाही.

धोंडू : ऑरोरा मिल बंद झाली तर? संपवाले पुढच्या गिरणीकडे गेले?

विठ्ठल : सारे गेले– अगदी दृष्टीच्या टापूबाहेर गेले. पोलीसांनी नुसते वायबार काढले म्हणून ठीक झाले. नाहीतर आज शेकडो माणसांचे मुडदे पडले असते. पहिला आवाज ऐकला तेव्हा माझं काळीज फाटून गेलं. आज अनर्थ होणार, माझ्यामुळं आज माणसं मरणार याची कल्पना येताच माझ्या मनाची काय स्थिति झाली असेल याची कुणाला कल्पनासुद्धा येणार नाही.

धोंडू : त्याची कल्पना मला आली. तुझ्यामुळं का म्हणतोस? आजच्या संपाला कारण मी–

विठ्ठल नाही. तू सहन केलंस– हात उचलला नाहीस.– मी घसरलो–

तत्त्वाला चुकलो– माथं गरम झाल्यामुळे अत्त्याचारी बनलो, म्हणूनच आजचा संप झाला. माझे डोळे उघडले– पण ते बंदुकीच्या पहिल्या आवाजानंतर. तोपर्यंत मला एक प्रकारचा खून चढला होता– मी बेफाम झालो होतो. नको–नको ती कल्पना ! पश्चात्तापाचा विचारसुद्धां काळीज फोडून टाकतो !

धोंडू : (जमिनीवर अंग टाकून) नाही– सहन करवत नाही. विठू ! मला इस्पितळात पोहोंचव. मला मूर्च्छा येऊ लागली. (बाबा व मजूर येतात) बाबा– बाबा– मी मरणार नाही ना ?

बाबा : कुणी सांगावं ? मरशीलही कदाचित् ! मी काही डॉक्टर नाही– तुझं टाळकं फुटलं आहे— रक्त फार गेलं आहे. कुणी सांगावं ? कदाचित् धनुर्वात-सुद्धा व्हायचा ?

धोंडू : काय हे बोलता बाबा ?

बाबा : तर काय खोटं बोलू ? ठीक ! तसं बोलतो. तू चांगला धडधाकट आहेस तुला काहीसुद्धा झालं नाही. ऊठ आणि जा पाहू घरी.

विठ्ठल : (मजुराला) हे पहा, धोंडूला जरा सांभाळून घेऊन रस्त्यापर्यंत जा. एक व्हिक्टोरिया करा आणि याला इस्पितळात पोचता करा. कराल एवढं काम ?

मजूर : हो– हो– मोठ्या आनंदानं ! (धोंडूला हाती धरून घेऊन जातो)

विठ्ठल : बाबा ! (स्तब्ध राहतो) बाबा, मी आज घोर अपराध केला.

बाबा : होऊन गेलं, आता त्याचं काय ?

विठ्ठल : तुम्हाला माझा राग आला ?

बाबा : राग ? हं ! हा वेड्या ! कृति घडण्यापूर्वी रागाचा उपयोग असतो. व्हायचं ते होऊन गेलं– चूक झाली हे तुला पटलं– आता नुसता माझा बडिलकीचा शहाणपणा मिरविण्यासाठी हव्या तर चार शिव्या हांसडतो, मग होईल ना तुझं समाधान ?

विठ्ठल : पण आता पुढं काय ?

बाबा : पुढं काय ते भवितव्यतेला माहीत. संप व्हायला नको होता. आता झाला. आता माघार घेणं म्हणजे नामुष्कीची गोष्ट आहे. गेल्या गोष्टीचा पश्चात्ताप करायचं सोडून पुढं काय करायचं यावर नजर ठेवूं म्हणजे झालं.

विठ्ठल : पण बाबा, तुम्हाला वाटतो त्यापेक्षा हा प्रसंग बिकट आहे. मी कोण आहे याची तुम्हाला कल्पना नाही.

बाबा : तू आहेस तसा नाहीस, याची कल्पना मला पहिल्याच दीवशी आली होती. वेड्या मुला, तू फितूर बदमाष तर नाहीस ?

विठ्ठल : नाही. फितूर नाही, पण मी फितूर ठरण्याचा मात्र संभव आहे.

बाबा : वेड्याच्या बालंटामुळे की स्वतःच्या मूर्खपणामुळे ?

विठ्ठल : स्वतःच्या अविचारामुळे– स्वतःच्या भावनात्मकतेमुळं म्हणा हवं तर !

बाबा : काय म्हटलंस ? असले अवजड शब्द माझ्यापुढं वापरू नकोस बाबा !

विठ्ठल : मी जो आहे तो तोच असल्यामुळे !

बाबा : वेड्या पोरा, तू आहेस तरी कोण ?

विठ्ठल : या सोन्याच्या कळसाचा– या करसन मिलचा मालक !

बाबा : मालक ? मालक अं ! तू करसनदासचा मुलगा तर नव्हेस ? गुजराती ! मराठा नव्हेस ? काय गाढव तरी मी ! इतक्या दिवसात एवढा भेदसुद्धा मला ओळखला नाही ? शाबास गुजराती बच्चा, शाबास ! (त्याची पाठ थोपटतो) आहेस– माणूस आहेस ! काळीज नावाचा एक बारीकसा तुकडा न विसरता घेऊन आला आहेस. जीते रहो ! गुजरात्यांच्या नावाला बट्टा लावलास ! लहानपणी मराठणीचं दूध प्यायला होतास कारे ?

विठ्ठल : होय– आणि त्याचा मला मोठा अभिमानही आहे. तिच्याच सहवासानं मी मराठ्यांची बोली बेमालूम शिकलो.

बाबा : सारेच गुजराती जर मराठी दाया ठेवतील !–पण कां रे, ही अवदसा तुला कां आठवली ? गादी तक्क्याचं गुबगुबित जिणं सोडून डुकरासारखा या उकिरड्यावर लोळायला का आलास ?

विठ्ठल : सत्याच्या शोधासाठी—

बाबा : फार पिकलं आहे हे सत्याचं वेड हल्ली. सगळेच सत्याचं नाव घेतात; पण तू त्यांच्यापेक्षा बराच प्रामाणिक दिसतोस ! काय चमत्कार झाला हा ? माझा बच्चा वाटणारा मुलगा एका क्षणांत मला पारखा झाला;

विठ्ठल : असं का म्हणता ? या पूर्वी पारखा होतो– या क्षणापासून तो परकेपणा राहिला नाही. उजळ माथ्यानं आज मी तुमच्यासमोर उभा राहिलो आहे. धुतलेल्या जिव्हेनं मी माझी लबाडी कबूल केली आहे. मी लबाडी केली खरी पण ती सत्याच्या शोधासाठी. नाडलेल्या मजुरांच्या कल्याणासाठी. आणि त्याबरोबरच श्रीमंतीन सडलेल्या या जिवाच्या उद्धारासाठी !

बाबा : मोठं गोड बोलतो आहेस की रे ! पण हा गोडवा खरा आहे ना ! की हीही लबाडीच ?

विठ्ठल : तुम्ही वसनजीला पाहिलंत ?

बाबा : मी पाहिलं, ते नादुरुस्त झालेलं कळीचं बाहुलं आताच पाहिलं !

विठ्ठल : तरीही माझा संशय येतो ?

बाबा : बाबारे, दारिद्र्य मोठं संशयी आहे. श्रीमंतांवर त्याचा काडीभरही विश्वास नसतो ते दारिद्र्य मला म्हणतं, म्हाताऱ्या– सावध ! सावध ! (विठ्ठल हुंदका देतो) नाही ! सावधपणालाही मर्यादा आहे. यापुढे मी तुझ्यावर कसा अविश्वास

दाखवीन ? इतका का मी निगर्गट्ट आहे ? नाही– माझ्या लाडक्या मुला, हा बाबा शिगवण अशिक्षित आहे, अविचारी आहे, अडाणी आहे. पण त्याला काळीज आहे हे विसरू नकोस. डोळे पूस. माझ्याकडे पहा आणि पुढं काय बोलायचं ते हसतमुखानं बोल.

विठ्ठल : तुम्हीही पुसाल का आपले डोळे ?

बाबा : दिसली का तुला माझी टिपं ! किती मूर्ख मी ! लबाडीसुद्धा बेमालूम करता येत नाही मला !

विठ्ठल : आता माझं संकट ?— हेच मजूर उद्या म्हणतील की गिरणीत संप घडवून आणण्यासाठी हा लांडगा मालक, मेंढ्याचं कातडं पांघरून आमच्या कळपात शिरला. आज त्यांनी मला खांद्यावर घेतलं पण– मी कोण आहे कळताच– उद्या मला ते पायाखाली तुडवतील !

बाबा : खरं आहे, खरं आहे– (अगदी हुरळून) पण त्याला उपाय आहे. मोठा सुंदर उपाय आहे– पृथ्वीच्या मोलाचा उपाय आहे ! तो उपाय करशील तर मातीचं सोनं होईल, गगनाला गवसणी पडेल श्रीमंतांच्या वेचाळीस कुळांचा उद्धार होईल.

विठ्ठल : सांगा– सांगा तो उपाय. हे डोकं उतरून ठेवावं लागलं तरी त्याला माझी तयारी आहे.

बाबा : डोकं उतरून ठेवायला नको काही; आहे तिथंच डोकं घट्ट मजबूत केलंस की बस्स झालं. उपाय मोठा छान आहे ! अगदी सोपा आहे— आणि म्हणूनच मोठा कठीण आहे. (स्तब्ध राहतो)

विठ्ठल : बोला,– थांबलात का ? अजूनही तुम्हाला माझी शंका वाटते का ?

बाबा : शंका वाटत नाही रे बाबा-- मला आनंद झाला आहे ! हृदयाच्या सांदीकोपऱ्यात ठेवलेलं एक गुपित आज बाहेर येणार! स्वप्नासारखी ओझरती असलेली माझी एक वेडी कल्पना आज मला प्रत्यक्षात आलेली दिसणार ! शेट विठ्ठलदास करसनदास ऐकलंत ? शेटजी, खरोखरच विठू कृष्णा व्हा ! काय समजलास विठ्या पोरा, खरा मजूर हो ! मजुरांचा पुढारी म्हणून बेधडक तुरुंगात जा. सारे आरोप धुऊन जातील, तोंडावरची काजळी जाईल, माथं उजळ होईल, गिरणगावचे मजूर उद्या तुझं देऊळ बांधतील !

विठ्ठल : जशी आज्ञा. (नमस्कार करतो.)

बाबा : पाया पडलास ! मला आवडत नाही ते हेच ! हे असं काही केलंस की माझ्या डोळ्यांना पाणी येतं ना ! –ऊठ, माझी फजिती करू नकोस. जा, तुरुंगात जा, बाबा शिगवणाच्या अन्नाचं सोनं करून दाखीव. (बिजली येते) आलीस ? हा पहा, हा कोण आहे तुला माहीत आहे ?

बिजली : आंधळया म्हाताऱ्या, ते केव्हाच कळलं आहे मला !

विठ्ठल : पूर्वीच तिनं मला अगदी मुद्यानिशी पकडलं आहे !

बाबा : होय ? अशीही फजिती झाली माझी ? छेः छेः आता इथं राहता कामा नये. त्या पोरांनी तिकडे अनर्थ केला असेल. हे बघ बिजले, याला सोडू नकोस. पोलिस येऊन पकडतील तेव्हा मी नसलो तर खूप मोठ्यानं याच्या नावाचा जय-जयकार कर. समजलीस ? वा ऽ रे बाबा शिगवण ! वा ऽ रे म्हातारा बाबा ! वाः वाः !!! (बोलत बोलत जातो.)

विठ्ठल : बिजले ?

बिजली : जी—

विठ्ठल : (जरा रागाने) बिजले !

बिजली : काय हुकूम आहे शेटसाहेब ?

विठ्ठल : जरा माणसात येऊन बोल.

बिजली : श्रीमंतांनाच तेवढी माणुसकी नसते. आम्ही भिकारी माणसं माणुसकीच्याच अन्नावर जगलो आहोत !

विठ्ठल : बिजू, मी आता श्रीमंत नाही. बाबाच्या आज्ञेनं विठ्ठलदासचा आता बिठ्ठा झाला आहे.

बिजली : अस्सं ? म्हातारा मोठा जादुगार दिसतो !

विठ्ठल : आता पुढं ?

बिजली : पुढं काय ? जा तुरुंगात !

विठ्ठल : ते तर ठरलंच आहे. पण तुरुंगातून परत आल्याबर ?

बिजली : जा महालक्ष्मीच्या बंगल्यात !

विठ्ठल : ते आता शक्य नाही. मी एक मजूर आहे आणि यापुढं जन्मभर मी मजूरच राहीन. महालक्ष्मी आता मला बर्ज्य झाली आहे. महालक्ष्मीचे सारे संबंध– सारे लागेबांधे आज तुटून गेले आहेत. (दोघेही स्तब्ध)

बिजली : (गंभीरपणे) आणि हंसा ?

विठ्ठल : हंसा विठ्ठलदास करसनदास गिरणीवाल्याची भावी पत्नी होती. विठू कृष्णाला ती काय होय ?

बिजली : तर मग तिनं काय करावं ?

विठ्ठल : तू तिचा विचार करतेस ! माझी काय वाट ? माझ्या भावी आयुष्याचं काय होणार याचा विचार तुझ्या मनात मुळीच का येत नाही ? बिजले, त्या दिवशी प्रत्यक्ष हंसासमोर तू कबूल केलंस–

बिजली : असं देऊळ फिरविणार वाटतं ? अहो नामदेव महाराज, हे पंढरपुरचं देऊळ नव्हे ! भक्त मागं गेला म्हणून या राउळाचं तोंड उलट्या दिशेला केव्हाही नाही वळणार.

विठ्ठल : खोटं कशाला बोलतेस ? बिजले, तुझं माझ्यावर प्रेम नाही ?

बिजली : बाबा शिगवण तर मला जिवाहून प्यारा आहे !

विठ्ठल : तसाच मी ? (दोघे स्तब्ध) आता का प्रसाद देत नाहीस ! देवता रुसली वाटतं भक्तावर !

बिजली : मोटाभाई, ऐका–

विठ्ठल : मोटाभाई !!

बिजली : होय– मोटाभाई–ऐका. बिजली स्त्री नाही. सांसारिक प्रेमाचा अंकुर बिजलीच्या हृदयातच नाही तर तुमच्यासाठी म्हणून तो वाढणार कुठून ?

विठ्ठल : तर मग या गिरणगावात मी कुणाच्या आधारावर संसार थाटू ? थांब तो विषय संपला. माझी जात बदलली-- माझं गोत बदललं. नवं नातं जोडून मला नवी जात आंथरायची आहे. बिजू, तुझ्या प्रेमाच्या मोलानं माझं परिवर्तन करशील का ?

बिजली : (सुस्कारा टाकून) प्रेमाचं मोल ! फोल प्रेमाचं मोल, मोटाभाई. कवडीमोल असतं.

विठ्ठल : ती कवडीच मला पाहिजे आहे. श्रीमंतीवर मी लाथ मारली. ती त्या कवडीच्या लालचेमुळे.

बिजली : क्षमा करा, मोटाभाई, मला क्षमा करा. दुसऱ्याच्या दांभिकपणाला मी नावे ठेवीत आले, पण माझा दांभिकपणा आज एवढा अनर्थ करील, याची मला जाणीव झाली नाही. तुम्हाला उघडकीस आणण्यासाठी मी ढोंग केलं.

विठ्ठल : शपथेवर सांग. ते ढोंग होतं का ? (दोघे स्तब्ध) हे पहा, पुनः ढोंग करते आहेस.

बिजली : (सुस्कारा टाकून) खरं आहे. क्षणभर माझं मन माझ्या ताब्याबाहेर गेलं होतं खरं– पण पुनः ते थाऱ्यावर आलं, मोटाभाई, प्रेमाच्या गोष्टी बिजलीला आता वर्ज्य आहेत. गिरणगावच्या मजुरांसाठी मी आयुष्य वाहिलं आहे आणि त्यांच्याच सेवेत एक दिवस हा देह पडावा एवढीच माझी महत्त्वाकांक्षा आहे. तेवढ्याच आशेच्या जोरावर मी उभी आहे. आणि त्याखेरीज दुसरी भावना हृदयात उत्पन्न होऊ देणं म्हणजे माझ्या लेखी व्यभिचार आहे.

विठ्ठल : नाही बिजे, तुझा हात मिळेल– तुझं प्रेम मिळेल– तर या गिरणगावच्या उकिरड्यावर मी सोन्याचा कळस उभारीन.

बिजली : हंसाबेनचं प्रेमही तेवढंच पराक्रमी आहे. विठोबा - विठ्ठलदास, हंसाच्या हृदयात बिजलिला पहा ! मी तिथंच आहे - दुरावलेली नाही. हंसाच्या मुखावर बिजली पहा–तुमचा संसार सुखाचा होईल–दोघांचंही कोटकल्याण होईल ! मोटाभाई, मला विसरून जा. माझं मन सांगतं की, गिरणगावात हा तुमचा

शेवटचा दिवस आहे. आपली तुटलीक झाली तर ही माझी काकळूत विसरू नका. हंसावेनला सुखी करा – या विजलीला त्यांतच समाधान आहे.

विठ्ठल : नाही – नाही – विजू – नाही, विरहाची कल्पना असल्या फुक्या जोडणीनं नाश पावणार नाही —

विजली : हीच आहे मर्दपणा दाखवायची वेळ. मी सुखासमाधानानं मन मारलं असं का तुम्हाला वाटतं ? नाही ना ? मी बायकोनं मर्दपणा दाखवला ! तुम्ही पुरुषासारखे पुरुष —

विठ्ठल : प्रेमाच्या प्रपंचात पुरुष पांगळा असतो बिचे !

विजली : देवाचं नाव घेईल तर पांगळा देखील पर्वतपार होईल. आधी देवाचं नाव घ्या नि मग प्रेमाचा ठाव पाहा. मोठाभाई, हा विषय इथं संपला ! माझ्यावर तुमचं प्रेम आहे ना ? ठीक वेळ येईल तेव्हा त्याची कसोटी पाहीन. या अनर्थाच्या क्षणातला तिळाएवढा हा एकांत संपला. ते पहा पोलीस आले ! (मजुरांचा घोळका येतो) ते पहा पोलीस आले. पाहता काय ? विठोबाला घेरुन धरा. प्राण कंठाशी येईपर्यंत त्याला स्वाधीन होऊ देऊ नका. पण ध्यानात धरा–हात उचलायचा नाही– दंगा करायचा नाही–

(माधवजी, वसनजी, करसनदास, हरबा, शिवबा व पोलीस येतात.)

हरबा : शेटसाहेब, तो हरामखोर विठू कृष्णा आता इथं होता. या घोळक्यात दडून बसला आहे. मी प्रत्यक्ष पाहिला आहे.

विजली : काय पाहिलं आहेस रे माकडा ! भाईबंदावर उठायला लाज नाही वाटत ? हरामखोर कोण ? तो की तू ? तू विठू कृष्णाला पकडून देणार ?

१ मजूर : आम्हां सर्वांचे मुडदे पडतील तेव्हांच विठू कृष्णाचं नख तुमच्या दृष्टीला पडेल.

माधवजी : बाई, दूर व्हा ! इथं तुमचं काम नाही.

विजली : माझं काम नाही ? तर कुणाचं काम आहे ? या संपाच्या पुढाऱ्याचं काम नाही ?

हंसा : (प्रवेश करून) हीच–हीच–संपाची पुढारी ! मी पाहिलं आहे– हिनंच संप पुकारला ! पकडा हिला– (रडव्या स्वरानं) अहो पोलीससाहेब, हिलाच पकडा हो !

करसन : हंसा, इकडे ये. इथं तुझं काम नाही.

माधवजी : हंसावेन, दूर हो. अरे ए मूर्खांनो ! कुठं आहे तो तुमचा मर्द विठू कृष्णा ? संप पुकारायला हवा आणि आता तोंड का लपवतो ?

विजली : संप मी पुकारला. मला पकडा. बोला रे– (मजूर–' बिजली तावडेकी जय ' असे ओरडतात.)

बाबा : (प्रवेश करून) अग ए पोरटे, माझं भाग्य चोरायला पाहातेस ? बोला रे– (ते बाबाचा जयजयकार करतात.)

माधवजी बस्सू ! सारे दूर व्हा. आम्हाला विठू कृष्णाच पाहिजे आहे.

हंसा तुम्हाला विठू कृष्णा पाहिजे आहे होय ? पकडाल त्याला ? बेड्या ठोकाल ? ठीक बिजूबेन, दूर हो. व्हारे बाजूला. (आत शिरून विठ्ठलदासाला घेऊन येते) ठोका याला बेड्या ! हा पहा विठू कृष्णा !

वसनजी काय ? हाच विठू कृष्णा ? मोटाभाई विठू कृष्णा ? काय पडदा आला माझ्या डोळ्यावर ?

करसनजी
माधवजी – } कोण ? मोटाभाई ?

हंसा होय. हा तुमचा मुलगा ! कामगार हो– हा तुमचा पुढारी, पण खरा विठ्ठलदास करसनदास– याच गिरणीचा मालक !

बिजली आणि या हंसाबेनचाही मालक. कायहो विठ्ठलदास शेट, असंच ना ?

विठ्ठल नाही. या सोळा आणे संसारातल्या या हंसादेवीचा आठ आण्यांचा भागीदार. बंधूनो, मला क्षमा करा. गिरणीच्या या मालकांचा मी मुलगा आहे.

करसन नाही. आजपासून या गिरणीचा मालक मी नाही. मालकी माझ्या मुलाची आहे !

विठ्ठल ऐकलंत ? आता या गिरणीचा मालक मी आहे. बंधूनो, आजपासून ही गिरणी तुमची आहे. माझ्या गिरणीतला प्रत्येक मजूर माझा भागीदार आहे. (सर्व 'विठ्ठलदास करनदास की जय' असं ओरडतात) झालं. संप संपला. पोलीस साहेब, उगीच तुमची कांडतुसं फुकट गेली. कुणाला पकडायचं असेल तर या वसनजीला पकडा—

शिवबा : तो हा विठ्ठल ऽ ऽ ऽ बरवा–

विठ्ठल : तुला नाही कुणी पकडीत बरं शिवबा–

बिजली : आणि 'तो हा माधव ?' कसं काय माधवजी शेट ?

माधवजी : हंसाबरोबरच ऑरोरा मिलही मोटाभाईची झाली आहे.

बिजली : तो हा माधव बरवा ! तो हा–विठ्ठल बरवा !

बाबा : संप मोडला–देवानं खैर केली. सर्व काही आमच्यासारखं झालं. गिरणगावात सोन्याचा कळस चढला. शेटसाहेब, एक गोष्ट ध्यानात ठेवा ! तुमच्याशिवाय आम्ही भीक मागून पोट भरू. पण आमच्याशिवाय तुमचं केव्हाही चालणार नाही. शेटसाहेब, या व्यवहारात तुम्हीही पाहिजेत आणि आम्हीही पाहिजे–पण दोघांचीही जोड झाली पाहिजे.

॥ ५ ॥

उडती पाखरे

[आधुनिक इब्सेनियन तंत्राने लिहिलेले मामांचे हे नाटक अनेक अर्थांनी गाजले. यांतील एका वाक्यावर आक्षेप घेण्यात येऊन त्यांचेवर अब्रूनुकसानीचा खटला भरण्यात आला. परंतु वरिष्ठ न्यायालयात मामा 'निर्दोषी' म्हणून सुटले. उत्कृष्ट संवाद व व्यक्तिरेखन हे या नाटकाचे एक वैशिष्ट्य मानता येईल.]

(केसरीनाथ बाजूला उभा राहतो नी कृष्णराव आत येतो. त्याच्या अंगावरील कपडे त्याची दैन्यावस्था दाखवताहेत. तीन दिवसांची दाढी वाढलेली, डोळे खोल गेलेले, तरीही मूळच्या रुबाबात कमीपणा नाही.)

बाबासाहेब : आलास कृष्णा ! ये बैस.

कृष्णराव : मी तुमच्या घरी आलोय ना हा ?

बाबासाहेब : हो. आता या घरात मीच आहे कर्ता माणूस.

कृष्णराव : त्यांच्या घरी यायचं नाही आहे मला !–ही इथं आहे ?

बाबासाहेब : हो इथंच आहे ही. कुठं जाणार दुसरीकडे ? तो आला होता एकदा हिला बोलवायला म्हणे ! आतांच सांगत होती ती मला– पण ही कांही गेली नाही, तेव्हा आता या दोन्ही माझ्याच घरी असतात म्हणायच्या–किंवा या दोघींच्या घरी मी असतो– पण यांच्या घरी यायला नाही ना तुझी हरकत ?

कृष्णराव : मी आता हे तुमचंच घर समजतो.

बाबासाहेब : केव्हा आलास मुंबईला ?

कृष्णराव : कसलं येणं नि कसलं जाणं ? आहे म्हणूनच आहे म्हणायचा. कुठंच काही जमत नाही माझं. पहिल्यापासून नोकरी करायची संवय नाही. मालकी गाजवीत आलो पहिल्यापासून, तेच पदोपदी नडतंय मला. नोकरी होत नाही. काका,

नोरी होत नाही. काय करू?–माफ करा वहिनी–मला काकांजवळ बोलायचं आहे. (केसरीनाथ मुकाट्याने निघून जातो)

कमला : अगदी गेलंच पाहिजे का मी ?

कृष्णराव : अगदी गेलंच पाहिजे का! कसली आता लाज धरायची! –नका जाऊ. बसा—

कमला : चहा आणू का ?

कृष्णराव : (एक क्षणभर तिच्याकडे टक लावून पाहून) हो आणा– (कमला जाते) बायकांची जात– मुद्रेवरून ताडलं तिनं माझ्या. कोणत्या तोंडानं सांगू तुम्हाला काका ? उपाशी आहे मी !

बाबासाहेब : कां हे दैन्य ओढून घेतलंस ? तुझ्या हक्काचे पैसे तुला पाठवले तर ते का परत करतोस ? तुला नोकरी करण्याची काहीसुद्धा जरूरी नाही. नुसतं बसून खाल्लंस तरी देखील पुरेल जन्मभर, एवढा तुझा वाटा आहे. का ही अवदसा आठवली तुला ?

कृष्णराव : मी लाथ मारून गेलोय इथनं– या वैभवावर लाथ मारून गेलोय स्वर्ग दिसत होता हाती आलेला, म्हणून गेली. पण तो स्वर्ग नव्हता काका. काही दिवस असं वाटलं, की खरोखरच स्वर्गात वावरतोय मी–दारिद्र्य होतं तरी देखील आनंदात दिवस जात होते.– थोडीशी नोकरी होती. कसंबसं दोघांच्या पोटापुरतं मिळत होतं, पण आमच्या सुपरिंटेंडेन्टना पत्र आलं– निनावी पत्र आलं– त्यांनी मला छेडलं, मी चिडलो अन् टाकून बोललो, शेवटी नोकरी गेली. चेक पाठव तोय म्हणे ! पण हे चेक येत होते तिथूनच हे पत्र आलं याची एवढीसुद्धा शंका नाही मला !

बाबासाहेब : अगदीच अशक्य नाही. तू चेक घेत नाहीस– घ्यावा म्हणून त्यानं तसं केलं असेल ते.

कृष्णराव : पण माझी अब्रू गेली. बोभाटा झाला साऱ्या पुण्यात.

बाबासाहेब : चोरटा व्यवहार आधी का ठेवलास ? त्यानं पहा उघड उघड लग्न केलं. (हसून) सव्वा हात तुरा लावून मिरवतोय मुंबईत. तसं का केलं नाहीस ?

कृष्णराव : ती तेच म्हणत होती—

बाबासाहेब : मग केलं का नाहीस तसं ?

कृष्णराव : का केलं नाही ? प्रशस्त वाटलं नाही मला. आधी तिनं किती हट्ट घेतला. तिला उघड उघड दिसत होतं, आज ना उद्या असा प्रसंग येईल असं तिनं सांगितलं, तरी मी ऐकलं नाही—

बाबासाहेब : ती शहाणी आहे. जगाचे व्यवहार पुरुषांपेक्षा बायकांना जास्त चांगले कळतात.

कृष्णराव : खरं आहे. मला तो तिचा गळेपडूपणा वाटत होता. लग्न करण्यातच काय विशेष आहे ? सिव्हिल मॅरेज तर होत नव्हतंच, नुसत्या भटाच्या बडबडी बरोबर होमाच्या धुरानं डोळे धुरकटले म्हणजे काय फरक होतो माणसाच्या जीवनात ?

बाबासाहेब : कायदा आहे तो. माणसाचं जीवन कायद्यावर आधारलेलं आहे हे सामान्य माणसाला कळत नाही. तू कायदेपंडीत आहेस, तुला हे कळायला पाहिजे होतं. तुझी गोष्ट वेगळी होती. तू घरात रहात नव्हतास– पुरुषाला गृहस्थ म्हणतात पण कधीच नसतो तो घरात – तिला घरी रहावं लागत होतं. शेजारी-पाजारी आहेत, ओळखी देखीचे आहेत; त्याच्याकडे ती गृहिणी म्हणून मिरवली असेल अन् हा बोभाटा झाला, तेव्हा–

कृष्णराव : हो, हो, तसंच झालं. तेव्हाच ती निघून गेली.

बाबासाहेब : निघून गेली ! तुला टाकून निघून गेली ? आता तुम्ही दोघं एका जागी नाही ?

कृष्णराव : नाही. त्यामुळंच मी खचलो. अगदी शेवटच्या घटकेपर्यंत मी तिचं ऐकलं नाही. दोन वेळा घरं बदलली पण ससेमिरा सारखा मागं लागला होता—

बाबासाहेब : मग त्यावेळी तरी कां नाही लग्न केलंस ? तुझ्यासाठी नव्हे, तिच्यासाठी !

कृष्णराव : मी हट्टाला पेटलो होतो. तसंच रहायचं असं मी ठरवलं होतं. कां राहू नये तसं ?— तिला ते पटेना अन् मला तिचं म्हणणं पटेना—

बाबासाहेब : कसं पटेल तिला ? जगाकडून छळ होतो तो स्त्रीचा - पुरुषाचा नव्हे. घरंदाज मुलगी, तिनं रखेली म्हणून रहावं का तुझ्याबरोबर ?

कृष्णराव : मी कुठं म्हणत होतो तसं ?

बाबासाहेब : तू म्हणत नव्हतास, तिनंही म्हटलं नसतं, पण कुणी विचारलं तर तिनं काय सांगायचं ? तुला विचारलं तर तू काय सांगितलं असतंस ? त्यापेक्षा लग्न करणं फार सोपं होतं. तिच्या मनाकडे जरा पहायचं होतंस – (ट्रेमधून चहा आणि बिस्कुटे घेऊन कमला येते आणि टीपॉयवर ठेवून कृष्णरावाच्या पुढे ठेवते.)

कृष्णराव : अन् काकांना ?

बाबासाहेब : मी अवेळी चहा घेत नाही.

कृष्णराव : (चहा घेत घेत) मला पश्चात्ताप होत नाही त्याचा. मी माझ्या तत्त्वाला जागत होतो. जी गोष्ट करायला सामान्य माणूस कचरतो, ती मला करून दाखवायची होती–

कमला : छे, छे !

कृष्णराव : काय छे, छे ! काय कळलं तुम्हाला ?

कमला : लग्न केल्याशिवाय एका जागी रहायचं होतं का तुम्हाला ?

कृष्णराव : तुम्हाला कसं कळलं ?

कमला : सामान्य माणूस कचरतो तो याच कर्माला. तत्त्व, तत्त्व म्हणून हल्लीचे तरुण ओरडतात ते यालाच. पण ते तरुण पुरुष ओरडतात, तरुण स्त्रिया नाहीत.

कृष्णराव : का ?

कमला : स्त्रीच्या जन्माला आल्याशिवाय तुम्हाला ते कळायचं नाही.

कृष्णराव : म्हणजे मी तिच्याशी लग्न केलं पाहिजे होतं असं का तुमचं म्हणणं आहे ?

कमला : हो !

कृष्णराव : हो ? प्रत्यक्ष तुम्हाला चटका लागला तरी देखील ?

कमला : हो, हो. तरी देखील. आमच्या जन्माचा नाश झाला. निदान तिच्या तरी व्हायला नको. असं पाहिलं म्हणजे वाटतं, की यांनी केलं तेच बरोबर. हिंदु स्त्री आहे मी– उच्चवर्णीय हिंदु स्त्री आहे मी – मला वाट मोकळी नाही. नाहीतर 'डिव्होर्स' घेऊन पुन्हा लग्न केलं असतं मी. पण आता एवढं तरी समाधान वाटतं, की त्या दुसरीच्या जन्माचं तरी मातेरं झालं नाही.

बाबासाहेब : ऐकलंस ? आता तरी पटलं ? अजून तरी सावध हो ! अजून लग्न कर–

कृष्णराव : कुणाशी ? आता कुठं आहे ती ? (कमला बाबासाहेबांकडे पहाते. बाबासाहेब तिला नजरेने दटावतात) तिचा शोध करीत साऱ्या मुंबईभर फिरू ? रस्त्यात विचारू का प्रत्येकाला ती कुठं आहे म्हणून ?

बाबासाहेब : तिचा बाप आहे ना इथं ?

कृष्णराव : त्याचं तोंडसुद्धा पहायचं नाही मला अन् तिला सुद्धा नको होता तो— त्याला भिऊनच ती पुण्याला पळून आली —पण आता– आता काय झालं कोण जाणे ! तो पुण्याला आला आणि तिला घेऊन गेला असं कुणीतरी सांगितलं मला– मला खात्री नाही, पण कुणी सांगावं, कुठल्याही वाईट बातमीवर माझा आता विश्वास बसू लागलाय— (चहाचा ट्रे दूर लोटून) संकटानं माणसाचं मन असं पांगळं होतं, म्हणूनच आज मी इथं आलो. कुठंतरी परागंदा व्हायचा विचार केला आहे, त्यापूर्वी एकदा तुमची भेट घ्यावी. म्हणून आलो. आणखी एक बेत होता– (शामराव आणि श्रीमती प्रवेश करतात, एकमेकांना पाहून दोघेही भाऊ चमकतात. श्रीमंतीवर मात्र कसलाच परिणाम झाल्याचे दिसत नाही. कमला अस्वस्थ होते. बाबासाहेब निर्विकार आहेत.)

कृष्णराव : तू ! तुम्ही ?

बाबासाहेब : का रे तुम्हाला आश्चर्य वाटलं ? कुठलाही वेताळ केव्हा तरी पूर्वस्थानावर यायचा असं का धरून चालत नाही तुम्ही ?

शामराव : (किंचित गहिवरून) दादा, काय ही तुमची दशा ?

कृष्णराव : कुणी केली ?

बाबासाहेब : दुसऱ्या कुणी नव्हे, ज्याची त्यानंच. (कमलेला) अन् तू का ग उगीच राहिलीस ? ती आली आहे ना ? तिचं स्वागत कर ? विसरलीस वाटतं इतक्यात ? होऊन जाऊ दे तसंच काहीतरी.

कमला : मला क्षमा करा. ती चूक झाली होती माझी.

शामराव : कसली चूक झाली होती ?

बाबासाहेब : अरे सारेच चुका करीत होते. सर्वांपेक्षा मोठ्यातली मोठी चूक करून मी बसलोय. इथं येऊन राहिलोय ना ? मी इथं नसतो म्हणजे तुम्ही कशाला आला असतां इथं !

शामराव : (कृष्णरावाला) ते चेक का परत केलेत ?

कृष्णराव : माझी मर्जी.

शामराव : का उगीच स्वतःला असा त्रास करून घेता ? नसतं काही तर गोष्ट निराळी–पण आहे ते तुमच्या हक्काचं आहे. त्यात कुणाचेच उपकार नाहीत. मग हे ओढून दैन्य कशाला घेता अंगावर ?

कृष्णराव : तीही माझी मर्जी.

शामराव : मी इकडे सुखांत नांदतो आहे अन् तुम्ही तिकडे गावोगाव दीनवाण्यासारखे भटकता आहांत, ते बरं का ?

कृष्णराव : काय बिघडलं त्यांत ? सर्वांनीच सुख भोगावं असा काही निसर्गाचा नियम नाही. जगात कितीतरी दुःखी माणसं आहेत, त्यांची दया कर ना आधी.

शामराव : हा दयेचा प्रश्न नाही. प्रश्न आहे हक्काचा. हक्काचा पैसा असताना का असे दारिद्र्यांत दिवस काढता ?

कृष्णराव : माझी मर्जी म्हणून सांगितलं ना तुला ? मला जास्त बोलायला लावू नकोस. मी इथं भांडणं करायला आलो नाही. मी इथं आलो हे तुला पाहवत नसेल, तर इथून जायला सांग मला, या क्षणाला अशाचा असा चालता होईन मी. तेव्हा जायला कचरलो नाही –

शामराव : ते माहीत आहे मला. मग आता जायलाच कशाला हवं ? रहाना इथंच !

कृष्णराव : (मोठमोठ्याने हंसतो) हो. आता तुझं काम झालं— होय ना ? – आता तुझं काम झालं. आता मी इथं राहिलो तरी तुला फिकीर नाही. लाज नाही वाटत मला इथं रहा म्हणायला ? सांग– काकांच्या समोर सांग– (श्रीमतीकडे बोट करून) ही कोण ?

शामराव : माझी पत्नी !

कृष्णराव : (कमलेकडे बोट करून) अन् ही कोण ?

शामराव : माझी पत्नी.

कृष्णराव : मग ही इथं एकटी का ? का हिचा पति हिच्याजवळ रहात नाही ?

शामराव : तो तिचा हट्ट ! विचार तिला.

कृष्णराव : (कमलेला) होंय ?

कमला : (एक क्षणभर थांबून) हो.

बाबासाहेब : अरे काय चाललंय हे ? बसा तिथं. इतक्या दिवसांनी भेटलात ते सुखातीलाच भांडू लागलात ?

कृष्णराव : स्वेच्छेने नाही भेटलो ! योगायोगानं भेट झाली. बरं झालं ही भेट झाली ती. आता सांग काकांच्या समोर, का मला या घरांतून बाहेर काढलंस ?

शामराव : मी बाहे काढलं ? रागारागानं तुम्हीच नाही का निघून गेला ?

कृष्णराव : पण मी का निघून गेलो ? काय कारण झालं मला निघून जायला ? प्रभुगे घराण्याच्या अब्रूसाठी ना मला घराबाहेर जावं लागलं ? आता कुठं आहे ती प्रभुगे घराण्याची अब्रू ? तू काय केलंस ?

शामराव : मी लग्न केलं हिच्याशी !

कृष्णराव : पण ते केव्हा ? (क्षणभर थांबून) मला कळलं नाही असं वाटतं तुला ? लग्न केल्याखेरीज गत्यंतर नाही असं झालं त्याचवेळी ना हिच्याशी लग्न केलंस ? त्यापूर्वी काय केलंस ? त्यावेळी कुठं गेली होती प्रभुगे घराण्याची अब्रू ? तुझ्या भानगडी उघडकीला आणायला तिसरा कुणी नव्हता–निसर्गानं दगा दिला आणि भानगड उघडकीला येईल असं वाटलं म्हणूनच ना लग्न केलंस हिच्याशी ?

शामराव : केव्हा का होईना, पण मी लग्न केलं—तुम्ही केलं नाही– एका गरीब पोरीच्या आयुष्याचं मातेरं केलं–

कृष्णराव : ऐका काका, ऐका ! (कमलेकडे बोट करून शामरावाला) अन् हिच्या आयुष्याचं मातेरं केलं नाहीस तू ?

शामराव : नाही. तिला पटलं नाही त्याला मी काय करू ? काय जगात कुणाच्या दोन बायका नसतात ? तुकारामाच्यासुद्धा दोन बायका होत्या !–तुमच्या-सारखा टाकून गेलो नव्हतो मी बायकोला !

कृष्णराव : कार्य निर्लज्ज आहेस ! भाऊ म्हणून बोलू नये, पण मूर्तिमंत राक्षस आहेस तू. ही असताना ही राहील तुझ्याबरोबर ? (श्रीमतीकडे बोट करून) ही कशी झाली तुझी पत्नी (कमलेला उद्देशून) हे विसरायला होईल का हिला ? मी माझ्या बायकोला टाकून गेलो– जातांना भेटलोसुद्धा नाही.–मी दया केली तिच्यावर. असा पुन्हा पुन्हा तिच्या दुःखावर डागण्या देत बसलो नाही. पण प्रभुगे घराण्याच्या अब्रूचं काय झालं ते सांग ना मला आता ?

बाबासाहेब : मी आहे तोपर्यंत प्रभुगे घराण्याच्या अब्रूची काळजी तुम्ही कुणीच करू नका.

शामराव : का बरं ? – (कृष्णरावाला उद्देशून) पहा ना यांच्याकडे. सारं पुणं काय म्हणतं ते ऐका. पुण्याची नोकरी का गेली हे यांना विचारा –

बाबासाहेब : मला सारं काही माहित आहे. शाम, तू कां आला होतास इथं ? हा आला असं कळलं म्हणून आला होतास ?

शामराव : नाही. मी विचारायला आलो होतो हिला–शेवटचं विचारायला आलो होतो. (कमलेला) तू येणार आहेस ?

कमला : कशाला ? पोतेरी धुवायला तुमच्या या रखेलीची ?

शामराव : shut up ! ती धर्मपत्नी आहे माझी.

कृष्णराव : धर्मपत्नी म्हणे !– गळचेपीची धर्मपत्नी ! नाहीतर किती दिवस ते तसंच चाललं असतं.

शामराव : गप्प बैस–

बाबासाहेब : तू गप्प बैस. कुणाच्या उखाळयापाखाळया काढायला नकोत कुणी. कितीही मिरवलास शाम, तरी तू अपराधी आहेस. या कृष्णाच्या पुढं मानच वाकवली पाहिजेस तू. त्यानं लबाडी केली नाही, ढोंग केलं नाही, फसवा फसवी केली नाही-- (कमलेकडे वळून) केव्हा जाणार आहेस याच्याबरोबर ?

कमला : मी जाणार नाही.

बाबासाहेब : ऐकलंस ? जा पाहू आता. अन् आम्हा दुःखी जीवांच्या दुबळया समाधानात बिब्बा घालायला पुन्हा इथं येऊ नकोस. जा. पहातोस काय, जा— दोघंही जा. एक शब्दसुद्धा बोलू नका. (शामराव आणि श्रीमती जातात. तीं जाताच कमला एकदम बैठकीत कोसळून रडू लागते.)

बाबासाहेब : आता रडून काय करतेस ? ती आली होती तेव्हा तिला घराबाहेर घालवायला निघालीस, आता ही आली. त्याच्याबरोबर आली, त्याची पत्नी म्हणून आली, तेव्हा तुझी दातखिळी बसली !

कृष्णराव : ती कोण आली होती ?

बाबासाहेब : शालिनी !

कृष्णराव : शालिनी इथं आली होती ?

बाबासाहेब : हो. हिनं तिची लाजशरम काढली. तिच्या अंगावर धावून गेली. तिला इथून निघून जायला सांगितलं हिनं.

कमला : मला क्षमा करा. मी मघाशीच सांगितलं ना— मला क्षमा करा. ती पुन्हा आली तर तिचीसुद्धा क्षमा मागेन—

कृष्णराव : शालिनी इथं आली होती ? कशाला आली होती ती ?

बाबासाहेब : तुझा कांही संबंध नाही त्यात. तिचं खासगी काम होतं माझ्याकडे. मला कायद्याचा सल्ला विचारायला आली होती.

कृष्णराव : कोणत्या बाबतीत ?

बाबासाहेब : तू विसरतोस, मी सॉलिसिटर आहे. अशिलांची रहस्यं मी फोडीत नसतो.

कृष्णराव : बरं, बरं. मला आता काय करायचंय तिच्याशी ? तिचा माझा आता काय संबंध राहिलाय ?

कमला : (डोळे पुसून) असं म्हणू नका भावोजी. पुन्हा एकदा तिची भेट घ्या. आता माझी चूक मला कळली. त्यावेळी मी तिला विचारलं पाहिजे होतं, ऐकून घेतलं पाहिजे होतं —

बाबासाहेब : अनुभवानं शहाणपण आलं, पण ते फार उशिरा आलं. आता ती काही इथं यायची नाही आणि तिला विचारायची संधीही तुला मिळायची नाही.

(बंडोपंत येतो)

कृष्णराव : (त्याच्या अंगावर धावून जाऊन) चालता हो पाजी माणसा.

बंडोपंत : मी बाबासाहेबांकडे आलोय. समजलं ? मी यांच्याकडे आलोय. मी तुम्हाला ओळखीत नाही.

कृष्णराव : तुझ्या पायी या घराला मुकलो, माझ्या साऱ्या आयुष्याचा सत्यानाश झाला तो तुझ्यापायी, हा असा फटिंग झालो तो तुझ्यापायी—

बंडोपंत : नाही.

कृष्णराव : नाही ?– नाही ?– तुला पैसे दिले म्हणूनच ना हे प्रकरण उपस्थित झालं ?

बंडोपंत : हो. पण ते का दिलेत तुम्ही ?

कृष्णराव : तुला संकटांतून सोडवायला ना ?

बंडोपंत : नाही.

कृष्णराव : तर ?

बंडोपंत : तो मोबदला होता.

कृष्णराव : काय म्हटलंस ?

बंडोपंत : तो मोबदला होता. माझी मुलगी —

कृष्णराव : खबरदार तिचं नाव घेशील तर !

बाबासाहेब : अजून त्या पैशांची हॅन्ड-नोट आहे माझ्याजवळ बंडोपंत.

बंडोपंत : (खिशांतून नोटांचे पुडके काढून बाबासाहेबांच्या अंगावर फेकीत) घ्या मोजून. बीस नोटा आहेत. हजारांच्या. व्याज किती झालं ते लिहून कळवा म्हणजे ते पाठवून देईन. पोचली रक्कम ?

बाबासाहेब : हो, पोचली !

कृष्णराव : कुठून आणलीस ही रक्कम ? की हा देखील मोबदला ?

बाबासाहेब : (दरडावून) कृष्णा—

बंडोपंत : (शांतपणे) हा देखील मोबदलाच. आताच शालिनीचा साखरपुडा झाला. लग्न ठरलं तिचं–ते कोल्हापुरचं स्थळ, पहिले दहा हजार नेले त्या दिवशी सांगितलं होतं ना मी, तेच स्थळ—(कृष्णराव मटकन् खाली बसतो.) तुमच्यावर विश्वास आहे माझा बाबासाहेब–ती हॅन्ड नोट तेवढी फाडून टाका. व्याजाची रक्कम मी नक्की देईन. आता नवा पार्टिबा मिळालाय मला.

बाबासाहेब : कुणाचा ?

बंडोपंत : माझ्या जांवयाचा. किती मूर्ख तो मुलगा त्याचा— हिची कीर्ति गेली होती म्हणे त्याच्या कानावर. पण आता बापानंच पत्करली तिला. आता बैस म्हणावं रडत ! समजलं कृष्णराव, शालिनी आता एका लक्षाधीशाची पत्नी झालीय.

(शालिनी प्रवेश करते)

शालिनी : नाही—

कृष्णराव : तू ? — नाही ? — का नाही ?

शालिनी : हे तुम्ही विचारता मला ? —

बंडोपंत : आताच तुझा साखरपुडा झाला—

शालिनी : मी बेछूट फसवलं तुम्हाला. चालते व्हा इथून. मला विकून पैसे मिळवायला हवेत होय ? माहित नव्हतं तोवर फसत होत्ये. पण आता कळलं— अगदी उघड उघड कळलं. तुमची मुलगी म्हणून घ्यायलासुद्धा मला लाज वाटते. (अंगावरचा एकेक दागिना काढीत त्याच्या अंगावर फेकते) हा घ्या– हा घ्या– हा घ्या– अन् नेऊन घाला त्या म्हाताऱ्याच्या मढ्यावर !

बंडोपंत : अन् पुढं काय करणार आहेस ?

शालिनी : ते माझ्या या पतिराजांना विचारा.

कृष्णराव : शालिनी !

शालिनी : ती पुरे झाली तत्त्वं ! होय म्हणा आता. (बंडोपंताला) मी पत्नी आहे यांची. आजवर मी यांची पत्नीच होते– कायद्याचा शिक्का नव्हता त्या लग्नावर म्हणून तुम्हाला ही थेरं करायला सवड झाली. आता तो शिक्का घेणार आहे मी. (बाबासाहेबांच्या पाया पडते. वळून कृष्णरावाकडे पाहून) नमस्कार करा यांना माझ्याबरोबर – नमस्कार करा म्हणते ना !

कृष्णराव : थांब. वहिनी, मी हा असा भणंग झालोय, प्रभुणे अँड प्रभुणे फर्ममधला एक पैसा सुद्धा मी घेणार नाही ही माझी प्रतिज्ञा आहे. — तिला विचारा आत जाऊन, ती येणार आहे माझ्याबरोबर ? — बोलवा तिला बाहेर.

कमला : खरंच विचारू ? कशाला विचारायला हवं ?

बाबासाहेब : जा तिला बोलाव इकडे. (कमला जाते) अन् ए सभ्य गृहस्था, तू आता इथून जा पाहू. तुझं व्याज मला पोचलं. तुझी नोट मी फाडली— जा आता. चल निघ. निघ म्हणतो ना !

(बंडोपंत त्याला नमस्कार करतो.)

बंडोपंत : (शालिनीला) चल शाले.

शालिनी : पुरे झालं, जा आता.

बंडोपंत : अजून निश्चित नाही याचं. हातचं स्थळ घालवून बसशील अन् मग पश्चात्ताप करशील.

शालिनी : आता निघता की नाही इथून ?—

बंडोपंत : कर्म तुझं ! (जातो)

कृष्णराव : शालिनी, हा अविचार होतोय तुझा–

शालिनी : यापूर्वीच केला पाहिजे होता हा अविचार. तीच चूक झाली माझी. आता सोडणार नाही तुम्हाला. सप्तपदीची पावलं टाकल्याशिवाय आता हा हात काही मी सोडणार नाही.

बाबासाहेब : अन् ती येते म्हणाली तर ? (कमल येते) आली ती ?

कमला : नाही. त्या म्हणतात, 'हे घर मला सोडायचं नाही. इथं रहात असला तर मी इथं आहे. नाहीतर मी '— सांगू त्यांचे शब्द ?

बाबासाहेब : हो, हो. सांग–पहिल्यापासूनच विधवा आहे, असंच ना म्हणाली ती ? तेच सांगत असते ती मला पुन्हा पुन्हा.

कमला : हो - तेच !

शालिनी : (कृष्णरावाला ओढून) या, करा आता नमस्कार यांना माझ्याबरोबर. (दोघेही नमस्कार करतात) चला आता.

(ती दोघे जातात.)

कमला : साऱ्या घड्या विस्कटल्या गेल्या.

बाबासाहेब : चुकतेस कमल, आता या घड्या नीट बसल्या. प्रभुणे घराण्याची अब्रू आता शाबूत राहिली !

(पडदा)

॥ ६ ॥

सारस्वत

[लोकप्रियता आणि प्रतिष्ठा यासाठी कलेचा बाजार करणारे साहित्यिक आणि अस्सल कलेची उपासना करीत असताना कोणत्याही प्रकारची स्वार्थमूलक अथवा व्यवहारिक तडजोड न करता दारिद्र्य भोगणारा आणि अनुभवणारा साहित्यिक, अशी दोन परस्पर भिन्न चित्रणे 'सारस्वत' (१९४१) या सामाजिक नाटकात आहेत. साहित्यिक हे सरस्वतीचे उपासक असतात म्हणून त्यांना सारस्वत म्हणायचं.परंतु काही साहित्यिक स्वत च्या ऐश्वर्यासाठी सरस्वतीची विटंबना करतात, तर काही सहित्यिक सरस्वतीचं ऐश्वर्य अबाधित राखण्यासाठी स्वतः दारिद्र्य पत्करतात. या नाटकात दोनच अंक आहेत. पण अंक न म्हणता मामांनी प्रकरण असे म्हटले. पुढील प्रवेश दुसऱ्या प्रकरणातील आहे.]

[बाबासाहेब दरवाजा उघडून सदरा घालीत घालीत बाहेर येतात]

बाबासाहेब : कोण ? प्रभाकर ? तू कुठं इकडं ?

प्रभाकर : वाः वाः ! म्हणजे हे काय ? अभिनंदन करायला आलोय ना मी !

बाबासाहेब : (एक खुर्ची ओढून घेऊन बसतो आणि दुसरी खुर्ची प्रभाकरला देतो) बैस ना.अभिनंदन करायला आला होतास होय ? कसलं अभिनंदन करणार आहेस?

प्रभाकर : कसलं म्हणजे ? डॉक्टरेट दिलं ना तुम्हाला !

बाबासाहेब : मग त्यात कसलं अभिनंदन ! एवढं काय झालं विशेष त्यात ! मी नालायक होतो डॉक्टरेटला !

प्रभाकर : हे काय म्हणणं ? लायक होता म्हणूनच ही पदवी दिली युनिव्हर्सिटीनं–अन् म्हणूनच आपलं अभिनंदन करायचं.

[हे भाषण चालले असता राजाभाऊ सुलभेच्या कानात काही सांगून कपडे करून निघून जातो. सुलभा लिहायच्या टेबलाला टेकून ऐकत उभी राहते.]

बाबासाहेब : असं होय ? हे नव्हतं मला माहीत. पण असं सांग मला प्रभाकर, ही बातमी ऐकून तुला मनापासून आनंद झाला ?

प्रभाकर : वा : वा : म्हणजे हे काय म्हणणं ? आनंद झाल्याशिवाय का अभिनंदन करायला आलो ?

बाबासाहेब : साहित्यपरिषदेचा अध्यक्ष व्हायला नालायक असलेल्या माणसाला युनिव्हर्सिटीनं डॉक्टरेट देणं योग्य होईल का ?

प्रभाकर : हे अगदी उगीच बोलताहात हं बाबाहेब. पक्षाभिमानाला बळी पडून केव्हा केव्हा माणूस काहीतरी लिहून जातो. पण ते तेवढ्यापुरतंच पहायचं.

बाबासाहेब : तेवढ्यापुरतंच म्हणजे रे ! तू उघड उघड तसं लिहिलंस. हजारो उदाहरणं दिलीस, माझी पुस्तकं कवडीमोलाची ठरवलीस— मग कवडी किंमतीचं लेखन करणाऱ्या माणसाला डॉक्टरेट देणाऱ्या युनिव्हर्सिटीला पायपोस मारायच्या ऐवजी अभिनंदन करायला येतोस माझं ?

प्रभाकर : (हसायचा प्रयत्न करीत) ते आता विसरून चला. झालं गेलं हो ऊन गेलं. वादाच्या भरात गेलो लिहून काहीतरी. ईर्ष्या असते ना ?

बाबासाहेब : पण हजारो लोक वाचून गेले ना तो तुझा लेख ?

प्रभाकर : पण शेवटी तुम्ही झालाच कौ नाही अध्यक्ष ? कुठं काय परिणाम झाला माझ्या लिहिण्याचा ? हे असं चालायचंच बाबासाहेब. एरव्ही आम्ही केव्हढी तारीफ करतो तुमची—खाजगी बैठकीत. ते जाऊ दे आता. उद्या सभा घेणार आहे अभिनंदनाची—

बाबासाहेब : हे आता ढोंग केलंस तेवढं पुरे झालं. कुणी नको माझं अभिनंदन करायला. काही पोट भरायचं नाही माझं या अभिनंदनामुळे.

प्रभाकर : वा : वा : ! असं कधी झालंय ? तुम्ही काय वाटेल ते म्हणाल. पण आमचं काही कर्तव्य म्हणून आहे ना ?

बाबासाहेब : अन् माझे लेख कवडी किंमतीचे ठरविताना कुठं रे गेलं होतं तुझं कर्तव्य ?

प्रभाकर : आता ते कशाला काढता ? मी क्षमा मागतो हवी तर. पण उद्या अभिनंदाची सभा झालीच पाहिजे. काय सुलूताई, तुमचं काय म्हणणं ?

सुलभा : मला नाही काही कळत यात. ते तुम्ही आहात नि बाबा आहेत— काय वाटेल ते करा.

प्रभाकर : असं कसं होईल ? तुम्हीतर अवश्य हजर राहिलं पाहिजे त्या सभेला.

सुलभा : माझा काय संबंध ?

प्रभाकर : आमचा काय संबंध ? का सभा भरवणार आहोत आम्ही ? हे सार्वजनिक कार्य आहे. हा नुसता व्यक्तीचा सन्मान नाही—हा मराठी भाषेचा मान आहे. हा विजय आहे या आमच्या महाराष्ट्राचा. मुंबई युनिव्हर्सिटीच्या इतिहासात हे पहिलं उदाहरण आहे. यावेळी जर आम्ही पुढं यायचं नाही, तर यायचं केव्हा ?

केवढा अभिमान वाटतो आम्हाला. केवढा आनंद होतोय! केवढी आशा वाटतेय! आजवर असं झालं नव्हतं, आता झालं हे एक उदाहरण झालं. मराठी लेखकाची कदर युनिव्हर्सिटी करते हे सिद्ध झालं. एकदा झालं ते पुन्हा होईल. आमच्यासारख्या तरुण लेखकांना हा एक आशेचा किरण आहे.

बाबासाहेब : अस्सं होय? उद्या तुला डॉक्टर व्हायची आशा आहे म्हणून आज माझं अभिनंदन करतोस होय?

प्रभाकर : आता तुम्हीच पाहा सुलूताई. मी काय गैर बोललो होतो यात? पुढच्यांना मोठेपणा मिळाला तर मागच्यांना आशा उत्पन्न व्हावी हे स्वाभाविक नाही का?

बाबासाहेब : अग, त्याला एक कप चहा दे.

प्रभाकर : वाः वाः! नुसता चहाच का? चांगली बडी पार्टी हवीय आम्हाला. म्हणजे मला एकट्याला नव्हे-मुंबईतल्या साऱ्या लेखकांना.

बाबासाहेब : मी टाटाचा वारस आहे असं वाटलं का रे तुला? ही पार्टी वसूल करण्यासाठी का माझं अभिनंदन करणार आहेस?

सुलभा : खरंच का चहा हवा?

प्रभाकर : चहा कधी कुणी नको म्हटलाय?

सुलभा : मग असं करा, भांडं देते मी– त्या पलीकडच्या इराण्याकडून नाही तर भय्याकडून पावशेर दूध घेऊन या.

प्रभाकर : हो, आणतो की, द्या ना भांडं. [सुलभा आत जाते] हे पाहिलंत बाबासाहेब, सुलूताईला वाटलं मी असलं काम काही करणार नाही. पण इथं मी परका का आहे? [सुलभा भांडे आणून त्याच्या हाती देते.] आता घेऊन येतो पहा दूध. (उठून जाऊ लागतो) काय पडतं पावशेराला?

सुलभा : सांगेल की तो दुकानदार.

प्रभाकर : (खिसे चाचपून पहात) मग द्या ना.

सुलभा : दिलं की भांडं.

प्रभाकर : भांडं नव्हे— (हळूच) पैसे!

सुलभा : इकडे आणा ते भांडं. तसं असतं तर मीच नसते का घेऊन आले? तुम्हाला कशाला सांगितलं असतं? [त्याच्या हातचे भांडे काढून घेऊन सुलभा आत जाते.]

बाबासाहेब : अन् पार्टी मागतोस माझ्याजवळ. एकट्याला नव्हे— तर मुंबईतल्या साऱ्या मराठी लेखकांना. तरी बरंच, की तू सुद्धा एक लेखक आहेस.

[गोपाळराव घाईघाईने येतो. आल्याबरोबर एकदम बाबासाहेबांचा हात धरून जोरजोराने शेक हॅन्ड करतो.]

गोपाळराव : किती आनंद झालाय म्हणून सांगू बाबासाहेब ?

बाबासाहेब : सांगू नकोस. पैसे आणलेयस का काही ?

गोपाळराव : पैसे पैसे म्हणजे काय समजता बाबासाहेब ? असे ओवाळून टाकीन तुमच्यावरून पैसे !

बाबासाहेब : टाकू नकोस. टाकायचेच असले तर माझ्या हातात टाक. कुठं तरी टाकू नकोस.

गोपाळराव : टाकीन टाकीन. वेळ येईल तेव्हा तेही देऊन टाकीन.

बाबासाहेब : पण केव्हा येणार आहे ती वेळ ?

गोपाळराव : ते राहू दे. प्रभाकरपंत, सभा केव्हा घेणार आहात बोला. व्हाईस चॅन्सेलरनाच बोलवा अध्यक्ष म्हणून.लुंगीसुंगी माणसं आणून नाही चालायचं. उगीच नाही प्रभाकरपंत, कसं छान काढलंय पुस्तक ! जॅकेट पाहिलंत ? अमेरिकन पुस्तक वाटलं प्रत्येकाला. इंग्रजी असतं तर नोबेल प्राईझ मिळालं असतं.

बाबासाहेब : तुझ्या जॅकेटमुचं ?

गोपाळराव : जॅकेटच काय, टाईप, छपाई, कागद, बाईंडिंग झक्क झालं होतं पुस्तक.

बाबासाहेब : पण मी कुठं इकडे यात ?

गोपाळराव : ते आहेच हो. हिरा असला, तरी कोंदण पाहिजे. कुठं तिळाएवढा हिरा – पण चांगलं बोटभर शंभर नंबरी सोन्याचं कोंदण असल्याशिवाय का कुठं खुलून दिसतं ?

बाबासाहेब : अन् त्या तिळाएवढ्या हिऱ्याची किंमत ?

गोपाळराव : अहो, ते चाललंच आहे. बिनमोल असतो हिरा–

प्रभाकर : हे मात्र अगदी खरं. दोनशे पानांचं माझं पुस्तक पण एक दमडीसुद्धा दिली नाही.

गोपाळराव : पण पुस्तक कसं काढलं ? काय ? तुम्ही पाहिलं होतं ना ते बाबासाहेब ? छपाईलाच जातात पैसे, मग द्यायचे कुठून लेखकाला ? पण हे तुम्ही लोक ध्यानात घेत नाही प्रभाकरपंत. प्रसिद्धी केवढी मिळते ? आता हे बाबासाहेब. डॉक्टर झाले, ते त्यांच्या पुस्तकामुळंच ना ? पण त्यांना काय मिळालंय त्या पुस्तकासाठी ?

प्रभाकर : ते आताच कळलं मला.

गोपाळराव : तसे देतो मी मधून मधून. नाही असं नाही. एवढा मोठा लेखक— जपायला पाहिजे ना त्याला ?

बाबासाहेब : ऐक प्रभाकर, दमडीदुगाणी दिलीय यानं म्हणून जगलोंय अजून. मला डॉक्टरेट मिळालं म्हणून जर तुला अभिनंदन करायचं असेल तर ते या गोपाळरावाचं कर. यानं जगवलं मला. यापूर्वीच मेलो असतो तर कुटलं डॉक्टरेट अन् कुठलं तुझं अभिनंदन !

गोपाळराव : हे पहा बाबासाहेब, पहिल्यापासून तुमचं चुकत आलंय. कुठंतरी नोकरी करायची पोटापुरती. पुस्तकावर का कधी पैसे मिळतात ?

बाबासाहेब : लेखकाला की प्रकाशकाला ?

गोपाळराव : असं म्हणू नका बाबासाहेब. आधी भांडवल असावं हाती तेव्हा प्रकाशक होता येतं. प्रकाशकाला मिळतं ते या भांडवलाचं व्याज.

प्रभाकर : अन् लेखकाचं नसतं का त्यात काही भांडवल ?

गोपाळराव : लेखकाचं कसलं भांडवल ? घेतली लेखणी की लिहिलं. चाललाय लिहीत. चाललाय लिहीत.

बाबासाहेब : अन् ते लिहिण्याला काही बुद्धी लागत नाही वाटतं ? काही अभ्यास, काही अवलोकन, काही प्रवास, काही अनुभव– चिंतन एखाद्या विषयाचं ?

गोपाळराव : ते खरं, पण त्याला काही भांडवल लागत नाही. अर्थशास्त्राच्या दृष्टीनं बुद्धीला काही मोल नाही. बुद्धी म्हणजे पैसा नव्हे. बुद्धी म्हणजे शेतवाडी नव्हे–जमीन जुमला नव्हे. गहाणविक्री करून बुद्धीवर काही पैसे काढता येत नाहीत अर्थशास्त्राच्या दृष्टीनं बुद्धीची किंमत शून्य आहे. त्या तुमच्या या शून्याच्या पसाऱ्याला भांडवल घालून आम्ही मोल आणतो. म्हणून तुमची किंमत ! काय ? ते भांडवल वापरण्यासाठी लेखक हवेत म्हणून आम्ही देतो त्यांना काहीतरी.

बाबासाहेब : हो. जगण्यापुरतं.

गोपाळराव : हो, जगण्यापुरतं. तसं पाहिलं तर लेखकाला अस्वस्थपणा पाहिजे. तळमळ पाहिजे. खळबळ पाहिजे. श्रीमंत झाला तर लेखक स्फूर्ती हरवून बसेल. म्हणून नुसतं जगण्यापुरतं द्यायचं त्याला. जास्त दिलं की मेलाच लेखक. काहीही लेखन व्हायचं नाही मग त्याच्याकडून.

बाबासाहेब : ऐकलंस प्रभाकर ?

गोपाळराव : तेव्हा काय म्हणत होतो मी – बरं का प्रभाकरपंत, अभिनंदनाच्या सभेचा सारा खर्च मी देईन. पण व्याख्याते मी ठरवीन.

प्रभाकर : ते का ?

गोपाळराव : ते कळायचं नाही तुम्हाला. बाबासाहेब डॉक्टर झाले पण त्याचं श्रेय सारं मला आहे. ते माझं श्रेय या सभेत गाजलं पाहिजे.

बाबासाहेब : हं. ऐकलंस प्रभाकर, म्हणूनच मी म्हणत होतो, की अभिनंदन करायचं तर या गोष्याचं कर.

गोपाळराव : छे! छे! छे! छे! अभिनंदन तुमचंच व्हायला पाहिजे. आम्ही सारे तुमच्या पोटात येतो —

बाबासाहेब : तेव्हाच अन्नाशिवाय पोट भरतं माझं ते.

गोपाळराव : असं म्हणू नका बाबासाहेब— अशी एक झकास कादंबरी लिहा. त्यात ते तुमचं लैंगिक की कायसं म्हणतात ते पुष्कळसं आलं पाहिजे. खूप मुके, मिठ्या, लुगडीधोतरं सोडून आणलीत तरी देखील चालतील. पण पोरापोरींनी वाचलं– की यंव !— पुन्हा पुन्हा वाचलं पाहिजे त्यांनी. म्हाताऱ्याचा 'ओकासा' झाली पाहिजे ती कादंबरी. असं काहीतरी लिहा. आता डॉक्टर झालात तुम्ही, आता काही हरकत नाही तसं लिहायला.आता कुणाची छाती आहे तुम्हाला नाव ठेवायची ? हा प्रश्या— माफ करा हं प्रभाकरपंत, हा मुद्दा तारीफ करू लागेल तुमची. (प्रभाकरला) कॉलमला पाच रुपये देईन. (बाबासाहेब) काय ? लिहिता ?

बाबासाहेब : सुले, सुले—अग ए सुले, इकडे ये पाहू. [सुलभा येते] आत काय करीत होतीस ?

सुलभा : काही नाही.

बाबासाहेब : हे आले आहेत ना माझे प्रकाशक—

सुलभा : मग ? पुन्हा व्हायला हवी आहे का शोभा ?

बाबासाहेब : अग, चहाला दूध नाही ते मला माहीत आहे. केरसुणी आहे ना तिथं ?

गोपाळराव : हे पाहा बाबासाहेब—

बाबासाहेब : मला काय लिहायला सांगतोस रे पाजी माणसा ? असलं मुकेमिठ्याचं वाङ्मय लिहून जगण्यापेक्षा मेलेलं काय वाईट ?—

गोपाळराव : मग नका लिहू. पोटभर पाहिजे तसं लिहा. नको असलं तर काय वाटेल ते लिहा. काही तरी पुस्तक हवं असतं आम्हाला म्हणू आम्ही प्रसिद्ध करू.

बाबासाहेब : माझ्या पुस्तकाची तारीफ करायला कॉलमला पाच रुपये.आणि त्या माझ्या मूळ पुस्तकाला देतोस दर पानी–

गोपाळराव : ते बोलू नका या प्रश्यासमोर. नाहीतर माझं सांगणं अन् तुमचं सांगणं यात तफावत पडेल. तुमची इभ्रत राखली पाहिजे ना मला ? अन् असं पाहा बाबासाहेब, हा लिहून लिहून काय लिहील ? कॉलम दोन कॉलम, फार तर चार कॉलम. पानभर जाहिरातीला काही वीस रुपये पुरायचे नाहीत. पन्नास-साठ रुपयाचं काम वीस रुपयात होऊन जाईल,पण तुम्हाला जर दर पानी आठ आणे वाढवले तर शे दोनशे रुपये फटकन जातील माझे. हा व्यवहार कळायचा नाही तुम्हाला बाबासाहेब ! तुम्ही नुसती पुस्तके लिहावी. प्रसिद्ध करण्याइतकी ही असती तर लेखक झाला नसता तुम्ही.

बाबासाहेब : खरंय तुझं म्हणणं. माफ कर. काय करू ? या वेळी एक कप चहासुद्धा दिला असता मी. हे पहा सुले, पाहा ना कुठं दूध असलं तर —

गोपाळराव : छे! छे! काही नको मला. विचार करा पुन्हा मी सांगितलं त्याचा. – बरं येऊ ? – अन् तुम्ही हो प्रभाकरपंत, येता का ? ते नवं पुस्तक निघालंय आपलं त्याच्याबद्दलचं बोलायचंय शिवाय ही अभिनंदनाची सभासुद्धा भरवायची आहे [प्रभाकरला घेऊन बोलत बोलत निघून जातो. त्याचे वाक्य खिडकीपलिकडे संपते.]

सुलभा : (बाबासाहेबांच्या जवळ येऊन) किती दिवस हे असं चालणार बाबा ! लिहा ना का तो म्हणतं तसं. माझी खात्री आहे, तुम्ही मनात आणाल तर लेखनाचा दर्जा न बिघडवता त्याला हवं तसं सहज लिहाल .... पाहता काय असे माझ्याकडे ?

बाबासाहेब : सुले – पोरी, हत्ती थकला म्हणून काही मोटरच्या गॅरेजमधे जायचा नाही. हत्तीपेक्षा देखील मोठी होऊन बसलीय मोटर हल्ली. पण हत्ती तो हत्ती अन् मोटर ती मोटर. हत्ती म्हणजे वास्तवता, मोटर म्हणजे कृत्रिमता. हत्ती म्हणजे निसर्गाचं लेकरू अन् मोटर म्हणजे निसर्गाशी झगडण्यासाठी माणसानं बनवलेलं खोटं ढोंग. हत्ती चिरंतन आहे, मोटर क्षणभंगुर आहे. म्हणूनच मी म्हटलं, की हत्ती थकला तरी मोटारीच्या गॅरेजमधे जाणार नाही. हत्तीच्या एका पायाखाली मोटारीचा चुराडा होऊन जाईल–म्हणून हत्तीचं उदाहरण दिलं मी. (क्षणभर दोघेही स्तब्ध) मला माहीत आहे, की माझ्यापायी तुला क्लेश सोसावे लागत आहेत. तुझ्या आईची आठवण आहे ना तुला ? असं म्हटलं असतं का तिनं ?— सांग ना, असलं घाणेरडं बुक लिहा असा आग्रह धरला असता का तिनं ?

सुलभा : माफ करा बाबा. माझी चूक झाली.

बाबासाहेब : किती क्लेश काढले तिनं माझ्यापायी. माझी ही मिजास मी सोडून द्यावी म्हणून किती जणांनी तिला किती प्रकारे चिथावणी दिली. पण बधली का ती कुठं ?— (पुन्हा क्षणभर स्तब्ध होऊन) सुले, पुरुषाच्या अभिमानाची मूर्ती म्हणजे स्त्री. तिनं सांभाळली पाहिजे त्याची इभ्रत — ती सांभाळीत असते त्याची इभ्रत — मग तो आई असो, बायको असो, की मुलगी असो. तिच्या पाठिंब्यावर तो लढत असतो साऱ्या जगाशी. तिच्या करंगळीच्या आधारावर संकटाचा गोवर्धन पर्वत तो उचलून धरीत असतो – आठवतं ना तुला ? अन्नाशिवाय दिवस काढले आपण पण बाहेर दैन्य दिसू नाही दिलं तिनं कुणाला. इकडे उपासमार होत होती पण लोक आम्हाला सुखी समजत होते. गुण म्हण की दोष म्हण, पण ती तिची कर्तबगारी होती. म्हणून झगडलो मी साऱ्या जगाशी. तू तिची मुलगी–माझी मुलगी–पण आता कुणाचीतरी बायको झालीस म्हणून असली पुस्तकं लिहायला सांगतेस मला ! (डोळ्यात आलेले टीप आंगठ्याच्या टोकाने पुसून टाकतात आणि हसू लागतात.) मी अगदी वेडा आहे नाही ग सुले ? केरसुणी आणायला सांगितली तुला मी.–आणली असतीस तर मी झोडपून काढलं असतं त्याला, इतका चिडलो होतो मी—

सुलभा : मीच मारलं असतं कदाचित त्याला केरसुणीनं.

बाबासाहेब : माझीच मुलगी की नाही ! पण काय निष्पन्न झालं असतं त्यात ? माझ्या वैऱ्यांच्या यादीत आणखी एक नाव अधिक वाढलं असतं. पण वैरी तरी कसले ? पाठीमागे निंदा करतात पण समोर आले की बोबडी वळते एकेकाची– त्या कुतरड्यात आणखी एकाची भर पडली असती एवढंच. पण आता मी फार मोठा माणूस झालोय, नाही ग मुले ? आता अशी माणसं हिशेबात धरता नयेत मी–

सुलभा : अन् पूर्वी कुठं धरीत होता हिशेबात ?

बाबासाहेब : ते खरं आहे ग, पण आता बराच मोठा झालोय मी.

सुलभा : खरंच का ? – मग तो लखोटा का फेकून टाकलात तेव्हा ?

बाबासाहेब : खट्याळ कार्टी कुठली ! अग ते माझं मत झालं. आता मी म्हटलं ते लोकांच्या दृष्टीनं. यापुढं लोक अगदी निराळ्या दृष्टीनं पाहतील माझ्याकडे— म्हणूनच असली पुस्तकं लिहिता नयेत मी.

सुलभा : अन् पूर्वी कुठं लिहित होता ?

बाबासाहेब : हा राजा कुठं गेला ?

सुलभा : ही माणसं आली म्हणून जाऊन येतो असं सांगितलं मला.

बाबासाहेब : त्याला पटलं नसतं हे. बरं झालं गेला तो.... [बाळासाहेब एकदम प्रवेश करतात. तोही एक प्रकाशक आहे. साधारण पन्नाशी उलटलेला. घेरा राखणारा, केस पिकलेला, धोतर गुडघ्यापर्यंत, लांब कोट, तांबडी पगडी, गळ्याभोवती टाकलेलं उपरणं, हातात एक हरणछाप छत्री. तो येताच सुलभा बाबासाहेबांपासून दूर जाते.]

॥ ७ ॥

भूमिकन्या सीता

['भूमिकन्या सीता' (१९५०) हे सामाजिक दृष्टिकोनातून लिहिलेले पौराणिक नाटक आहे. रामाने सीतेवर अन्याय केला आणि एकाअर्थी लक्ष्मणानेही उर्मिलेवर अन्याय केला. रामाला राज्याची प्रतिष्ठा महत्त्वाची वाटत होती आणि लक्ष्मणाला रामाची प्रतिष्ठा महत्त्वाची वाटत होती. पुरुषांकडून होणाऱ्या स्त्री-जातीच्या विटंबनेविरुद्ध उर्मिला संतापून उठली. आणि रामराज्याच्या प्रतिष्ठेपेक्षाही स्त्री-जातीची प्रतिष्ठा सीतेने महत्त्वाची मानली आणि आपले निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी तिने आत्मबलिदान केले. तो प्रसंग दर्शविणारा हा नाटकातील अखेरचा हृद्य प्रवेश.]

(तपस्विनीच्या वेषात सीता शांतपणे पावले टाकीत प्रवेश करते. सर्वांची नजर तिच्याकडे जाते. रामाखेरीज इतर सर्व 'सीतादेवी' म्हणून तोंडातल्या तोंडात पुटपुटतात. सीता मध्यभागी येऊन उभी राहते, त्यासरशी उर्मिला तिच्याजवळ जाते. हाताच्या खुणेनेच ती तिला दूर राहायला सुचवते.)

वाल्मीकि : पाहिलीस रामा ही तुझी सीता ! माझ्या आज्ञेनं आली आहे इथं.

राम : सीता निर्वासित आहे.

सीता : हो. असं कुणीतरी सांगितलं मला. राजाची आज्ञा राजच्या मुखानं झालेली मी नव्हती ऐकली.

राम : तरीही ती राजाज्ञाच होती.

सीता : यज्ञमंडपात पुण्याहवाचनाच्या वेळी कोण होती यजमानाशेजारी ?

राम : ती प्रतिमा–

सीता : सीतेची प्रतिमा ? हया अयोध्येत सीतेला बंदी होती तर तिची प्रतिमा तरी कां येऊ दिली इथं ?

राम : यज्ञ कार्यासाठी–

सीता : सीता जिवंत होती.

राम : रामाच्या लेखी ती कुठं जिवंत होती ?

सीता : म्हणून तिची प्रतिमा केली ? (राम स्तब्ध) जिवंत असून मेल्यासारखी झाली म्हणून तिची प्रतिमा केली ?

राम : यज्ञकर्माला यजमानपत्नीची जरूरी असते म्हणून.

सीता : सजीव पतीच्या शेजारी निर्जीव पत्नी कशी चालली हया यज्ञकर्मासाठी ? ऋत्विजांनी संमती दिली का हयाला ?

राम : ऋत्विजांनी विरोध केला नाही हया योजनेला.

सीता : सम्राटाच्या भीतीनं ?

राम : ऋषीमुनी का भितील सम्राटाला ?

सीता : रामाची पत्नी जिवंत आहे हे माहीत होतं ना त्यांना ? – सर्वज्ञ असतात हे ऋषीमुनी ! – ते माहीत असूनसुद्धा निर्जीव पत्नी मान्य का केली त्यांनी ?

राम : कुणीच विरोध केला नाही त्या प्रतिमेला.

सीता : जन्मभर जिनं केव्हाही पतीच्या आज्ञेचं उल्लंघन केलं नाही, ती ही सीता, आज्ञा होताच आली असती असं नाही का वाटलं तिच्या पतीला ? हे अश्वमेधाचं भाग्य एका उत्तमांगानं अनुभवावं – अर्धांगाला का वंचित करावं त्या भाग्यापासून ? काय अपराध केला होता तिनं ?

राम : लोकापवाद ! लोकनिंदेच्या कलंकाने दूषित झाली होती ती.

सीता : प्रत्यक्ष कृतीनं नव्हे ! (राम स्तब्ध) तिनं अग्निदिव्य केलं होतं लंकेत, ते माहीत नव्हतं का हया निंदकांना ?

राम : निंदा होत होती, प्रवाद उठत होते, पौरजनांची मनं कलुषित झाली होती. त्याचा परिणाम होत होता सामान्यांच्या नीतिमत्तेवर. त्या परिणामांच्या संपर्कानं कलंकित होत होतं हे रामराज्य.

सीता : ती निंदा खोटी होती, निराधार होती, होय ना ?

राम : ती खरी असो की खोटी असो, त्या निंदेचा परिणाम चुकवता येत नव्हता.

सीता : मग का त्याचं निराकरण केलं नाही ? वनवासातला तो एक प्रसंग – सीतेच्या अंगावर राम विश्रांति घेत होते. एक कावळा आला आणि सीतेच्या वक्षस्थलावर चोंच मारू लागला. रामांना त्याचा संताप आला. त्यांनी इषीकास्त्र सोडलं त्या कावळ्यावर. त्या अस्त्रानं साऱ्या त्रिभुवनात पाठलाग केला त्या

कावळ्याचा. शेवटी शरण आला तो कावळा आणि एका डोळ्याचं दान देऊन त्यानं आपली सुटका करून घेतली. कावळा एकाक्ष झाला तेव्हापासून. आठवतं ना ते ? (राम स्तब्ध) एक लहानसं क्षत पाहून चोंच मारणाऱ्या कावळ्याला एवढी कठोर शिक्षा करणाऱ्या रामानं, क्षतवीक्षण करणाऱ्या ह्या असंख्य कावळ्यांना–ह्या लोकांना—तशीच शिक्षा केली पाहिजे होती, नाही का ?

राम : तो राम वनवासी होता. स्वतंत्र होता. राज्याचा भार नव्हता त्याच्या माथी–

सीता : आता रामराज्याचा भार आहे रामाच्या माथी ! अनेकांच्या संतोषासाठी एका जिवाची—जन्मभर बरोबर राहून सारी सुखदुःखं भोगणाऱ्या जिवाची–अशी निर्घृण हत्त्या करणं हेच का राजनीतीचं लक्षण ? न्याय झाला का हा ? (राम स्तब्ध राहातो असे पाहून सीता वाल्मीकीपाशी जाते. वाल्मीकीला) क्षमा करा गुरुदेव, आपल्या साक्षीनं मी हा अपराध करते आहे. सम्राटाचा– पतीचा उपमर्द होतो आहे माझ्या करवी, मला क्षमा करा.आपल्या कृपेनं ही संधि मिळालीय मला. काहीसुद्धा न सांगता मला हद्दपार करण्यात आलं.माझं म्हणणं ऐकवायची संधीसुद्धा मिळाली नव्हती मला, म्हणून आज मी बोलून टाकतेय हे माझं शेवटचं भाषण. लंकेत अग्निदिव्य केलं त्या वेळी असं झालं नव्हतं. त्या वेळी ही आग पाखडली गेली होती माझ्यावर. तरी पण साऱ्या राक्षसांसमोर, वानरांसमोर, मानवांसमोर, देव–यक्ष– गंधर्व किन्नरांसमोर माझी बाजू मांडता आली होती मला. जे काही बोलायचं म्हणून होतं ते सारं बोलून मी ते अग्निदिव्य केलं होतं. ह्यांच वेळी असं काय झालं, की मला काहीसुद्धा न सांगता माझे वनवासाचे डोहाळे पुरवण्याचं निमित्त करून का अशी फसवणूक केली माझी ? लंकेच्या अग्निदिव्यापूर्वी मी निर्भयपणे उत्तर दिलं तसंच कठोर उत्तर ऐकावं लागेल अशी भीति वाटली का रामराजाला ?

राम : नाही. हा रघुकुलोत्पन्न राम कुणालाही भीत नाही.

सीता : निंदकांना नाही भ्याला ? मी गर्भवती होते हे माहीत असूनसुद्धा का म्हणून मला जंगलात एकटं सोडून दिलं ?

राम : लोकाराधनेसाठी !

सीता : म्हणजेच लोकांना भिऊन. कोण हे लोक ? निंदकच ना ? महापराक्रमी रामानं का भ्यावं ह्या निंदकांना ? (राम स्तब्ध) अयोध्येच्या सम्राटाला आता तुम्हीच विचारा ना गुरुदेव.

वाल्मीकि : रामा, लोकापवादामुळं माझ्या आश्रमाजवळ जिला तू अशाप्रकारे सोडून दिलीस, ती ही तुझी पत्नी निष्कलंक आहे–निष्पाप आहे. ही निष्पाप आहे अशी माझी खात्री होती म्हणूनच मी हिला आश्रय दिला. रामायणाचं गायन करणारे जे दोन कुमार तू पाहिलेस ते सामान्य ऋषिकुमार नव्हते, ते तुझेच पुत्र

आहेत. पुत्रवती झालेल्या ह्या आपल्या पत्नीचा आनंदानं स्वीकार कर, असं हा प्रचेतसाचा दहावा पुत्र वाल्मीकि तुला प्रतिज्ञापूर्वक सांगतो आहे.

उर्मिला : अजूनसुद्धा अयोध्येच्या सम्राटाला शंका वाटते का ह्या माझ्या भगिनीची ?

राम : मला केव्हाच शंका वाटत नव्हती. शंका निरसन झालं पाहिजे ते माझं नव्हे, लोकांचं ! माझ्या पौरजनांचं ! लोकांचा सेवक म्हणून रामानं धुरा वाहिली आहे ह्या रामराज्याची, त्या लोकांचं समाधान झालं पाहिजे. सीतेनं लंकेत दिव्य केल, मी तिचा स्वीकार केला, तरीही लोकनिंदा थांबली नाही. लोकापवाद दुस्तर आहे म्हणूनच मी ह्या भूमिकन्येचा त्याग केला. ह्या अपराधाबद्दल मुनिराज, मला क्षमा करा.

वाल्मीकि : तू ह्या सीतेचा स्वीकार केलास की ती क्षमाच होणार आहे माझी.

राम : पण आधी लोकांचं समाधान झालं पाहिजे. सीता स्वतःसिद्ध शुद्धच आहे ना भगवन् ? की आपल्या पवित्र आश्रमात वास्तव्य केल्यामुळे ती निर्दोष झाली आहे ?

वाल्मीकि : सीतेच्या वास्तव्यामुळे उलट माझाच आश्रम पवित्र झालाय.

उर्मिला : (ताडकन् पुढे येऊन) काय चाललंय हे ? शंकाकुशंकांचं कसलं हे काहूर उठवताहा ? एकदा आपणच म्हणायचं की सीता निर्दोष आहे ! पुन्हा बिचारायचं की आश्रमांतल्या वास्तव्यामुळं ती निर्दोष झाली का म्हणून ! ही अशी शंकाकुशंकांची झटापट का चालली आहे तुमच्या हृदयात ? सीता निर्दोष आहे असं जर खरोखरच वाटत असेल तुम्हाला, तर यज्ञमंडपातील ती सीतेची प्रतिमा द्या फेकून अन् ह्या चालत्या बोलत्या जिवंत पत्नीचा हात धरून अश्वमेधाची सांगता करा.

वाल्मीकि : शांत हो वत्से, शांत हो.

उर्मिला : कशी शांत होऊ ? सारखी विटंबना चालली आहे ही– रामाच्या पत्नीची नव्हे, जनकाच्या कन्येची नव्हे, अयोध्येच्या राज्ञीची नव्हे की माझ्या आवडत्या बहिणीचीही नव्हे ! का चालली आहे ही स्त्री-जातीची विटंबना ? संशय ! संशय ! संशय ! स्त्री-जातीचाच का तेवढा संशय घ्यायचा ? सदा निर्दोष असतो का हा पुरुष ? शूर्पणखा अत्यंत सुंदर रूप धारण करून रामाच्या गळी पडायला आली होती, सीतेला टाकून माझा स्वीकार करा असं म्हणत होती ती, असं (लक्ष्माणकडे पाहून) हेच सांगतात. सीता नव्हती तिथं समोर ! होय ना ? (राम स्तब्ध) सीतेने संशय घेतला का त्यावेळी तुमचा ? कधी उल्लेख तरी केला का त्या प्रसंगाचा ? किती निर्मळ असते ही स्त्री जातीची मनोवृत्ति ! अन् तुम्ही पुरुष ! शंका ! शंका ! शंका !सारखा संशय ! सारख्या शंका ! स्वतःच्याच मनावर विश्वास नसतो तुम्हां पुरुषांचा !–

सीता : उर्मिले ! –

उर्मिला : बोलू नकोस. ह्या क्षणाचं महत्त्व मी जाणते. कसा कोंडमारा होत असतो स्त्री जातीचा ह्याचा अनुभव माझ्याइतका नाही मिळालेला तुला ! कित्येक

वर्षे कोंडून पडलेल्या हट्या माझ्या हृदयातल्या बंधाऱ्याला आज वाट फोडायची संधि मिळाली आहे मला – तुझ्यामुळं संधि मिळालीय ! (रामाला) आता बोला, अजून-सुद्धा संशय आहे का तुमच्या मनात ?

राम : मला क्षमा कर उर्मिले, लोकाराधनेच्या भाराखाली मी चुरडून गेलो आहे, हतवीर्य झालो आहे. माझा नाइलाज झाला आहे. शेवटचा बोल म्हणून सांगतो, हट्या महर्षींची अनुज्ञा घेऊन सीतेनं आपल्या शुद्धीविषयी आता इथं शपथ करावी.

सीता : (वाल्मीकीला) ऐकलंत गुरुदेव ? आता काय आज्ञा करता मला ?

वाल्मीकि : प्रतिज्ञापूर्वक मी सांगतो, की सीता निर्दोष आहे. निष्पाप आहे. ती निर्दोष नाही असं ठरलं तर अनेक सहस्र वर्षपर्यंत मी जी तपश्चर्या केली ती निष्फळ होऊन जाईल. ह्यापेक्षा अधिक काय सांगू मी ?

सीता : पण तुमची अनुज्ञा काय आहे मला ?

वाल्मीकि : स्वतःचं संरक्षण करायला तुझी तू समर्थ आहेस.

सीता : (रामाला) ऐकलंत ? ही माझ्या गुरुदेवांची अनुज्ञा ऐकलीत ? मी काय करावं आता ?

राम : शपथ कर. दिव्य कर ! लोकांचं समाधान झालं पाहिजे !

सीत : असं किती वेळा दिव्य करायचं ? एकदा शपथ केली, दिव्य केलं, नुसतं वाणीचं नव्हे, अग्निदिव्य केलं. दिव्य एकदाच होत असतं. शपथ एकदाच घेतली जाते. पुन्हा पुन्हा शपथ करणाऱ्याच्या शब्दावर कसा कोण विश्वास ठेवील ? एकदा दिव्य केलं असतासुद्धा पुन्हा पुन्हा मी दिव्य करू लागले तर माझाच माझ्यावरचा विश्वास नाही का उडून जायचा ?

राम : काकुळतीला येऊन सांगतो आहे मी– लोकांच्या समाधानासाठी आणखी एकदा शपथ कर.

सीता : नाही. केव्हाही नाही. मी पुन्हा शपथ करणार नाही. पुन्हा दिव्य करणार नाही. मी स्वतःसिद्ध शुद्ध असताना लोकांनी माझी शंका घेतली एवढ्यासाठी मी केव्हाही पुन्हा दिव्य करणार नाही. तुम्ही राजे आहां, तुम्हाला लोकांची चाड आहे. मी स्त्री आहे, मला स्त्री-जातीची चाड आहे. स्त्री-जातीच्या भवितव्याची काळजी आहे मला, मी स्त्री आहे म्हणून. ह्या वेळी मी माघार घेतली अन् दिव्य केलं तर त्याची फळं भविष्यकाळात साऱ्या स्त्री-जातीला भोगावी लागतील संशयाच्या भडकत्या ज्वालेंत पोळून निवेल सारी स्त्री-जात. मीही तितक्याच काकुळतीनं सांगते, अयोध्येचे सम्राट, मला शपथ करायचा आग्रह करू नका.

राम : रामराज्याच्या प्रतिष्ठेसाठी म्हणून मी तुझी विनवणी करतो आहे. –

सीता : रामराज्याची प्रतिष्ठा ! रामराज्याच्या प्रतिष्ठेपेक्षाही स्त्री-जातीची प्रतिष्ठा अधिक महत्त्वाची वाटते मला ! रामराज्य ? कसलं हे रामराज्य ! रामराज्य

होतं ते त्या वनवासात. वैभवाची भलती प्रतिष्ठा नव्हती त्यावेळी. अधिकाराचा बडिवार नव्हता त्या वनवासांत. ते नुसतं रामराज्य नव्हतं, ते सीतारामाचं राज्य होतं! सीतारामाचं राज्य होतं म्हणूनच ऋषीमुनींची तपश्चर्या निर्विघ्न झाली. ते सीतारामाचं राज्य होतं म्हणूनच दैत्यांचा संहार झाला, दुर्जनांचा नाश होऊन सज्जनांची प्रतिष्ठा प्रस्थापित झाली. रावणाचं साम्राज्य जाऊन बिभीषण लंकेचा राजा झाला. पृथ्वी निष्कंटक झाली ती सीतारामाचं राज्य होतं म्हणून. ह्या निष्कलंक सीतेला पुन्हा पुन्हा दिव्य करण्याचा प्रसंग येतोय हे रामराज्य आहे म्हणून– हे नर राज्य आहे म्हणून! स्त्री–जातीची ही मानखंडना ही भूमिकन्या केव्हाही सहन करणार नाही. राजा रामचंद्रा, मी दिव्य करते आहे, पण ते दिव्य माझ्या शुद्धीच्या प्रस्थापनेसाठी नव्हे! मी दिव्य करते आहे ते स्त्री–जातीच्या मानखंडनेचा विध्वंस करण्यासाठी. मला राज्य पाहिजे आहे ते सीतारामाचं. मला जगायचं आहे ते सीतारामाच्या राज्यात. पतितपावन म्हणून ज्याचा जयजयकार होतो आहे तो राम नव्हे, तो सीताराम आहे, त्या सीतारामाच्या राज्याच्या छत्रा-शिवाय हा जीव धरून ठेवणं अशक्य होतंय मला म्हणून मी दिव्य करते आहे. रघुकुलोत्पन्न रामाशिवाय मी कुठल्याही पुरुषाचं चिंतनसुद्धा केलं नसेल, कायेनं, वाचेनं आणि मनानं जर मी रामाचीच आराधना केली असेल, तर ही विष्णुपत्नी– ही माझी माता–ही भूमाता आपल्या ह्या निष्कलंक कन्येला ह्या क्षणालाच ठाव देईल. भूमीतून आलेला हा आत्मा ह्या भूमीतच विराम पावेल. जय सीताराम! [सीता खाली बसून जमिनीवर मस्तक ठेवते. चोहोकडे अंधार होतो. प्रकाशाची एक तळपती ज्योत कडकडाट होऊन एकदम चमकून जाते आणि पुन्हा प्रकाश होतो. उर्मिला आणि लक्ष्मण धावतच पुढे येतात.]

उर्मिला : गेली! रामाची चित्शक्ति अनंतात विलीन झाली!

राम : हा सीते! हा सीते!

॥ ८ ॥



नवा जमाना (एकांकिका)

[मामा वरेरकरांनी व्यक्तिस्वातंत्र्याचा सातत्याने पुरस्कार केला आहे. पुरुष प्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीची होणारी कुचंबणा व तिच्यावर होणारा अन्याय याविषयी अनेक प्रकारांनी त्यांनी लिहिलेले आहे. नव्या जमान्यांत पुरुषांची अधिकारपदे स्त्रियांना मिळाली तर स्त्री-पुरुषातच काय ताणतणाव निर्माण होतील–]

(मराठवाडा राज्यातील राजधानीतल्या सरन्यायाधीशाच्या बंगल्यातील दिवाणखाना. हा दिवाणखाना अगदी आधुनिक आहे आणि त्यातील सर्व समानसुमान सर्वस्वी इंग्रजी थाटाचे आहे. पूर्वीच्या राजवटीतील कोणत्याही बड्या गोऱ्या साहेबाचा दिवाणखाना ज्या प्रकारे शृंगारलेला असेल, तसाच हा आहे. पडदा वर जातो, त्यावेळी घरचा बटलर सामानसुमान नीट लावीत असतो. भिंतीच्या बाजूच्या टेबलावरील विस्कटलेले कागदपत्र नीट जुळवून ठेवीत असतो. बाहेरच्या दरवाजाने अखिला प्रवेश करते. तिचे वय सुमारे वीस आणि पंचविशीच्या दरम्यान असावे. तिच्या अंगावरची साडी खादीची आहे. अंगातील ब्लाऊजही खादीचाच आहे. तिची मुद्रा पाणीदार असून कुणाशीही बोलतांना ती नजरफेक करते आहे की काय, असा भास होतो. आत येताच ती इकडे तिकडे पहाते आणि टेबलाजवळ तिच्याकडे पाठ करून उभ्या असलेल्या बटलरच्या पाठीवर थाप मारते. तो दचकतो आणि मागे वळून पहातो आणि मुजरा करतो.]

अखिला : वाः गुंड्या, आता साहेबाचा बटलर दिसतोस खरा ! बरा सजबिलायू तुला ! – साहेब नाही आले वाटतं अजून ?

गुंड्या : कुठले साहेब ?

अखिला : अरे, साहेब एकच. सर न्यायाधीशसाहेब ! कुठे गेलेत ते ?

गुंड्या : मला सोडला इथंच बंगल्यासमोर – शोफरलासुद्धा सोडला– अन् स्वतःच गाडी घेऊन गेले कुठंतरी. इतक्यातच येतो म्हणून म्हणाले.

अखिला : आता हे इतक्यातच म्हणजे काय समजायचं ?

गुंड्या : ते मी काय सांगू ? अशीच सवय आहे साहेबांना. तिकडे वकील साहेबांकडे गेले असतील कदाचित. असेच म्हणतात–– इतक्यात येतो म्हणून, अन् मग वकीलसाहेब भेटले तर त्यांना घेऊन जातात फिरायला— अन् मग किती वेळ लागेल तो सांगता येत नाही.

अखिला : मोठी गंमत आहे, नाही ? वकील साहेबांना घेऊन सरन्यायाधीश फिरायला जातात ! तुला कसं वाटतं हे ?

गुंड्या : जायचेच ते ! त्यात काय वाटायचं ? साहेब म्हणतात, की दोन बिऱ्हाडं नकोत; अन् वकील साहेब काही ऐकत नाहीत. त्यामुळंच होतेय ही ओढाताण !

अखिला : असं का ? अन् पोलिससाहेब आले होते का आजकाल ?

गुंड्या : रोज येतात की.

अखिला : आज आले होते ?

गुंड्या : नाही, त्यांची यायची वेळ झालीय आतांच.

अखिला : अन् आमचे बाबा ?

गुंड्या : गेल्या चार दोन दिवसांत, काही आले नाहीत. मघाशीच फोन आला होता त्यांचा.

अखिला : आता येणार म्हणून ?

गुंड्या : हो, तीच पंचाईत पडलीय मला. ते आले अन् साहेब इथं नसले, तर काय करायचं ?

अखिला : अरे, चहा द्यायचा त्याना. काही खायला असलं तर तेही द्यायचं. सेक्रेटरीएटमधून सरळ येणार ते इथं– दमून भागून येणार—

गुंड्या : छान सांगितलं ! मोठा पेंच पडला होता मला.

अखिला : बरं ! – तो नांगऱ्या आला होता का ?

गुंड्या : हजेरी घेताहेत सर्वांची ! नांगऱ्या कोण ?

अखिला : माहीत नाही तुला ? तुझ्या साहेबांचा भाऊ.

गुंड्या : आप्पासाहेब होय ? ते आहेतच की आत.

अखिला : मग का नाही सांगितलंस मला आधीच ?

गुंड्या : बोलावू का त्यांना ?

अखिला : हे सांगायला का हवं ? तुझ्या साहेबांचा थांगपत्ता नाही –

तुझ्याशी बोलून बोलून काय बोलणार ? बरं, भेटल्याशिवाय गेलं तर तुझे साहेब रागावतील. कुणीतरी बोलायला हवं ना बरोबर ! कुणीच नसण्यापेक्षा तो नांगऱ्या बरा.

गुंडू : नांगऱ्या ! हं: – थांबा हं –

[आत जातो. अखिला बाहेर जाऊन एकदा दाराबाहेर पहाते. पुन्हा आत जाते. टेबलावरचे कागद चाळू लागते. आतून घाईघाईने अप्पासाहेब येतो. त्याचे वय पस्तीशीच्या सुमाराचे आहे. अंगात खादीची कोपरी, जेमतेम गुडघ्याखाली येणारे खादीचे धोतर. डोळे पाणीदार असले तरी पण मुद्रा बावळी. गांवढळपणाची संपूर्ण छाया असलेला.]

अप्पा : केव्हां आलांत अखिलाबाई ?

(अखिला त्याच्याकडे मान वाकडी करून पहात रहाते. तो अस्वस्थ होतो.)

अप्पा : काय झालं ? चुकलं का काही ? केव्हा आलात ?

अखिला : हे 'अहो जाहो' केव्हापासून सुरू झालं ? जन्मभर अखू म्हणत आलात मला – आता अखिलाबाई का झाल्या ?

अप्पा : ते असं आहे, मी गांवढळ माणूस. इथं थोरामोठ्यांच्या घरी आलोय. मोठमोठी माणसं येतात इथं. कुणाशी कसं बोलावं ते नीटसं कळत नाही मला. पुरुष दिसला की 'राव,' :'पंत' म्हणायचं— तसाच मोठा असला की, 'साहेब' म्हणायचं !– स्त्री असली की 'बाई' म्हणायचं, तशीच मोठी असली की 'बाई-साहेब' म्हणायचं— अधिकारी असला तर नुसतं 'साहेब' म्हणायचं, असं आपलं ठरवून टाकलंय मी. उगीच अपमान व्हायला नको कुणाचा. थोरामोठ्यांच्या घराला साजेल असंच वागलं पाहिजे ना ?

अखिल : तू बकिली करीत होतास तेव्हा असाच घाबरत होतास का सर्वांना ?

अप्पा : पण आता ती सवय सुटली ना ? गेली पाचसहा वर्षे शेतावर राबतोय. चुकूनमाकून असा शहरात येतो तेव्हा कुठं आठवण होते पूर्वीची– पण ती फार वर्षांपूर्वीची गोष्ट.

अखिला : म्हणजे आता तू पुन्हा केव्हाच येणार नाहीस इकडे ?

अप्पा : कशाला यायचं ? बरा सुखांत आहे माझ्या शेतावर.

अखिला : अन् लग्न केव्हा करणार आहेस आता ? शेतावर भाकर घेऊन यायला हवी ना कुणीतरी ? (तो अस्वस्थ होतो) कां ? घाबरलास ? भीति वाटते लग्नाची ?

अप्पा : (हात चोळीत) तसं काही नाही.पण इथं येतो मधूनमधून तेव्हा पाहतो इथल्या गमती.गल्लीतल्या कुत्र्यासारखी सारखी भांडत असतात ही इथली नवराबायको ! मोठी भीती वाटते या भांडणाची. सुखाचा जीव कशाला उगीच या भानगडीत घालू ? बरं चाललंय भूमातेच्या कृपेने.

अखिला : अगदीच गारठलेला दिसतोस त्या शेतावर गेल्यापासून.

अप्पा : असं झालंय खरं. पण झालय ते बरं झालंय. या इथल्या भानगडी जेव्हा पहातो—

[पार्वती येते. तिचा पोशाख अद्ययावत् आहे. तिचे वय तिशीपस्तिशीच्या दरम्यान असून मुद्रा मोठी करारी आहे. ती आत येते ती रागारागानेच. तडक त्या दोघांच्या अंगावरून आंतल्या घरांत जाऊ लागते. मागे वळते आणि त्या दोघांकडे पाहून थांबते.]

अखिला : हे आले साहेब– जज्जसाहेब ! अगदी तडक आत निघाली होतीस ?

पार्वती : मग ? घर आहे हे माझं ! माझं घर म्हणजे माझं घर ! माझा सरकारी बंगला ! माझ्या नवऱ्याचं घर नव्हे हे ! गुंड्या कुठं गेला ?

अखिला : गुंड्या गेलाय आंत. बैस ना ! की कपडे बदलायचेत ? हाच वाटतं तुझा ऑफिसचा पोशाख ?

अप्पा : तर काय कोट पाटलोण घालणार आहे ती ?

पार्वती : बोललास ? अजून तुझी जुनी दृष्टि निवळत नाही ! सारे वकील हे असेच.

अखिला : तुझे वकील देखील ?

पार्वती : माझे वकील नव्हे – माझा नवरा, नवरा म्हणे ! कसले हे नवरे ! नुसते जळताहेत मत्सराने. ये म्हटलं इकडे, तर म्हणे माझी कुळं वाट पहात असतील ! अन् मला नसतं का काम ? त्या खटल्यांच्या फायलींच्या राशी पडल्याहेत टेबलावर. एक भलं मोठं 'जजमेंट' लिहून काढायचंय आजच्या आज ! उद्या निकाल द्यायचाय त्या दाव्याचा. एवढं काम होतं तरीही म्हटलं, येऊन जा घटकाभर – तर म्हणे कुळं यायची आहेत !– हा माझा नवरा !

अप्पा : बसा ना साहेब !

पार्वती : (चिडून) साहेब ! चीड येते या साहेबगिरीची. मोठा भाऊ ना तू माझा ? तू देखील 'साहेब' म्हणू लागलास मला ?

अप्पा : वकील असतो तर 'मिलॉर्ड' म्हणणार होतो !

पार्वती : तोच लागलाय ना चुटका ! त्याचमुळं आग होतेय ही अंगाची. मी डिस्ट्रिक्ट जज—अन् हे वकील– मान झुकवावी लागते ना माझ्यापुढं ? सत्ता गाजवीत होते पूर्वी— ती आठवण सळसळतेय सारखी ! नवरे बरं हे– नवरे !

अखिला : मी आल्यापासून सारखी उभी आहे— कोणसुद्धा स्वतः बसत नाही की बसा म्हणून म्हणत नाही.

अप्पा : मी म्हटलं ना आता ?

अखिला : बसा म्हटलंत ते या साहेबांना— मला नव्हे. तुझे दावे येणार आहेत ना कोर्टात ! मी काय करणार आहे तुझ्यासाठी ?

पार्वती : कांही कुणाचा वशिला लागायचा नाही माझ्याकडे. म्हणून आज एवढा भडका उडाला तो !

अखिला : कसला भडका ?

पार्वती : कसला का असेना– (बसते) बैस. अन् तू का उभा राहिलास ?

अखिला : साहेब बसल्याशिवाय तो कसा बसेल ? (बसते)

अप्पा : असंच काही नाही. पण या असल्या खुर्च्यांकोचांवर बसायची माझी संवय आता मोडलीय्.

अखिला : मग घोंगडी आंथरू का इथं एक ?

अप्पा : तसंच काही नाही– तेवढी आहे पूर्वीची आठवण. (बसतो) पण हें चार दिवसांचं उसनं वैभव कशाला हवं मला नांगऱ्याला ?

अखिला : हो. खरंच ! बाबांचा फोन आला होता असं गुंडू म्हणाला मला.

पार्वती : येणार म्हणाले असतील मामा ! कशाला येतात हे माझ्याकडे ? उगीच लोकाचे डोळे फुटतात. किती झालं तरी मी सरकारी नोकर. ते आहेत मिनिस्टर-गृहमंत्री. नोकरांच्या घरी मंत्र्यांनी वेळी अवेळी येणं काही बरं दिसत नाही जगाच्या दृष्टीनं.

अप्पा : पण मामा आहेत ना ते आपले ?

पार्वती : हो,.... आहेत, म्हणूनच यायचं नाही त्यांनी इथं. उगीच लोकांचे डोळे फुटतात.

[आतून भय्यासाहेब यांचा आवाज–'मी म्हणतोय ना ये म्हणून ? ये पाहू मुकाट्यानं ' असा ऐकू येतो. त्यासरशी पार्वती उठून उभी रहाते. भय्यासाहेब विष्णुपंताला हाताला धरून ओढून आत आणतात. भय्यासाहेबांचे वय साठीच्या आसपास आहे. खादीचा सदरा, धोतर, नेहरू जाकिट, डोक्याला खादीची टोपी, हातात चांदीच्या मुठीची काठी, मुद्रा उग्र, मिशा मोठ्या,भुवया थोड्याशा करड्या झालेल्या. विष्णुपंताचे वय चाळिशीच्या आसपास आहे. त्याचा पोषाख अद्ययावत इंग्रजी पद्धतीचा आहे. आत पाऊल टाकताच तो डोक्याची टोपी काढून बगलेला घेतो.]

विष्णु : साफ सांगतो. मी येणार नाही. इथं पाऊलसुद्धा टाकायचं नाही मला. आपण वडील माणूस आहा.. तसेच या राज्याचे मंत्री आहा.... आपली अवज्ञा करायचा प्रसंग माझ्यावर आणू नका. (पार्वती तणतणत आत जाऊ लागते.)

भय्या : पार्वती ! मागं फिर, इकडे ये.

पार्वती : (आंतून) मी येणार नाही. (असे म्हणून आत दाराशी येऊन उभी राहते. अखिला हसू लागते.)

भय्या : हंसतेस काय अखू ? काय झालं हंसायला ?

अखिला : नाही म्हटलं— डिस्ट्रिक्ट जज्ज आहे ही— कांही 'डिगनिटी' ठेवील आपल्या जागेची असं वाटलं होतं मला.

विष्णु : (दात ओठ खाऊन) जात बायकांची ना !

पार्वती : हो – हो जात बायकांची– पण सरन्यायाधीश आहे मी !

विष्णु : त्या तिकडे– कोर्टात. इथं नव्हे.

पार्वती : होय ना ? मग का आला नाही मघांशी ? तेव्हा मी बोलावीत होते तुम्हाला, ती तुमची बायको म्हणूनच ना ? 'बार' मधल्या वकिलाला सरन्यायाधीश कधी बोलावीत नसतात आपल्या घरी.

भय्या : झालंय काय तुम्हां दोघांना आज ! रस्त्यात भेटलास विष्णु, मी इकडेच येत होतो, चल म्हटलं तरी ऐकेनास म्हणून बळेच तुला ओढून आणलं–

विष्णु : नाहीतर पायसुद्धा ठेवला नसता इथं, पण वडील माणसांचा शब्द—

अखिला : आणि तशांत मंत्रीमहाशयांचा —

विष्णु : इथं घरी कमले आले आहेत मंत्री ! वडिल माणसांचा शब्द कसा मोडायचा म्हणून आलो —

अखिला : अन् 'नाही नाही' म्हणत इथं येऊन बसलो. 'अग अग म्हशी मला का नेशी !' वाटच पहात होता कुणीतरी बोलावील म्हणून !

भय्या : तू गप्प बैस अखू– पारू. इकडे ये. बैस इथं. (पार्वती रागारागाने बसते.) काय झालंय आज ?

पार्वती : त्यांनाच विचारा.

विष्णु : कांहीं नको विचारायला. मीच सांगतो. तोंड दाखवायलासुद्धा जागा राहिली नाही मला. गेल्या दीड महिन्यात एकामागून एक तीन खटले बुडवले माझे हिनं.

पार्वती : मी नव्हे. – सरन्यायाधीशांनी.

विष्णु : म्हणजे हिनंच – तूच.

अखिला : म्हणजे तुमचं लग्न लागलंय ते पार्वतीशी की सरन्यायाधीशाशी ?

अप्पा : तू कशाला मधेच तोंड घालतेस अखिल ?

भय्या : तू गप्प बैस अखू. आधीच फुरसत मिळत नाही मला. विरंगुळा म्हणून घटकाभर इथं यावं तर तुमची ही भांडणं –

पार्वती : मग यांना कशाला घेऊन आलात बरोबर ?

भय्या : मला काय ठाऊक तुम्ही भांडला होता ते ?

पार्वती : आता कळलं ना ? घटकाभर सुखासमाधानानं बसायचं आहे ना तुम्हाला इथं ? मग द्या की यांना घालवून.

विष्णु : हे बायको बोलतेय बरं ! नवऱ्याला घालवून द्या, म्हणून बायको बोलतेय ! मी कुठं येत होतो ! बदनामी झालीय माझी साऱ्या 'बार' मधे, अशिलांचा देखील विश्वास उडू लागलाय माझ्यावरचा. हे असे दावे बुडाल्यामुळं त्यांना वाटतंय, की बेबनाव झालाय आम्हा दोघांचा म्हणून—

पार्वती : म्हणूनच म्हणत होते पहिल्यापासून, की इथं येऊन रहा म्हणून

विष्णु : माझं स्वतःचं घर टाकून ?

पार्वती : काय बिघडलं त्यांत ?

विष्णु : एकाच घरावर दोन पाट्या–एक वकिलाची आणि एक जज्जाची. त्या पाट्यासुद्धा भांडू लागतील एकमेकांवरोबर !

अखिला : आपण नाही रे बुवा लग्न करणार !

अप्पा : तुला जज्ज व्हायचंय का ? — मॅजिस्ट्रेट ? पोलीस सुपरिंटेंडेंट ? नाही ना ? मग काही लग्नाला भ्यायला नको.

[लक्ष्मी येते. तीही पार्वतीच्याच वयाची आहे. तिचा वेष पुरुषी थाटाचा आहे. खाकी ब्रिचीस, कोट, हातात बारीक पोलीशी छडी, खाडखाड बूट वाजवीत ती 'पार्वती, पार्वती ' म्हणून हाका मारीत आत येते.]

अखिला : आता ही आली ! रागातच आहे वाटतं !

लक्ष्मी : (इकडे तिकडे पाहून) बरीच मंडळी जमलेली दिसतेय !

अखिला : पांचापेक्षा जास्त माणसं–पकडणार आहेस का कुणाला ?

लक्ष्मी : हो हो ! पकडणार आहे ! दुसरा धंदाच नाही वाटतं मला ! धावाधाव ! पळापळ ! पकडापकड ! एवढींच कामं असतात आम्हाला !

भय्या : काय लक्ष्मी ? तू देखील चिडलेली दिसतेस. मोठा कठीण प्रसंग आला आहे हा माझ्यावर. माझ्याकडेच आली होतीस का ग लक्ष्मी ?

लक्ष्मी : तुमच्याकडे यायचं असलं तर येईन तिकडे ऑफिसात...नाही तर बंगल्यावर तुमच्या. मला कुठं माहीत होतं तुम्ही इथं आहांत ते ? मी आले होते पार्वतीकडे....

अप्पा : सरकारी नात्यानं की खाजगी नात्यानं ?

लक्ष्मी : (रागारागाने) थट्टा करतांहा माझी ! थट्टेचाच विषय झाले मी ! कुठली बुद्धि झाली मला....आणि...

भय्या : काय– झालंय काय असं ?

लक्ष्मी : तुम्हाला काय करायचंय त्याच्याशी– मी आलेय पार्वतीकडे.

विष्णु : मला कुणीच बोलू देत नाही.

अखिला : गरीब बिचारे ! नवऱ्यांच्या जातीला मोठे वाईट दिवस आणलेयत आमच्या सरकारनं.

अप्पा : तरी बरं.... जागा मूठभरच आहेत !

लक्ष्मी : (पार्वतीला उठवून तिचा हात धरून) चल, आपण आत जाऊ. इथं सारीच थट्टा होईल आपली.

पार्वती : चल. [दोघी आत जातत.]

विष्णु : तैंच हवं होतं तिला. तोंड कुठं आहे उत्तर द्यायला ? बुद्धिपुरस्सर माझा पाणउतारा करते.... सूड उगवतेय माझ्यावर ! मी नाकबूल करीत नाही– पूर्वी मी छळलंय तिला. एम्. ए. च्या परीक्षेला सुद्धा बसू देत नव्हतो. माझ्या मर्जी-विरुद्ध कॉलेजला जात होती म्हणून सारखा छेडीत होतो तिला. त्याचं उट्टं काढलं तिनं ! माझ्यावर मात करू पहातेय.

भय्या : पण आज काय झालंय असं रागवायला तुला ?

विष्णु : ही इथं राहाते. मी असतो माझ्या घरी. तिला म्हटलं तिकडे ये, कोर्टाचं काम संपल्यावर ये – तर तिला पटत नाही. मलाच म्हणते, इकडे या म्हणून. मिजास आलीय ना अधिकाराची ! पण मी नवरा आहे म्हणावं ! माझ्या घरी आलं पाहिजे तिनं. मी असं म्हणतो म्हणूनच माझे दावे बुडवतेय ती !

भय्या : काही आधार असल्याशिवाय ? हायकोर्ट आहे ना वर ? हायकोर्ट काही आंधळं नाही ! आमचे सरकारी हुकूमसुद्धा उलथून टाकताहेत हीं हायकोर्टं. नवी घटनाच आहे ना तशी ! खोटे निकाल दिले असतील तर फिरतील की हायकोर्टात.

विष्णु : फिरतील देखील– पण आज तर माझी अब्रू जातेय. हिची बदली करून टाका पाहू इथनं.

अखिला : मग तुम्ही काय करणार आहात ? दोन बायकांना बंदी झालीय कायद्यानं !

विष्णु : एका बायकोचा अनुभव आला तेवढा पुष्कळ झाला. पुन्हा भानगडीत कोण पडेल असल्या ?

अप्पा : एकादी अशिक्षित बाई शोधून काढा की !

विष्णु : अशिक्षित काय अन् सुशिक्षित काय, बायका तेवढ्या इथून तिथून सारख्याच. डोकं कसं भणाणून गेलंय. एक ही गेली पाहिजे इथनं, किंवा मला तरी पाहिला पाहिजे दुसरा कसला तरी उद्योग. कुठं तरी मुन्सफच करून टाका मला–

अखिला : पण तुम्ही कुठं तालुक्याला मुन्सफ म्हणून गेला अन् ही डिस्ट्रिक्ट जज्ज म्हणून आली तुमचं कोर्ट तपासायला–

विष्णु : हो, ते त्याहीपेक्षा वाईट.—नकोच ते. वेड लागायची पाळी आलीय अगदी. चीड येतेय् मला या आमच्या सरकारची. स्वराज्य आलंय म्हणे ! नवरा-बायकोंत वाकडं आणणारं कसलं हे स्वराज्य ! घटनासमितीवर मी असतो तर कारकुनीसुद्धा करू दिली नसती या बायकांना.

भय्या : नव्या राजवटींत नवे प्रयोग हे केले जायचेच. कुठंच नाही केलेला हा प्रयोग. आज तरी हा प्रयोग यशस्वी झालेला दिसतोय. वशिलेबाजी आणि लांचखोरी पुष्कळच कमी झालीय या बायका अधिकारावर आल्यामुळं. किती नेकीनं काम चालवलंय यांनी!

अखिला : पण त्यांच्या नवऱ्यांचं काय?

भय्या : तुला कशाला त्याची उठाठेव? तू काही अजून लग्न केलं नाहीस.

अप्पा : अन् केलं तरी तिला कुठं ही अडचण उत्पन्न होणार आहे? ही कांही गेली नव्हती नोकरी शोधायला. कुणातरी नोकराचीच–

अखिला : किंवा वकिलाची—

अप्पा : किंवा व्यापाऱ्याची—

विष्णु : किंवा शेतावर राबणाऱ्या एखाद्या नांगऱ्याची—

अखिला : हे मात्र मी ऐकून घ्यायची नाही इतका काही माझा जीव वर आलेला नाही. भर दुपारी फडक्यात भाकरी बांधून शेतीच्या मेरांवरून उड्या मारीत जायला मी काही कुणब्याची पोर नव्हे.

भय्या : हा अप्पा नांगर धरतोय हाती– तो कुठंय कुणवी?

अखिला : त्याला अवदसा आठवलीय. वकिली सोडून शेतावर राबतोय.

विष्णु : आता मी देखील तेच करणार आहे. वकिली सोडून शेतावर जाणार आहे.

अखिला : अन् नांगरसुद्धा धरणार का याच्यासारखा हातात?

विष्णु : हो हो! नांगरसुद्धा धरणार आहे! चिखल तुडवणार आहे! वेणणी, कापणी, मळणी देखील करणार आहे! या विटंबनेपेक्षा ते पत्करेल. मग त्या माझ्या चंद्रमौळी झोपडीत ही कशी येत नाही ते पाहीन.

भय्या : सारेच म्हणतात शेतावर जाणार म्हणून. आम्हीसुद्धा सांगत असतो. लोकांना– शेतावर जा म्हणून! पण नसा-नसांतून खेळलेला हा पांढरपेशेपणा मुस्कटदाबी करीत असतो आमची! त्यापेक्षा तू आपला कायद्याचाच आधार घे, विष्णु, सक्तीनं घरी राहायला लाव तिला. नाही तर धंदा तरी बदल.

विष्णु : त्यापेक्षा हिलाच सांगा ना राजीनामा द्यायला. चांगली चालत असलेली वकिली काय म्हणून सोडून द्यावी मी? (एकदम उठून आंतल्या दाराकडे डोकावून पुन्हा मागे फिरतो.) काय करताहेत दोघी आंत एवढा वेळ? तो शंकरराव देखील सबइन्स्पेक्टरच आहे आणि ही पोलिस सुपरिंटेंडेंट. बायकांच्या हाताखाली नवऱ्यानं काम करायचं! माझ्यापेक्षा देखील वाईट ते.

अखिला : म्हणजे ती त्याला जरबेंत ठेवते की काय!

विष्णु : कुणाला ठाऊक काय करते ती?

भय्या : तसं काही असतं तर तो चिडला असता. पण इथं तर हीच चिडून आलीय.

अखिला : मोठी गंमत आहे! कण्या घालून कोंबडी झुंजवतंय हे आमचं सरकार! बायकांची तारीफ होतेय म्हणून जळफळाट चाललाय पुरुषांचा!

विष्णु : आमची कर्म आम्हांला माहीत. पुरुषांच्या जातीत जन्म घेतल्याशिवाय नाही कळायचं तं तुला. आता काहीतरी दुसरा धंदा पाहिला पाहिजे आम्हाला! [वामनराव येतो. तोही विष्णुपंताच्या वयाचाच आहे त्याचा पोषाख इंग्रजी थाटाचा असला तरी तो फारसा व्यवस्थित नाही. सदा हंसतमुख असलेला, गडबड्या माणूस.]

अखिला : या वामनरावासारखा ....

वामन : माझ्यासारखा? औषधं विकायचा?

अखिला : अगदी तोच काही नव्हे...कापडविक्याचा...विडीवाल्याचा....

विष्णु : बूट-जोडेविक्याचा ....

अप्पा : हो....बूट - जोडे विक्याचासुद्धा! लक्षाधीश झाले आहेत कित्येकजण बूट - जोडे विकून ....

भय्या : पण बूट - जोडे विकून श्रीमंत व्हायला तयार होऊ का आम्ही लोक?

अखिला : हो...एकदा मंत्र्याची मिरास अनुभवल्यावर....

वामन : कोण कसा बसेल बूट विकायला दुकानांत? पण का निघाला होता हा प्रश्न आताच?

भय्या : आमच्या सरकारनं हा घोळ घालून ठेवलाय ना! माझ्या तीन बहिणींच्या तीन मुली. एक झाली डिस्ट्रिक्ट जज्ज, दुसरी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट अन् तिसरी पोलीस सुपरिंटेंडंट. एकीचा नवरा आहे वकील, पण बायकोनं आपला दावा बुडवला म्हणून तो भडकलाय्, दुसरी स्वतःच भडकून आलीय्! का ते अजून कळलं नाही ....

वामन : पण तिसरीचं मोठं मजेत चाललंय. तिथं भांडण नाही की तंटा नाही. काही खटका येत नाही एकमेकांचा. दोघांचे मार्ग अगदी वेगवेगळे, विष्णुपंत म्हणाले तेच खरं, धंदाच बदलला पाहिजे यांनी.

अप्पा : यांनी म्हणजे कुणी? नवऱ्यांनी की बायकांनी?

अखिला : अर्थात् नवऱ्यांनी.

विष्णु : नवऱ्यांवरच का तुझी संक्रांत? साऱ्या जगाचा इतिहास पहा....अगदी वेदकालापर्यंत जाऊन पहा...बायका त्या बायकाच! त्यांनी नुसतं चूल नि मूल संभाळायचं...प्रपंच नेटका करायचा. त्यांना कशाला हवेयत हे अधिकार मिरवायला? हे रशियाचं अनुकरण शोभत नाही आमच्या आर्यसंस्कृतीला.

अप्पा : आता आली ही आर्यसंस्कृती!

भय्या : पण हा वामनराव कुठं नाही तो तक्रार करीत ? अन् शंकरराव कुठं आलाय तक्रार करायला ? त्यानं तसं काही म्हटलं असतं–

[शंकरराव येतो. तो सब इन्स्पेक्टरच्या वेषात आहे. तोही चिडल्याचे दिसून येते आहे.]

शंकर : का माझं नाव निघालं होतं ?

अखिला : का ? तुमचं नाव कुणी घेऊच नये वाटतं ?

शंकर : घ्यावं. खुशाल घ्यावं– (दचकून भय्यासाहेबांना पाहून शिस्तीत सॅल्यूट करतो.) मी पाहिलं नव्हतं. आपण इथं आहात हे माहित नव्हतं मला.

भय्या : काही बिघडलं नाही त्यांत. मी इथं आलोय तो काही मिनिस्टर म्हणून नव्हे. आलो होते सुखासमाधानानं चार गोष्टी बोलायला. आजच तेवढी सवड मिळाली होती. पण इथं येऊन पहातो तो भडका उडालाय एकेकाचा. ही पार्वती रागांत होतीच– हा विष्णुपंत भडकून आलाय. ती लक्ष्मी आली धुसपुसत अन् दोघीहि आता आत जाऊन खलबतं करताहेत––

अप्पा : ती तिसरी सावित्री तेवढी यायची राहिलीय. अन् ह्या अखिलाचं लग्न झालं नाही म्हणून––

अखिला : म्हणून काय झालं ? मी कुठं तोंड बंद करून राहिलेय ?

अप्पा : पण तू तक्रार कुणाविरूद्ध करणार आहेस ?

अखिला : सगळ्या जगाविरुद्ध–विशेषतः या आमच्या भारताच्या सरकार-विरुद्ध. त्या सरकारचे हे एक प्रतिनिधी बसलेच आहेत की इथं.

अप्पा : त्यांच्याविरुद्ध ?

विष्णु : त्यांनी काय केलं ?

अखिला : का आले ते इथं ? भांडणारी सारी नवराबायको आज इथं गोळा होतील हे कसं त्यांना कळलं नाही ? कसे हे राज्य चालवणार आहेत ?

अप्पा : ज्यांनी यांना कळवायचं तेच भांडताहेत ! काय हो शंकरराव ?

शंकर : भांडायचं काय ? हे भविष्य कुठं कळलं होतं मला ? हा सब इन्स्पेक्टर झालो, त्यावेळी माझीच बायको माझ्या डोक्यावर येऊन बसणार आहे असे कुणा म्हापणकरानं सांगितलं असतं तर कशाला पडलो असतो या नोकरीच्या भानगडीत ? आज काय झालं माहीत आहे ?–नाही ? आलीय ना ती इथं ? सांगितलं नाही का तिनं ?

भय्या : रागारागात आली खरी, पण काहीसुद्धा न सांगता पार्वतीला घेऊन आत गेली.

शंकर : (रागारागाने बसत) मग मी तरी कशाला सांगू ? पुरुष आहे मी–नवरा आहे मी तिचा–नवरा या नात्यानं मला एक दर्जा आहे–एका परीनं मी वरिष्ठ आहे तिचा, ती वरिष्ठपणाची जाणीव मी का विसरावी ?

[लक्ष्मी आणि पार्वती आतून बाहेर येतात.]

लक्ष्मी : कुणी सांगितलं ती जाणीव विसरा म्हणून ?

शंकर : (चटकन् उठून शिस्तीत मुजरा करून रागारागाने) कोण म्हणतोय मी विसरलोय म्हणून ?

भय्या : मग सॅल्युट का दिलीस आता ?

शंकर : ते तिलाच विचारा.

भय्या : हे घर आहे, ऑफिस नाही.

शंकर : ते आपल्यासारख्यांना. पोलीसच्या नोकराला घर आणि ऑफिस दोन्ही सारखीच. रस्त्यांत देखील सॅल्युट द्यावी लागते वरिष्ठांना. (लक्ष्मी मोठमोठ्याने हंसते) हंसतेस काय ? लाज नाही वाटत हंसायला ?

अखिला : कोण बोललं हे ? नवरा की सब्इन्स्पेक्टर ?

शंकर : कसला नवरा अन् कसला सबइन्स्पेक्टर ? कर्मभोग आहे नुसता ! (रागारागाने बसतो)

विष्णु : डोळे निवले माझे ! आमच्या त्या 'मिलार्ड' पेक्षा हे फारच वाईट ! आता माझी तक्रार रद्द. बरं का भय्यासाहेब, माझी तक्रार रद्द.

वामन : बरं झालं, माझी तक्रारच नव्हती.

भय्या : पण झालं होतं काय असं ? का आली होती ही लक्ष्मी धुसपुसत ? काय ग लक्ष्मी ? काय बोलत होता इतका वेळ आत ?

पार्वती : आमच्या कर्मकथा ! असं हे रोज चालू लागलं तर पत्करलेली सरकारी जबाबदारी कशी पार पडणार आमच्या हातून ?

भय्या : पण झालं काय ते तरी सांगशील ! तू ग लक्ष्मी ....

लक्ष्मी : (जळफळत) सांगते. ऑफिसांतून मी बाहेर पडत होते. हे ड्यूटीवर होते....यांनी येऊन भर रस्त्यांत माझा हात धरला ! ....

अखिला : प्रत्यक्ष आपल्या बायकोचा हात धरला ! ....

लक्ष्मी : नाही—एका सबइन्स्पेक्टरनं पोलिस सुपरिंटेंडंटचा हात– आपल्या वरिष्ठाचा हात धरला. सारे कॉन्स्टेबल्स फिदीफिदी हसायला लागले.

अप्पा : विनयभंग !

अखिला : नाही.... कायदेभंग ! वरिष्ठाचा अपमान. वरिष्ठावर हात टाकला !

शंकर : थट्टा करायला बरं सुचतं तुम्हा लोकांना. आता तूच सांग अखिला, तू सबइन्स्पेक्टर असतीस आणि तुझा नवरा पोलिस सुपरिंटेंडंट असता —

अखिला : असल्या भानगडीत पडलेच नसते मी मुळी.

शंकर : पण घटकाभर समज, तसं काही असतं, अन् त्यानं साऱ्या शिपायांदेखत तुझा हात धरला असता—

अखिला : तर मला मोठा अभिमान वाटला असता. माझ्या वरिष्ठानं माझं कौतुक केलं, असं वाटलं असतं मला–

पार्वती : ही तुलनाच मुळी चुकली. ते तुमचे उदाहरण इथं मुळीच जुळत नाही शंकरराव.

भय्या : मोठा पेच आलाय हा ! नवरा या नात्यानं हात धरला तर बायकोला काहीच वाटायला नको, उलट अभिमान वाटायला हवा.... पण आपल्या नोकरांसमोर कनिष्ठानं वरिष्ठाच्या हातात हात घातला, तर त्या वरिष्ठाच्या दृष्टीनं कनिष्ठानं दर्जा बिघडवला, असं त्या वरिष्ठाला वाटणारच.

शंकर : (रागारागाने) म्हणजेच मी चूक केली असं आपलं म्हणणं ? ही बायको नव्हे का माझी ? (सारे हसतात) हसता काय ? माझ्या बायकोचा मी हात धरला.... आज घरी ये म्हणून मी तिला सांगणार होतो.... तो माझाच हात हिसडून टाकून हिनं सर्वांदेखत माझा अपमान केला. मला ' अटेन्शन ' मध्ये राहायला भाग पाडलं अन् आपण तणतण निघून गेली. कसला नवरा न् कसली बायको !

लक्ष्मी : यांत काय चुकलं माझं ? आता तुम्हीच सांगा मामा, यांना कवटाळून धरून जर मी निघून गेले असते, तर साऱ्या शिपाई लोकांत माझा काय बोज राहयला असता ?

भय्या : खरं आहे ते !

शंकर : खरं आहे काय ? आपण मंत्री आहा आमचे.... आपल्यासमोर एक सबइन्स्पेक्टर म्हणून बोलत नाही मी– आपला भाचेजावई म्हणून बोलतोय मी– गैर झालं होतं त्यात ?

लक्ष्मी : पोलिस म्हणजे पोलीस; शिस्त बिघडवता नये पोलिसखात्यांतल्या नोकरानं.

शंकर : हे मला शिकवतेय ही ! तुझ्यापूर्वी चार वर्षांपासून आहे मी या पोलिसखात्यांत !

लक्ष्मी : सबइन्स्पेक्टर म्हणून !

शंकर : हो हो, सबइन्स्पेक्टर म्हणून. सबइन्स्पेक्टर काय, सुपरिंटेंडंट काय, कमिशनर काय की कॉन्स्टेबल काय, इथून तिथून सारे पोलिसचे शिपाई. शिस्तीच्या बाबतीत तिथं भेद नाही कसलाच. आता या शिस्तीच्या गोष्टी पुरे झाल्या. आज येणार आहेस की नाही !

लक्ष्मी : त्या तुमच्या बराकीत ?

शंकर : माझं राहातं घर आहे ते.

लक्ष्मी : तुम्हीच या माझ्या बंगल्यार–माझं राहातं घर आहे ते !

शंकर : हे शेवटचं उत्तर तुझं ?

लक्ष्मी : अजून चहा आणला नाही तुझ्या बटलरनं, पार्वती ?

शंकर : (तणतणत) समजलो! कट आहे हा या बायकांचा! मुद्यावरून घसरायचं असलं की चहापाण्याच्या गोष्टी करतात या बायका. काही नको चहा कुणाला. आता तुम्हीच सांगा भय्यासाहेब ...

भय्या : असं पहा लक्ष्मी, काय बिघडेल तू तिकडे गेलीस तर ? किती झालं तरी तो नवरा आहे तुझा –

लक्ष्मी : किती झालं तरी पोलिस सुपरिंटेंडंट आहे मी – वरिष्ठ अधिकारी आहे. इन्स्पेक्टरच्या बराकींत मी–पोलिस सुपरिंटेंडंट जाऊ ? अन् तिथं राह्यला ? काय म्हणतील सारे पोलिस शिपाई सांगा ना तुम्हीच.

अप्पा : मोठं विकट कोडं आहे हे. भारताच्या सरकारने मोठा विलक्षण पेंच टाकलाय हा आमच्यासमोर. याला उपाय एकच–दोघांना एका जागी ठेवता कामा नये.

अखिला : दोघांनी एका जागी राह्यचं नाही–एका गावीसुद्धा राह्यचं नाही– मग लग्न कशाला करायचं ?

विष्णु : नवऱ्याच्या जातीच्या मुळावरच उठलंय आमचं हे सरकार ? माझी तरी तीच तक्रार होती ना !

पार्वती : इथं राहायला या म्हणून म्हटलं तर ते पत्करत नाही तुम्हाला. काय होईल इथं येऊन राह्यलांत तर ?

लक्ष्मी : मी नाही असं म्हणणार. माझ्या हाताखालचा इन्स्पेक्टर माझ्या बंगल्यावर येऊन राहू लागला–रात्रंदिवस राहूं लागला–तर माझा बोज कसा राहील चारचौघात ?

अप्पा : म्हणजे यानं तुझ्याकडे येता नये–तो बोलावतो आपल्याकडे तर तू जाणार नाहीस म्हणतेस–मग काय करणार आहात तुम्ही दोघं ? आता तुम्हीच सांगा मामा—

भय्या : काय सांगू मी ? आता दिल्लीच्या गृहमंत्र्यांना भेटल्याशिवाय कांही हे कोडं उलगडायचं नाही. तरी बरं, या वामनरावाची ती तक्रार नाही.

वामन : नाही हं. माझीसुद्धा ती तक्रार आहेच. पण ते असं आहे, मी काही कुणी अधिकारी नाही. एक व्यापारी आहे–केमिस्ट ! मॅजिस्ट्रेटच्या म्हणजे माझ्या बायकोच्या घरी मी वेळी अवेळी खेटे घालू लागलो तर त्यात उलट माझा बोज वाढतोच.

अखिला : होय ना,मग माझीसुद्धा तीच तक्रार आहे असं का म्हणाला तुम्ही !

वामन : ती जी माझी तक्रार आहे ती 'नवरा' या नात्यानं. 'व्यापारी' या नात्यानं. ते भूषणच आहे माझं. पण एवढं खरं, की कुठं तरी केव्हा केव्हा मनाला

डिवचतेच ही गोष्ट. म्हणजे समजा, उद्या ही बदलून दुसऱ्या गावी गेली, म्हणजे काय हा धंदा सोडून मी तिच्यामागे जाऊ ?

अप्पा : मग बायकांनी मुळी नोकरीच करू नये, असं का म्हणणं आहे तुमचं ?

वामन : काय आमचं म्हणणं आहे ते आमचं आम्हालाच समजेनासं झालं आहे !

विष्णु : अगदी बरोबर—

वामन : कुणाच्याच कल्पनेत नसलेली ही एक अगदीच नवीन परिस्थिती निर्माण झाली आहे.

भय्या : अगदी हेच आहे माझं म्हणणं. इतक्यांतच दोन्ही पक्षांनी उतावीळ होणं बरं नव्हे. प्रत्येकानं थोडी पड खाल्ली पाहिजे,

शंकर : पण मी काय करू ? ही माझ्या घरी येत नाही– अन् मला आपल्या घरी येऊ देत नाही–

लक्ष्मी : शट अप !

शंकर : (पाय जुळवून ताठ उभा राहून सॅल्यूट करतो आणि पुन्हा बसतो.) अशी ओढाताण चाललीय माझी. अनुभवाशिवाय कळायचं नाही ते कुणाला. या विष्णुपंताना ती तरी अडचण नाही. नुसतं कोर्टात समोर उभं रहावं लागतं तेवढंच.

विष्णु : तेवढंच म्हणे ! ते काय थोडं झालं ? पार्वती ! तुला यायचंय की नाही माझ्या घरी !

पार्वती : हा सरकारी बंगला आहे. इथंच राह्यलं पाहिजे मी. इथं यायला तुम्हाला का कमीपणा वाटतो ? हे तुझं, हे माझं असं का मनात येतं तुमच्या ? वरिष्ठ-कनिष्ठपणाची कल्पना का भेडसावते तुम्हांला ? दोघांचाही– नवरा अन् बायको या दोघांचाही दर्जा एक आहे असं निश्चित करून का वागत नाही तुम्ही ?

विष्णु : समजलो ! तुझा हट्ट तुला सोडायला नको आहे. मी पुरुष आहे. तुझ्यापेक्षाही हट्टी आहे म्हणावं. तू माझी बायको आहेस. तू माझ्या आज्ञेत राहिलं पाहिजेस.

अप्पा : एकमेकांनी एकमेकांच्या आज्ञेत राहिलं पाहिजे–

अखिला : म्हणजे कुणीच कुणाच्या आज्ञेत राह्यचं नाही. !

विष्णु : बस्स झालं. नुसती थट्टा चालवलीय सर्वांनी. हा एक फकीर अन् ही एक साळकायी– लग्न झालं नाही म्हणून सुचतेय ही थट्टा. यापुढं मला काहीसुद्धा सांगायचं नाही. ऐकलंस पार्वती, यापुढं तुझी माझी भेट कोर्टात !

लक्ष्मी : वादी–प्रतिवादी म्हणून की वकील–न्यायाधीश म्हणून ?

अखिला : काडीमोडीपर्यंत येणार आहे हे प्रकरण !

अप्पा : कुणी सांगावं, एक वकील, एक न्यायाधीश. दोघेही कायदेबाज

भय्या : गप्प बसा सारीजणं.स्वस्थ बसून ऐकत होतो आतापर्यंत.या राज्याचा एवढा मंत्री मी— गृहमंत्री– केवढे बिकट अन् किचकट प्रश्न रोज सोडवावे लागताहेत मला. पण हे माझ्याच घरातलं तिरपागडं मला कसं उजू करता येणार आहे कोण जाणे !

अखिला : आता पुढं कसं होणार आहे तुमचं बाबा ? कसं चालवणार आहात हे राज्य ?

वामन : मोठं बिकट कोडं आहे हे ! तरी बरं, की माझ्या घरी ही असली काही भानगड नाही ! या असल्या नोकऱ्या देतांना सरकारनं आधी नवरा बेकार आहे की काय, हे पाह्यलं पाहिजे. बेकार नवरा असला की मुकाट्याने घरी राहील पाळीव कुत्र्यासारखा.

शंकर : म्हणजे आम्ही नोकरी सोडून स्वस्थ घरी बसावं, असं का तुमचं म्हणणं ?

वामन : का सोडू नये ? भरगच्च पगार मिळतोय की हिला –

अप्पा : खरंच, यापूर्वी या बायका चूल अन् मूल सांभाळीत बसतच होत्या की घरी—

अखिला : म्हणजे पुरुषांनी आता चूल अन मूल सांभाळीत घरी बसावं होय ?

अप्पा : असं कुठं म्हटलं मी ? पुरुषांनी 'एम. एल. ए.' व्हावं, 'एम्. पी.' व्हावं अन् फुरसतीच्या वेळात घरसंसाराकडेही पहावं. पुरुषाचा दर्जाही राहील अन भांडणंही टळतील.

भय्या : हे मात्र अगदी ठीक बोललास.

[सावित्री येते. तिचा पोषाख पांढरा शुभ्र आहे. ती आत येतांना सर्वांवर एकदा नजर टाकते आणि क्षणभर थांबते.]

भय्या : तूही आलीस का सावित्री ?

सावित्री : मीही म्हणजे काय ? ते राहू द्या. तू आहेस ना इथं लक्ष्मी ! पार्वती, चल जरा आपण आत जाऊ. (त्या दोघींना घेऊन आत जाऊ लागते.)

अखिला : मीही येऊ का ?

सावित्री : कशाला !

अखिला : खलबतं करायला.... तुमच्याबरोबर.

सावित्री : शहाणी आहेस ! .... बैस तिथं.... चला ग.

[लक्ष्मी पार्वतीला घेऊन जाते]

अप्पा : हा लग्न न झाल्याचा परिणाम ! बरं का अखिल, तुझा समावेश व्हायचा नाही त्यांच्यात.

वामन : माझ्याकडे बघितलंसुद्धा नाही !

विष्णु : मॅजिस्ट्रेट जागा झाल्यासारखा दिसतो ! काय आहे ही भानगड ?

शंकर : मोठी भयंकर आहे ही भानगड !

वामन : काय आहे ? तुला माहीत आहे ?

शंकर : ते आता कळेल आपोआप.

अप्पा : पोलिसचा बच्चा आहे तो—असा सांगायचा नाही.

भय्या : काय आहे रे शंकरराव ?

[तिघीही बाहेर येतात. सावित्री भय्यासाहेबांच्या शेजारी जाऊन उभी राहते.]

काय आहे ग ?

सावित्री : मला एक प्रश्न विचारायचा आहे.

भय्या : सरकारी की खाजगी ?

सावित्री : तसं म्हटलं तर सरकारीच ! मला असं विचारायचं आहे—एकादा माणूस आजारी आहे.... (वामनराव अस्वस्थ होतो. शंकरराव गालातल्या गालात हसतो.) त्या औषधाची किंमत आहे वीस रुपये.... पण एखाद्या औषध-विक्यानं अडवून जर त्याचे तीनशे रुपये घेतले, तर काय शिक्षा कराल तुम्ही ?

भय्या : बिसाऐवजी तीनशे रुपये घेतले ?

सावित्री : काय करील बिचारा ! घटका पळं जात होती. नाकाशी सूत धरलेलं. माणसाच्या जिवापेक्षा पैसे जास्त वाटतात का अशा वेळी ? चटकन् माणूस पैसे देऊन टाकतो— पण ते पैसे घेणाऱ्या माणसाला—

भय्या : फाशीचं दिलं पाहिजे....

अखिला : बाबा....

विष्णु : कायद्यात तशी शिक्षा सांगितलेली नाही.

भय्या : नसली तर तसा नवा कायदा करून घेतला पाहिजे. हा बुद्धीपुरस्सर खून आहे धडधडीत.

सावित्री : या गृहस्थानं केला आहे तो गुन्हा.

अप्पा : कुठल्या गृहस्थानं ?

सावित्री : (वामरावाकडे बोट करून) या गृहस्थानं....

अप्पा : तुझा नवरा आहे ना तो ?

सावित्री : गप्प बैस. सांगा मामा, काय करायचं अशा वेळी ? (भय्यासाहेब स्तब्ध रहातो) बोला ना– गृहमंत्री आहांत तुम्ही.

भय्या : (वामनरावाला) खरं आहे हे ?

वामन : (घाबरून हंसण्याचा प्रयत्न करीत) वाटेल त्यानं वाटेल ते बोलावं....

भय्या : वाटेल त्यानं का ? तुझी बायको आहे ती. आपल्या नवऱ्यावर खोटा आळ घ्यायची काय जरुरी आहे तिला ? मोठं सुखी जोडा आहे आमचं असं तूच म्हणत होतास ना आता ? .... (सावित्रीला) कुणी पकडली ही 'केस' ?

शंकर : मी !

लक्ष्मी : तुम्ही ?

शंकर : होय, मी !....मी ताबडतोब मॅजिस्ट्रेटसमोर दाखल केली. हे नव्हते त्यावेळी दुकानी....

वामन : मग मी गुन्हेगार कसा ?

शंकर : ही काही पहिलीच केस नव्हे, आणखीही सज्जड पुरावा मिळालाय मला....

भय्या : (सावित्रीला) तुझ्यासमोर आलाय का हा खटला ?

सावित्री : हो.

भय्या : मग काय करणार आहेस ?

विष्णु : आम्ही ही 'केस' बदलून घेऊ ? काही काळजी करू नका, वामनराव, मीच चालवीन तुमचा खटला.

अखिला : फुकट ?

विष्णु : हो हो, फुकट. एक दमडीसुद्धा घ्यायचा नाही. उलट्याचं पालटं करून टाकीन. काय समजल्यायत या बायका ?

पार्वती : (विष्णुपंताला) ही 'केस' चालवणार तुम्ही ?

विष्णु : हो हो. कुणाची भीति आहे की काय मला ? माझा धंदाच आहे तो. खोट्याचं खरं अन् खऱ्याचं खोटं करता आलं नाही तर वकिली कशाला करायची ?

पार्वती : सर न्यायाधीशाचा नवराच बोलतोय का हा ?

विष्णु : नाही.... एक वकील बोलतोय. चला वामनराव....

भय्या : थांबा वामनराव.... हा आरोप खरा आहे ?

विष्णु : एक शब्दसुद्धा बोलू नका. उद्या तोच पुरावा म्हणून आणतील. या. अन् शंकरराव, तू केलंस हे काम ? काहीसुद्धा वाटलं नाही तुला ? खरं असलं तरी दाबून टाकायची असली 'केस.'

शंकर : स्वतंत्र भारतातला पोलिस ऑफिसर आहे मी !

अप्पा : ऐक लक्ष्मी (लक्ष्मी स्तब्ध उभी असते.)

विष्णु : आता क्षणभरसुद्धा इथं थांबायचं नाही. चला वामनराव.

पार्वती : ती चूक होतेय ! गुन्ह्याला मदत करणारा देखील गुन्हेगारच ठरतो.

विष्णु : मी मदत नाही करीत– सोडवणूक करणार आहे. गुन्हा शाबित झाल्याशिवाय कुणीच गुन्हेगार नसतो कधी.

पार्वती : हे घर वर्ज्य होईल ! ....

विष्णु : आता तरी कुठं खुलं आहे ? चला वामनराव. [दोघे जातात.]

पार्वती : थांबा–आधी ऐकून घ्या माझं. [त्याच्या मागोमाग जाते.]

भय्या : आता तू काय करणार आहेस सावित्री ? 'केस' दुसऱ्या मॅजिस्ट्रेटकडे द्यायला सांगणार आहेस ?

सावित्री : मी का सांगू ? माझं कर्तव्य मला बजावलंच पाहिजे. त्यांचं ते पाहून घेतील ! कशाला गेली ही पार्वती ? कर्तव्यापुढं मला नात्याची पर्वा नाही. [जाते.]

लक्ष्मी : (पुढे होऊन शंकरावाच्या पाठीवर थाप मारून) शाबास इन्स्पेक्टर शंकरराव ! –

शंकर : (सॅल्यूट करून पुन्हा तिचा हात धरीत) नुसती शाबासकी ?

लक्ष्मी : हाताखालच्या नोकराला वरिष्ठ अधिकारी यापेक्षा काय देणार ? (ती दरवाजाकडे जाऊ लागते.)

शंकर : अन् नवऱ्याला ?

[लक्ष्मी जात असतांना दाराजवळ थांबते. शंकररावाकडे पहाते आणि एक डोळा मिचकावते.]

लक्ष्मी : आज येणार आहे मी.

शंकर : कुठं ? माझ्या बराकीत ?

लक्ष्मी : होय–– म्हणजे इन्स्पेक्टरच्या बराकीत सुपरिंटेंडेंटसाहेब येणार नाहीत–– समजलं ?– लक्ष्मी आपल्या नवऱ्याच्या घरी येणार आहे आज.

[हसत डोळे मिचकावीत जाते. शंकरराव अप्पासाहेबाला मिठी मारतो.]

शंकर : अप्पा–अप्पा, कर्तबागारीची कुठं खरी कदर असेल तर ती आमच्या या भारताच्या पोलिसखात्यातच ! (त्याची मिठी सोडून हातातली काठी फिरवीत, शीळ घालीत जवळ जवळ नाचत नाचतच जातो !)

भय्या : लाचलुचपत नाहीशी व्हायला पाहिजे असेल तर या बायकांच्याच हाती आधिकाराची सूत्रं दिली पाहिजेत.

अखिला : (अप्पाला) तुमचं काय म्हणणं आहे हो ब्रह्मचारीबुवा ?

अप्पा : नव्या भारताच्या नव्या राजवटीत ज्याला अधिकाराची जागा घ्यायची असेल त्यानं या लग्नाच्या भानगडीत पडू नये.

भय्या : पुरुषानं की स्त्रीनं ?

अप्पा : दोघांनीही ! —

(पडदा)

॥ १ ॥



जरठ

(माणसाच्या जीवनातील सात अवस्थांचे दर्शन घडविणारी श्रुतिकामाला मामा वरेरकरांनी आकाशवाणीसाठी लिहून सादर केली होती. त्यांतील ही एक श्रुतिका. मामा हे आकाशवाणीवरील श्रुतिनाट्याचे जनक आहेत.)

(मुलांचा गलबला ऐकू येतो. काही धडे वाचीत आहेत, काही कविता म्हणत आहेत, आणि काही उगीच आरडाओरडा करीत आहेत. दार धाडकन् उघडून मंजिरी येते.)

मंजिरी : अरे गप्प रहा म्हणते ना ? काय आरडाओरडा चालवलाय, इकडे खोलीत आजोबांचा डोळा लागलाय....ते जागे होतील ना ? काय हे रमेश, ऐकू येतंय की नाही ?

रमेश : कुणाला ? मला की आजोबांना....

मंजिरी : तुला–तुला....कुठल्या कविता म्हणतोयस त्या. मघांपासून सांगतेय, की आजोबा जागे होतील....

रमेश : नाही व्हायचे....

मंजिरी : या तुमच्या आरडा ओरडीनं कुंभकर्णसुद्धा जागा होईल.

रमेश : हो.... हो.... पण आजोबा नाही जागे व्हायचे. त्यांना ऐकू कुठं येतंय...

मंजिरी : आता पहा हं रमेश....(शांतपणे) असं बोलू नये रमेश, आता वय झालंय त्यांचं, तसं थोडंसं कमीसुद्धा ऐकूं येत असेल....पण आपण म्हणू नये तसं...

रमेश : का म्हणू नये ? खरे आहे ते बोलायला कसली भीती ? आणि भ्याचं तरी का म्हणून ? मी अगदी मोठ्यानं ओरडणार. (ओरडून) आजोबांना ऐकू येत नाही.... ऐकलंत रे ? अन् तू ग बबे, आजोबांना ऐकू येत नाही....

सुरेश : हो, हो.... ऐकलं, आम्हाला ठाऊक आहे ते, तू नको काही सांगायला. आजोबांचे कान फुटलेयत ते चांगलं माहीत आहे आम्हाला.

बबी : हे काय बरं सुरेश, असं म्हणू नये.... ऐकलंस ना आताच आई काय सांगत होती ती ?

सुरेश : हो, हो ऐकलं.... तू नको मला शिकवायला. मोठी आजी बाईच आली की नाही.... लाडकी आहेस ना आजोबांची....

मंजिरी (दटावून) सुरेश.... सुरेश....

सुरेश : दटावतेस कशाला ? आहेच मुळी ती लाडकी.... चढवून ठेवली आहे डोक्यावर.... वाटेल त्याला वाटेल तशी बोलते....

मंजिरी : कोण बोलतंय ? बबी का ? छान.... वाटेल त्याला वाटेल तसं कोण बोलत असलं तर तो तू....

रमेश : अन् रमेश नाही का बोलत ?

मंजिरी : हो, तो सुद्धा तसलाच....

रमेश : अन् शहाणी काय ती ही बेबी.... ऐक सुरेश.... आजोबांचीच नुसती नाही आईचीसुद्धा लाडकी आहे ती... मुलगी आहे ना.... आमच्यासारखा मुलगा नव्हे.... मुलगे तेवढे सारे वाईट अन् शहाण्या काय त्या मुली.... तरी बरं तो अक्का पळून गेली कुणाबरोबर....

मंजिरी : (दटावून) रमेश....

रमेश : मग खोटं की काय ? काय भीती की काय बोलायला.... मी सत्यवादी आहे वसंतकाकासारखा....

बबी : पण अहिंसावादी आहेस कां त्यांच्यासारखा.

रमेश : ती अहिंसा नाही पटत बुवा आपल्याला. आपण नुसतं खरं तेवढं बोलतो

सुरेश : तोंड पहा खरं बोलणाऱ्याचं. परवा आजोबांच्या धोतराला मेलेला उंदीर बांधलास तू...अन् आळ घेतलास माझ्यावर...तोंड तर बघा सत्यबाबाचं...ही बबी होती साक्ष द्यायला म्हणून बरं, नाही तर बाबांनी माझाच पिट्टया पाडला असता.

रमेश : मग खोटं होत की काय ? वल्ली कुणाची ? तुझीच ना ? उंदीर बांधला मी.... आणून दिला मन्यानं, ते सांगितलं नाही ते हा सत्यवादी बबीनं !

बबी : असं का ! मन्यानं आणला होता की तो उंदीर.... आता येऊ देत बाबा म्हणजे सांगते त्यांना....

रमेश : सांग ना कोण भीतय बाबांना. मी काही कारकून नाही त्यांच्या ऑफिसांतला.

मंजिरी : आता गप्प रहाल कारे... बाई बाई बाई, शर्थ झाली या पोरांपुढे. बबे, तू जा पाहू इथनं. तिकडे आजोबांकडे जाऊन बैस जा. या नष्ट पोरांच्या संगतीला राहू नकोस तू.

सुरेश : हो हो हो, आम्हा नष्ट पोरांच्या संगतीला राहू नकोस तू. बिघडायचीस कदाचित आक्कासारखी.

मंजिरी : (दटावून) सुरेश.

सुरेश : हो, हो, हो,.... ऐकू येतंय मला, माझे कान काही फुटले नाहीत आजोबांसारखे....

मंजिरी : आता किती सांगायचं तुम्हाला. काही वडील माणसांचा आदरच नाही का रे तुम्हा पोराना ?

सुरेश : आदर कसला असायचा ? आजोबा काय ? आहेत म्हणजे आहेत. बोलता येत नाही, ऐकता येत नाही, चालता येत नाही, येतंय काय ते एकच.... बडबायला येतं आम्हा मुलांना... उठल्या सुठल्या बडबू लागले असे तर आदर कसा राहील....

मंजिरी : अन् तुम्ही त्यांना त्रास देता तो.... पहायला हवी होती पूर्वी तुम्ही त्यांची कारकीर्द....भीत होते सारे लोक त्यांना.... उगीच नाही रावबहाद्दुर झाले.... जा आता, कळली तुमची अक्कल.

सुरेश : माझे धडे पाठ करायचे आहेत. टी. एच. आर. ओ. यू. जी. एच. थ्रो. म्हणजे फेकणे.

रमेश : आता ऐका.... अरे थ्रू–थ्रो नव्हे थ्रू.... थ्रू म्हणजे मधून....

सुरेश : हो कळलं.... आमचं आपलं थ्रोच आहे तेच आहे बरोबर.... तू आपल्या कविता म्हण तुझ्या....

रमेश : मी म्हणेन नाही तर नाही म्हणेन, तू कोण मला सांगणार ?

मंजिरी : मी सांगतेय....ते धडे नकोत अन् त्या कविताही नकोत. जा पाहू इथून...

रमेश : नाही जात ? तू कोण सांगणार आम्हाला....बाबांनी सांगितलं तर ऐकू आम्ही....

बाबू : (धुरून येत) हो मी सुद्धा सांगतोय....काय चांडाळ कारटीं आहेत.

मंजिरी : हो, आपल्याच लाडाचे परिणाम....म्हणे पोरांना बोलू नका...आता कोण बोलतंय ?

बाबू : हो हो हो–मीच बोलतोय....पण का बोलतोय, तू बोलली असशील त्यांना काही तरी, अन् मग ती पिसाळली असतील. म्हणून बोलावं लागतंय मला...

बाळा : (दुरून पुटपुटत येत) कोण ते ? बाबू का ? अरे कसली भुणभुण लावलीस ? जरा डोळा सुद्धा लागू देत नाहीत, म्हटलं असतील पोरं.... ही तुम्हीच नवरा बायको भांडता....

बाबू : भांडत नाही बाबा, मुलं ओरडत होती, त्यांना दटावत होती ही...

बाळा : कुणामुळं काय झालं... अरे हे व्हायचंच. तुम्ही आता काही लहान नाही.... तेव्हा भांडत नव्हता, आता भांडू लागला. अन् म्हणतो हिच्यामुळं भांडतो मी. कायरे असंच म्हणालास ना ? (मुले लांबून खी खी करून हसतात... त्यांना बबी शुक शुक करून दटावते)

मंजिरी : (त्यांच्या कानाजवळ ओरडून) माझ्यामुळं नव्हे....
म्हटलं ही मुलं गोंगाट करीत होती....

बाळा : घुंगुट पांघरून झोपली होती वाटतं.... कोण ? बबी का ?

बाबू : (कानाजवळ ओरडून) नाही म्हटलं, दंगा करीत होती मुलं....

बाळा : असं होय ? मुलं दंगा करीत होती. अरे मुलंच ती, दंगा करणारच. परवा उंदीर बांधला माझ्या धोतराला त्या रम्यानं....

रमेश : (ओरडून) नाही आजोबा, मन्यानं बांधला तो उंदीर....

सुरेश : (ओरडून) नाही आजोबा, मन्यानं बांधला नाही, मन्यानं आणला

बबी : अन् सुरेशनं बांधला.... मी पाहिलं.... सुरेशनंच बांधला....

बाबू : (हळूच दटावून) बरं, बरं कळलं, आता उगी रहा, पुन्हा संतापतील बाबा.

बाळा : काय रे कुजबुजताहा ? ऐकू येत नाही ना मला....बोला काय वाटेल ते....(बोबड्या वाणीने) हरे खळहारे शिव, शिव, शिवानाम् कलकलः

रमेश : (वेडावून) हले लयब्दाले–

बबी : (दटावून) रमेश, वेडावणं दाखवतोस का आजोबांना ?

मंजिरी : आता तुम्ही जा पाहू इथनं....

रमेश : नाही जात जा....

सुरेश : तू कोण आम्हाला सांगणार जा म्हणून....

बाळा : बबे....इकडे ये, कोण ओरडतंय ते ?....ती गिरदी घे पाहू तिथली अन् ठेव या माझ्या मानेखाली....(सुस्कारून) राम, राम, राम, राम.

सुरेश : लाम्, लाम्, लाम्, लाम्, लाम्,

बाबू : गप्प बैस....

सुरेश : का म्हणून ? म्हणतातच तसं ते....

बाबू : म्हणून वेडवायचं का त्यांना ?

सुरेश : वेडावलं कुठं कुणी ? आपलं तसंच म्हटलं एवढंच....

बाबू : बरं, बरं, पुरे झालं. जा आता....

(दोघेही खिदळत हसतात)

बाबू : आता पहा हं.... अशी भडकावीन थोबडीत... मंजिरी ....

मंजिरी : आता जा एकदा माझे आई....

बाळा. : काय म्हणालीस ?

मंजिरी : (कानाशी ओरडून) म्हटलं कोको आणू का ?

बाळा : आँ....

मंजिरी : (ओरडून) कोको आणू का म्हटलं ?

बाळा. : कोको होय.... नको आता, आज काळजांत अगदी कससंच होतंय. मळमळल्यासारखं वाटतं.... वसंत आला होता का ?

बाबू : नाही बाबा....

बाळा. : किती दिवस झाले.युगावर युगं गेली, पण वसंत काही येत नाही.

बाबू : (हळूच मंजिरीला) आता यांना कसं सांगायचं की तो तुरुंगात आहे म्हणून.

बाळा. : काय म्हणालास ?

बाबू : नाही म्हटलं त्याला बोलवायला पाठवतो....

बाळा. : कुठं पाठवलंस त्याला ? जीव कसा कासावीस होतोय...लोक नाव घेतात त्याचं....अन् मी चांडाळानं त्याला घराबाहेर घालवला. आता वाईट वाटतं.... पण तेव्हा ते काही जाणवलं नाही....रावबहादूर आहेना मी....अन् तो सारख्या वाऱ्या करीत होता तुरुंगाच्या...काय म्हणालास ?

बाबू : काही नाही मी म्हटलं, वसंताची काही काळजी करायला नको. त्याच्या उलाढाली असतात फार....

बाळा. : काय म्हटलंस ?

बाबू : (थोडं मोठ्यानं) म्हटलं त्याच्या उलाढाली असतात फार. त्याला निरोप पाठवलाय....

बाळा : आँ....

बाबू : त्याला निरोप पाठवलाय म्हटलं..

बाळा. : बरं, बरं, काय म्हणत होतो मी.. आज अगदी चमत्कारीक होतंय मला. कसं कालवल्यासारखं होतंय आतून. मंजू कुठं आहे ?

मंजिरी : इथंच आहे ना मी..

बाळा. : आहेस ? बरं बरं, दिसत नाही चांगलंस मला.. ते तेव्हा मोतिबिंदूचं ऑपरेशन केलं तेव्हा दिसत होतं. साधारणसं वाचीत होतो देखील. तेव्हा आता हे वाचता येत नाही.. कुणाकडून वाचून घेईन म्हटलं तर ऐकू येत नाही.. कोण माझ्या कानाजवळ येऊन ओरडणार.. हं: काय होतंय मला असं आज ! वसंत नाही आला ?

बाबू : येईल आता तो...

बाळा : बरं झालं असतं तो आज आला असता तर.. तेल संपत आलेला दिवा हा.... कुणी सांगावं.. फटकन् मालवायचा कदाचित.

(गहिवरून) वसंत यायला हवा रे....फुकट गेलं हे आयुष्य. काय केलं जन्माला येऊन ? जन्माला आलो; शाळेत गेलो, पुढे कॉलेजात गेलो, लग्न केलं आणि नोकरी पण केली, रावबहादूर झालो, पेन्शन घेतलं. अन् आता केव्हा तरी जाईन मरून. जगाच्या हिशोबात कुठंच जमेला आलो नाही. किती जण जन्माला आले.... कितीजण मरून गेले... त्यांतलाच एक मी.... तोच वसंत पहा (क्षणभर थांबून, हुंदका देऊन) वसंताचं नाव जगांत गाजलं पण त्याला मी नुसता मुक्या बोलाचा आशीर्वादसुद्धा दिला नाही कधी..... कसलं हे माझं जिणं....कशाला जन्माला आलो मी ? नुसता सरकारी गोष्या वाहणारा बैल होऊन बसलो होतो.....

बाबू : आता जरा स्वस्थ पडता का ?

बाळा : काय म्हणालास ?

बाबू : जरा पडा म्हटलं बिछान्यावर ....

मंजरी : मी हात देऊ का ?

बाळा : काय म्हटलंस ....

मंजिरी : म्हटलं मी हात देऊन नेऊ का बिछान्यापर्यंत ?

बाळा : नको, नको, मरायचं असलं तर असं खुर्चीत बसून मरेन मी. बिछान्यावर नाही की घोंगडीवर नाही...हं तू हात देणार मला. तुझ्या लग्नाला आम्ही विरोध केला .... तेवढं तरी सत्कार्य केलं बाबूनं .... तसलं काहीसुद्धा घडलं नाही माझ्या हातून....देशाची सेवा केली नाही. समाजाची सेवा केली नाही. फुकट गेलो जन्माला येऊन. तेवढं तरी केलं. वसंतानं मात्र शहाण्यांच्या घराण्याचं नाव अजरामर करून टाकलंय....आला नाही वसंत ? (काकुळतीला येऊन) वसंत केव्हा येणार आहे ग मंजू ?

मंजिरी : येतील आता....आता जरा स्वस्थ पडायचं....ही उशी देते मानेखाली. आता काही बोलायचं नाही....ऐकलं ? आता काही बोलायचं नाही....

बाळा : बरं, बरं, तुझी आज्ञा प्रमाण. ती गेली आधीच. सौभाग्यनिशी गेली आपल्या. मोठं प्रेम होतं आमचं एकमेकांवर....त्या प्रेमाची खरी किंमत कळली असा म्हातारा झालो तेव्हा. पण ते सुख देखील नव्हतं नशिबी. तू आहेस, (गहिंवरून) सून खरी पण मुलीसारखी....या दुसऱ्या बाळंतपणात आईसारखी सेवा करतेयस माझी, ईश्वर कल्याण करू दे तुझं.

बाबू : आता डोळे मिटून पडा जरा उगीच....

बाळा : आता तेवढंच राहिलेय....डोळे मिटायचे ....

मंजिरी : असं अभद्र काय बोलायचं ते ....

बाळा : काय म्हटलेस ? अभद्र होय .... (हसायचा प्रयत्न करून) कसलं आता अभद्र. कंटाळा आलाय आता जगायचा. जन्मभर अभिमानानं मिरवलो.... आता उठायचं म्हटलं तर हात धरावा लागतो दुसऱ्याचा. हे दुबळं जिणं जितकं लवकर संपेल तितकं बरं....वसंत कसा आला नाही अजून ?

मंजिरी : आता एक शब्दसुद्धा बोलायचा नाही. कळलं ? मुकाट्याने डोळे .... (जीभ चावून) शांतपणे अगदी पडून रहायचं ...

बाबू : थांबा हं .... मी जरा ही घेतो सारखी करून, अस्सं .... अशी मान ठेवा इथं ... (त्याचा श्वास मोठ्यानं वाहू लागतो ... घाबरून) बाबा, बाबा, आता यहा जर, इकडे, असं काय करतात हे बाबा. बाबा....

बाळा : (तोंडातल्या तोंडात पुटपुट) वसंत नाही आला अजून ?

बाबू : येईल आताच तो.... ऐकलं, वसंत येईल आताच—

(दुरून मुलं, ' वसंतकाका की जय ' म्हणून ओरडत असलेली ऐकू येतात)

मंजिरी : खरंच आले भावजी....

बाबू : खरोखरीच आला वाटतं तो.. बाबा, बाबा, काय हो, हालचाल सुद्धा करीत नाहीत काही..

बाळा : (पुटपुटत) वसंतानं नाव गाजवलं.... फुकट फुकट गेलो आम्ही. काहीसुद्धा केलं नाही जन्माला येऊन. पुढच्या जन्मी तरी राम राम राम

बाबू : ? बाबा, बाबा, हा बघा वसंत आला....

(पूर्वीपेक्षा जवळ ' वसंतकाका की जय ')

बाबू : बाबा, बाबा...

वसंत : (घरांतून येत येत) दादा, वहिनी, बाबाही आहेत वाटतं इथंच....

बाबू : आहेत, आहेत कसले, नुसता देह आहे त्यांचा आता...

मंजिरी : एका क्षणाची चुकामुक... शेवटी तुमचं नाव घेऊन देह ठेवला.

वसंत : शेवटी माझं नाव घेऊन देह ठेवला... नुसतं पाहिलं— एवढंच— शिक्षा कमी झाली तीही फुकट गेली. हार घालायला अडवलं मला साऱ्या लोकांनी— तेवढाच तो क्षण— तेवढीच चुकामुक-झालं. आटोपला बाजार. गेलो हं मी दादा...

बाबू : हे काय वसंत ? कुठं चाललास ?

वसंत : आपला हा एवढाच ऋणानुबंध. आता हे शेवटचं डोकं ठेवतो पायावर बाबांच्या... (वंदे मातरम्)

(समाप्त)

वि. सू. : शेवटच्या दृश्याकरिता. आम्ही जातो आमुच्या गावा.. आमुचा राम राम घ्यावा.. आजवर होतो तुमच्या गावी.. आता कृपा असो द्यावी. असा अभंग म्हणत (प्रेतयात्रेच्या भजनाच्या चालीवर) जात असताना शेवटच्या ओळीवर फेड आऊट करणे.

कादंबरी आणि कथा –

मामा वरेरकरांनी आपल्या कादंबरी लेखनास १९११ पासून प्रारंभ केला. 'संसार की संन्यास ? अथवा (एक बुद्धकालीन ऐतिहासिक कादंबरी)' ही त्यांची कालानुक्रमे पहिली कादंबरी. 'लढाईनंतर' ही १९४७ मध्ये प्रसिद्ध झालेली अखेरची कादंबरी. वास्तविक या कादंबरीतील विषयावर व कथानकावर नाटक लिहिण्याचा त्यांचा संकल्प होता. परंतु नाटक मंडळींच्या बिऱ्हाडी त्यांना पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून त्यांनी १९२२–२३ च्या सुमारास कादंबरी लिहिली. रशियातील कामगार क्रांतीचे समर्थन इतक्या स्पष्ट स्वरूपात त्याकाळी याच कादंबरीत केलेले आढळते. परंतु या कादंबरीच्याही प्रकाशनात अनेक अडचणी उद्‌भवल्या. आणि १९४७ मध्ये ही कादंबरी प्रसिद्ध झाली. एवढा कालावधी लागला तरीही मूळ हस्तलिखितात मामांनी कोणत्याही प्रकारचा फेरबदल केलेला नाही. त्यामुळे प्रारंभापासूनच त्यांची पुरोगामी भूमिका कोणत्या स्वरूपाची होती हे या कादंबरीवरून वाचकांना समजू शकते. गिरणगावातील कामगार जीवनावर व मालक मजूर संघर्षावर आधारलेली 'धावता धोटा' (१९३३) ही कादंबरी आधी प्रसिद्धीस आली असली तरी कालानुक्रमे 'लढाईनंतर' या कादंबरीचे लेखन त्यापूर्वीचे आहे.

मामा वरेरकरांनी एकूण २७ कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. भारतीय जनमानसाच्या बहुधा सर्वच समस्यांना उद्‌गार देण्याचा प्रयत्न त्यांच्या कादंबऱ्यात आहे. सामाजिक पार्श्वभूमीवर त्यांनी आपल्या कादंबऱ्यांची रचना केली आणि त्याचबरोबर राजकीय जागृती आणि कामगार मालक यांच्यातील संघर्ष चित्रित करण्याचा

प्रयत्न केला. इतकेच नव्हे तर कनिष्ठ मध्यमवर्गाच्या अनेक समस्यांचे मर्म अथवा इंगित त्यांनी प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे आपल्या कादंबऱ्यांतून व्यक्त केले. कोणतीही समस्या ही जणू आपलीच समस्या आहे अशा आत्मीयतेने मामांनी सामाजिक समस्यांकडे पाहिले.

प्रेमचंद या प्रसिद्ध हिंदी लेखकाच्या कादंबऱ्यात सामाजिक समस्यांविषयी जी तीव्र समज आढळते, आणि शरदबाबूंच्या कादंबऱ्यात जी सहृदयता आढळते तशाच प्रकारची समज आणि सहृदयता मामा वरेरकरांच्या कादंबऱ्यातही आढळते हा विशेष लक्षणीय आहे.

त्यांच्या कादंबऱ्यांतील सामाजिकता वास्तविक रूपात प्रकट झालेली आहे. सामाजिक समस्यांवर कथानकाच्या माध्यमातून अचूक शरसंधान करण्याची त्यांची हातोटी होती. आपल्या अवती भोवतीच्या विभिन्न सामाजिक दुःखानी व्याकुळ होऊन त्यांना ललित वाङ्मयाद्वारे सर्वसाधारण माणसाच्या हृदयापर्यंत नेऊन भिडविण्याचा प्रयत्न करणारे हरिभाऊ आपटे यांच्या नंतरचे कादंबरीकार म्हणून मामा वरेरकरांचाच उल्लेख करावा लागेल. परंतु हरिभाऊंची सामाजिक कादंबरी पांढरपेशा मध्यमवर्गाशीच प्रामुख्याने सीमित होती. वरेरकरांचे वैशिष्ट्य असे, की जाणीवपूर्वक त्यांनी मराठी कादंबरी बहुजनसमाजजीवननिष्ठ बनविली.

'धावता धोटा' (१९३३) या कादंबरीत मालक-मजूर संघर्षाबरोबरच गिरणगावात राहणाऱ्या मजुरांच्या स्थितीचे हृदयस्पर्शी चित्रण ते करतात. 'सात लाखातील एक' (१९४०) या कादंबरीत खेड्यातील स्थानिक संघर्ष चित्रित करतांना खेड्यातील लोकांचे थकलेले उदास जीवन, अज्ञान, गरिबी आणि त्यांच्या भावजीवनाला व्यापून राहणाऱ्या अंधश्रद्धा इत्यादींचे वास्तविक दर्शन घडवतानाच राखेच्या ढिगाऱ्यात स्फुल्लिंगाप्रमाणे चमकणाऱ्या एका पुरोगामी खेडुताचे–जिवाचे व्यक्तिचित्रण करतात. बहुजनसमाज जागृत झाल्याशिवाय सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला गतीच येणार नाही; अशा जनजागरणासाठी लोकरंजनाचे माध्यमच लोकशिक्षण देण्यासाठी वापरता येईल असा वरेरकरांचा विश्वास होता. या विश्वासातूनच त्यांची 'मी–रामजोशी' (१९४१) ही कादंबरी लिहिली गेली. त्यांची प्रत्येक कादंबरी उद्देशमूलक आहे.

कादंबरीचे रूप, शिल्प आणि आशय या बाबतीत कलात्मकतेचा अभाव त्यांच्या कादंबरीलेखनात असला तरी, त्यांतील सामाजिक वास्तविकता जितकी लक्षणीय आहे, तितकीच व्यक्ती, प्रसंग व परिस्थिती ह्यांचे मार्मिक चित्रण करण्याची त्यांना साधलेली कला, आणि त्यांच्या शैलीतील सूचकता व सरळपणाही लक्षणीय आहे.

विषयवैचित्र्य आणि गुणवैपुल्य त्यांच्या विपुल कथा लेखनातही आढळते. 'स्वैरसंचार' (१९३२) 'घोडशी' (१९३६) आणि 'वैमानिक हल्ला व इतर गोष्टी' (१९३८) हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. या खेरीज नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या असंग्रहित कथाही खूप आहेत. कथनकौशल्य, स्वभावचित्रण, मनोविश्लेषण, प्रसंगरेखाटण या बाबतीत त्यांच्या कथा कुठेच उण्या पडत नाहीत.

नाट्यक्षेत्राप्रमाणेच कादंबरी व कथाक्षेत्रातील त्यांची कामगिरी निःसंशय उल्लेखनीय आहे.

॥ १ ॥

पुढाऱ्यांचा पुढारी

['धावता धोटा' (१९३३) ही कादंबरी मालक-मजूर संघर्षावर आधारलेली आहे. गिरणी कामगारांच्या हलाखीच्या जीवनाचा स्वतःच अनुभव घेऊन मालकांचाच मुलगा कामगारांचा पुढारी बनतो. संपाचे नेतृत्व करतो. असे हे प्रकरण.]

जमलेल्या घोळक्याचा आरडाओरडा एकदम थांबला आणि सर्वांची नजर एका वेळीच बिजलीकडे वळली.

ती तशी उग्रमूर्ति धारण करून बिजली लावसटीसारखी का धावत आली, याचा कुणाला अंदाज नव्हता. गिरणीवाल्याच्या मुलीच्या मोटरीतून जाताना बिजलीला सर्वत्रांनी पाहिले होते. बिजली बिघडली, श्रीमंत माणसात घुसण्याचा प्रयत्न करू लागली, कामगारांबद्दलची पूर्वीची तिची सहानुभूती तशीच राहिली नाही, असा अलिकडे अलिकडे कामगारवर्गात गवगवा होऊ लागला होता.

प्रत्यक्ष संपाची आग भडकली असताना बिजली हंसाच्या मोटरीतून गेली, हे ज्या वेळी सर्वत्रांनी पाहिले त्या वेळी प्रत्येकाची खात्री होऊन चुकली की बिजली यापुढे कामगारातली राहिली नाही.

कामगार लोकांची दृष्टी अशा बाजूने वळलेली असता ज्या वेळी बिजली लावसटीसारखी धावत आली त्या वेळी प्रत्येकाने कयास केला, की शेवटी बिजलीने श्रीमंताच्या हातचा फटका खाल्ला.

पण म्हाताऱ्याचा तसा गैरसमज होण्याचे काहीच कारण नव्हते. हंसाबरोबर बिजली त्याच्याच परवानगीने गेली होती.

बिजली जी आली ती तडक म्हाताऱ्यापाशी गेली. त्याच्या कानाशी लागून ती बोलते आहे असे पाहताच संपवाल्यात एकच कुजबुज सुरू झाली. त्या असंख्य

माणसांच्या कुजबुजीचा आवाजसुद्धा आरोळ्यांच्या आवाजाप्रमाणेच साऱ्या वातावरणांत दुमदुमून रहात होता. ते कुजबुजीचे उग्र असे व्यापक स्वरूप होते.

चेहेऱ्यावरील रेघा यत्किंचितही न हालवू देता अत्यंत धिमेपणाने म्हाताऱ्याने बिजलीचे बोलणे ऐकून घेतले. बोलणे चालत असता म्हाताऱ्याची नजर अगदी सहजासहजी कान्होबाकडे वळून फिरली.

बिजली म्हाताऱ्याच्या कानाशी लागली त्या वेळेपासून कान्होबाची नजर त्या उभयतांवर खिळून राहिलीच होती. हंसाने आपल्याला ओळखले याची जाणीव उत्पन्न झाल्यानंतर बिजलीही तिच्याबरोबर निघून गेल्याचे त्याने पाहिले होते. आपण कोण आहोत, हे हंसाने तिला सांगितले की काय, आणि तीच हकिकत ती आता म्हाताऱ्याला सांगते आहे की काय, या शंकेने त्याचा जीव व्याकुळ झाला होता.

त्यांतून म्हाताऱ्याने एकदम वळून त्याच्याकडे पाहून नजर फिरवितांच जवळ जवळ त्याची खात्रीच पटली, कारण नसतांना त्याने आपल्याकडे पाहिले, किंवा कामगारांचा पुढारी झाल्यामुळे सहजी आलेल्या उल्लेखाने त्याची नजर आपल्याकडे वळली, याजबद्दल त्याला कोणताच निश्चय ठरविता येईना. बिजलीने त्याला केव्हाच ओळखले होते, याची त्याला यत्किंचितही ओळख नव्हती. म्हातारा आजूबाजूच्या लोकांना साधारणपणे ऐकू जाईल एवढ्या मोठ्या आवाजांत म्हणाला,

'तसं असेल तर देवच पावला म्हणायचा. पण अजून माझी खात्री होत नाही.'

बिजली नुसती हंसली. तिच्या त्या तसल्या वेषांत ते हसणेही विलक्षण वाटले. ती झटकन संपवाल्याकडे वळली आणि म्हणाली, 'थांबलात का? वाचा बसली का तुमची? मी काही तहाच्या वाटाघाटीसाठी आले नाही. नुसती बाबांच्या कानाशी लागले, एवढ्यानंच तुमची दातखिळी बसली. काय वाटलं तुम्हाला? गिरणीवाल्याच्या मुलीच्या गाडीतून गेले म्हणून मजुराची जात विसरले असं तुम्हाला वाटलं होय? गिरणीच्या चाकात सांपडून चिंध्या झालेलं माझ्या बापाचं प्रेत माझ्या नजरेसमोरून हाललं, असं का तुम्हाला वाटलं? गिरणगांवच्या दारूबाजीनं सडलेल्या माझ्या नवऱ्याच्या हातचे फटके विसरले, असं का तुम्हाला वाटलं? काय वाटलं तरी काय तुम्हाला? आपल्या बैऱ्यांचे डोळे आपल्याकडे लागले आहेत, त्याची आठवण तरी आहे का? तुमच्या तोंडची आरोळी एक पळभर थांबली तर समंधासारखे ते तुमच्या मानगुटीला बसतील, याची आठवण आहे का तुम्हाला? मुखस्तंभासारखे काय पाहात राहिला? ओरडा— मोठ्यानं ओरडा–मोठ्यानं ओरडा–घसा कोरडा पडेपर्यंत—काळीज फुटेपर्यंत ओरडा. तुमच्या ओरड्याने सारी मुंबई दणाणून गेल्याशिवाय गिरणीवाल्यांच्या कानावरचे पडदे दूर होणार नाहीत—'

संपवाल्यातून एकच आरोळी उठली, 'बिजली तावडे की जय!' बिजलीला

आठवण झाली. हंसाच्या मोटारीतून ती एके दिवशी आपल्या चाळीकडे आली, त्या वेळी थट्टा करण्याच्या उद्देशाने चाळीतल्या पोरांनी तिच्या नावाचा जयजयकार केला होता. त्याच वेळी तिने भविष्य वर्तविले होते.

ते भविष्य खरे झाले. अंतःकरणाच्या स्फूर्तीपासून हजारो मुखावाटे निघणाऱ्या तिच्या नावाच्या जयजयकाराने गिरणगाव दणाणून सोडला. तरुण हृदयात अभिमानाची लहर आली. तो अभिमान सात्विक होता. त्या अभिमानात स्वार्थाची छटा यत्किंचितही नव्हती, तो बिजलीचा अभिमान नव्हता. श्रीमंतांच्या पायाखाली तुडवल्या गेलेल्या एका दरिद्री व्यक्तीच्या विजयाचा अभिमान होता. एका दरिद्री व्यक्तीला असंख्य दरिद्री व्यक्तींनी जो मान दिला त्या मनाचा तो अभिमान होता. परार्थासाठी तन्मयतेने आयुष्याचे केंद्र एकाच विषयावर खिळवून राहिलेल्या 'समाजसेवका' चा तो अभिमान होता

आरोळ्यांवर आरोळ्या सुरू झाल्या. पण त्यानंतर कान्होबाच्या तोंडून आरोळी निघालो नाही. गिरणीतून बाहेर पडण्याच्या वेळचा तो बेफाम उत्साह म्हाताऱ्याच्या एका दृष्टिक्षेपानं कुठल्या कुठे नाहीसा झाला होता.

त्याच्या अंतःकरणात सारखी कालवाकालव सुरू झाली होती. आपले रहस्य म्हाताऱ्याला कळले, असेच त्याला राहून राहून वाटत होते.

संपवाल्यांचा घोळका सारखा पुढे पुढे जात होता. पण म्हाताऱ्याने मागे वळून एकदाही त्याच्याकडे पाहिले नाही. काय असेल ते असो ... पण बिजली आल्याक्षणापासून संपवालेही त्याला बहुतेक विसरले. म्हाताऱ्याच्या येण्यानंतर तो अर्धाअधिक मागे पडला होता, पण बिजली आल्यापासून तर त्याचे अस्तित्व मुळीच नाहीसे झाले. सर्वांचे लक्ष एका बिजलीकडे वेधले होते. तुलनेने म्हातारा ही तिच्यापुढे फिक्का पडला होता.

जयजयकाराच्या आरोळीत बिजलीच्या नावाला प्रामुख्य आले होते. म्हाताऱ्याचे नाव मधून मधून उच्चारले जात होते, पण 'कान्हू कृष्णा' चे नाव कसे गळले हे कोणालाही कळले नाही

पण कान्होबाला मात्र ते कळले. हा संप कुणामुळे झाला ? सुपरिटेन्डेन्टला लाथांखाली कुणी तुडविले ? रुबी मिलच्या साऱ्या गिरणी-कामगारांस गिरणीबाहेर काढून संपाची पाहिली आरोळी कुणी फोडली ?

त्याच्या नावाची संपवाल्यांना इतक्या लवकर विस्मृति झाली, याचे कान्होबाला आश्चर्य वाटले. काही झाले तरी हे लोक आपल्या लोकांकडेच ओढणार, दुसऱ्याचा मोठेपणा त्यांना नको अशीच यांची वृत्ती आहे काय, असा प्रश्न त्याच्या मनात आला.

त्या वेडगळ प्रश्नाचे त्याचे त्यालाच हसू आले. कान्होबा कोण आहे, हे संपवाल्यांना कुठे माहित होते ? कान्हू कृष्णा या नावाचा मजूर संपवाल्यापैकीचं एक होता. तो कुणी 'दुसरा' नव्हता. मग दुसऱ्यांचा मोठेपणा नको असे त्यांना वाटले असावे, अशी कल्पना आपल्या मनात यावी तरी का ? ही मूळ भूमिकेची जाणीव काय ? मजुरांच्या शब्दाने आपण बोललो तरी भांडवलवाल्याचे अंतःकरण अजून बोलत

राहिले आहे काय? श्रीमंतीची जाणीव अजूनही आपल्या हृदयात डोकावते आहे काय?

या विचाराने त्याची त्यालाच लाज वाटली, पण त्याही शंकेचे शेवटी निराकरण झाले. पहिल्याने त्या निराकरणाची लहर त्याच्याच हृदयात उठली. इतक्या वर्षांपासून बाबा शिगवण साऱ्या कामगारांचा पुढारी होता. सारे कामगार त्याला देवासारखा मान देत होते. बिजली त्याच्याच तालमीत तयार झाली होती. बापाच्या त्या तशा भयंकर मृत्यूमुळे आणि नवऱ्याच्या छळामुळे बिजलीबद्दलची कामगारांची सहानुभूति शतपटीने वाढली होती. बाबा शिगवणाचे भांडवलशाहीने केलेले नुकसान तात्विक स्वरूपाचे होते. पण भांडवलशाहीच्या बेफिक्रीरीमुळे बिजलीच्या संसाराचा आणि सर्वस्वाचा सत्यानाश झाला होता.

त्याचमुळे म्हाताऱ्याबद्दलचा सर्वत्रांचा जसा आदर होता, तसा बिजलीबद्दलचा प्रेमाचा कळवळा होता. बिजलीची जीभ भयंकर तिखट होती – म्हणजे म्हाताऱ्याच्या वाणीत बिजलीपेक्षा कमी तिखटपणा होता असे मुळीच नाही – पण अनुभवाचे धक्के खाऊन आलेला सारासार विवेक म्हाताऱ्याच्या जहाल वाणीलाही वेळीप्रसंगी कोमलपणा आणीत असे. तो कोमलपणा म्हणजे निःसत्त्वपणाचा दर्शक नव्हता. विवेकीवृत्तीमुळे मागल्या पुढल्या परिस्थितीचा पडताळा पाहून तोंडावाटे निघणारे ते वृद्ध अंतःकरणाचे उद्‌गार असत.

पण बिजलीच्या भाषेत जाज्वल्य तिखटपणा होता. म्हाताऱ्याच्या जास्त वयाच्या अनुभवापेक्षा तिच्या अल्पवयातले थोडेसे अनुभव जास्त भयंकर स्वरूपाचे होते. त्या अनुभवाच्या ज्वालांनी तिचे अंतःकरण करपून गेले होते. स्त्री जातीचा नैसर्गिक कोमलपणा तर दूरच राहो, पण प्रसंगाचे धक्के खाऊन येणारा सात्विकपणाही तिच्या हृदयांतून पार नाहीसा झाला होता. त्यामुळे तिच्या जिभेवाटे निघणारा प्रत्येक उद्‌गार तापलेल्या लोखंडाच्या रसासारखा जळजळीत असे. तो उद्‌गार ज्याच्या ज्याच्या हृदयात कानावाटे शिरत असे, त्याच्या हृदयाला दणाणून सोडल्यावाचून राहात नसे. म्याडमेकडांना सुद्धा तिच्या तोंडच्या शब्दांनी स्फुरण चढत असे.

जळजळित तारुण्याला मिळालेली भयंकर छळाची जोड शक्य तितका ज्वलज्जहालपणा आणीत होती. त्याच्याच परिणामामुळे बिजली येताच म्हाताऱ्याचे नाव अर्धे झाले. कान्होबाला वाटले, की म्हाताऱ्या शिगवणापुढे आपण कोण? जिथे म्हातारा दिसला तिथे आपली काय कथा? आपल्याला पूर्वीचा इतिहास कुठे आहे? यापूर्वी गिरणगावासाठी असे आपण काय केले होते? गिरणगावच्या परिस्थितीमुळे आपले तरी असे लोकांच्या डोळ्यात भरण्याजोगे कोणते नुकसान झाले होते? धोंड्याच्या कळवळ्याने आपण सुपरिटेन्डेन्टला बडविले तेवढ्यापुरती सहानुभूती—तेवढ्यापुरता मान— सेपवाल्यांनी आपल्याला दिला; यापेक्षा जास्त मानाची-जास्त जयजयकाराची

—अपेक्षा आपण का करावी ? खर्चिल्याशिवाय मिळत नाही—आणि आपण अशी कोणती पुण्याई खर्ची घातली आहे, की तीमुळे म्हाताऱ्याला आणि बिजलीला विसरून संपवाल्यांनी आपल्याच नावाचा पुकारा करावा ?

त्याने अशा प्रकारे आपल्या मनाचे समाधान करून घेतले न घेतले तोच हजारो मुखातल्या प्रचंड आरोळ्यानाही मागे पाडणारा बिजलीचा आवाज त्याच्या कानी पडला.

दोन्ही हात उभारून ती मोठमोठ्याने ओरडत होती, 'नामर्द, इतक्या लवकर विसरलात ? आठवण नाही तुम्हाला ? कुणी तुमच्यासाठी साहेबाला तोंड दिलं ? एका मजुराचं रक्त जमिनीवर सांडलं म्हणून सुपरिटेन्डन्टला लाथांखाली कुणी तुडविलं ? काय केलं आहे बाबा शिगवणानं ? असं काय केलं आहे तावड्याच्या बिजलीनं ? कशाला त्यांच्या नावानं कोकलता आहात ? जिवावर उदार होऊन अधिकाऱ्याच्या कंबरड्यांत लाथ मारणारा कान्हू कृष्णा प्रत्यक्ष तुमच्यासमोर उभा असता बाबा शिगवणाचा जयजयकार करता ? बिजली तावडेचा जयजयकार करता ? काय म्हणून ? नुसते चार जहाल शब्द आम्ही बोललो म्हणून ? नुसती तोंडाची जळफळीत वाफ बाहेर टाकली म्हणून ? कर्त्याला विसरून नुसत्या बोलत्याच्या नावाचा डांगोरा पिटता ? लाज नाही वाटत तुम्हाला ? कृतघ्नपणा तो याखेरीज काय असतो ? आणि तुम्ही संप चालविणार ? आणि हे असले तुम्ही गिरणीवाल्यांना पायाशी आणणार ? चार पळांच्या वायफळ बडबडीनं दिपून जाऊन जिवावर उदार होणाऱ्या मर्दाला विसरणारे तुम्ही नामर्द, तुम्ही भांडवलवाल्यांना वठणीवर आणणार ? पहाता काय तोंडाकडे ? बोला 'कान्हू कृष्णा' की जय !—'

साऱ्या संपवाल्यांतून एकच गगनभेदी आरोळी उठली 'कान्हू कृष्णा की जय !'

त्या आरोळीसरशी गिरणीच्या उंच इमारती आणि आकाशाला हात लावू पहाणाऱ्या चिमण्या थरारून हादरल्या.

कान्होबाचे हृदय कृतज्ञतेने उचंबळून आले. म्हाताऱ्याने वळून पाहिले तों त्याच्या डोळ्यातून आनंदाश्रूंच्या धारा वाहात होत्या. म्हाताऱ्याने हात धरून त्याला पुढे ओढले. त्याच्या काखेंतून हात घालून त्याला कवटाळले आणि म्हटले, 'असा मागं काय राहतोस माझ्या मर्दा ! आज या गिरणगांवचा तू पुढारी आहेस. गिरणगावच्या अब्रूसाठी उगारलेली तुझी लाथ आज भांडवलवाल्यांच्या छाताडावर बसली आहे. त्या लाथेच्या स्पर्शानं या गिरणगावची पापी भूमी आज पवित्र झाली आहे. मर्दातला मर्द तू असा मागे राहू लागलास तर संपवाल्यांनी कुणाच्या तोंडाकडे पहावं ! कुणाच्या शब्दानं त्यांच्या अंगात स्फुरण चढावं ? आम्ही गिरणगावचे मजूर आहोत. गिरणगावातले पांढरपेशे नव्हे. मजुराच्या तोंडचा शब्द लाखो लोकांना चैतन्य आणील, त्यांच्या करवी जगाची उलथापालथ करवील, अशा जाज्वल्य तेजाचा असला पाहिजे. गिरणगावच्या पुढाऱ्यानं मागं

राहून चालत नाही. ते काम गिरगावातल्या पांढरपेशांचं, गिरणगावचा मर्द सर्वांच्या पुढं राहतो, लढाईला तोंड देतो, आंगचं रक्त सांडतो, वेळीवक्ती आपल्या बांधवांच्या कल्याणासाठी जीवही देतो. तू नव्या दमाचा नवा शिपाई आहेस. याच वेळी मागं राहिलास तर पुढं काय करणार? आज कर्तव्यगारी करून दाखवली आहेस— म्होरक्या म्हणून सर्वांच्या पुढं उभं राहण्याची आजचीच वेळ आहे. हो असा मर्दासारखा सर्वांच्या पुढं आणि अशी आरोळी ठोक, की तिच्या सरशी श्रीमंतांचे उंच बंगले आडवे पडून जमिनदोस्त होतील–'

दोन्ही हात वर करून मोठ्याने ओरडून म्हातारा म्हणाला, 'पाहता काय मर्दाच्या बच्चानो! बोला, कान्हू कृष्णा की जय!'

कान्होबाच्या सर्वांगावर थरारून रोमांच उभे राहिले. त्या अननुभूत आनंदाने तो सुन्न होऊन गेला होता. म्हाताऱ्याच्या आरोळीने त्याला जागृति आली आणि तीसरशी ती आनंदाची धुंदी झटकून झाडून टाकून तो तसेच हात वर करून ओरडला:

'पाहता काय मर्दाच्या बच्चानों! निघा गिरणीबाहेर!'

: २

दैव आणि देवी

['सात लाखातील एक' (१९४०) ही कादंबरी ग्रामोध्दाराच्या चळवळीवर आधारलेली आहे. खेड्याच्या दु:स्थितीचे मूळ शोधून काढण्याचा प्रयत्न कुणीच करीत नाही असे मामांचे मत होते. तसेच परदेशी 'ईझम' चे नियम लावून भारतीय खेड्याची उन्नति होणार नाही, असेही त्यांना वाटत होते. 'आर्थिक' कॅपिटॅलीझम-पेक्षाही 'धार्मिक' कॅपिटॅलीझम प्रभावी आहे. परदेशीय ईझमवाल्यांच्या सावलीतून खेड्याकडे पहाणारे, तसेच भारतीय म्हणवणारे काँग्रेसवाले खेड्यांच्या बाबतीत आंधळी कोशिंबिर खेळत आहेत असेही त्यानी प्रतिपादिले. अंधश्रद्धेविरुद्ध एकाकी लढा देणाऱ्या जिवा लोहाराची ही कथा.]

गावात देवीची साथ आली होती. जिकडे तिकडे हाहा:कार उडाला होता. लहान मुलांतच साथीचा फैलाव जोरात सुरू झाला होता. मोठी माणसं देखील त्यांतून सुटत नव्हती, पण त्यांची संख्या कमी होती.ज्यांना लहानपणी देवी टोचून घेतल्या नव्हत्या किंवा देवी आल्या नव्हत्या, अशा मोठ्या माणसांची लागण सुरू झाली होती.

सर्व प्रकारचे उपचार चालू होते–सर्व प्रकारचे म्हणजे ज्या उपचारांमुळे साथीचा फैलाव कमी होईल, असे योग्य उपचार सोडून बाकीचे सारे उपचार सुरू होते.

मुख्यत्वेकरून 'बाया' अंगात आणणं, त्यांचा कौलप्रसाद घेणं, तळी भरणं, किरका काढणं वगैरे प्रकारांना मोठा जोर आला होता. देवी आलेली एवढीशी मुलं हाती घेऊन उघड्या हवेंतून त्यांची गावभर मिरवणुक काढली जात होती.

असले अघोरी उपाय केल्यामुळे लागण झालेला प्रत्येक रोगी हटकून दगावत होता.

ब्राह्मणांच्या वस्तीत मात्र फारशी लागण झाली नाही. आधी त्यांच्या मुलांना लहानपणीच देवी काढलेल्या होत्या. शिवाय साथ सुरू झाल्याचा सुगावा लागताच देवी डॉक्टरला बोलावून ब्राह्मण लोक देवी टोचून घेत होते.

देवी टोंचल्यामुळे ब्राह्मणात लागण होत नव्हती खरी पण ब्राह्मणेतरात त्याचा अर्थ निराळा केला जात होता. ते म्हणत, 'देवी जातीची बामण म्हणून बामणांना तिचा कोप बाधत नाही. आपल्या माणसाची आपण काळजी घेतो तशी देवी बामणांची काळजी घेते.'

नि ते त्या लोकांना पटत होतं.बिचारा जिवा लोहार सर्वांची समजूत घालण्यासाठी जिवाचा आटापेटा करीत होता. पण त्याचं बोलणं कुणीच मनावर घेत नव्हतं.

रस्त्यावरून मिरवणूक चालली होती. दोन-अडीच वर्षांचं पोर, अंगावर तीळ ठेवायलासुद्धा जागा नाही अशा देवी आलेल्या, त्याला हाती घेऊन मिरवणुकीबरोबर त्या पोराची आई चालली होती. जिवा तिला म्हणाला, 'काय चालवलंयस हे बाई! अशा ह्या देवी आलेल्या— ताप फणफणतोय— नी या वाऱ्यातून उघडं पोर घेऊन फिरवतेस? त्यापेक्षा पोराला मारून का टाकीत नाहीस आपटून?—'

'तुझ्यासारखे आम्ही राक्षस नाही.' ती बाई म्हणाली.

'मिरवणुकीतून फिरवलेलं प्रत्येक पोर नेलंय देवीनं, ते माहित आहे का तुला?' जिवानं विचारलं.

'बाजूला हो' ती बाई ओरडली, 'तुझी सावली नको पडायला माझ्या पोरावर!'

मिरवणुकीच्या वाद्यावरसुद्धां ऐकू जाईल एवढ्या मोठ्यानं जिवा ओरडला, 'गाढवाच्या लेकांनो, आपल्या हातांनी आपली पोरं का मारता? उपाय का करीत नाही? औषध का देत नाही?—'

'औषध दिलं तर देवीचा कोप होईल' एकजण म्हणाला.

'कोप होईल म्हणजे काय होईल?' जिवानं विचारलं.

'लागलेले मरतील,' एकजण म्हणाला, 'अन् जे मोकळे आहेत त्यांना देवी येतील.'

जिवानं विचारलं, 'मग हे असं फिरवल्यानं लागलेले जगले का आजवर? मग हा कोणाचा कोप? देवीचा कोप असेल तर हाच! औषधं जवळ असताना उपाय केल्याशिवाय माणसं का मारता? गेले ते गेले–लागले ते जाणार–मग आता मोकळे आहेत तेवढ्यांना तरी टोचून घ्या. सरकारनं मुद्दाम डॉक्टर पाठवलाय, लस पाठवलीय, एक दमडीसुद्धा खर्च होत नाही टोचून घ्यायला, मग मुद्दाम खाईत का उडी घेता?'

'दूर हो पाहू आधी,' एकजण ओरडला, 'तुझी सावली नको पडायला आमच्यावर --' दोघातिघांनी धक्क्यासुद्धा मारल्या. उघड्या डोळ्यांनी पाहायत नाही म्हणून तो जीव तोडून बोलत होता. पण ते ऐकून घ्यायची कुणाचीच तयारी नव्हती.

मिरवणुकीच्या मध्यभागी देवी घुमत होत्या. पाण्याने भरलेल्या कळशांवर आंब्याची पानं टाकून वर नारळ ठेवलेल्या रंगवलेल्या कळशा डोक्यावर घेऊन काही माणसं मिरवणुकीच्या मध्यभागी होती. टाळमृदंगांच्या खणखणाटाला पडघम सनईची जोड देऊन असा काही भयाण आवाज निर्माण झाला होता की तो ऐकताच अंगावर शहारे येत. चालत्याबोलत्या माणसालासुद्धा तो आवाज ऐकून ताप भरला असता, तिथं तिळाएवढ्या पोरांची काय स्थिती झाली असेल या कल्पनेनं जिवा लोहाराचा जीव बेचैन झाला. समोरून येणाऱ्या पाटलाला थांबवून तो म्हणाला, 'अहो हे काय चाललंय? का आपल्या हातानं आपली माणसं मारता आहात? तुम्ही गावचे अधिकारी, तुम्ही नको का या लोकांना समजावून सांगायला? देवी डॉक्टर आलाय ना?— लस पाठवली आहे ना सरकारनं?— मग तुम्ही काय करता आहात? ज्यांना देवी आल्या नाहीत त्यांना तरी टोचून घ्या! रोग आहे तो, त्याला औषध केलं पाहिजे, तिथं तळ्या भरून काय होणार आहे! रोग्याला वाऱ्यावर फिरवताहेत, आवडून मरायचे नाहीत का ते विचारे जीव? काही दयामाया आहे की नाही तुम्हाला?—'

'आता तुम्हीच सांगा ना.' पाटील म्हणाला.

'मी काय सांगणार?' जिवा म्हणाला, 'माझं कोण ऐकणार? रोज अर्धा शेर रक्त आटवतोय या गाढवांसमोर ओरडताना. पण उलट माझीच थट्टा करतात! कुणाचा विश्वास आहे माझ्यावर? तुमच्यावर विश्वास आहे म्हणून तुम्ही सांगितलं पाहिजे या लोकांना.'

'पहातो सांगून.' पाटील म्हणाला, 'ऐकलं तर बरं, नाही तर त्यांचं कर्म त्यांच्याजवळ. मी माझ्या पोराना टोचून घेतलं. माझं कर्तव्य मी केलं. त्यांनी ऐकलं तर ठीक नाहीतर मी काय त्यांच्यासमोर डोकं फोडून घेऊ?'

'जा मरा, काय वाटेल ते करा!' असं म्हणून जिवा तिथून निघून गेला. मिरवणुकीमागून मिरवणुका सारख्या येत होत्या—गाया घुमत होत्या—नाचत होत्या. भयाण वाद्ये वाजत होती. उधळलेल्या गुलालाने रस्त्यावरची हवा कुंद झाली होती. साऱ्या मिरवणुका ग्रामदेवतेच्या दारात येऊन थांबल्या. तळी भरून किरका गावाबाहेर नेऊन सोडण्यात आली नि सर्व लोक पुन्हा ग्रामदेवतेच्या दर्शनासाठी आले.

चारदोन वयोवृद्ध गृहस्थांना गाठून पाटील सांगत होता,'असं पहा, जे काही तुम्हाला करायचं असेल ते करा. पण आधी तिकडे चावडीवर येऊन देवीची लस टोचून घ्या. सरकारनं तजबीज केली आहे, एक पैसासुद्धा द्यावा लागत नाही, मग

त्याचा फायदा का घेत नाही ? चार प्रकारे चार उपाय केले पाहिजेत. देवधर्माचं चाललं आहे, त्यांतच टोचून घेतलं.... '

'माहित आहे आम्हाला ! ' एकजण म्हणाला, ' वीष भरायचं आहे आम्हा लोकांच्या अंगात ! माणसं मेली की त्यांचे जमीनजुमले तुम्हाला मिळणार आहेत हे काय आम्हाला कळत नाही ? '

इतक्यात कुठून तरी रूपा लोहार आला नि म्हणाला, ' हा पाटील सांगतो नि तुम्ही ऐकता ! जिवा लोहारानं बगलेत मारलंय या पाटलाला ! अरे कसले डॉक्टर आणता नि टोचता काय तुमचं बोडकं ? कोप झालाय बहिरोबाचा त्याचा आधी इलाज करा, आधी देवधर्म बघितला पाहिजे ! या पाटलाला काय ? '

' माझी कशाला उगीच बदनामी करता ? ' पाटील म्हणाला, ' मी हुकमाचा ताबेदार– '

' कुणाच्या हुकमाचा ? ' एकानं विचारलं.

' जिवा लोहाराच्या ? ' दुसऱ्यानं विचारलं.

' नाही बाबांनो, नाही ! ' पाटील म्हणाला, ' सरकारी हुकूम आहे तो. जिल्ह्या तून डॉक्टर आलाय लस घेऊन. सर्वांना टोचा म्हणून हुकूम झालाय मला. सांगायचं ते सांगतो. ऐकायचं असलं तर ऐका नाही तर सोडून द्या. पण आकडा भरून दाखवला पाहिजे मला. '

' मग द्या की आकडे भरून, ' कुणी तरी म्हणाले, ' गावची खानेसुमारी माहित आहे ना ? '

'तसं खोटं करता येतं का बाबा डॉक्टरसमोर ? '

' हरिश्चंद्राचा अवतारच की नाही ! ' रूपा म्हणाला, ' तू खोटं बोललास तर गाव ओस पडेल जसा काही ! '

'आता हे तुम्ही बोलता आहांत ना रुपाजीराव ? ' पाटील म्हणाला.

' बघा, म्होरा बघा पाटलाचा ! ' कुणीतरी उद्‌गारलं. पाटलाला मेल्याहून मेलं झालं. त्याचा असा पाणउतारा आजवर कधीच झाला नव्हता. लोक इतके खवळले होते, की त्यांच्याविरुद्ध बोलायची त्याची छाती झाली नसती. केवढाही मोठा अधिकारी असता नि त्यानं देवाधर्माच्या बाबतीत हात घातला असता तर गावच्या लोकांनी त्याला ठेचून काढलं असतं.

' मग मी आता काय करू म्हणता ? ' पाटील काकुळतीला येऊन म्हणाला.

' एवढं कळत नाही तर पाटील कशाला झालास ? ' रूपा म्हणाला, ' मुळाशी जा – आधी मुळाशी जा – मूळ शोधून काढा या देवाच्या कोपाचं ! '

' मूळ शोधून काढा. ' कुणीतरी ओरडला, ' आधी तळी भरा. ' गावचा पंचाक्षरी म्हणाला.

'देवाला हाक घाला.' कुणीतरी ओरडला.

'आधी शितळादेवीला कौल लावा!' शितळादेवीचा गुरव म्हणाला.

'तुझ्या शितळादेवीला कोण विचारतो?' बहिरोबाचा गुरव म्हणाला, 'माझ्या बहिरोबाचं गाव आहे हे! तुझी शितळादेवी म्हणजे माझ्या बहिरोबाची राख! समोर शेट असताना रखेलीला कोण विचारतो?'

'अरे बाबा, बोलू नकोस.' एक म्हातारा म्हणाला, 'तू बहिरोबाचा गुरव आहेस ते मला माहित आहे. पण असं काहीतरी बोललास तर शितळादेवीचा कोप होईल. नि या बायांची देवी शितळादेवी— म्हणून तिलाच हाक घातली पाहिजे यावेळी.'

'अरे दोघांचीही वाडी भरू!—' दुसरा म्हातारा म्हणाला, 'दोघांनाही शांत करू! बहिरोबाही आमचा नि शितळादेवीही आमचीच!—'

'पण कौल घ्यायचा तो बहिरोबाचाच!' रूपा म्हणाला, 'काय रे बाबांनो, तुमचं काय म्हणणं आहे? गावचा देव बहिरोबा. मग कौल त्याचा घ्यायचा नाही तर घ्यायचा कुणाचा! गावची राखण झाली पाहिजे. हाक घालायची ती बहिरोबालाच. मग बहिरोबा नि शितळादेवी आपसात काय ते पाहून घेतील. तसा खंबीर आहे आमचा बहिरोबा.'

'बहिरोबाचा कौल घ्या!— बहिरोबाचा कौल घ्या!'

पाटील, रूपा नि बहिरोबाचा गुरव तिघेही एकमेकांच्या कामाला लागले. तिघांनीही काहीतरी ठरवलं. त्या थोड्याच वेळात पाटलाचा नि रूपाजीचा समेट झाला असावा असं दिसून आलं. कुणाला नकळत रूपाजीचा हात हळूच पाटलाच्या खिशात गेला होता.

'बहिरोबाचा कौल घ्या!' म्हणून सारे लोक ओरडत होते. पाटील एका चौथऱ्यावर उभा राहिला नि दोन्ही हात वर करून मोठ्यानं ओरडला, 'ऐका हो, ऐका—'

पाटलाची हाक ऐकून सारे लोक गप्प राहिले. 'ऐका हो ऐका!' पाटील पुन्हा मोठ्यानं ओरडला, 'उद्या सकाळी— गावचे सारे भट, बामण, मराठे, सोनार, शिंपी, तेली, कोळी, महार, चांभार— जे जे म्हणून असतील त्यांनी त्यांनी— लहान थोर, बायकापोरं–सारी जात, सारी जमात–प्रत्येक जातीचा थोर माणूस– उद्याची पूजा झाली—की या देवळात जमायचं–बहिरोबाला हाक घालायची— शितळादेवीला थंड करायची–कौल घ्यायचा देवाचा—नि देव जसा हुकूम करील तसं गावानं चालायचं—'

गुरव ओरडला, 'ऐकलंत रे थोरापोरांनो–मी गुरव बहिरोबाचा—लेकरू माझ्या बहिरोबाचं मी–तुम्हीसुद्धा लेकरंच त्याची–पण मी तुमचा थोरला भाऊ—तुम्ही

म्हातारे आहात, तरणे आहात, त्यात तुमचा मी थोरला भाऊ—कसा म्हणून नाही विचारलंत ?'

'कसा ?' सारे एकदम एका शब्दात ओरडले.

'अरे असः,' गुरव म्हणाला, 'तुम्ही लहान आहात, थोर आहात. ऐशी वर्षांचे म्हातारे आहात, पण बहिरोबा तुम्हाला ओळखत नाही– मला ओळखतो- माझ्या अंगात येतो– माझ्या तोंडानं बोलतो– म्हणून मी बहिरोबाचं लेकरू- म्हणून मी तुमचा थोरला भाऊ !- पाटलानं तुम्हाला हुकूम केला, तुम्ही ऐकला. मी हुकूम करणार नाही– मी या म्हणणार नाही– पाटलानं तुम्हाला साद घालावी– तुम्ही यावं– ते माझं काम नाही. मी देवापुढं नाक घाशीन – देव येईल नि बोलेल– तुम्ही ऐकाल पण मला ऐकू येणार नाही. म्हणून म्हणतो, उद्या या ! देवाचा कौल घ्या, गावाचं कल्याण करा– जय बहिरोबा की जय !' सारे एकदम ओरडले. 'जय बहिरोबा की जय !' तितक्यात कुणीतरी एक ओरडला, 'जय शितळादेवी की जय–! आईचा उदो-चांग भले !'

हळूहळू गर्दी पांगू लागली. गुरव जायला निघाला होता त्याला बाजूला घेऊन रूपाजीनं हळूच एक दहा रुपयाची नोट त्याच्या हाती देऊन त्याची मूठ झाकली नि तो म्हणाला, 'ही वज्राची मूठ – वैऱ्यावर मारायची – काय समजलास !' गुरवानं नुसती मान हालवून होकार दिला. शितळादेवीचा गुरव चिडला होता. रूपाजीनं त्याच्याकडे ढुंकूनही पाहिलं नव्हतं म्हणून त्याला राग आला होता. चार-दोन माणसं गोळा करून तो म्हणत होता, 'अरे काय तुम्हाला वेड लागलंय ? माझ्या शितळा-देवीला टाकून बहिरोबाच्या कसल्या नादी लागता ? गावात बाया नाचताहेत त्या कोण आहेत असं तुम्हाला वाटतं रे ? बहिणी आहेत त्या शितळादेवीच्या ! त्यांना टाकून बहिरोबाच्या मागं लागलात तर कसं कल्याण होईल तुमचं ? घरची घरण रुसली तर घरधनी काय करील ? कुलपाची. किल्ली असते घरणीच्या हातात – सगळे सगळ्या घरी तुम्ही बघता अन् बहिरोबाच्या मागं लागता ? कसं होईल तुमचं कल्याण ? त्यातून बहिरोबाचा गुरव काही माझ्यासारखा लिंगायत नाही— तो आहे भवीक गुरव ! बहिरोबाच्या नावानं मोठा होऊन बसलाय !— पण दिसेल म्हणावं माझ्या शितळादेवीचा तडाखा, तेव्हा कळेल कोण खरा नि कोण खोटा—'

शितळादेवीचा गुरव बहिरोबाच्या गुरवाच्या बेचाळीस कुळांच्या कुळकथा सांगू लागला होता. पहाता पहाता त्याच्याभोवती माणसांचा घोळका जमला. बहिरोबाचा गुरव आधीच निघून गेला होता त्याचा फायदा घेऊन तो वाटेल त्याप्रकारे त्याची बदनामी करीत होता.

रूपा लोहार हा प्रकार दुरून पहात होता. त्याला वाटलं, की चाललं आहे हे बरं नव्हे. शितळादेवीच्या गुरवाचं ऐकणारे देखील बरेच होते. देवी म्हटली म्हणजे

देवीच्या साथीत तिला महत्व होतं. अर्थात त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणं रूपाजीच्या दृष्टीनं इष्ट नव्हतं. खरं पाहिलं तर शितळादेवीच्या गुरवाशाच त्यानं हाती घ्यायला पाहिजे होतं. पण त्याच्या अंगात वारं येत नसे. तो नुसता कळे लावून देवीचा कौल घेत असे. तो एक प्रामाणिक माणूस होता. अंगात वारं आणण्यासाठी जे कसब लागतं ते त्याच्या अंगी नव्हतं.

प्रसंगावर नजर ठेवून रूपाजी त्याला बाजूला घेऊन म्हणाला, 'बाबारे, उगीच लोकाचं मन बिघडवू नकोस. हे चार रुपये घे. गावच्या नावानं देवीला एक बोकड दे – जास्त पैसे लागले तर माझ्याकडून घे. तुझ्यापरीनं तू कर – त्याच्या परीनं तो करील. पण गावचं कल्याण झालं म्हणजे झालं!'

शितळादेवीच्या गुरवाचं समाधान झालं – बहिरोबाच्या गुरवाप्रमाणं त्यानं उगीच पैसे घेतले नसते. तो मोठा पापभीरू होता. म्हणूनच बोकड द्यायची गोष्ट काढून रूपाजीनं त्याची समजूत घातली. शितळादेवीच्या गुरवानं बळीची तयारी करून गावच्या लोकांना आमंत्रण दिलं.

विरोधाचं बीज नाहीसं झालं नि रूपाजीचा मार्ग मोकळा झाला.

॥ ३ ॥

मी पुन्हा ढोल घेतला

['मी–रामजोशी' (१९४१) ही मामा वरेरकर यांची उल्लेखनीय कादंबरी आहे. ग्रामोद्धार, खादीप्रसार आणि अस्पृश्यता निवारण या म. गांधी पुरस्कृत कार्यक्रमांच्या प्रसारावर आधारलेली; त्यातील हे प्रकरण.]

'ही गंमत कळली का ?' जनी म्हणाली, 'किकीचा कालचा बेत बदलला ! तो कोण विनायक आहे ना, त्यानं म्हणे तिची कानउघाडणी केली !'

'बरं झालं,' मी म्हटलं, 'असं बांधून कुत्रं पारधीला नेऊन काय होणार ?'

मी असं म्हटलं खरं पण ते ऐकून मला वाईट वाटलं होतं. किकीनं मला न सांगता जनीकडेसच्च नुसता त्या गोष्टीचा उल्लेख का करावा ? मला सांगायला तिला धीर झाला नाही, की पुन्हा मी वादविवाद घालीन अशी तिला भीति वाटली ?

कुणाच्या मतामताची फारशी पर्वा करायची नाही असं मी ठरवलं होतं. पण अशी पर्वा न करणं म्हणजे त्या व्यक्तीला विरोध करणं, असा माझा उद्देश नव्हता. आपल्याबरोबर कुणी आलं– सुखासमाधानानं आलं–तर त्याला बरोबर घ्यायचं; मुद्दाम कुणाला आग्रह करायचा नाही की सक्ती करायची नाही, कुणाची जोड मिळाली नाही तर स्वतःलाच जेवढं साधेल तेवढंच करायचं असा माझा बाणा होता.

या दोन दिवसात किकी शक्य तोवर मला टाळीत होती. मी मुद्दाम तिला काही विचारलं नाही. की येण्याबद्दल हाकसुद्धा मारली नाही. माझा मी जात होतो— कदाचित जनीही जात असावी. जे काही पहायचं होतं ते पहात होतो, येतील त्या

कल्पना साठवीत होतो आणि त्यांचा उपयोग कसा करून घ्यायचा याजवर विचार करीत होतो.

त्या तमाशाच्या तात्फ्याचा जो म्होरक्या होता त्याची मी भेट घेतली. जुन्या काळांतल्या तमाशाच्या अमदानीच्या हकीकती सांगताना त्याचा कंठ भरून येत होता. गझल कवालीच्या आक्रमणामुळे तमाशांत होत असलेली अस्सल लावण्यांची आबाळ पाहून त्याचा जीव तिळतिळ तुटत होता. तो म्हणाला, 'लावणी हे आमचं मराठ्यांचं गाणं– ते आता नाहीसं होत चाललं आहे. म्हणायची ताकदच नाही कुणाला. गेल्या चार दोन दिवसांत जे काही तुम्हाला ऐकायला मिळालं तेवढंच राहिलं आहे. मीच एक राहिलोय आता, अन् हट्टानं मी माझी जुनी अमदानी चालवली आहे. त्यामुळे मला गिऱ्हाइकी नाही. उपाशी मरावं लागलं तरी बेहेत्तर पण आपलं मूळ सोडायचं नाही या अभिमानामुळे खरोखरंच मला उपाशी मरावं लागतंय. पुणं - सोलापुरांत आमची खरी गिऱ्हाइकी. पण तिथं आम्हांला आता कुणीच उभे करीत नाही. मुंबईचं तर नाव घ्यायला नको. खेड्यापाड्यांत जुन्या जमान्यातली माणसं आहेत म्हणून ती आमचं ऐकून घेतात. आता परवांच तुम्ही ऐकलं असेल, रामजोशाची लावणी म्हणणारी ही आता एकच राहिलीय—'

'कुठली रामजोशाची लावणी?'

'अगदी सोवळी लावणी – भक्तिरसाची – ती म्हणत होती ती ऐकलीत ना? स्वतः मोठी भाविक आहे ती बाई. मोठी कृष्णभक्त आहे. रामजोशाच्या लावणीखेरीज दुसरी कुठलीच लावणी ती कधी म्हणत नाही. शिणगाराशिवाय तर चालत नाही. तेव्हा असा हा देवादिकांचा शिणगार आळवावा लागतो. अजून महारी लावण्या तुम्ही ऐकल्या नाहीत. त्या म्हणणारी माणसंही आता राहिली नाहीत—'

'कोण आहेत या गाणाऱ्या बायका?'

'ही राम जोशाची लावणी म्हणते ती महारीण आहे. एकदोन कोल्हाटणी आहेत. आवाज ऐकलात ना त्यांचा? ज्या पट्टीत त्या गातात त्या पट्टींत गाणारी कोण तुमची कलावंतीण असेल ती दाखवा पाहू मला. मिळमिळीत झालंय अलिकडचं गाणं! चांगला भरपूर दम असावा लागतो छातीत. दिवसेंदिवस ती माणसं घटत चालली आहेत अन् आमचेही दिवस आता भरत चाललेयत. याच दोघीचौघी आहेत तोपर्यंत माझे डोळे मिटले म्हणजे मिळवली असं वाटतंय.' म्हाताऱ्याचे डोळे भरून आले होते. कंठ सद्गदित झाला होता. आपल्या कलेबद्दलचा त्याचा हा निस्सीम जिव्हाळा पाहून माझ्या मनावर परिणाम झाल्यावाचून राहिला नाही.

मी विचारलं, 'या असल्या ओंगळवाण्या लावण्या तुम्ही का म्हणता? साऱ्या रामजोशाच्याच का म्हणत नाही?'

तशा मनस्थितीतही त्याला हसू आलं. तो म्हणाला, 'जसं पहावं तसं दिसतं. खेडेगावच्या नजरेत यात ओंगळवाणं काहीच नाही. हीच असते त्यांची भाषा. ही

कवनंसुद्धा त्यांच्याच भाषेत नसली तरी कोण पाहील आमचे हे तमाशे ? तुम्हीच पाहिलं ना कसे लोक रंगून जात होते ? तीच हौशी म्हणू लागली रामजोशाच्या लावण्या तेव्हां सारे थंडावले. ऐकत होते पण उसळत नव्हते. बरं वाटतं ते तसलं गाणं ऐकून, पण तमाशा बघितल्यासारखा वाटत नाही, त्यामुळं आपली चूष म्हणून ठेवली आहे झालं.'

मला रामजोशाची काहीच माहिती नव्हती. त्या म्हाताऱ्यालासुद्धा लावण्यांपलीकडे रामजोशाचा इतिहास अवगत नव्हता. शक्य तितकं करून ही माहिती मिळवायचं मी ठरवलं.

शिमग्याचा उत्सव ऐन रंगात येत होता. आणि तिकडे किकी, विनायक आणि श्रीकांत यांची शिमगाविरोधी चळवळही जोरात येत चालली होती. विनायकाला एका काळी पाठिंबा देणारे बाबा - काका आता त्याच्यावर उलटले होते. धर्माच्या अभिमानानं ज्यावेळी तो बोलत होता त्यावेळी ते त्यांना पटलं होतं पण आताचा त्याचा शिमग्याचा विरोध बाबीकाकांना अधार्मिक वाटला. म्हणूनच त्यांनी त्या लोकांना विरोध करायला सुरवात केली.

मी उत्सवात भाग घेत होतो. याचं बाबीकाकांना समाधान वाटत होतं. असं मला कळून आलं. क्वचित ते माझी स्तुतीही करीत होते. पूर्वी एकदा त्यांनी माझ्याशी बोलणं टाकल्यापासून पुन्हा बोलायचा प्रयत्न केव्हाच केला नव्हता. मीही त्या बाबतीत उदासीन होतो. किकीच्या समोरसुद्धा ते येत नसत. पण या उत्सवामुळं माझ्या त्यांच्या बैठकी एका जागी होऊ लागल्या आणि त्यामुळं त्यांच्या मनातली अढीही हळूहळू दूर होत चालली.

तो पौर्णिमेचा दिवस होता. या दिवशी गळ्यात ढोल बांधण्याचा महारी हक्क सर्वांनाच मिळणार होता. संध्याकाळपासून जाखड्यांना सुरवात झाली. तोपर्यंत महार ढोल वाजवित होते. पण रात्र पडताच देवाच्यासमोर जयजयकार करून महारांनी ढोल खाली ठेवले. त्याच जयजयकारांत पहिले मानकरी या नात्यानं बाबीकाकांनी गळ्यात ढोल घातला. अण्णा रामभाऊ प्रभृती सारे वाणी उदमी लोक गळ्यांत ढोल चढवू लागले.

त्यांच्या अनुकरणानं मीही ढोल उचलला. फेरे सुरू झाले. बोंबाबोंबीच्या कल्लोळांत जाखड्या नाचू लागल्या. ढोल वाजवणं सोपं नाही असं मला वाटलं. ढोलाचं वजनसुद्धा भरभक्कम होतं. गळ्यात ढोल बांधून एवढीसुद्धा तक्रार न करता मी नाचत होतो असं पाहून गावच्या सर्व लहानथोर लोकांना माझ्याबद्दल अभिमान वाटला.

दूर उभे राहून किकी, विनायक आणि श्रीकांत आमचा नाच पहात होती. आज त्यांना कुणाचाच पाठिंबा नव्हता. धोंडशेटनी जरी गळ्यात ढोल बांधला

नव्हता तरी गावचे मानकरी या नात्यानं जाखडीबरोबर त्यांना हजर रहावं लागलं होतं.

ढोलांचे आवाज, जाखडीची गाणी, नाचाचा थयथयाट आणि दुरून ऐकू येणारा शिमग्यांच्या बोंबेचा आवाज यांनी सारा गाव दणाणून गेला होता. आमच्या बरोबरची मंडळी जरी बोंबा मारीत होती तरी फोका घालीत नव्हती त्यांचं सर्व लक्ष ढोल वाजवून नाचण्याकडे होतं वर्षातील तीनशे चौसष्ट दिवस वर्ज्य असलेल्या दोन गोष्टी, ढोल वाजवणं आणि बोंब मारणं, एकच दिवस करायला मिळाल्यामुळं उभ्या वर्षाची पुरेपुर वसुली करण्यासाठी प्रत्येकजण मोठ्या आवेशानं ढोल वाजवून नाचत होता.

पहिल्यापहिल्यानं मला ते जरा कठीण गेलं. पण एकदा ढोलांचं घुमणं सुरू झाल्याबरोबर हळूहळू मीही त्यात रंगू लागलो. पूर्वीपासून मला वाद्याची आवड असे. कॉलेजात येण्यापूर्वी मी तबला वाजवायला शिकलो होतो बरोबरच्या विद्यार्थ्यांच्या गाण्याच्या बैठकीत तबला वाजवण्याचं काम मी पुष्कळ वेळ केलं होतं. क्वचित नावाजलेल्या एकाद्या गायकाचीही साथ करण्याची संधी मला लाभली होती म्हणूनच त्या तालाची लय माझ्या डोक्यात शिरताच भान विसरून ज्यावेळी मी रंगून वाजवीत नाचू लागलो, त्यावेळी अण्णा हळूच मला म्हणाले, 'वा गुरुजी!' पूर्वीची सवय आहे वाटतं वाजवायची?'

मी दचकलो आणि भानावर येऊन उत्तर दिलं, 'ढोल नव्हे, तबला.'

नाचत असतांनाच आमचं बोलणं चाललं होतं. अण्णा म्हणाले, 'हे ढोलाचं ओझं पेलतं का तुम्हाला?'

'पहिल्यानं जरा जड वाटलं, पण तालाच्या रंगात आता ओझ्याची आठवण-सुद्धा होत नाही.'

'मोठा नाद आहे नाही हा? ढोल घुमूं लागला, की सारं जग विसरल्यासारखं वाटतं! नाही?'

'क्षणभर असं झालं खरं.'

'पण ढोलावरची महाराची काठी काही और असते. तो नाद काही आमच्या काठीला येत नाही. शिवाय महाराच्या मनगटांत देखील जो जोर असतो त्याची सर आमच्या काठीला यायची नाही. नुसती काठी बडवून चालत नाही ती घासून घुमवली पाहिजे आणि तितक्याच जोरांत डाव्या हाताची थाप पण पडली पाहिजे. तरच खरी लय साधते. —'

वेशीवर आल्यामुळं फेरा थांबला आणि उतरलेले ढोल शेकवण्यासाठी सर्वांनी शेकोटी पेटवली. शेकोटी दिसताच बोंबा ठोकण्याची कळ प्रत्येकाला आली आणि आम्ही गावाबाहेर आलो असल्यामुळं प्रत्येकानं छाती फुगवून एकदा शंख केला.

त्या समुदायात मिसळल्यामुळं मीही केव्हां बोंब ठोकून गेलो हे माझं मलाच कळलं नाही.

ते ध्यानी आलं तेव्हा मला लाज वाटली आणि त्याचवेळी समोर नजर गेली, तो तिथंच किकी विनायकाबरोबर बोलत उभी होती. मी बोंब ठोकल्याचं तिच्या नजरेला पडलं होतं.

मी अगदी शरमिंदा झालो. ढोल टाकून पळून जावं असं क्षणभर मला वाटलं. माझ्या अंतरंगातला पांढरपेशा उसळून जागा झाला होता. माझे कान पकडून तो मला या समुदायाबाहेर खेचू लागला होता. पण–

मी आत्मसंयमन केलं. या गर्दीत मी एकदा घुसलो खरा–आता माघार घेणं म्हणजे नामुष्की होती. सुशिक्षितपणाचा अभिमान टाकून जो मी या उत्सवात सामील झालो होतो, त्याचा सर्वत्रांना जो अभिमान वाटला होता, जी आपुलकी उत्पन्न झाली होती ती आयते वेळी पिछेहाट घेतल्यामुळं नाहीशी झाली असती. खादीच्या प्रचारासाठी नाही का मी सर्वांच्या निंदेला तोंड दिलं ? कुणब्याच्या हातचं अन्न खाण्याच्या बाबतीत ब्राह्मणांनी केलेल्या तीव्र विरोधाला नाही का मी तोंड दिलं ? मग आताच मी माघार का घ्यावी ?

पुन्हा वाटलं, ती सुधारणा होती. ही पिछेहाट आहे. सुधारणेसाठी दाखवलेला निधडेपणा पिछेहाटीच्या बाबतीत योग्य ठरेल का ?

पण ही पिछेहाट देखील सुधारणेसाठीच नव्हती का ? विहीरीत बुचकळत बुडायला आलेल्या माणसाला बचावण्यासाठी विहीरीत मारलेली ही उडी होती. बुडणाऱ्या माणसाइतकाच जरी मी बुचकळत होतो, तरी ते बुडण्यासाठी नव्हतं–तारण्यासाठी होतं.

ही आठवण होताच मला पुन्हा अवसान आलं. अगदी निर्लज्जपणे मी ढोल तापवून गळ्यात घातला आणि मोठ्या रंगानं ढोल वाजवीत, नाचत, माना झुलवीत, फेरा धरतांना मुद्दाम किकीच्या अंगावरून गेलो. विनायक मोठ्यानं हासला ते मला ऐकू आलं

पण किकीचा चेहरा साफ पडला होता. नाचत असतांना मुद्दाम मान वळवून किकीकडे पाहून मी हासत होतो. ती रागाने दातओठ खात असावी असं मला वाटलं. फेऱ्याबरोबरच्या मशालीच्या प्रकाशात तिचा चेहरा भेसूर झाल्यासारखा मला दिसला.

जाखडी अगदी रंगात आली होती. ढोलावरची काठी एका ठेक्यात पडत होती. झोपेतून नुकत्याच जाग्या झालेल्या सिंहाच्या डरकाळीसारखे ढोल डरकाळ्या फोडीत होते––

मी अगदी बेफाम झालो होतो—

तोच कुणीतरी मला मागून डिंवचलं. मी मागं वळून पाहिलं. मला डिंवचण्यासाठी जाखडीच्या फेरावरोबर फिरत किकी माझा पाठलाग करीत होती. मी सापडताच

मला डिवचून ती म्हणाली, 'पुरे झालं आता. द्या तो ढोल कुणाकडे तरी अणि चला घरी.'

माझ्या अंगात वारं संचारलं होतं. मी मोठ्यानं हसलो आणि जोरजोरानं नाचून ढोल बडवू लागलो.

दातातल्या दातात किकी उद्‌गारली, 'मूर्ख, गाढव !'

मी मागं वळून पाहिलं नाही. नाच अगदी ऐन रंगात आला होता. यावेळी मी बाजूला झालो असतो तर मजलसीचा विरस झाला असता.

गावाबाहेर येताच सर्वांनी ढोल खाली ठेवले. मी वळून पाहिलं तो किकी निघून गेली होती.

ठराविक झाड तोडण्यात आलं आणि त्या झाडाची मिरवणूक निघाली. आता जाखडीचा फेरा न धरता झाड उचलून नेणाऱ्या लोकांच्या दोन्ही बाजूला दोन रांगानी उभे राहून आम्ही ढोल वाजवीत होतो. लोक झाड खेळवीत होते. एवढा भला मोठा बुंधा पण तो सहज लीलेने उचलून सर्वांनी कित्येक कदम धावत पुढं जावं आणि पुन्हा तसंच मागल्या पावली हटत कित्येक कदम मिरवणुकीबरोबर मागं जावं, अशा थाटानं आमची मिरवणूक चालली होती. आम्ही ढोलवाले मात्र आपली जागा सोडीत नव्हतो.

मिरवणूक ग्रामदेवतेच्या देवळाजवळ येताच पुन्हा सर्वांनी ढोल खाली ठेवले. पूजेची तयारी सुरू झाली. खणलेल्या खड्ड्यात झाड उभं करण्यात आलं आणि त्याच्या आजूबाजूला लाकडं आणि शेणी रचण्यात आल्या. त्यातली बहुतेक लाकडं जरी लोकांनी खुषीनं आणून दिली होती तरी चोरी करून लाकडं आणल्याशिवाय होळीचा उत्सव साजरा होत नाही असं असल्यामुळं बरीचशी लाकडं कुणी ना कुणीतरी, कुणाच्या ना कुणाच्यातरी घरची चोरी करून, क्वचित् कुणाच्या घरची नासधूससुद्धा करून आणली होती.

सर्व प्रकारच्या बंधनांतून मुक्त होण्याचा हा दिवस होता. आज चोरी हा गुन्हा नव्हता. शिवीगाळ हा गुन्हा नव्हता, घरफोडी हा गुन्हा नव्हता, बोंब मारणं हा गुन्हा नव्हता. शिवाशीव न पाळणं हाही आज गुन्हा नव्हता, या बंधमुक्ततेच्या परंपरेतला हा सर्वातला मोठा विशेष होता.

या एकाच विशेषासाठी मी या उत्सवांत भाग घेतला होता. होळी झाल्यानंतर ढोल खाली ठेवायचे आणि नंतर महारांनी उचलायचे असा शिरस्ता होता. त्यावेळी महाराना शेलापागोटं देण्यात येत असे. केविलवाणे तोंड करून एका बाजूस उभे राहिलेले महार जेव्हा ढोल उचलीत त्यावेळी त्यांच्या मुद्रेवर एकदम तजेला चढे आणि दुप्पट आवेशानं ते ढोल बडवू लागत. एकदा महारानं ढोल उचलल्यावर मग अस्पृश्यतेला सुरवात होई.

इथंच मी माझ्या प्रचारकार्याला सुरवात केली. महारांनी ज्यावेळी ढोल उचलले त्यावेळी मीही ढोलाला हात घातल्याचं पाहून इतरांनी मला निवारण केलं. कुणाचंही न ऐकता मी ढोल गळ्यात चढवला तेव्हा आजवर माझ्याबरोबर अबोला धरलेले बाबीकाका पुढे येऊन म्हणाले, 'आता ढोलाला शिवायचं नाही गुरुजी. आता ढोल महारांनी उचलायचा. आता ढोल उचलील तो महार?'

'मी महारच आहे म्हणा ना!' असं म्हणून मी ढोलावर काठी हाणली.

माझा उद्देश धोंडशेटच्या ध्यानी आला आणि यावेळपर्यंत गळ्यात ढोल न बांधलेल्या धोंडशेटनींही एक ढोल घेऊन गळ्यात घातला.

'हे काय? हे काय?' म्हणत बाबीकाका ओरडत होते. तोच एका महाराच्या हातचा ढोल काढून घेऊन अण्णांनीही आपल्या गळ्यांत घातला.महारांच्या मेळाव्यात मिसळून आम्ही फेरा धरून नाचू लागलो. बाबीकाका मोठमोठ्यानं ओरडत होते, 'अरे, झालं तेवढं पुरे नाही का झालं? धर्म म्हणून काही आहे की नाही? होळी लागली, शिवांशिव सुरू झाली तरीसुद्धा ढोल घालून नाचता आहात! ठेवा तो ढोल खाली धोंडशेट. अरे तुला वेड लागलं का अण्णा?—' ओरडताना बाबीकाकांचा घसा कोरडा पडत होता.

पूर्वीच्या कितीतरी पट रंगात येऊन आम्ही नाचत होतो. आमच्या अनुकरणानं आणखी काही मंडळी महारांच्या कडून ढोल घेऊन गळ्यात बांधून नाचू लागली.

बाबीकाकांच्या अंगाचा भडका झाला होता. ते सारखे ओरडत होते, 'अरे देवाच्या साक्षीनं भ्रष्टाकार करता आम्हां! कुठं खंडाल हे पाप?' महार हंसत होते. पण ते थट्टेनं नव्हे– आनंदानं!

संतापाच्या भरांत बाबीकाका धोंडशेटच्या अंगावर धावून आले आणि त्यांनी ढोलाला हात घातला तेव्हा धोंडशेटनी त्यांना लोटून दिलं. बेसावध बाबीकाका पाय घसरून खाली पडतात एकच हंशा पिकला. रागाच्या तिरमिरीसरशी ते कसाबसा रुमाल डोक्यावर ठेवून धावत जाऊ लागले, तेव्हा सर्वांच्या हंशावर घोडं खिंकाळण्यागत कुणाचं तरी हसणं माझ्या कानी आलं.

वळून पाहातो तो जनी पोट धरधरून हंसत होती. तिच्या हसण्याचा आवाज आजूबाजूला ठोकल्या जाणाऱ्या बोंबांच्या वर ऐकू येत होता. ती हसत आहे असं पाहून सारेच हसू लागले. बोंबांचं रुपांतर हसण्यांत झालं. हसण्याचा एकच हलकल्लोळ उठला.

ती संधी साधून मी एकदम हाक ठोकली, 'स्वामी श्रद्धानंदजी की जय! महात्मा गांधी की जय!'

एकदम हसणं थांबलं आणि दोन्ही महात्म्यांच्या नावाचा जयजयकार साऱ्या गावाला दणाणून टाकू लागला. बोंब मारण्याची सर्वत्रांना विस्मृती झाली. जयजय

कारावर जयजयकार झडत होता. ढोलाचा आवाज त्याला साथ देत होता. महारांच्या हातच्या भक्कम काठीनं ढोलाचा निनाद सारं आकाश घुमवीत होता.

सारे बेफाम झाले होते. सारखे जयजयकार करीत होते आणि त्याचबरोबर स्वतःच्या सामर्थ्याकडेसुद्धा न पाहाता बेहोष होऊन नाचत होते.

चटकन् मला आठवण झाली—मी वळून मागं पाहिलं—जनीच्या शेजारी किकी उभी होती.

दोघीही श्रद्धानंद आणि गांधीजींच्या नावानं जेव्हा जयजयकार करू लागल्या त्याबेळी पहायला जमलेल्या बायकांनीही त्यांच्या शब्दांत आपला शब्द मिसळला.

मला वाटलं, अस्पृश्यतेच्या अभेद्य तटबंदीतली पहिली वीट आम्ही हालवली.

॥ ४ ॥

वादळानंतर

(भारताच्या फाळणीनंतर नौखाली हत्याकांड झाले. त्यातील एका प्रसंगावर आधारलेली हृदयद्रावक कथा–)

तो वेडापिसा झाला होता. दोन वर्षांपूर्वी झालेल्या भयंकर वावटळीत तो सर्वस्वांत झाला होता.

आणि नोवाखालीत अशी पुष्कळशी घरे होती की जिथे असाच प्रत्येक घराचा माणूस सर्वस्वांत झाला होता. ती वावटळ आता निवटली होती. जिकडे तिकडे स्थिरस्थावर झाले होते. तशी गडबड पुन्हा होईल अशी आता भीति सुद्धा नव्हती.

कारण ती राजवटच आता बदलली होती. आता ते पाकिस्तानी झाले होते. हिंदू असूनही हिंदुस्थानशी त्यांचा आता काहीच संबंध राहिला नव्हता. संबंध होता एकच–भाषेचा–राजवट पाकिस्तानची असली, तरी बंगाली भाषा पूर्वीइतक्याच लोभाने सर्वत्र नांदत होती. हिंदुस्थानशी आपला संबंध तुटला, आता आम्ही पकिस्तानी झालो. असे म्हणणारा मुसलमान देखील बंगालीतच बोलत होता. म्हणूनच राजवट बदलली आहे असे कुणाला वाटत नव्हते.

पूर्वीची राजवट तरी मुसलमानांचीच होती ना ? सबंध बंगालभर मुसलमान सत्ता गाजवीत होते. आता हा पूर्व बंगालचा भाग तेवढा पाकिस्तानात गेला होता. म्हणून कित्येकांना काही वाटत होते एवढेच !

प्रत्येकाच्या मनात थोडीशी अढी होतीच. आता तिकडे हिंदूंची राजवट सुरू झाली आहे आणि आपण मात्र तेवढे इकडे या जुन्या राजवटीत अडकून पडलो आहोत, अशी ज्यांना जाणीव होत होती तेवढेच लोक मनातल्या मनात दुःखी होते. बोलून दाखवायचे कुणाला ? जो तो आपल्या मनात चोर होऊन राहिला होता.

आणि मुसलमानांना तरी सर्वस्वी आनंद कुठे झाला होता ? त्या बावटळीत दंगा करणारे तरुण मोठ्या खुशीत होते. त्यांना वाटत होते, की आता स्वर्ग आपल्या हाती आला आहे. त्यांना वाटत होते, की आता आपण राजे झालो. या बाकीच्या लोकांपेक्षा वेगळे झालो. हे बाकीचे लोक कीडमुंगीसारखे धुळीत तोंड खुपसून राहिलेले असताना आपण आता हत्तीसारखे दिमाखात चाललो आहोत.

तरी देखील अंतःकरणातून त्यांना शाश्वती वाटत नव्हती. नवी बिटी नवा डाव झाला होता, हिंदूंना काढून टाकून त्यांच्या जागा आपल्याला मिळतील असे त्यांना वाटत होते– पाकिस्तानच्या अभिमानापेक्षा स्वार्थी पोटभरूपणावर ते नव्या राजवटीचा अभिमान बाळगीत होते.

करीमचाचासारखे जे म्हातारे होते, ते मात्र काहीच बोलत नव्हते. सुख मानावे की दुःख मानावे हे त्यांना कळत नव्हते. हिंदुस्थानच्या महासमुद्रात आपले हे पाकिस्तान बेट झंझावातात कसे तग धरून राहील याची त्यांना शंका वाटत होती. बेफाम तरुणांना आवरणे त्यांना पूर्वी जसे अशक्य झाले होते, तसेच आजही चार बोधाचे शब्द सांगू म्हटले तर ऐकायला कोणी तयार नव्हते. बोलायचेच असले, तर करीमचाचा पूर्वीसारखा नवीनच्याच घरी तसाच येऊन बसे, आणि हुक्का ओढीत ओढीत जुन्या आठवणी काढून क्वचित रडतसुद्धा असे. नवीनचे घर आता उध्वस्त झाले होते–म्हणजे घराच्या भिंती, दारे, खिडक्या कोसळून पडल्या नव्हत्या. घर होते तसेच मजबूत उभे होते.

पण घरांत कोण होतं ? आई नव्हती, बायको नव्हती, बहीणही कुठं परागंदा झाली होती. – अंगण ओस पडले होते. फुलांचे ताटवे वाळून गेले होते. हिरवळीचा कुठं मागमूससुद्धा राहिला नव्हता. चंडीमंडप ओस पडला होता. नोकराचाकरांनी गजबजलेले घर, तिथे आता घरात राहायला नवीनखेरीज दुसरा कुणी माणूससुद्धा राहिला नव्हता. एक गडी होता तोही काम झाले की निघून जाई. बायका नसलेले घर, म्हणून मोलरीण कुणी यायला तयार नसे. एकटे घर, एवढ्या खोल्या, माजघरे, खालच्यावरच्या मजल्यावरची शेजघरे, – सारी काही ओस पडली होती. साऱ्या खोल्यांना कुलपे घालून एकटा नवीन खालच्या खोलीत बिछाना टाकून पडे. देवघरात पूजेकरता जावे लागे, सैंपाकघरात जेवणासाठी, आणि कुणी करीमचाचासारखा शेजारी भेटायला आला तर बाहेरच्या ओटीवर; एवढीच काय ती वर्दळ होती.

घर उध्वस्त झाले होते खरे, पण शेतवाडी, जमीन जुमला सारी काही शाबूत होती. उत्पन्न येत होते, रयत येऊन खंड घालून जात होते. पण पूर्वीच्या भाषेने आता कुणीच बोलत नव्हते. खेड्यावरचा माणूस आला तर दोन संदेश खाऊन एक घोटभर पाणी पी, तसे म्हणणारे घरात कुणीच नव्हते.

करीमचाचा म्हणे, 'ज्याचा त्याचा धर्म ज्याला त्याला आवडतो. कुणाच्या धर्माला कुणी नावं ठेवू नयेत. पण तुमचा हा धर्म-कशी कुणाच्या धर्माला नाव ठेवू? पण तुमचा हा धर्म मला पटत नाही. घरच्या गृहदेवता, कुणी कलमा पढला नव्हता, की कुणी कसला विधि केला नव्हता– त्या बाटल्या कशा? माझं धर्मांतर कर असं सांगायला का त्या गेल्या होत्या? अत्याचार झाले, बळजबरी झाली. तिथं काय त्या देवीची खुषी होती? जुल्म जबरदस्तीनं माणूस बाटतो कसा हेच मला कळत नाही.'

नवीन म्हणे, 'तुम्हाला ते कळायचं नाही चाचा! आमचा धर्म मोठा कडक आहे. ज्याची सावली पडू नये त्याची नुसती सावली पडली तरी सुद्धा प्रायःश्चित्त घ्यावं लागतं आम्हाला. तुम्ही येत होता, आमच्याघरी जेवीत होता– पण आम्ही कधी तुमच्या घरी जेवलो नाही.'

'तेच तर मी म्हणतो,' करीमचाचा म्हणाला, 'तुमच्या घरी जेवलो म्हणून मी बाटत नव्हतो. पण माझ्या घरी तुम्ही जेवला-अगदी साधं स्वच्छ मांस–मासे नसलेलं निर्मळ अन्न तुम्ही जेवलात तर तुम्ही बाटता कसे? तुम्ही मांस खात नाही– मासे खाता–आम्ही मांस खातो–मासे खातो–आम्हीसुद्धा काही रोज गाईचं मांस खात नाही.—सोज्ज्वळ अन्न करून घातलं तर ते खाल्ल्यामुळे तुम्ही मुसलमान झालात असं का तुमचे हिंदु लोक मानतात?'

'ते तुम्हाला कळायचं नाही.' नवीन म्हणाला, 'मोठी कडक आहेत ही आम्हा हिंदूंची धर्मशास्त्रं!'

'मला उलगडाच होत नाही तुमच्या या चालीरीतीचा.' करीमचाचा म्हणाला, 'बळजबरी झाली ती काही खुषीची नव्हती. बळजबरीच ती– कुठं झाली असेल तर कुठं झाल्याचा संशय असेल. हवं तर प्रायश्चित घ्या. पण घरच्या देवता घराबाहेर घालवून देता. या तुम्हाला म्हणावं तरी काय? आज घरची कीर्ति घरात नाही, सोन्यासारखी बायको तुम्ही घराबाहेर घातली, पोराला कोण कुठं घेऊन गेलं असेल कोण जाणे? ही जी बाताहात झाली ती कशापायी? आमच्या लोकांनी अत्याचार केले, पण तुमच्या बायका तुम्ही घराबाहेर का घालवल्या? अत्याचार करणारे आमचे लोक जेवढे अपराधी तेवढेच बायकांना घराबाहेर घालवून देणारे तुम्ही नाही का अपराधी? तो गांधीबाबा सांगत होता, अत्याचाराला बाट नाही त्याचं तुम्ही ऐकलं

नाही अन् ऐकता कुणाचं, तर सूपभर शिध्यासाठी तुमच्या दारी दहा खेटे घालणाऱ्या एका पोटभरू भट्टचाचाचं. गांधीबाबापेक्षां हा भट्टचाचा का मोठा ?'

'ते तुम्हाला कळायचं नाही.' नवीन म्हणाला, 'ते तुम्हाला नाहीच कळायचं ! कशाला हव्यात त्या गोष्टी ? झालं गेलं होऊन गेलं. आता ते काही परत येत नाही.'

'तर मग आता पुन्हा संसार तरी थाट बाबा.' करीमचाचा म्हणाला, 'घरांत देवी नाही तर ते घर कसलं ? मी म्हातारा काय सांगू ? पण सोन्यासारख्या संसाराला आलेली ही अवकळा माझ्यानं काही पाहवत नाही.'

गुडगुडी ओढीत ओढीत करीमचाचा निघून गेला. नवीनला तसेच वाटत होते. तोही प्रयत्न करीत होता. स्थळ शोधून काढण्यासाठी त्याने घटक बोलावून त्यांना काकुळती विनंती करून सांगून पाहिले होते. पण कुठलाच बाप आपली मुलगी नवीनला द्यायला तयार नव्हता.

नवीनचे आपल्या बायकोवर फार प्रेम होते. ते जोडपे मोठ्या सुखासमाधानाने नांदत होते. त्या सुखासमाधानकालाची त्याला क्षणोक्षणी आठवण येत होती. बायकोला घराबाहेर घालवून दिल्यापासून बिछान्यावर पडून रात्रीच्या रात्री त्यानं तळमळून काढल्या होत्या.

तो तरुण होता. नुकती कुठं त्यानं संसाराला सुरुवात केली होती. नुकतीच कुठं त्या उभयतांची दिलजमाई होऊ लागली होती.प्रेमाच्या चेष्टांची त्याला पुन्हा पुन्हा आठवण येत होती. आठवणी झाल्या की त्याच्या हृदयाची कालवाकालव सुरू होई. जीव कावराबावरा होई.

घर सोडून जायच्या वेळची तिची मुद्रा त्याला पुन्हा पुन्हा नजरेसमोर दिसे. ती व्याकुळतीला आली होती. सारखी रडत होती. त्याच्या पायावर डोकं ठेवून आंसवांनी त्याचे पाय भिजवून टाकीत होती.पाठीवर सुटलेल्या तिच्या मोकळ्या केसांचा त्या वेळी पायाला झालेला स्पर्श आठवून आजसुद्धा त्याच्या अंगावर रोमांच येत होते.

ती म्हणाली होती, 'माझा काय अपराध ? का मला ही शिक्षा ? का मी माझं घर सोडावं ? तुम्ही कुठं मला सोडवायला आला होता ? त्या राक्षसानं माझ्या अंगावर हात टाकला तेव्हा तुम्ही दार बंद करून घेतलं. हातातल्या बांगड्या पिचून हात रक्तबंबाळ होईपर्यंत मी दार ठोठावलं पण तुम्ही ते उघडलं नाही– मला आत घेतलं नाही— माझं संरक्षण केलं नाही— म्हणून ना त्यानं माझ्यावर हात टाकला ? म्हणून ना मी भ्रष्ट झाले ? हा माझा का अपराध ? तुम्हाला मी दोष देत नाही-- तुम्ही माझे गुरु, तुम्ही माझे देव, तुम्ही माझ्या भाग्याचे भगवंत, तुम्ही पाठ फिरविली म्हणून ना माझी विटंबना झाली ? हा माझा का अपराध ? मग का मला ही शिक्षा ? का मी माझं घर टाकावं ? करुणा भाकली पण देव आला नाही, निर्दय झाला, त्याची शिक्षा मला का ? देव भ्रष्ट होत नाही, भ्रष्ट होते ती देवी-- गृहलक्ष्मी- बायकांची

दुबळी जात ! पण बलवान म्हणणारा पुरुषच दुबळा होऊन स्वतःला खोलीत कोंडून घेऊ लागला तर दुबळ्या बायकोनं काय करावं ? '

त्यावेळी त्याला उत्तर देता आले नाही. आजही त्याला उत्तर देता येत नव्हते. आत्मानम सततं रक्षेत दारैरपि धनैरपि असे शास्त्रवाक्य सांगून त्याने आपला दुबळा बचाव केला होता. कारुण्याची पराकोटी झालेली तिची मुद्रा आठवून आजही त्याचे अंतःकरण रक्ताचे अश्रू गाळीत होते.

त्याला वाटे, का आपण तिला जाऊ दिलं ? धर्मासाठी ? ही धर्माची का कल्पना ! करीमचाचाही तोच प्रश्न विचारीत होता. त्याला उत्तर देता येत नव्हते; आज घर उजाड पडले होते. तारुण्याचा जोम त्याला अनावर होत होता. पुन्हा लग्न करीन म्हटले तर जिकडे तिकडे बदनामी झाल्यामुळे कोण त्याला आपली मुलगी देत नव्हता.

त्याला आश्चर्य वाटत होते ते हेच की आता कसली भीति होती ? आता अत्याचार करायला कोण येणार होते ? आता का कुणी आपल्याला मुलगी देऊ नये ? काय हे माणसाचे मन ? जुन्या गोष्टी का कुणी उकरून काढाव्या ?

आपला अपराध त्याला जाणवत नव्हता. आपण धर्माचरणाने वागलो या अभिमानाने तो स्वतःला निर्दोष समजत होता. एका निर्दोष जिवाचा आपण घात केला ही जाणीव मुद्दाम विसरून तो स्वतःचं निर्दोषीपण प्रस्थापित करू पाहत होता. पण कुणीच त्याचं समाधान करीत नव्हते.

असमाधानाच्या या भडक्याने पोळत असलेला जीव चौमोहानीत राहून शांत होणार नाही असा विचार करून तो घराला कुलूप ठोकून परदेशी जायला निघाला– हो, परदेशीच ! कलकत्ता आता परदेशी होता. त्या परदेशांत जाताना निरोप घ्यायला करीमचाचाखेरीज दुसरे कुणीच जिव्हाळ्याचे नव्हते. त्या परदेशात जाताना देवाच्या देव्हाऱ्या खेरीज डोके टेकून पायधूळ घ्यायला कुटलेचे वडिलांचे पाय त्याच्या हाताशी नव्हते.

अंगणातील माती मस्तकाला लावून त्याने चौमोहानी गांव सोडले. पैशाची त्याला उणीव नव्हती. कलकत्त्यासारख्या ठिकाणी जाऊन ऐषआरामात राहाण्याइतका पैसा त्याच्या हाती होता. आईचा आशीर्वाद नाही, बायकोची पंचारति नाही, वडिलांची पाखर नाही, स्नेहीसोबत्यांचे धन्यवाद नाहीत. सोबतीला एक पैसा घेऊन तो परदेशगमनाला निघाला.

कलकत्त्याला तो पूर्वी बऱ्याच वेळा गेला होता. पण यावेळी त्याच्या दृष्टीला कलकत्ता शहर बदललेले दिसले. वस्तुतः शहरांत काहीच बदल झालेला नव्हता. बदल झाला तो त्याच्या दृष्टीत.

तो एका वसतिगृहात उतरला होता. एक स्वतंत्र खोली घेऊन जरी तो त्या

ठिकाणी राहत होता, तरीही कुठेतरी स्वतंत्र घर मिळाले असते तर त्याला अधिक बरे वाटले असते. अशा एखाद्या घराच्या शोधात तो होताच.

त्याला काही काम नव्हते. आणि काम करण्याची आवश्यकताही नव्हती. कलकत्त्यांत कुठंतरी स्थायिक होऊन राहावं आणि एखादा घटक हाताशी धरून लग्न करून संसार थाटावा अशी त्याची इच्छा होती. तो आपल्यापरीने विचार करीत होता. शहराबाहेरच्या दृष्टीने त्याने आपले बेत आंखले होते, पण दोन्ही ठिकाणच्या परिस्थितीत किती अंतर होते, याची त्याला कल्पना नव्हती.

मनाप्रमाणे कुठेच काही जमेना. लग्न जुळवण्याच्या मध्यस्थांचे धंदेवाईक काम करणारे घटक कलकत्त्यात त्याला सापडेनात. कलकत्त्यात त्याला कोणी ओळखत नव्हते.

सारा दिवस ट्रॅम किंवा बसमधून उगीच खेटे घालीत तो हिंडत होता. त्या उद्देशहीन भटकण्यामुळे त्याचे मन अधिकाधिक अस्वस्थ होत होते. ट्रॅम किंवा बसमधून जातांना कुणी तरुण जोडपे प्रेमाने बोलत गुजगोष्टी करीत जाताना दिसले की त्याचे मन अनावर होत असे. सुशिक्षित तरुण मुली आता कलकत्ता शहरात पुष्कळशा मोकळेपणाने वावरू लागल्या होत्या, त्या दृष्टीला पडल्या म्हणजे तो कासावीस होत असे.

फिरायला जावे तर ही दृश्ये नजरेसमोर दिसतात आणि न जावे तर खोलीत एकलकोंडेपणाने बसणे असह्य होते—या दुहेरी पेचाच्या परिस्थितीत त्याच्या जिवाची व्याकुळता सारखी वाढत होती. नोकरी करावी असेही एकदा त्याच्या मनात आले होते, पण सारा जन्म मालकी गाजवण्यात घालवलेला असल्यामुळे आपल्या हातून नोकरी होणार नाही असे जे त्याला वाटत होते, तेही तितकेच बरोबर होते.

कलकत्त्याच्या शहरी वातावरणामुळे त्याचे मस्तक भडकू लागले. मनाच्या समाधानासाठी तो शहरात आला होता खरा, पण दिवसेंदिवस ते समाधान त्याच्यापासून दूरदूर पळत होते. स्वाभिमान निसरून नोकरी करून मन कसेबसे गुंतवून ठेवले तरी ते समाधान मिळणार नाही, याची त्याला खात्री होती.

एकच उपाय. त्याच्या नजरेसमोर दिसत होता. तो उपाय करणे म्हणजे नीतीची मर्यादा ओलांडून जाणे होते, असे त्याला वाटत होते. पण नीती आणि अनीतीच्या कल्पना त्याच्या बेफाम मनःस्थितीला काबूत ठेवण्यास असमर्थ ठरल्या. त्याने जिवाचा धडा केला आणि—

त्या दिवशी संध्याकाळी जेवण उरकून तो पायीपायीच घराबाहेर पडला आणि ज्या वस्तीत गेला, ती वस्ती वेश्यांची होती. त्याच्या उरात धडकी भरली होती. मस्तक बधीर झाले होते. भावना उचंबळल्या असल्या, तरी जिवाला आतून कुठून तरी सारखी टोचणी लागली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूला पहात तो लटपटत्या पायानी कसाबसा पुढेपुढे जात होता. इतक्यात एका माणसाने त्याला गाठले. त्याने

काय सांगितले हे त्याला नीटसे कळले सुद्धा नाही. तरीही त्याचा हात धरून तो एका माडीवर चढला. चढत असतांना त्याचे पाय लटलट कापत होते; त्याच्या सोबत्याने जवळ जवळ त्याला ओढूनच वर नेले.

एका सुसज्ज दिवाणखान्यात तो आला त्या वेळी एक अत्यंत वृद्ध बाई त्याच्यासमोर आली. तिने त्याचा हात धरून त्याला तक्क्याशी बसवले आणि त्याच्यावरोवर आलेला माणूस निघून गेला.

ती बाई हिंदु नसावी असे त्याला वाटले. तो पाकिस्तानातून आला होता– पाकिस्तान सोडून हिंदुस्थानात येऊन रहावे म्हणून तो आला होता–नीतीची पायरी ओलांडायची तर ते घर निदान हिंदूंचे तरी असावे असे त्याला वाटले. अडखळत अडखळत त्याने त्या म्हातारीला विचारले. तेव्हा तिने ते घर हिंदूचेच असल्याचे सांगितले. ती म्हणाली 'हा पोषाख पेशाचाच आहे. परदेशांतले आणि परप्रांतातले बरेचसे लोक आता इथे येऊ लागले आहेत. त्यांचा हा आवडता पोषाख आहे. सध्या या पोषाखाला दर आहे– एरवी आम्ही हिंदूच आहोत.' असे म्हणून ती उठली आणि आत गेली.

एक क्षण निघून गेला. तो क्षण त्याला युगासारखा वाटला. त्याने आपल्या खिशाकडे हात नेला. खिशात पाकिट शाबूत होते. अशा जागी किती पैसे द्यावे लागतील, पुरेसे पैसे आपल्यापाशी आहेत का, आहेत तेवढे पुरे पडले नाहीत तर काय करावे, असा कावराबावरा विचार त्याच्या मनात येत होता तोच --

पंजाबी पोषाख केलेली एक तरुणी त्याच्यासमोर येऊन अदबीने मजरा करून बैठकीवर थोडेसे अंतर टाकून जवळच बसली. तिच्याकडे पाहायचा पहिल्याने त्याला धीर झाला नाही. एक क्षणभर तो बसलेल्या बैठकीकडे पाहात होता त्याने वर नजर केली आणि तिच्याकडे पाहिले.

रक्ताची सळक पायापासून मस्तकापर्यंत झणझणून गेली. तारवटल्याप्रमाणे तो तिच्या तोंडाकडे पाहत राहिला होता गालांतल्या गालांत हसून तिने त्याच्याकडे पाहून डोळे मिचकावले.

सर्वांगाला विंचू डसल्यासारखा त्याला भास झाला. पोषाख बदललेला असला तरीही ओळख पटणे कठीण गेले नाही– विशेषतः तिची दृष्टादृष्ट झाली, त्या वेळी तिने जे डोळे मिचकावले–

हो एकांतात असताना ती अशीच डोळे मिचकावीत असे क्षणभर तो बावरला, गांगरला, नंतर घाबरला– घाबऱ्याघाबऱ्याच एक शब्द त्याच्या तोंडून निघाला, 'तू?

'काय वाटतं तुम्हाला?' तिने विचारले.

आपल्याशीच पुटपुटल्यागत तो म्हणाला, 'होय! तूच!!'

'होय ना?' ती म्हणाली, 'मीच! पण ही मी आता ती मी नाही. मी आता कोण आहे ते तुम्हाला कळलं ना?'

बावरल्यासारखा तो तिच्याकडे पाहत राहिला होता. काय बोलावे हे त्याला सुचत नव्हते. ज्या विकारवशतेच्या उद्दाम आवेगाला बळी पडून तो या जागी आला होता, त्या वृत्तींतील पौरुष आता लुप्तप्राय झाले होते. त्याचे सर्वांग गारठून गेले होते. देहाची जाणीवसुद्धा शिल्लक राहिली नव्हती.

ती थोडीशी पुढे सरकली आणि त्याला लगटून बसली. त्याच्या अंगावर शहारे आले. तो झटकन् दूर सरला. कुणीतरी कोलीत घेऊन चरका दिल्यासारखे त्याला वाटले.

तिने अधिकच लगट केली आणि त्याच्या गळ्यात हात टाकला. एक किंचाळी फोडून तो दूर झाला. ती खद्खद् हसत होती– उकळ्यावर उकळ्या येऊन हंसत होती. त्याला ते हसणे राक्षसी वाटले. कुणातरी कैदासिणीच्या कवेत आपण सापडलो आहों आणि ती आता आपल्याला फाडून खाणार आहे, अशी काही तरी मनाची भावना होऊन तो ताड्कन उठून बाहेर जाऊ लागला.

तीही ताड्कन उठली आणि त्याचा हात धरून ओढून तिने त्याला जेव्हा कवटाळून धरले, त्यावेळी त्याच्या डोळ्यापुढे काजवे चमकले. विचाराची भावना समूळ नष्ट झाली होती, त्यामुळे त्याच्या देहावर त्या स्त्रीच्या स्पर्शाचा यत्किंचितही परिणाम झाला नाही

मोठ्या लाडिकपणे ती गोड गोड भाषेत बोलत होती, 'घरी आलेलं गिऱ्हाइक असं जाऊ दिलं तर माझा उदरनिर्वाह कसा चालेल? मी जमीदार नाही– सुशिक्षित नाही– नोकरी करण्याइतकं मला शिक्षण मिळालेलं नाही– आणि विशेष हें की मी एकटी नाही. माझ्या सासूचंही पोषण केलं पाहिजे मला. घराला मुकले– नवऱ्यानं घराबाहेर घालवून दिलं– आता याखेरीज दुसरा कोणता मार्ग '

'बोलू नकोस! बोलू नकोस!!' तो मोठ्याने ओरडला. तरीही ती बोलत होती, 'आता झालं ना रक्षण तुमचं? 'आत्मानम् सततं रक्षेत दारैरपि धनैरपि' असं तुम्ही सांगितलंत! तुमचं रक्षण झालं त्या 'दारे' च्या रक्षणाचा तुम्ही विचार केला नाही! तुम्ही तिला लाथ मारली! धर्मानं तिला लाथ मारली! आप्तेष्टांनी तिला लाथ मारली! तिचं स्थान हेच! देहविक्रयाशिवाय मला मार्ग कोणता होता?–'

क्षणभर थांबून तिने त्याच्या उत्तराची वाट पाहिली. तो सुन्न झाला होता. त्याची बोबडी वळली होती. तडातड बोलून तिची निर्भर्त्सना करावी असे त्याला वाटत होते–पण–त्याला शब्द सुचत नव्हते. त्याची जीभ लुळी पडली होती.

तिचे शब्द तापलेल्या सळयांप्रमाणे त्याच्या कानांत घुसत होते.त्याच्या अंगाचा भडका होत होता. रोमारोमांतून आगीच्या ज्वाळा निघत होत्या. तिला ते कळत

होते–तरीही ती बोलत होती – अत्यंत लाडिकपणे हंसत हंसत बोलत होती. त्या लाडक्या हंसण्यासरशी तिच्या गालाला खळ्या पडत होत्या. तिच्या शब्दात द्वेषाच्या भावनेचा यत्किंचितही भास निर्माण होत नव्हता. ते भाषण एखाद्या वेश्येचे नव्हते–स्वैराचारी स्त्रीचे नव्हते–व्यभिचारी स्त्रीचे तर नव्हतेच नव्हते. तिच्या भाषणात कुलीन माणसाच्या घरच्या कुलवधूच्या वाणीचा मूर्तिमंत गोडवा ओसंडून वाहत होता. एकांतात पत्नी पतीशी ज्या विशिष्ट भावनेने बोलते, त्याच भावनेची मूर्तिमंत जाणीव त्या शब्दावाटे प्रतीत होत होती–पण ती भाषा कुणाची होती—वेश्येची नव्हती खास! कुलवधूची होती का?

ती म्हणत होती, 'तुम्हाला पत्नी नाही–मला पति नाही. तुम्हाला पत्नी नाही म्हणून तुम्ही इथं आला. ज्यांना पत्नी नाही त्यांच्यासाठी मी हे दुकान उघडलं आहे. माझं भाग्य मोठं की गिऱ्हाइक म्हणून तुम्हीच मला लाभलांत. केवढं माझं भाग्य हे? धर्मानं मला लाथ मारली, पण कर्मानं मला तुमची सेवा करायचा सुयोग आणून दिला. केवढी भाग्यवान मी!' क्षणभर थांबून ती म्हणाली, 'आता का लाजता? वेश्येच्या शोधार्थ तुम्ही निघाला होता, तुम्हाला ती मिळाली– या ना आता, तो हात टाका ना माझ्या गळ्याभोवती! असे का पाहता माझ्याकडे? या ना माझ्याजवळ!' असे म्हणून तिने त्याला घट्ट कवटाळले.

तिच्या कवेतून स्वतःला सोडवून घेऊन तो ताडकन उठून उभा राहिला आणि ओरडला, 'नाही! नाही!! नाही!!'

त्या किंचाळीसरशी आत गेलेली म्हातारी धावतच बाहेर आली. तिच्या मागोमाग आणखी एक स्त्री येऊन दाराशी उभी राहिली.

तिच्या कवेतून सुटण्यासाठी तो धडपडत होता आणि ती त्याला कवटाळत होती. तो 'नाही, नाही' म्हणून सारखा ओरडत होता. तिच्याशी धडपड करीत असताना त्याची नजर दाराकडे गेली.

म्हातारीच्या मागे उभी राहिलेली स्त्री दगडाच्या पुतळीसारखी निश्चल होऊन तारवटलेल्या दृष्टीने तो देखावा पाहत होती!

त्याची आणि तिची दृष्टादृष्ट झाली.

'आई! आई!' अशी काळीज फोडून निघालेली हाक त्याच्या तोंडून निघून गेली–

–तो मूर्च्छित होऊन खाली पडला.

संदर्भसूची

लेख :

१. वाङ्मय आणि वास्तववादी यथार्थता.
(५ डिसेंबर, १९३६ रोजी ठाणे येथे झालेल्या मुंबई व उपनगर साहित्य संमेलनाच्या वेळी केलेल्या अध्यक्षीय भाषणातून–'आघात' पृ. ६३ ते ८०)

२. नव्या जगाची निर्मिती. (दीपावली, दिवाळी विशेषांक १९५०)

३. साहित्य आणि प्रेरणा (सत्यकथा, जानेवारी १९६१)

आत्मचरित्र :

४. पहिली मागणी (माझा नाटकी संसार, भाग १, पृ. १ ते ६)
गुरुसहवास (माझा नाटकी संसार, भाग १, पृ. ५१ ते ५८)
प्रकाशक : स्वस्तिक पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ति, ऑक्टोबर १९४१

५. बंगाली रंगभूमि (माझा नाटकी संसार, भाग २, पृ. ५२ ते ७४)
गडकरी यांची भेट (माझा नाटकी संसार, भाग २, पृ. १५१ ते १५७)
ग. पां. परचुरे प्रकाशन, आ. पृ. १५ ऑगस्ट १९५२

६. महाराष्ट्र रंगभूमि आणि राजकारण (माझा नाटकी संसार, भाग ३ पृ. ७४ ते ७९
लोकमान्य टिळक वरेरकरांचे नाटक पाहतात. (माझा नाटकी संसार, भाग ३, पृ. १९२ ते १७४)

: प्रकाशक वसंतकुमार सराफ आ. प. २७ एप्रिल १९५९

नाटकांचा प्रेक्षकवर्ग (माझा नाटकी संसार, भाग ३, पृ. १५३ ते १५६)

७. अधुनिक नेपथ्याचा पहिला प्रयोग. (माझा नाटकी संसार भाग ४ पृ. ५५ ते ६२)

पहिली डॉक्युमेन्टरी (माझा नाटकी संसार, भाग ४, पृ. ९३ ते ९५

गांधीजींचा मिठाचा सत्याग्रह (माझा नाटकी संसार, भाग ४, पृ. १६९ ते १७७)

प्रकाशक : सागर साहित्य प्रकाशन आवृत्ति १ ली, १९६२

नाट्यः

८ हाच मुलाचा बाप, अंक ३, प्रवेश ४ (प्रका. बलवंत पुस्तक भांडार, आवृत्ति अकरावी, एप्रिल १९६१)

९ संन्याशाचा संसार, अंक ३, प्रवेश ४ (प्रका. बलवंत पुस्तक भांडार आवृत्ति तिसरी, ३ डिसें. १९६४

१०. सत्तेचे गुलाम, अंक १, प्रवेश ३ (नवभारत प्रकाशन संस्था, आवृत्ती सातवी, १९८३)

११. सोन्याचा कळस, अंक ४, प्रवेश ३ (प्रका. बलवंत पुस्तक भांडार आवृत्ति पाचवी, जुलै १९५७)

१२. उडती पाखरे (यशोदा साहित्य प्रकाशन) हाजी कासम वाडी डिसेंबर १९४० अं. ४ था पृ. ९७ ते ११२)

१३. सारस्वत, प्रकरण दुसरे (पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४)

१४. भूमिकन्या सीता, अंक ४, पृ. ८४ ते ९० (प्रका. पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७. प्रथमावृत्ति, २७ एप्रिल १९५५)

एकांकिका व नभोनाट्यः

१५. नवा जमाना (वरेरकरांच्या एकांकिका – ३ पॉप्युलर प्रकाशन, मुंबई प्रथम मुद्रण, २२ सप्टेंबर, १९६२)

१६. जरठ ('माणसाच्या सात अवस्था' आकाशवाणीसाठी लिहिलेली नभोनाट्य मालिका – अप्रकाशित)

कादंबरी आणि कथाः

१७. दैव आणि दैवी. (सात लाखातील एक, प्रकरण १६ पृ. १४१ ते १४८ प्रका. अभिनव प्रकाशन, मुंबई १४, आवृत्ति २ री १९६०)

१८. मी पुन्हा ढोल घेतला (मी– रामजोशी, प्रकरण सहावे. पृ. ३७ ते ४४ प्रका. शेठ हिरजी मोहनजी, प्रथमावृत्ति, ऑक्टोबर १९४१)

१९. पुढाऱ्यांचा पुढारी (धावता धोटा, उत्तरार्ध. प्रकरण ५ वे. पृ. २६५ ते २७१ अभिनव प्रकाशन, मुंबई १४. व्दितीय आवृत्ति, २७ एप्रिल १९७२)

२०. वादळानंतर (कथा) ('दीपावली' विशेषांक १९४८)

कै.भार्गवराव विठ्ठल तथा मामा वरेरकर

वाङ्मय व संदर्भ सूची

वाङमय

● **नाटके :**

१. कुंजविहारी (१९१४)
२. वरवर्णिनी अथवा सती सावित्री (१९१४)
३. हाच मुलाचा बाप (१९१७) ४. संन्याशाचा संसार (१९२०)
५. सत्तेचे गुलाम (१९२२) ६. तुरुंगाच्या दारांत (१९२३)
७. लयाचा लय (१९२३) ८. नवा खेळ (१९२४)
९. करग्रहण (१९२७) ९. करीन ती पूर्व (१९२७)
११. पतित पावन (१९३१) १२. पापी पुण्य (१९३१)
१३. संसार (१९३२) १४. सोन्याचा कळस (१९३२)
१५. जागती ज्योत (१९३३) १६. नामा निराळा (१९३३)
१७. सदा बंदिवान (१९३३) १८. स्वयंसेवक (१९३४)
१९. समोरासमोर (१९३७) २०. कोरडी करामत (१९३९)
२१. उडती पाखरे (१९४१) २२. सारस्वत (१९४२)
२३. माझ्या कलेसाठी (१९४२) २४. चला लढाईवर (१९४४)
२५. न मागता (१९४४) २६. सिंगापुरांतून (१९४४)
२७. सिंहगड (आवृ.२ री,१९४५)
२८. संन्याशाचे लग्न (१९४५) २९. जिवाशिवाची भेट (१९५०)
३०. दौलतजादा (१९५०) ३१. द्वारकेचा राजा (१९५२)
३२. अपूर्व बंगाल (१९५३) ३३. भूमिकन्या सीता (१९५५)
३४. लंकेची पार्वती (१९५५) ३५. संजीवनी (१९६०)

अनुवादित नाटक :

१. चन्द्रशेखर अथवा समर्थ भिकारी (१९३४) [मूळ लेखक : विल्सन बॅरेट]
२ तिलाच ते कळतं (१९५१) [मूळ लेखक : जेम्स बॅरी]
३ ठाकुरांची नाटके (१९६२) [मूळ लेखक : रवींद्रनाथ ठाकुर]
४ वनहंसी (१९६२) [मूळ लेखक: हेन्रीक इब्सेन]
५. खेळघर (१९६५) [मूळ लेखक: हेन्रीक इब्सेन]

एकांकिका :

१. कडक लक्ष्मी (१९४४) २. जागलेली आई (१९५०)
३. तीन एकांकिका (१९५०) [सहलेखक: मो. ग. रांगणेकर]
४. वरेरकरांच्या एकांकिका : १ (१९६१) ५. वरेरकरांच्या एकांकिका : २ (१९६१)
६. वरेरकरांच्या एकांकिका: ३ (१९६२)

कादंबऱ्या :

संसार की संन्यास ? (१९११) ['भाव शर्मा' या टोपणनावाने]
१. चिमणी (१९२६) २. विधवा कुमारी (१९२८)
३. गोदू गोखले, पूर्वार्ध (१९३२) ४. गोदू गोखले, उत्तरार्ध १९३३)
५. धावता घोटा (१९३३) ६. परत भेट (१९३४)
७. उघडझांप (१९३५) ८. कुलदैवत (१९५३)
९. विकारी वात्सल्य (१९३६) १०. उमलती कळी (१९३७)
११. वेणू वेलणकर (१९३७) १२. मलबार हिल अर्थात् सौंगडी (१९३८)
१३. पेटते पाणी (१९३९) १४. भानगड गल्ली (१९३९)
१५. गीता (१९४०) १६. तरते पोलाद (१९४०)
१७. न पुजलेली देवता (१९४०) १८. सात लाखातील एक (१९४०)
१९. फाटकी वाकळ (१९४१) २०. मी – रामजोशी (१९४१)
२१. शिपायाची बायको (१९४३) २२. तोंड मिळवणी (१९४४)
२३. द्राविणी प्राणायाम (१९४४) २४. झुलता मनोरा (१९४६)
२५. लढाईनंतर (१९४७) २६. स्थित्यंतर (१९५४) [आणि इतर सहा लेखक सात लेखकांनी लिहिलेली]

शरच्चंद्र चतर्जी यांच्या अनुवादित कादंबऱ्या :

१. चंद्रनाथ (१९३) २. श्रीकांत, भाग १ ते ४ (१९३९ ते १९४१)

३. गांव-गंगा (१९४१) ४. भैरवी (१९४२)
५. माधवी (१९४३) (संपादित : अनु. पु. वा. कुळकर्णी)
६. विजया (१९४३) ७. विराज वहिनी (१९४३)
८. पंडित महाशय (१९४४) ९. परिणीता (१९४४)
१०. विप्रदास (१९४४)
११. अनुराधा, सती परेश (१९४६) १२. देवदास आणि विंदूचे बाळ (१९४६) १३. शुभदा १९४७)
१४. अरक्षणीया (१९४७) १५. शेष प्रश्न (१९४७)
१६. गृहदाह पूर्वार्ध व उत्तरार्ध (१९४८) १७) नवविधान (१९४८)
१८. सव्यसाची (१९४८) १९. अखेरची ओळख (१९४९)
२०. चरित्रहीन (१९४९) २१. छोटा भाई (१९४९)

• बकिमचंद्र चतर्जी यांच्या अनुवादित कादंबऱ्या :

१. आनंदमठ (१९५२) २. इंदिरा व युगलांगुरीया (१९५४) (संक्षेपित)
३. कपालकुंडला (१९५४) (संक्षेपित)
४. कृष्णकांताचे मृत्युपत्र (१९५४) (संक्षेपित)
५. चंद्रशेखर (१९५४) (संक्षेपित) ६. दुर्गेशनंदिनी (१९५४) (संक्षेपित)
७. मृणालिनी (१९५४) (संक्षेपित)
८. रजनी व राधाराणी (१९५४) (संक्षेपित)
९. राजसिंह (१९५४) (संक्षेपित)
१०. विषवृक्ष (१९५४) (संक्षेपित)
११. देवी चौधुराणी (१९५५) (संक्षेपित)
१२. सीताराम (१९५५) (संक्षेपित)

• प्रभातकुमार मुकर्जी यांच्या अनुवादित कादंबऱ्या :

१. रत्नदीप (१९५५) २. सौभाग्य (१९५५) ३. सत्यबाला (१९५६)

• कथा

१. खैरसंचार (१९३२) २. षोडशी (१९३६)
३. वैमानिक हल्ला १९३८) ४. एकादशी (१९४४)

• अनुवादित कथा

१. अभागीचा स्वर्ग, हरिलक्ष्मी, महेश (१९४८) (मूळ लेखक) शरदचंद्र चतर्जी)

२. पथनिर्देश (१९५१) (मूळ लेखक शरदचंद्र चतर्जी)

३. अनुपमेचं प्रेम (१९५८) (मूळ लेखक : शरदचंद्र चतर्जी)
४. एकविंशति (१९६०) (मूळ लेखक : रवींद्रनाथ ठाकुर)

रहस्यकथा :

१. दुर्जनांचा काळ (१९५१) २. धूर्त एदलजी (१९५१)
३. युक्तिरण (१९५१) ४. घड्याळी घालमेल (१९५२)
५. तारकेचा खून (१९५२) ६. तोडीस तोड (१९५२)
७. पडकी छावणी (१९५२) ८. बिनवारशी वारस (१९५२)
९. महंताचा सूड (१९५२) १०. अंधारी कैदी
११. खराट्याचे गूढ १२. डाकूचा हंडीबाग
१३. डिटेक्टिव्ह मोगरे १४. निळा हिरा
१५. फुलीवाला १६. बडा भाई
१७. बाहुलीचे गुपित १८. भिकाऱ्यांचा राजा
१९. भुयारांत महन्त २०. भेदी खाजिना
२१. रबरी रहस्य २२. लंकेच्या समुद्रांत
२३. लंगड्याची शिकार २४. संजीवन चहा
२५. सर्कशीत खून

भाषणे :

१. आघात (१९३६) २. महाराष्ट्र साहित्य संमेलन, २८ वे अधिवेशन, धुळे अध्यक्षीय भाषण १९४४.

आत्मचरित्र

१. माझा नाटकी संसार, खंड १ला (१९४१)
२. माझा नाटकी संसार, खंड २रा (१९५२)
३. माझा नाटकी संसार, खंड ३रा (१९५९)
४. माझा नाटकी संसार, खंड ४था (१९६२)

इतर

१. निबंधमाला, खंड २ रा (१९६४) (मूळ लेखक : रवींद्रनाथ ठाकुर)
२. गजाननस्मृति (१९२८)

परीक्षणे

१) **उघडझांप :**

- मोडक, बा. रा. (विश्ववाणी डिसेंबर १९३५ : पृ. १८९)

२) **उडती पाखरे :**

- * (समाजस्वास्थ्य : मे १९४३ : पृ. २४७)
- * (समाजस्वास्थ्य : जून १९४३ : पृ. २६७)

३) **कुंजविहारी :**

- नाडकर्णी, मं. भा. (अरुणमाला : जून १९२८ : पृ. २६)
- भोळे, केशवराव (हंस : नोव्हेंबर १९५० : पृ. ११)

४) **कोरडी करामत :**

- परांजपे, शकुंतला (समाजस्वास्थ्य : सप्टेंबर १९३९ : पृ. ८०)
- माडखोलकर, ग. त्र्यं. (उषा : एप्रिल १९४० : पृ. २६)

५) **गोदू गोखले :**

- चिटणीस, लीला (महिला : डिसेंबर १९३३ : पृ. २१)

६) **चिमणी :**

- काळे, पु. श्री. (रत्नाकर : ऑक्टोबर १९२६ : पृ. ७२५)

७) **जागती ज्योत :**

- एक श्रोता (प्रतिभा : २४ एप्रिल १९३३ : पृ. १)
- कशाळकर, कमला (प्रतिभा : १९ जून १९३३ : पृ. ९)

८) **जिवाशिवाची भेट :**

- र. धों. के. (समाजस्वास्थ्य : मार्च १९५० : पृ. २०६)
- * (आलोचना : जुलै १९६७ : पृ. २६)

९) **झुलता मनोरा :**

- प्रधान, ग. प्र. (महाराष्ट्र साहित्य पत्रिका : सप्टेंबर १९४७ : पृ. ४२)

१०) **तरते पोलाद :**

- * (उषा : सप्टेंबर १९४० : पृ. १७)
- * (मनोहर : डिसेंबर १९४१ : पृ ८५३)

- * (महाराष्ट्र साहित्य पत्रिका : पौष शके १८६२ : पृ. ८९)
- मराठे, रा. म. (समीक्षक : ऑक्टोबर १९४० : पृ. २१)

११. **दौलतजादा :**

- र. धों. क. (समाजस्वास्थ्य : मे १९५० : पृ. २५६)

१२. **धांवता धोटा :**

- पवार, दत्ता (नवशक्ति : १९ मे १९७४ : पृ. ५)
- सामंत, र. ज. (पारिजात : डिसेंबर १९३४ पृ. ४४)

१३. **न पुजलेली देवता :**

- अनिरुद्ध (मनोहर : जून १९४० : पृ. ४६)

१४. **नवा खेळ :**

- * (प्रफुल्लता : फेब्रुवारी १९२५ पृ ३७)

१५. **पापी पुण्य :**

- 'चंपक' (प्रगति : १ ऑक्टोबर १९३१)

१६. **पेटते पाणी**

- परांजपे, शकुंतला (समाजस्वास्थ्य : सप्टेंबर १९३९ : पृ. ७६)
- माडखोलकर, ग. त्र्यं. (उषा : एप्रिल १९४ : पृ. २६)

१७. **फाटकी वाकळ :**

- कर्वे, र. धो. (समाजस्वास्थ्य: जानेवारी १९४२: पृ. २१४)

१८. **भानगड गल्ली :**

- माडखोलकर, ग. त्र्यं. (उषा: मार्च १९४० : पृ. ९)

१९. **भूमिकन्या सीता :**

- देसाई, व. शां. (सह्याद्रि : जुलै १९५५ : पृ. २०)
- भट, गो. के. (सत्यकथा: सप्टेंबर व ऑक्टोबर ११५५: पृ. अनु. ९७ व २९)
- हस्तक, उषा (प्रतिष्ठान : एप्रिल १९७१: पृ. १४)

२०. **भैरवी :**

- निरंतर, गं. भा.(महाराष्ट्र साहित्य पत्रिका: पौष शके १८६४ : पृ. ७७)

२१. **मलबार हिल:**

- चिंदरकर, वि. द. (उषा: नोव्हेंब १९३८: पृ. ४५)

२२. **माझ्या कलेसाठी :**

- अरविंद (यशवंत : ऑक्टोबर १९४२ : पृ. ४)
- कुलकर्णी वा. ल. (समीक्षक: ऑक्टोबर १९४२ : पृ. ३८)

२३. **मी रामजांशी :**

- * मनोहर : मार्च १९४२ : पृ. ७५
- कर्वे, र. धों. (समाजस्वास्थ्य : जानेवारी १९४२ : पृ. २१४)

२४. **लढाईनंतर :**

- र. धों. क. (समाजस्वास्थ्य : मे १९४८ : पृ. २४७)
- राजाध्यक्ष, मं. वि. (साहित्य : ऑगस्ट १९४८ : पृ. ७०)

२५. **विजया :**

- दीक्षित, वि. वि. (सह्याद्रि : जून १९४४ : पृ. ३३९)

२६. **विधवा कुमारी :**

- * (विद्यासेवक : जून १९२९ : पृ. २७)
- खांडेकर, वि. स. (अरुणमाला : नोव्हेंबर १९२८ : पृ. १७)
- बंबेवाले, कमला (गृहलक्ष्मी : आगस्ट १९२८ : पृ. ४१)

२७. **वेणू वेलणकर :**

- देशपांडे, स. वि. (यशवंत : एप्रिल १९३७ : पृ. २७)

२८. **शेष प्रश्न :**

- र. धों. क. (समाजस्वास्थ्य : जून १९४८ : पृ. २७८)
- वैद्य, सरोजिनी (सत्यकथा : एप्रिल १९६९ : पृ. ६)

२९. **श्रीकांत :**

- पोवळे, श्रीकृष्ण (नयन: ऑगस्ट १९४० : पृ. ६२)

३०. **संजीवनी :**

- लेले, पु. रा. (रंगभूमि : वर्ष ५, अंक ३ : स्व. पृ. १)

३१. **सत्तेचे गुलाम :**

- आत्मानंद (महाराष्ट्र साहित्य : मार्च - एप्रिल १९२४ : पृ. ३९२)
- कानिटकर, रा. प्र. (प्रगति : सप्टेंबर १९३१)
- दिघे, प्र. तु. (प्राविण्य : डिसेंबर १९३६ : पृ. ४७)
- देशपांडे, स. वि. (नवयुग : जून-जुलै १९२२ : पृ. ३५६)
- निःपक्षपाती (नवयुग : जानेवारी १९२३ : पृ. ३६)
- लेले, पु. रा. (मासिक मनोरंजन : जुलै १९२२ : पृ. ७९)

३२. **संन्याशाचा संसार :**

- किणीकर, रॉय (प्रगति : ६ ऑगस्ट १९३१)

३३. **समोरासमोर :**

- विष्णुशर्मा (यशवंत : ऑक्टोबर १९३७ : पृ. २७)

३४. **सात लाखांतील एक :**

- बाबूराव (मनोहर : जून १९४१ : पृ. ३६९)

३५. **सारस्वत :**

- * (समाजस्वास्थ्य : डिसेंबर १९४२ : पृ. १४७)
- कुलकर्णी, वा. ल. (समीक्षक : डिसेंबर १९४२ : पृ. १६३)

३६. **सिंगापुरांतून :**

- वाळिंबे, रा. शं. (महाराष्ट्र साहित्य पत्रिका : आश्विन शके १८६६ : पृ. १९६)

३७. **सोन्याचा कळस :**

- कुलकर्णी, भि. ना. (यशवंत : मार्च १९३२ : पृ. ८९)
- कुलकर्णी, वि. ह. (रत्नाकर : मे १९३२ : पृ. ३३९)
- फडके, र. कृ. (नवजीवन : एप्रिल १९३२ : पृ. ७६)

३८. **स्वयंसेवक :**

- * (नवजीवन : ऑगस्ट १९३४ : पृ. ९२)

३९. **स्वैरसंचार :**

- काळे, के. नारायण (प्रतिभा : १६ जानेवारी १९३२)

४०. **हाच मुलाचा बाप :**

- कुलकर्णी, वा. ल. (प्रतिष्ठान : सप्टेंबर-ऑक्टोबर १९६५ : पृ. १)
- बर्वे, अ. वा. (रंगभूमि : वर्ष ७, अंक १–२ : स्व. पृ.१)
- बेहेरे, ना. के. (मासिक मनोरंजन : जून १९१७ : पृ. ४४२)

साहित्यकाविषयक लेख

- आमोणकर, दि. वि. – श्री. वरेरकर यांची सामाजिक नाटके (प्रविण्य डिसेंबर १०३६ : पृ. ३९)
- कंटक, सां. घ. – वरेरकरांचे वाङ्मय वैचारिक आहे; वैचारिक नाही (उषा : मे १९४० : पृ १४)
- कर्वे, र. धों. – महाराष्ट्राचे नाटककार श्रीयुत मामा वरेरकर यांच्या कलेचा परिचय (मनोहर : एप्रिल १९४० : पृ ४)
- कुलकर्णी, व. दि.–मामाच्या दोन मानस कन्या (मांडवी : मे १९६३ : पृ. ५८)
- गोखले, वा. दा.–मामांच्या कादंबऱ्यांतील 'महिला' (प्राविण्य : डिसेंबर १९३६ : पृ. २५)
- गोमकाळे, द. रा.–मामांची मौलिक नाट्य-सेवा (मांडवी : मे १९६३ : पृ. ५२)
- चिंदरकर, वि. द.–वरेरकरांच्या लघुकथा (प्राविण्य : डिसेंबर १९३६ : पृ. ३३)
- देसाई, व. शां.–तीन तासांची नाटके [त्यांची गरज; वरेरकरांचे कार्य] (रत्नाकर : सप्टेंबर १९२९ : पृ. ६५५)
- नाईक, वसंत–श्री. वरेरकरांचे वाङ्मयीन विचार (नवजीवन डिसेंबर १९३२ : पृ. ७९)
- नाडकर्णी, ज्ञानेश्वर–मामा आणि मराठी रंगभूमि (मांडवी : मे १९६३ : पृ. ४९)
- नातू, मनमोहन–भूतकाळातले 'भा. वि.' (केसरी : २७ सप्टेंबर १९६४ : पृ. ५)
- पटवर्धन, वि. मा. दी. –वरेरकरांचा विनोद (हंस : जून १९४७ पृ. १९)
- पेंडसे, आप्पा–वरेरकर : व्यक्ति आणि वाङ्मय (प्राविण्य : डिसेंबर १९३६: पृ. ४३)
- पेंडसे, आप्पा–वरेरकरांची वाङ्मयीन महात्मता (पारिजात : ऑगस्ट १९५५)
- पै, रा. मा. –मराठी रंगभूमीला नवे वळण लावणारे मामा वरेरकर (महाराष्ट्र टाईम्स : ४ ऑक्टोबर १९६४ : पृ. ५)

• बेंद्रे, प्रभाकर–वरेरकरांची नाट्यरचना (वसंत : ऑक्टोबर १९६३ : पृ. १९)

• मानकर, सुंदर–मामांच्या चित्रपट कथा (प्राविण्य : डिसेंबर १९३६ : पृ. २९)

• रवींद्र भारती–वरेरकरांच्या कादंबऱ्या (महाराष्ट्र टाईम्स : २८ एप्रिल १९६३ : पृ. ३)

• वैद्य, गो. वि. –कादंबरीकार वरेरकर (मराठवाडा : दिवाळी अंक १९६३ : पृ. ४५)

• वैद्य, गो. वि. –कै. भा. वि. तथा मामा वरेरकर (वाङ्मय शोभा दिवाळी अंक १९८२ : पृ. ५६)

• वैद्य, गो. वि. –नाटककार मामा वरेरकर (हेमांगी : दिवाळी अंक १९८२ : पृ. ८२)

• सावळापूरकर, पां. कृ. –'करीन ती पूर्व' नायक विचार (युगवाणी : फेब्रुवारी १९५८ : पृ. १०)

साहित्यविषयक ग्रंथ

• बैतुले, मा. के. – नाटककार वरेरकर (१९५७)

• मोहरीर, भ. प्र. – वरेरकरांच्या कादंबऱ्या (१९५७)

• गोमकाळे, द. रा. – वरेरकर आणि मराठी रंगभूमि (१९५८)

व्यक्तिविषयक

• कै. मामा वरेरकर [संपादकीय] (महाराष्ट्र टाईम्स : २५ सप्टेंबर १९६४: पृ. ४)

• कै. मामा वरेरकर [संपादकीय] (लोकसत्ता: २५ सप्टेंबर १९६४: पृ. ४)

• मामा वरेरकर [संपादकीय] (साहित्य सहकार: ऑक्टोबर १९६४: पृ. ३)

• श्री. भार्गवराम विठ्ठल वरेरकर (महाराष्ट्र सारस्वत: फेब्रुवारी १९३७: पृ. २)

• श्री. मामा वरेरकर (यशवंत : मे १९४३: पृ. २)

• आंबेकर, वि. बा. – मामा वरेरकर (अमृत : दिवाळी अंक १९६४ : पृ. १७९)

• कंटक सां. घ. – हसत मुखाचे कष्टी साहित्यिक मामा वरेरकर (मांडवी मे १९६३ : पृ. ६३)

- कुलकर्णी, अरविंद–मराठी कादंबरीला शरच्चंद्रांचा मानदंड देणारे मामा वरेरकर (मुंबई सकाळ : २ जानेवारी १९७७ : पृ. ४)
- खांडेकर, वि. स. – नाट्य तपस्वी वरेरकर (मनोहर : मे १९५८ : पृ. ४२)
- गुप्ते प्र. के. – महाराष्ट्राचे मामा (सत्यकथा : डिसेंबर १९४४ : पृ ६)
- गोस्वामी मानव प्रकाशम् – काको न गरुडायते (रत्नाकर : डिसेंबर १९३२ : पृ. ८९३)
- जोशी, श्रीपाद – मला दिसलेले मामा वरेरकर (मांडवी : मे १९६३ पृ. ५६)
- ताह्मणे, ग. बा. – मामा वरेरकर (कथामाला : ऑगस्ट १९७४ : पृ १०
- देशभक्त, शं. कृ. – श्री. भा. वि. वरेरकर (ध्रुव : ऑक्टोबर १९३५ पृ. ५५०)
- नवरे, नी. शं. – महाराष्ट्राचे मामा (सत्यकथा : डिसेंबर १९४४ : पृ. ५)
- नाडकर्णी, रमेश – आजचा खराखुरा 'सारस्वत' : सुप्रसिद्ध साहित्यिक भा. वि. ऊर्फ मामा वरेरकर (महाराष्ट्र सारस्वत : एप्रिल १९४३ : पृ ८२)
- नाडकर्णी, ज्ञानेश्वर – अपूर्व मामा (ललित : दिवाळी अंक १९६४ : पृ.४१)
- नाडकर्णी, ज्ञानेश्वर–शेजाऱ्याच्या दृष्टिकोणातून मामा (परचुरे : एप्रिल १९६३ : पृ. ८)
- नेरूरकर, प्र. श्री. –वरेरकर मामांचे आठवे श्राद्ध (नवशक्ति ८ ऑक्टोबर १९७२ : पृ २)
- परिचित-सव्यसाची साहित्यिक मामा वरेरकर नवनीत (एप्रिल १९६३) पृ. १०)
- पेंडसे, आप्पा–मामा (लोकसत्ता : २० जून १९७६ पृ. ६)
- भट, सुधा–मामा वरेरकर (साहित्य सहकार : ऑक्टोबर १९६४ : पृ. ३)
- माडखोलकर ग. त्र्यं–मुंबई साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (ज्योत्स्ना : डिसेंबर १९३६ : पृ. १३
- माडखोलकर, ग. त्र्यं. – रत्नागिरी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष (ज्योत्स्ना मे १९४० : पृ २३)
- रांगणेकर, मो. ग. –२४ तासांत मामा (हंस : दिवाळी अंक १९६१ : पृ. ८७)
- रांजणकर, यशवंत–मामा वरेरकर (कथासागर : मे १९६ : पृ. ३९)

- राजाध्यक्ष, मं. वि. – मामाचा वाडा चिरेबंदी (मनोहर : मे १९६३ : पृ. २)
- राजाध्यक्ष, मं. वि. – मामांची कमाई (वसुधा : जून १९ २ : पृ. ३१)
- लाड, पु. मं. – मराठीचे श्रेष्ठ व ज्येष्ठ नाटककार [षष्ट्यब्दिपूर्तिनिमित्त केलेले भाषण) (मौज : एप्रिल १९४३)
- लेले, वा. के. – साहित्यतपस्वी कै मामा वरेरकर (जीवनविकास : फेब्रुवारी १९६५ : पृ. ६४२)
- लेही, म. ना. – मामा वरेरकर (अमृत : एप्रिल १९६३ : पृ. ८६)
- वर्टी, अ. वा. – शतायु होवोत (श्रीयुत : मे १९६३ : पृ. ७६)
- वागळे, वच्चूबाई – मामांचा महिम (प्राविण्य : डिसेंबर १९३६ : पृ. ३७)
- वैद्य, गो. वि. – मामा वरेरकर : एका अनोरख्या व्यक्तित्वाला स्मृत्यंजाडी (गोमंतक : २४ सप्टेंबर १९७२ : पृ. ८)
- वैद्य, गो. वि. – साहित्यिकांच्या जीवनातील विनोद व आख्यायिका (ध्रुव : ऑक्टोबर १९४९ : पृ. ३०५)
- शिंदे, मा. कृ. – अष्टावतारी मामा (प्राविण्य : डिसेंबर १९३६ : पृ. ३)
- शेळके, शांता – मामा वरेरकर : एक रेखाटग (सत्यकथा : मे १९६३ : पृ. ९)
- सातोस्कर, बा. द. – संमेलनाध्यक्ष वरेरकर (रागिणी : डिसेंबर १९४४ : पृ. ३७)

ग्रंथांतर्गत

- प्रदक्षिणा (आवृ. ४ थी, १९६८), पृ. ६३, २५३.
- 'मी का लिहितो ?' (१९४९), पृ. १७.
- अत्रे, प्र. के.–हुंदके (१९६९), पृ. ५२.
- अत्रे, प्र. के.–गुद्दे आणि गुदगुल्या (१९८०), पृ. ११९.
- कानडे, मु. श्री.–कालचे नाटककार (१९६७), पृ. १७९, २०८.
- कुलकर्णी, दा. वि.–मराठी कथा (स्वरूप आणि आस्वाद : १९७६), पृ. २८५.
- कुलकर्णी, भीमराव–ऐतिहासिक मराठी नाटके (१९७१), पृ. २३७.
- कुलकर्णी भीमराव–देवाची माणसं (१९८१), पृ २१.

- कुलकर्णी, व. दि.–साहित्य : रूप आणि गंध (१९७६), पृ ७०.
- खांडेकर, वि. स.–धुंधुर्मास (१९४०), पृ. १७.
- खांडेकर, वि. स.–मराठीचा नाट्यसंसार (१९४५), पृ. ६३.
- खानोलकर, गं. दे. –अर्वाचीन मराठी वाङमयसेवक, सप्तम खण्ड (१९६७), पृ. १५८.
- गडकरी, माधव– असा हा महाराष्ट्र, भाग १ ला (१९६५), पृ. १०९
- जोशी, प्र. न. – मराठी वाङमयाचा विवेचक इतिहास [अर्वाचीन काल] (१९७९), पृ. २७६, ३५९.
- ताम्हणे, ग. वा. – रेंगाळणारे सुगंध (१९७९), पृ. १४.
- दाण्डेकर, मालती– अष्टनायिका (१९६१), पृ. १०३
- दाण्डेकर, वि. पा– मराठी नाट्यसृष्टि, खंड १ ला, पौराणिक नाटके (१९४१), पृ. १५६, २६२, २८४.
- दाण्डेकर, वि. पा. – मराठी नाट्यसृष्टि, खंड २ रा, सामाजिक नाटके (१९४५), पृ. १५०
- दाण्डेकर, वि. पा.– मराठी साहित्याची रूपरेषा [इ. स. १८८३ ते इ. स.-१९५०] (१९५२), पृ. १३३, २२३.
- देशपांडे, अ. ना. – आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास, भाग २ रा, १९२० ते १९५० (पुनर्मुद्रण, १९७०), पृ. ९४, २०२.
- देशपांडे, कुसुमावती– मराठी कादंबरी [पहिले शतक] (आवृ. ३ री, १९७३), पृ १८९.
- देशपांडे, बालशंकर–मराठीचे मानकरी (१९६४) पृ. ३१४.
- देशपांडे, वा. ना.– विमार्शनी (१९६१) पृ. १८८.
- देसाई, ह. वि.-- मोठ्यांच्या मुलाखती (१९४०), पृ. ८६.
- देसाई–लिमये आधुनिक मराठी वाङमय दर्शन (आवृ. २ री, १९८१) पृ. २००, २४४.
- पंगु, द. सी. –पुष्पांजलि (१९४८), पृ. १.
- पाटील, ग. ह. आणि गं. भा. निरंतर–मराठी वाङमयाचा इतिहास, पृ. ९९, १२६.

- पेंडसे, लालजी–साहित्य आणि समाज जीवन (१९३५), पृ. १०६,
- बनहट्टी, श्री. ना. –मराठी नाट्यकला आणि नाट्यवाङ्मय (१९५९), पृ. १७०
- बापट, प्र. पा. आणि ना. वां. गोडबोले–मराठी कादंबरी [तंत्र आणि विकास] (आवृ. ३ री, १९७३), पृ. २८२.
- भट, गो. के. –मधुधारा (१९५३), पृ. ११९.
- भावे-दाते वाङ्मय प्रकार : नाटक : एक अभ्यास (१९८०-८१) पृ. १९४.
- माडखोलकर, ग. त्र्यं. –परामर्श (१९४३), पृ. ३२.
- माडखोलकर, ग. त्र्यं. –माझे आवडते लेखक (१९३९), पृ. ५९.
- माडखोलकर, ग. त्र्यं. – वाङ्मय-विलास (१९३७), पृ. ५१.
- माडखोलकर, ग. त्र्यं. – साहित्य शलाका (१९७०), पृ. १०७, १५५.
- मोहरीर, भ. प्र. – अनुभूति च अभिव्यक्ति (१९५८ ,) पृ. ७७, १६५.
- रांगणेकर, मो. ग. : संपा. : – मी आणि माझे लेखन (१९४३) पृ. ४३.
- लाड, पु. मं. – आकाशगंगा (१९५७), पृ. ७८.
- लिमये, शकुंतला – पौराणिक नाट्यसृष्टी (१९७८), पृ. १४१.
- शिखरे, दा. न. – आजकालचे साहित्यिक (१९३९), पृ. ७७.
- शिखरे, दा. न. – नाटककार, पुस्तक २ रे (पुनर्मुद्रण, १९६३) पृ. ८२
- शिखरे, दा. न. – मराठीचा परिमल, खंड १ ला (१९५२) पृ. ३७९.
- शिखरे, दा. न. – मराठीचा परिमल, खंड २ रा (१९५३), पृ. १८६.
- शेवडे, इंदुमती – मराठी कथा : उगम आणि विकास (१९७३) पृ. २८०
- सरवटे, वि. सी. – मराठी साहित्य समालोचन : १८१८ – १९३४ (१९३७), पृ. ३७८, ४८५, ५०९.

निवडक असंग्राहित लेख

संकीर्ण

● अत्रे यांची उत्कृष्ट कृति– 'साष्टांग नमस्कार' (उषा : ऑक्टोबर १९३९ : पृ. ५)

● अश्लीलतेची कल्पना कुणाची ? इंग्रजांची की भारतीयांची ? (जीवन : मे १९४४ : पृ. ३२)

● आमचा लैंगिक न्यूनगंड (जीवन : सप्टेंबर १९४१ : पृ. ४८)

● आलमआरा ते अमर ज्योति (प्राविण्य : ऑक्टोबर १९३६ : पृ. ९)

● उद्याची रंगभूमि (यशवंत : नोव्हेंबर १९४३ पृ. ३६)

● १९३५ पूर्वीच्या नाट्यसंस्था आणि नट (युगवाणी : जानेवारी १९५९ : पृ. ४९)

एच. ओ. एच. प्रदर्शनातील जपानी खेडे (प्राविण्य : मार्च १९३४ : पृ. ७)

● 'काळी राणी' कादंबरीवरील चर्चा (समीक्षक : ऑगस्ट १९४१ : पृ. १०)

● 'जाऊ मी सिनेमात ?' [परीक्षण] (उषा : मे १९४० पृ. ७)

● जिवंत वाङ्मयाच्या निर्मितीला पोटतिडिकच हवी (मनोहर : मे १९४५ : पृ १६१)

● टॉकी आणि संवाद (प्राविण्य : ऑक्टोबर-नोव्हेंबर १९३३ : पृ. ११७)

● डॉ. कान्होबा रणछोडदास कीर्तिकर (प्रभु प्रभात : नोव्हेंबर १९३४ : पृ. २)

● तरुणाचे प्रेमविषयक थोतांड (जीवन : ऑक्टोबर १९४१ : पृ. ४७)

● न लिहिलेली पुस्तके; काही प्रश्नोत्तरे : (सत्यकथा : मे १९६३ : पृ. १४)

● नाच्या पोऱ्या अर्थात समलिंगी संभोग [मराठी रंगभूमीच्या संबंधात] (जीवन : डिसेंबर १९४१ : पृ. २७)

● नाटककार कोल्हटकर (सुबोध : डिसेंबर १९३३ : पृ. ४४)

● नाटककार खाडिलकर (प्राविण्य : जानेवारी १९३४ : पृ. ९३)

● पुणे महाराष्ट्राचे केंद्र नव्हे-सनातनी क्षेत्र (प्रतिभा : मे १९३६ : पृ ९)

● पुन्हा एकदा 'कीचकवध' [प्रा. श्री. के क्षीरसागर यांच्या 'हंस' दिवाळी अंक १९५० मधील लेखाचे खंडन; पूर्वार्ध आणि उत्तरार्ध] (हंस : मार्च व एप्रिल १९५१ : पृ. २१)

● प्रचाराचे प्रभावी माध्यम–तमाशा (नवभारत : दिवाळी अंक १९४७ पृ. ११)

● प्रजानिर्मिति पशु व पुरुष (जीवन : जुलै १९४२ पृ. ४१)

● प्रतिभा-साधन (पारिजात : मार्च १९३४ : पृ. २८)

● बंगाली रंगभूमीचा सूत्रधार (हंस : ऑक्टोबर १९४६ : पृ. ६९)

● (एडवर्ड-आठवे) बाईलवेड कीं स्वातंत्र्यप्रियता ? (प्रतिभा : फेब्रुवारी १९३७ : पृ. ११७)

● बालविवाहच बरे का ? (बकुल : जानेवारी १९४१ : पृ. २)

● मराठीत उत्कृष्ट नाट्यवाङ्मय निर्माण झालेच नाही (उषा : जानेवारी १९४० : पृ. ६)

● मराठी नाटकाचे जनक (प्रतिभा : मे आणि जून १९३५ : पृ. अनु. ४ व २५)

● मराठी भाषेची मुलुखगिरी (वीणा : फेब्रुवारी १९३८ : पृ. ३)

● मराठी रंगभूमि : काल आणि आज (श्रीदीपलक्ष्मी : दिवाळी अंक १९६१) पृ. ५१)

● मराठी रंगभूमि : जुनी आणि नवी (श्रीदीपलक्ष्मी : दिवाळी अंक १९५९ : पृ. १०)

● मराठी रंगभूमीची शंभरी (समीक्षक : जानेवारी १९४४ : पृ. ३९)

● मराठी राज्य (श्रीदीपलक्ष्मी : जुलै १९५९ : पृ. ५)

● मराठी वाङ्मयावरील संकटे (उषा : एप्रिल १९३८ : पृ. ४)

● (कर्वे, र. धों.) महाराष्ट्रांतील लोकविलक्षण गृहस्थ (मनोहर : नोव्हेंबर १९४३ : पृ. ५६५)

- (ओगले, गोपाळ अनंत) माझे दादा (ज्योत्स्ना : जून १९४० : पृ. ७३)
- रंगभूमि आणि विश्वविद्यालये (रागिणी : वर्ष १, अंक ४, १९४३ : पृ. ४)
- रंगभूमि तेव्हा आणि आता (परचुरे : फेब्रुवारी १९६२ : पृ. १००)
- रंगभूमि - मानवी आणि यांत्रिक (प्रतिभा : फेब्रुवारी १९३७ : पृ. १४५)
- लोकवाङ्मयाची निर्मिती झाली पाहिजे (पूजा : नोव्हेंबर १९४७ : पृ. ९)
- लोकसाहित्याचे सामर्थ्य (ध्रुव : जानेवारी १९४५ : पृ. २४५)
- वासना व सक्तीचे ब्रह्मचर्य (जिवन : मार्च १९४२ : पृ. ४६)
- शंभरीची फिरती (महाराष्ट्र प्रतिभा : मार्च १९४४ : पृ. ६)
- (डॉ.) शरच्चंद्रांची संपूर्ण 'श्रीकांत' भाग १,२,३ व ४– प्रचार वाङ्मयाचा आदर्श (समीक्षक : जुलै १९४१ पृ. २)
- समाजातील 'परवाजी' ची परंपरा (जीवन : नोव्हेंबर १९४१ : पृ. ४९
- 'सवतीमत्सर' नाटकाचा प्रयोग (रंगभूमि:फेब्रुवारी-मार्च १९२८ : स्व पृ१)
- साहित्य आणि प्रेरणा : नाट्य (सत्यकथा : जानेवारी १९६१ : पृ ३८)
- 'साहित्य' चा विशेषांक (जमाजस्वास्थ्य : जून १९४७ : पृ. २४९)
- सिनेमा आणि नाटक (ज्योत्स्ना : जून १९३८ पृ. ७७)
- सोलापुरीं वांङमय (नामदेव एप्रिल १९४१ पृ ५७)
- हिंदुस्तानी सेवादल (प्राविण्य : ऑगस्ट १९३० : पृ. ३०)

आत्मविषयक

- कहाणीची कहाणी ['सात लाखातली एक' च्या लेखनाच्या संदर्भात] (सत्यकथा : जुलै १९५९ : पृ ४१)
- नाट्यलेखनातील माझे काही नवीन प्रयोग (नवनीत : मे १९६३ : पृ. ९७)
- पहिल्या बायकोच्या हयातींत दुसरे लग्न (सामानस्वास्थ्य : मार्च १९४३ : पृ. २०९)
- भा. वि. वरेरकर [मामा वरेरकरांनी भा. वि वरेरकरांची ओळख करून देण्याचा केलेले प्रयत्न] (साधना : दिवाळी अंक १९५३ पृ. ५८)
- माझे आवडते नट (रागिणी : आक्टोबर नोव्हेंबर १९४३ : पृ. ६१)

● माझे कादंबरी लेखन (विहंगम : मार्च. एप्रिल १ ३६ : पृ. ५ १)

● माझे पहिले पुस्तक (ललित : फेब्रुवारी १९६४) पृ. ५११

माझे बालपण (अमृत : जुलै १९६० : पृ. १२७)

माझे लेखन (श्रीदीपलक्ष्मी : फेब्रुवारी १९६४ : पृ. १३)

● माझ्या आयुष्यांतील सत्यकथा : जिवंतपणी भुडलेला कैलासवास (सत्यकथा फेब्रुवारी १९४१ पृ . ३३)

'माझ्या कलेसाठी' – खुलासा (समाजस्वास्थ्य : नोव्हेंबर १९४२ : पृ. ११४)

माझ्या नाटकांतील माझी आवडती अपत्ये (अरुण-माला : जुलै आणि ऑगस्ट १९२९ : पृ. अनु. १९ व २१)

● मी आणि माझी आवडती नाटके (रोहिणी : एप्रिल १९५८ : पृ. ४४)

● मी कादंबऱ्या का लिहिल्या (मनोहर : एप्रिल १९४० : पृ. ८)

● मी पाहिलेली अविस्मरणीय नाटके (सत्यकथा : एप्रिल १९४४ : पृ. २३)

● मी व माझे टीकाकार (ज्योत्स्ना : ऑक्टोबर, नोव्हेंबर १९३६ व जानेवारी १९३७ : पृ. अनु १०, १३ व ८)

● मी हा वाङ्मय प्रकार का लिहितो ? (सुषमा : मार्च १९६१ : पृ. १७)

● वाङ्मयविनिमयाच्या प्रचारासाठी माझे पूर्वभारतातील परिभ्रमण (मनोहर : एप्रिल १९४६ : पृ. ९५)

● 'सत्तेचे गुलाम' [आठवणी] (सत्यकथा : जुलै १९४७ : पृ. ५६)

● (डॉ.) सहस्रबुद्धे यांचे स्वभावलेखन आणि माझे वाङ्मय (उषा : नोव्हेंबर १९३९ : पृ. ९)

● 'सारस्वत' नाटकाचा प्रयोग (समाजस्वास्थ्य : डिसेंबर १९४२ : पृ. १४७)

● साहित्योपजीवनासाठी माझी धडपड (मौज : २८ एप्रिल १९४३)

भाषणे

● २४ वे महाराष्ट्र साहित्य संमेलन (यशवंत : मे १९४० : पृ. ६)

● नगरचे मराठी साहित्य संमेलन (ज्योत्स्ना : मे १९३९ : पृ. ६९)

● मराठी भाषेचा उत्कर्ष कशाने होईल ? (ध्रुव : जून १९३९ : पृ. १८१)

● मराठी रंगभूमि शतसांवत्सरिक उत्सव, लष्कर ग्वाल्हेर (महाराष्ट्र विस्तार : डिसेंबर १९४३ : पृ. ३३५)

● रत्नागिरी साहित्य संमेलन (समाजस्वास्थ्य : जून १९४० : पृ. ३८५)

विशेषांक, पुरवणी

● प्राविण्य, डिसेंबर १९३६

● मांडवी, मे १९६३

अभ्यास ' हा प्रबंध प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई विद्यापीठात १९६२ साली सादर केला.

REFBK-0023857

न वी प्र का श ने :

गर्भश्रीमंतीचं झाड : पद्मजा फाटक १६
ललित लेख : दुसरी आवृत्ती

दृष्टीआडच्या सृष्टीत : कृष्णाबाई मोंट १६
उपेक्षितांचे अंतरंग

नरकपुरी गवसली : श्री. अ. डांगे ८
तुरुंगातील अनोखे अनुभव

देवनवरी : प्रेमानंद गज्वी ५
देवदासींच्या प्रश्नावरील प्रक्षोभक नाटक

चकवा : माधुरी भिडे १६
बाल गुन्हेगार जगतातील अनुभव कथा

लग्न आणि इतर कथा : शिरीष पै १६
'लग्न' या विषयावर आधारित चौदा कथा

पाखरे भिरभिरती अंबरी : भानू शिरधनकर २०
पक्षी दर्शन

शिमाळ आलं शिमाळ आलं ! : भानू शिरधनकर १२
दर्यावर्दी जीवनाचा वास्तव झलक

दलित साहित्याच्या निमित्ताने : डॉ. सदा कऱ्हाडे १०
'दलित साहित्या' चा वैचारिक शोध

उद्विग्न सरोवर : शांताराम (प्रा. के. ज. पुरोहित) १६
कथासंग्रह

पहाड, पाणी आणि परी : दा. वि. जोगळेकर १५
कश्मीर, कांगडा, कुलू मनाली प्रवास

अभिनव प्रकाशन, मुंबई १४.

मुखपृष्ठ : सर्वोदय प्रिन्टर्स, मुंबई ४